म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४२३

# वीर पुरुष

अथवा

# नामर्दांचा मर्द हिंदु कसा होईल ?



REFBK-0003290

'ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ।'

कि. १ रु.

लेखक-स. बा. धामणकर.

केवळ प्रौढ वाचकवर्गाकरितां

# खरा वीर पुरुष

अथवा

## नामर्दांचा मर्द हिंदु कसा होईल ?

लेखक व प्रकाशक—

रा. रा. स. बो. आमणकर,
मु. पो. आपटे, ता. पनवेल.

REFBK-0003290

मुद्रकः—रा. रा. शंकर नरहर जोशी, "चित्रशाळा प्रेस"
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.

किंमत १ रुपया.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३ | ६ | लोकवायकोकडून | लोकनायकाकडून |
| ३१ | १३ | देखलि | देखील |
| ,, | १५ | ,, | ,, |
| ,, | २१ | रोटाव्यिवहार | रोटीव्यवहार |
| ,, | २६ | नानलें | मानलें |
| ३२ | ५ | परिष्ठांनीं | वरिष्ठांनीं |
| ,, | ६ | स्वमावास | स्वभावास |
| ४५ | ५१ | कालगति | कलागती |
| ४५ | १ | आय | आर्य |
| ,, | २ | हातें | होतें |
| ६७ | २५ | वर्चस्य | वर्चस्व |
| ८२ | १७ | वुद्धाचि | वुद्धीचे |
| ९३ | १८ | व | न |
| ९७ | ६ | का | वा |
| ९८ | १४ | सवयी नामर्दपणा | सवयी वगैरे नामर्दपणा |

# अर्पणपत्रिका.

यथाकाल यदृच्छया व्यक्ताव्यक्त रूपांत क्रमानें संकुचित,
विकासित होत राहणाऱ्या एकमेवाद्वितीय अशा विश्वा-
धार ज्ञानमय प्रभूंतच जीवजगताचा सर्व पसारा अभेद-
रूपानें पाहण्यास शिकविणाऱ्या थोर आर्य-
संस्कृतीच्या विस्तारसंरक्षणाच्या भयं-
कर होऊन राहिलेल्या पवित्र रणक्षेत्रा-
वरील कर्तव्यधारातीर्थांत आनंदानें
अवगाहन क्रीडा करीत असतानाच
तन्मय वृत्तींतच अकस्मात देहे
विसर्जन करण्याची सुसंधी
साधली गेल्यानें सायुज्य
मुक्ति प्राप्त होणाऱ्या
परम भाग्यशाली
आर्यवीरांना
समर्पित.

…ालय ठाणे
दा. क्र. ३२९०…

ता. ……

दा. नि. क्र. ……
ता. …… ……

हिंदु महासभेचे अध्यक्ष, पूज्य धर्मवीर,

डॉ. मुंजे.



' इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि । '

सं. १९८२
३२९०.

## हिंदुमहासभेचे अध्यक्ष परमपूज्य डॉ० वा० शि० मुंजे यांची

# प्रस्तावना.

'नामर्दांचा मर्द हिंदु कसा होईल ?' या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्यास मला आनंद वाटतो. कारण या पुस्तकांत जीं मतें प्रतिपादिलीं आहेत. तीं बहुतांशीं मला सम्मत असून माझ्या स्वतःच्या मतांस दुजोरा देणारीं अशीं आहेत.

हिंदु समाजावर, हिंदु संस्कृतीवर आणि हिंदु धर्मावर सध्यां जी इस्लामी आपत्ती आली आहे ती पूर्वींच्या इस्लामी आपत्तीच्या तुलनेनें पाहतां विलक्षण तर खरीच, पण तिच्यापेक्षां विशेष परिणामकारक आणि अधिक नाश करणारी आहे यांत शंका नाहीं. हिंदुस्थानच्या अंतःस्थिती संबंधानें गैरमाहितगार असे मुसलमान लोक हातांत केवळ तरवार घेऊन पूर्वीं हिंदुस्थानांत शिरले. परशिया-मध्यें पारशी धर्माचा व पारशी संस्कृतीचा आणि अफगाणिस्थानांत हिंदुधर्माचा आणि हिंदु संस्कृतीचा जसा आपण केवळ तरवारीच्या जोरावर नायनाट केला तसा हिंदुस्थानांतहि हिंदुधर्माचा आणि हिंदु संस्कृतीचा नायनाट आपण करूं शकूं असें त्यांस वाटलें व या महत्त्वाकांक्षेनेच त्यांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या.

'शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते ।' ( मनु ) या ब्राह्मणांनाही वेळीं हातीं शस्त्र धरण्यास सांगणाऱ्या तेजस्वी धर्मतत्वाचा लोप होऊन उलट 'अहिंसा परमो धर्मः' याच जैन आणि बुद्ध, बेंगरूळ अशा धर्मतत्वाचा लोकांत अगोदर प्रसार होत आल्यामुळें, सर्वसाधारण लोक नेभळे होत चाललेच होते. त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत तर थोड्या रजपुतांखेरीज त्या मुसलमानांस कोणीच फारसा अडथळा केला नाहीं. अर्थात त्या रजपुतांचा पुढें पराजय होऊन जरी हिंदुस्थानांत मुसलमानांनीं साम्राज्य स्थापलें, तरी परशिया आणि अफगाणिस्थानांत-ल्याप्रमाणें तरी हिंदुस्थानांतील हिंदुधर्माचा आणि हिंदुसंस्कृतीचा त्यांस समूळ विध्वंस कधींच करतां आला नाहीं. हिंदुधर्माचा नाश करण्याकरितां हातांत नंगी तरवार घेतलेला असा मुसलमान, सर्वांना रात्रंदिवस सर्वांपुढें उभा असलेला

दिसे. त्यामुळें सर्वजण आपसांतील भेदभाव विसरून शेवटपर्यंत त्याच्याशीं धर्मा-करितां लढत. लढतां लढतां त्यांनीं आपल्या रक्ताचे पूर वाहविले, तरी त्यांच्या-बायकामुलांचे तांडेच्या तांडे मुसलमानी देशांत गुलाम करून नेण्यांत आले आणि कित्येकांस येथेंच बाटवून मुसलमान करण्यांत आलें. हिंदूंचीं देवळें भ्रष्ट करून मूर्ति फोडण्यांत आल्या आणि युद्धांत येथील राजांचा पराभव करून मुसलमानांनीं आपलें राज्य स्थापलें. हिंदु लोक धर्मभावनेनें लढत पण मुसल-मानांस आपण जिंकूं शकूं असा त्यांस आत्मविश्वास वाटत नसे. पुढें श्रीशिवाजी महाराज आणि श्रीमंत पेशवे यांच्या नेतृत्वाखालीं ती स्थिति पालटली. मुस-लमानांविरुद्ध लढायांत मराठ्यांस एकामागून एक जय मिळत गेले आणि त्याचें पर्यवसान अखेरीस मुसलमानी साम्राज्य उलथून टाकून मराठ्यांनीं आपलें साम्राज्य स्थापलें.

पण मुसलमानांस आम्ही जिंकूं शकतो–जिंकतो–या आत्मविश्वासाबरोबर अहंकार बुद्धीही महाराष्ट्रांत उत्पन्न झाली; आणि ती, आम्हीच मुसलमानांस जिंकलें अशा जातिनिष्ठ स्वाभिमानानें पुढें बळावली. वास्तवीक हिंदवी स्वराज्य स्थापण्याच्या कार्यांत कोणत्या जातीचा उपयोग झाला नाहीं ? सर्व जातींचा झाला. ब्राह्मण प्रभु मराठे महार मांग या सर्वांनीं खांद्याला खांदा लावून आपलें क्षत्रियत्व प्रकट केलें आहे. सर्वांनीं प्रसंगविशेषीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून दुसऱ्यांस वाचविलें आहे. ब्राह्मणांप्रमाणें प्रभूंनींही तरवार व लेखणी सारख्याच कुशलतेनें चालवून दाखविली. केवळ साहसाच्या कामांत मराठ्यांची बरोबरी कोणीच करूं शकला नाहीं. व महार मांगानी देशभक्ति आणि स्वामीनिष्ठा दाखविण्यांत पराकाष्ठाच केली मिळून युद्धप्रसंगीं सर्वजण सारखे वागले असतांना शत्रूचा पराजय करून घरीं आल्यावर सोयरिकीच्या वगैरे भोजनप्रसंगीं प्रभु-मराठ्यांस पंक्तींत बसवून घेण्याला आणि महार मांगास बिछायतीवर बसवून घेण्याला ब्राह्मणांस विटाळ वाटूं लागला. ही गोष्ट स्वराज्य संस्थापनेच्या कार्यां-तील बरोबरीच्या कार्यकर्त्यांस कशी खपावी ? प्रबल मुसलमानांची बादशाही उलथून टाकून महाराष्ट्रानें ज्या संयुक्त बळावर हिंदवी स्वराज्य स्थापन केलें, ती एकच गोष्ट महाराष्ट्रांत नवीन मनू उदय पावला, नवें युग सुरू झालें, याची साक्ष म्हणून मानण्यांत यावयाला पाहिजे होती. परंतु ब्राह्मणानें त्यावेळीं प्रसंग-चातुर्य दाखविलें नाहीं. आढ्यतेच्या काळांतील चोचले त्यास सुचूं लागलें; आणि वेदोक्त व क्षत्रियत्वाचा वाद उपस्थित करण्यांत आला.

मुसलमान आटोक्यांत आले होते खरे पण मुसलमानी संकटापेक्षांही मोठें असें जे इंग्रजांचे सर्वग्राही संकट पुढें उभें होतें व त्यामुळें जी परिस्थिति प्रत्यहीं बनत होती तिकडे व तिच्या पासून होणाऱ्या परिणामाकडे ब्राह्मणानें दुर्लक्ष केलें. ' कलावाद्यंतयो स्थितिः ' हे वचन मागील पुढील संदर्भ लक्षांत न घेतां समोर धरून, हिंदुस्थानांत आतां क्षत्रिय व वैश्य राहिलेच नाहींत त्या अर्थी प्रभु मराठे यांना वेदोक्ताचाहि अधिकार नाहीं असें म्हणत, त्यांनीं समाजांत कलह माजविला. हिंदुधर्म बुडविण्याकरितां हातांत तरवार घेऊन पुढें उभें असलेले मुसलमानी संकट दिसत होतें म्हणून ब्राह्मण प्रभु मराठे महार मांग खांद्याला खांदा लावून पूर्वी एकत्र लढत होते. त्या मुसलमानी संकटाच्या जागीं आलेलें इंग्रजी संकट काय प्रकारचें होतें याची, तें संकट अनावर होईपर्यंत ओळखच कोणाला पटली नाहीं. त्यामुळें असलेली हिंदु संघटनाही नाहींशी होत होत अधिकार वैभवांत हीं वेदोक्तें सुचलीं, जाति वैमनस्यें वाढलीं, आणि हिंदवी स्वराज्य बुडालें. क्षत्रियत्वाचें प्रत्यक्ष कार्य केलेलीं माणसें डोळ्यासमोर दिसत असतांना आतां आमच्यांत क्षत्रियच नाहींत, या म्हणण्यांतच आम्ही फुशारकी मानूं लागलों.

पूर्वजांबद्दल आम्हांला आदर कमी म्हणून आम्ही असें म्हणतों असें कोणाला वाटण्याचें कारण नाहीं. कांहीं झालें तरी मोठीच माणसें तीं. त्यांचें गुण मोठे तसेच त्यांचे दोषही मोठे. राज्यें कमावणारे तेच आणि अर्थात घालविणारेही तेच. आम्हाला कमवायाचेंही नाहीं आणि जवळच नसल्यामुळें घालवायचेंही नाहीं. परंतु वेळ आली म्हणजे असल्या गोष्टींची मीमांसा एवढ्याचकरतां करावी लागते कीं पुढच्यास लागलेली ठेच पाहून तरी मागचा शहाणा व्हावा, व समाजांत उत्पन्न झालेले दोष काढले जाऊन समाजाची सुसंघटना व्हावी आणि पुन्हां स्वराज्य कमविण्यास समाज समर्थ व्हावा.

हिंदवी स्वराज्याच्या अमदानींत आमच्या जातिविशिष्ट समाजरचनेमुळें, धार्मिक आणि सामाजिक अशा ज्या ज्या प्रकारच्या अडचणी पदोपदीं मार्गांत येत, त्या सगळ्यांचा अनुभव, थोडया प्रमाणांत कां होईना, पण गेल्या चार पांच वर्षांत नागपुरांत हिंदू मुसलमानांत कटकट सुरू झाल्यापासून आम्हाला आला आहे. या कडू अनुभवानें शहाणा होऊन मी असें निःशंकपणें सांगूं शकतों कीं या लोकशाहीच्या कालांत हल्लींच्याच जातिसंस्थेस जर आम्ही चिकटून राहिलों तर—अभ्युदय लांबच राहिला पण—नाश मात्र आज किंवा उद्या

ठेवलेला आहे. पुण्याकडील बुद्धि, सातारा कोल्हापूरकडील शक्ति, आणि महाराष्ट्र दरिद्री ह्मणून गुजराथकडील संपत्ति या तीन गोष्टी, भांडल्याशिवाय एकत्र करायच्या, भांडल्याशिवाय त्यांच्या जोरावर राज्य कमवायचें आणि न भांडतां तें टिकवायचें, या गोष्टी फार दुर्घट आहेत, यापेक्षां कालमानाकडे लक्ष देऊन धर्मशास्त्रीय वचनांप्रमाणें समाजाची रचना केल्यास हीच गोष्ट अधिक सुसाध्य होईल असें वाटतें. नाहीं तर वाळूच्या पायावर जशी मागें पूर्वजांनीं स्वराज्याची इमारत उभारून पाहिली, तशीच चूक आपल्याही हातून होईल, ह्मणून सावधगिरी ठेवली पाहिजे. हल्लींच्या जातिसंस्थेचे शास्त्रीय सामाजिक संघटन पूर्वकालीन वर्णव्यवस्थेंत केल्याशिवाय स्वराज्य साध्य होणें शक्य नाहीं, ही गोष्ट सर्वांनीं ओळखून ठेवावी. ब्राह्मणब्राह्मणेतरासारखे जे वाद हल्लीं समाज पोखरून त्यास धुळीस मिळवीत आहेत, ते, हें मर्म ओळखल्या शिवाय मिटायचे नाहींत आणि कोणास मिटवितांही येणार नाहींत. याप्रमाणें मनाचा निश्चय केला नाहीं, तर या जगांत दिवसेंदिवस विकट होत चाललेल्या जीवन कलहांत हिंदू समाज स्वाभिमानानें आणि आत्मविश्वासानें इतरांशी स्पर्धाही करूं शकणार नाहीं. एके बाजूस ख्रिस्ती धर्म आणि दुसरे बाजूस इस्लामी धर्म या कैचींत सांपडलेला हिंदुधर्म, जिवंत तरी राहील किंवा नाहीं याचीच शंका वाटते.

बुद्धिभेद करणारी, बुद्धीस भ्रम पाडणारी, अशी एक मोहक कल्पना आपल्या हितशत्रूकडून लोकांसमोर मांडण्यांत येते कीं, हिंदुधर्माचा, संस्कृतीचा व समाजाचा नायनाट करून टाकण्याचा आजपर्यंत पुष्कळांनीं प्रयत्न केला परंतु कोणीही अजूनपर्यंत ज्याअर्थी नायनाट करूं शकले नाहींत त्या अर्थी, हिंदु, पुढें केव्हां तरी नामशेष होण्याची जी ही भीति लोकांसमोर उभी करण्यांत येत आहे ती निरर्थक आहे. पण हा युक्तिवाद साफ खोटा आहे. कारण पुराणांतरीं सांगितलेल्या इतिहासावरून आपल्याला कळून येते कीं, हिंदुधर्मीयांची संख्या साठ पासून बासष्ट कोटीपर्यंत होती. आणि आज तर फक्त बावीस कोटी भरत आहे. तेव्हां समाजाचा नायनाट होण्याची भीति व्यर्थ म्हणावी तर मधली ही चाळीस बेचाळीस कोट प्रजा कोठें गेली ? आणि काय झाली ? काय झाली पहा. सबंद अफगाणिस्तान आपल्या डोळ्यांदेखत जो चातुर्वर्ण्यात्मक सनातन धर्मांत होता इतकेंच नाहीं तर ज्यांतील काबूल आणि कंदाहार या शहरीं १०२०पर्यंत ब्राह्मण आणि क्षत्रिय राजे राज्य करीत होते, तो अफगाणिस्तानदेश आपल्या धर्मांतून निघून कधींच यवनमय झाला. त्यानंतर सबंद काश्मीर जो अधुनिक पौराणिक

हिंदु संस्कृतीचा जनकदेश तोही तसाच यवनमय झाला. मोठ्या मुष्कीलीनें तेथें आज शेकडा तीन घरें हिंदूंची सुटलीं असून त्यांचीही शाश्वति धरवत नाही. त्याचप्रमाणें पूर्वबंगालही यवनमयच झालेला आहे. त्यांत कांहीं कांहीं गावांत तर शेकडा पांच दहाही हिंदु सापडायचे नाहींत. जवळ जवळ तीच स्थिति मलबारची आणि सिंधचीही झालेली आहे आणि आज पंजाबची तशी होऊं पहात आहे. याप्रमाणें हिंदुसमाजास आणि संस्कृतीस ओहोटी लागलेली दिसत असतांना, डोळ्यावर कातडें ओढणें, याला कोण शहाणपणा म्हणेल ? नुसतें नाहीं तर हिंदूंवर आणि त्यांच्या पवित्र संस्कृतीवर नामशेष होण्याचें हें जिवंत संकट आहे, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. पूर्वींच्या याच प्रकारच्या आणि आजच्या या संकटांत तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां सध्यांचे संकट तर अधिक भेसुर आणि अधिक परिणामकारक आहे. पूर्वींच्या काळीं हिंदुसमाजांत आजच्याप्रमाणें इतका बुद्धिभेद माजलेला नव्हता. त्या काळीं जातिसंस्थेच्या उच्चनीचतेमध्यें सर्व लोक जसे कांहीं मुरून गेल्याप्रमाणें सुखानें वागतांना दिसत. तरवार घेतलेला मुसलमान म्हणजे धर्माच्या दृष्टीनें सर्वांचा शत्रु आहे असें प्रत्येकाला वाटे. सर्व जातींचे लोक एकजीवानें परधर्मी व परदेशी मुसलमानांशीं भांडण्यास तयार असल्यामुळें, त्या वेळीं हिंदु धर्माचा जितका नाश झाला नाहीं, तितका नाश होण्याची चिन्हें मात्र आज दिसत आहेत. समोर तरवार घेतलेला असा प्रत्यक्ष जरी कोणी दिसत नाही, तरी शत्रूचे घाले मात्र सर्वत्र पडत आहेत. त्या वेळेस एकच शत्रू होता पण आज दोन्हीं बाजूस दोन शत्रू असून त्यांच्या कात्रींत हिंदुसमाज सापडला आहे. परंतु असें असून हे दोघेही आमचे शत्रु आहेत, असें धार्मिकदृष्ट्या आम्हांस वाटतच नाहीं, ही केवढी गम्मत ? यावरून काय अनुमान निघतें ? हिंदु धर्म बुडेल कां टिकेल ? दोन बुद्धिभेद जे आमच्यांत केलेले, त्यापैकीं एकाचा हा परिणाम आहे. दुसरा बुद्धिभेद असा. जगांतल्या इतर सर्व धर्मांतील सर्व लोक सामाजिक धार्मिकदृष्टीनें समान समजले जातात पण या हिंदुधर्मांतच तेवढा मागसामागसांत उच्चनीच भाव आहे. तेव्हां हा हिंदुधर्मच मुळीं या प्रगमनशील कालास उचित आणि परिपोषक नाहीं. आपले हितशत्रु जे आहेत ते स्वतःच्या हिताकरितां हा बुद्धिभेद आमच्या समाजांत पसरवितात, आमच्या हिताकरितां उपकारबुद्धीनें पसरवीत नाहींत. समाजांतील माणसामाणसांत समानता असावी ही गोष्ट तत्वतः खरीच आहे. जन्मजात उच्चनीचता नसावी हें सत्य बुद्धीस पटणारेंच असल्यामुळें, हिंदु धर्मांत समतेचें

तत्वच नाहीं हा बुद्धिभेद, समाज वरवर पाहणाऱ्या भोळ्या लोकांस पटून ते यास बळी पडतात. पण हिंदुधर्मांतच हें तत्व नाहीं हें कशावरुन ? शस्त्राघाताच्या परिणामापेक्षां ' बुद्धिनाशात् प्रणश्यति ' या न्यायानें बुद्धीच्या नाशाचे परिणाम सहजच फार भयंकर व सर्वव्यापी होतात. अशा प्रकारच्या या दुसऱ्या बुद्धिभेदापासून समाजाचें रक्षण करण्याकरतां, सर्वांनीं अगदीं एकवटून प्रयत्न करणें अवश्य आहे. त्या बुद्धिभेदाकडे तो बुद्धिभेद आहे, हितोपदेश नाहीं; असें समजूनच लक्ष दिलें पाहिजे आणि तसें दिलें गेलें तरच समाज जिवंत राहील. मन्वादि ऋषीप्रणीत धर्मशास्त्रीय समाजव्यवस्थेपासून च्युत झाल्यामुळें, परमेश्वर आम्हांस एकप्रकारें ही शिक्षाच करीत आहे असें वाटतें. मुनीप्रणीत त्या समाजव्यवस्थेस चातुर्वर्ण्य व्यवस्था म्हणतात. ती चातुर्वर्ण्य व्यवस्था कशा प्रकारची आणि काय तत्वांवर केलेली आहे, तें मन्वादिकृत नियम देऊन मी थोडक्यांत सांगतो.

क्षेत्र प्राधान्य किंवा बीज प्राधान्य, यासंबंधीं मनुस्मृतींतील दहाव्या अध्यायांतील सुंदर शास्त्रीय विवेचनाचा सिद्धांतभूत श्लोक ७२ असा आहे:—

**यस्माद्बीज प्रभावेण तिर्यग्जा ऋषयोऽभवन्**
**पूजिताश्च प्रशस्ताश्च तस्माद्बीजं प्रशस्यते ॥ ७२ ॥**

क्षेत्रापेक्षां बीजाला प्राधान्य अधिक. हा या बाबतींत शास्त्राचा निष्कर्ष आहे. समाज व्यवस्थेचा सर्वमान्य असा सनातन शास्त्रीय नियम जो याच सिद्धांतांवर मनूनें दिला तो असा.

**जातो नार्यामनार्यायामार्यादार्यो भवेद्गुणैः**
**जातोऽप्यनार्यादार्यायामनार्य इति निश्चयः॥६७॥** अ० १०

अनार्य स्त्रीचे ठिकाणीं आर्यापासून झालेला गुणांनीं आर्यच होय. अनार्यापासून आर्येचे ठिकाणीं झालेला अनार्य होय.

त्याचप्रमाणें दुसरा सर्वमान्य असा सनातन शास्त्रीय नियम असा. —

**जन्मना जायते शूद्रः संस्काराद्द्विज उच्यते ॥**
**विद्यया याति विप्रत्वं त्रिभिः श्रोत्रिय उच्यते ॥**

जन्मानें शूद्र, संस्कारानें द्विज, विद्येनें विप्र आणि तिहींनीं श्रोत्रिय होतो. महाभारतकारांनीं तर वर्णव्यवस्थेचा जो तात्विक निष्कर्ष काढला तो असा.

**न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्म मिदंजगत ॥**
**ब्रह्मणापूर्वसृष्टंहि कर्मभिर्वर्णतां गतं ॥**

वर्णामध्यें विशेष कांहीं नाहीं. हें सर्व जग ब्रह्मचापासून उत्पन्न झालेलें आहे. ब्रह्मयानें पूर्वी उत्पन्न केलेलें जग कर्मानें वर्णस्वरूपाला गेलें.

वर्णव्यवस्थेचे हे मूल सिद्धांतच आहेत. चातुर्वर्णामध्यें गुणधर्माप्रमाणें आपापल्या पायरीनें कामें करून माणसें वागत असतांना त्यांच्यांत कायिक ऐक्य सतत कायम रहावें, म्हणून अनुलोम आणि प्रतिलोम अशा दोन विवाहपद्धति आणखी निर्माण करण्यांत आल्या. आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें आणि हल्लींच्या विकासपावत असलेल्या सुजप्रजाजननशास्त्राप्रमाणेंही प्रतिलोम पद्धति गौण आणि अनुलोमविवाह पद्धति प्रशस्त असें तज्ञ समजतात. यासंबंधानें मनूनें लावून दिलेल्या व्यवस्थेचे निदर्शक असे पुढील श्लोक पहा.

**सवर्णाग्रे द्विजातीनां प्रशस्तादारकर्मणि ॥**
**काम तस्तु प्रवृत्तानामिमाः स्युः क्रमशोवराः ॥ १२ ॥** अ. ३.
**शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वाच विशःस्मृते ॥**
**ते च स्वा चैव राज्ञश्च ताश्च स्वा चाग्र जन्मनः ॥ १३ ॥** अ. ३

द्विजांना सवर्णा स्त्री विवाहाला योग्य होय. कामवासनेनें प्रवृत्त झालेल्यांना पुढील क्रमानें हीन होत. शूद्राला शूद्रच स्त्री, वैश्याला वैश्य स्त्री आणि शूद्र स्त्री, क्षत्रियाला स्ववर्णीय व पूर्वीच्या दोन व ब्राह्मणाला त्या तीन आणि स्ववर्णीय. अनुलोम पद्धतीच्या उलट दिशेनें ठरविलेली विवाहपद्धति ती प्रतिलोम विवाहपद्धति. चारी वर्णामध्यें कायिक ऐक्य सतत कायम रहावें म्हणून विवाहांच्या या पद्धति शास्त्रकारांनीं पूर्ण विचाराअंतीं मुद्दामच निर्माण केल्या आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र गणलेल्या पुरुषांची संतति नेहमींच अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशीच राहील असा नियम नसल्यामुळें, त्याचीही व्यवस्थिति वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें लावून ठेवलेलीच आहे. क्षेत्रप्राधान्य का बीजप्राधान्य या वादाचा निकाल बीजप्राधान्य असा जसा दिला, त्याचप्रमाणें जन्मप्राधान्य का संस्कारप्राधान्य या वादाचा निकालही संस्कारप्राधान्य असा दिला आहे. आपल्या त्रिकालज्ञ ऋषींनीं, परमेश्वर ज्या नियमांनीं सृष्टि घडवितो, ते नियम लक्षांत घेऊनच पूर्ण विचाराअंतीं या वादांचे हे असे सर्वमान्य होणारे निकाल दिलेले आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या पुरुषांची संतति गुणधर्माप्रमाणें शूद्र, वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण आणि उलट शूद्र, वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण यांची संतति संस्कारप्राधान्यानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र होऊं शकणारच नाहीं असा कांहीं नियम

नाहीं. वर्णव्यवस्थेच्या या शास्त्रीय विवेचनावरून दिसून येईल कीं, व्यवहाराच्या सौकर्याकरितां आणि कौशल्याकरितां हिंदुसमाजास चातुर्वर्ण्यविशिष्ट करून देखील त्या समाजांत उच्चनीचतेचा जन्मसिद्ध भेदाभेद न राहतां त्यांच्यांत सदैव ऐक्य नांदावें, म्हणून आमच्या शास्त्रकारांनीं विचारपूर्वक फारच उदार दक्षता घेतलेली आहे. आपली ही व्यवस्था धर्मशास्त्रानुसार आहे. हल्लींची चालू अशास्त्रीय जातिव्यवस्था मोडून त्याठिकाणीं वरील धर्मशास्त्रानुसार असलेली वर्ण-व्यवस्था जर केली गेली, तर कोणता मनुष्य बुद्धिपुरःसर म्हणूं शकेल कीं, ही हिंदुधर्मीय व्यवस्था जगांतील इतर सामाजिक धर्मव्यवस्थेहून श्रेष्ठ नाहीं ? हल्लींच्या ब्राह्मण, ब्राह्मणेतर व स्पृश्यास्पृश्य वादासारखे वाद वरील सुंदर व्यव-स्थेंतून उत्पन्न होण्याचा मुळीं संभवच नाहीं. आपल्या स्वतःच्या अज्ञानाला दोष न देतां तो धर्मशास्त्राला देणें समंजस लोक प्रशस्त मानीत नाहींत.

आपल्या समाजव्यवस्थेच्या दहापंधरा हजार वर्षांच्या इतिहासांत, समाज-व्यवस्थेसंबंधानें प्रसंगानुरूप पुष्कळ वेळां अनेक प्रकारचे प्रयोग करून पाहण्यांत आले आहेत. हे सर्व प्रयोग धर्म्य व शास्त्र्य समजले जात असत. व ते ज्या ज्या वेळीं केले त्या त्या वेळीं ते समाजाचे अभ्युदयास पोषकच झालेले आहेत. युगपरिवर्तनाचे वेळीं त्या त्या वेळचे समाजशास्त्रधुरीण एकंदर समाजाचें विहंगम दृष्टीनें अवलोकन करीत आणि त्या त्या कालास अनुसरून समाजव्यव-स्थेंत जरूर असलेले फेरफार घडवून आणीत. समाजांत अनुरूप परिवर्तन याप्र-माणें पूर्वी करीत असत; म्हणूनच आमच्या अज्ञानामुळें आणि अनास्थेमुळें अली-कडे तो समाज उत्तरोत्तर क्षीणबल होत असतांही अजून टिकून आहे. धर्मशास्त्र आणि पुराणग्रंथ यांत याबद्दल पुरावेही आहेत.

हल्लींही तशाचप्रकारें युगपरिवर्तनाचा काळ आला आहे. आजच्या धर्मशास्त्रज्ञ धुरीणांनीं साहसानें पुढें येऊन हें काम करावें व तें लोकांकडून सम्मत करून घ्यावें. तसें त्यांनीं न केल्यास हा हिंदुसमाज यापुढें जिवंत राहणें अशक्य होईल. आपल्या धर्मशास्त्रज्ञ ऋषिमुनींनीं अनुपम विपुल बुद्धि खर्च करून आज-पर्यंत समाजशास्त्राचे जे जे प्रयोग करून पाहिलेले आहेत, त्यांपेक्षां काहीं निराळा शास्त्रीय प्रयोग आतां करणें शक्य आहे, असें निदान माझ्या बुद्धीला तरी वाटत नाहीं. ही माझी दृष्टि जर खरी असेल, तर मी असेंही म्हणतों कीं, हल्लींच्या समाजधुरीणांचें कार्य फार सोपें झालेलें आहे. पूर्वी विचारपूर्वक केल्या गेलेल्या प्रयोगांपैकीं हल्लींच्या परिस्थितींत हिंदुसमाजाच्या अभ्युदयास जो कोणत प्रयोग उचित वाटत असेल, तो रूढ करून लोकांत मान्य करून घ्यावा. हें कर

ण्याकारितां नवीन स्मृति उत्पन्न करायला नको. जुनाच एखादा प्रयोग जरी आजच्या प्रचलित भाषेंत लोकांसमोर मांडला, तरी तोही हल्लींच्या विस्कळित समाजांत उत्तम संघटना उत्पन्न करील. या दृष्टीनें विचार करून पाहिलें असतां वर जे मी वर्णव्यवस्थेच्या प्रयोगाचे श्लोक दाखवून दिले आहेत, त्यांत समाजव्यवस्थेसंबंधीं सूचित असलेला प्रयोग पुन्हां रूढ केल्यास समाजांत ऐक्य व नवीन चैतन्य उद्भवेल, यांत मला बिलकूल शंका वाटत नाहीं.

हिंदुसमाजाची वर्णव्यवस्थेप्रमाणें सशास्त्र संघटना आतां पुन्हां कां केली पाहिजे व ती कशी करतां येईल यासंबंधानें माझीं जीं मतें आहेत, तेवढ्या पुरतेंच मला मिळालेल्या वेळांत जितकें लिहिण्यास सांपडलें तितकें मीं लिहिलें आहे. पुस्तकांतील इतरही सर्व विवेचन बहुधा पटणारेंच असल्यामुळें आणि ग्रंथकर्त्यानें तें आपल्या परिणामकारक भाषेंत चांगलेंच केलेलें असल्यामुळें, वाचकांनीं तें अवश्य वाचावें. यापेक्षां कांहीं अधिक लिहीत नाहीं. ग्रंथकारास या कार्यांत यश येवो. अस्तु. २२-१२-२७

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# अभिप्राय

## ठाण्याचे सुप्रसिद्ध विद्वान पेन्शनर सबजज्ज श्री नाना सा० चापेकर यांचा अभिप्राय.

रा. रा. सदाशिव वामन धामणकर मु॥ आपटे यांस कृ. सा. न. वि. वि.

नामर्दाचा मर्द कसा होईल हा आपला निबंध वाचून फार आनंद झाला. **आपण या राष्ट्रीय रोगाची बरोबर चिकित्सा करून त्यावर योग्य उपाय सुचविला आहे.** रोटीबेटीनिषेध नाहींसा करून जातिबंधनें निर्मूल करणें हें ध्येय जरी आजच साध्य होण्यासारखें नसलें तरीपण तें सतत डोळ्यांपुढें ठेऊन तदनुसार प्रत्येकानें आपल्या आचारविचारांत इष्ट तो फरक करणें अवश्य आहे. **आपल्या निबंधाची भाषा भारदस्त असून परिणामकारक आहे. विवेचन मुद्देसूद आहे.** आपल्यासारख्या आडखेड्यांत राहणाऱ्या तटस्थ माणसाला जातिनिर्मूलनाची अवश्यकता भासावी ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळें समाजांत किती विचारक्रांति झाली आहे. तें दिसून येतें. हिंदु जिवंत रहावा अशी इच्छा असल्यास विस्कळित झालेल्या हिंदूंचें संघटन होणें अत्यंत अवश्य आहे, आणि हें संघटन रोटीबेटीनिर्बंध सैल केल्यावांचून होणार नाहीं. आपला निबंध लवकर प्रसिद्ध व्हावा अशी इच्छा आहे. हिंदुसभेमार्फत असे लहान निबंध प्रसिद्ध होऊन लोकजागृति होणें इष्ट आहे. क. लोभ असावा हे विनंति.

बदलापूर
१६–८–२७

**ना. गो. चापेकर**

स. नि. ५२
[१२९]
नि. नि.

## पुणें हिंदुसभेचे अध्यक्ष विद्यानिधि श्री. चित्रावशास्त्री यांचा अभिप्राय.

खरा वीर पुरुष अथवा नामर्दाचा मर्द हिंदु कसा होईल ? हें प्रौढ भाषेंत लिहिलेलें पुस्तक **विचारप्रवर्तक आहे.** हिंदूंची सध्याची स्थिति यांत चित्रित केली असून त्यावर उपाययोजनाही सुचविण्यांत आली आहे. पण सर्वांत मुख्य उपाय म्हणजे हिंदूंची मनोवृत्ति पालटणें हाच सिद्धान्त काढला असून त्याकरतां एक स्वतंत्र प्रकरण उपयोगांत आणलें आहे. त्यांत मनोवृत्ति पालटण्याचें उपायचिन्तन केलें आहे. केवळ भावनेनेंही बोलले जाणारे अनेक विचार साधक बाधक पद्धतीनें मांडलेले यांत दिसतात. ते सर्वस्वी जरी पटले नाहींत, तरी प्रत्येकांनीं एकदां दृष्टीखालीं घालण्यासारखे आहेत. अशा तऱ्हेचे विचार मांडणारे साधकबाधक वाङमय जितकें निर्माण होईल तितकें आवश्यकच आहे. पुस्तकाची भाषा प्रौढ, विषयाला साजेशी व अर्थगर्भ विशेषणांनीं नटलेली आहे. त्यामुळें वाचतांना एक प्रकारचें नाविन्य वाटतें. **सामाजिक बाबतींतील एक एक मुद्दा घेऊन सुटसुटीत भाषेंत अशीं पुस्तकें निर्माण होतील तर त्यांचा फार उपयोग होईल असें वाटते.**

१२।११।२७
**पुणें शहर**

आपला
**सिद्धेश्वर शास्त्री चित्राव.**

---

## गु. प्रो. श्री. चिं. गं. भानू यांचा विस्तृत अभिप्राय.

' खरा वीर पुरुष अथवा नामर्दाचा मर्द हिंदु कसा होईल ? ' हें बऱ्हंशीं सुंदर पुस्तक श्री. धामणकर यांनीं लिहून ही त्यांची अभिनव कृति प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांनीं कृपा करून मला पहावयास दिली; एतदर्थ त्यांचे आभार मानून मला या जिव्हाळयानें लिहिलेल्या पुस्तकाबद्दल काय वाटतें तें यथामति निवेदितो.

पुस्तकाच्या नांवावरूनच पुस्तकाचा विषय काय असावा हें सहज समजण्यासारखें आहे. विषय व्यावहारिक असून अत्यंत महत्त्वाचा आहे. पृष्ठ ९ वर अनुक्रमणिका दिली आहे. ती पाहिली असतां पुस्तकांतील अंगप्रत्यंगांचा विचार

कोणत्या क्रमानें झाला आहे, हें सुलभ रीतीनें कळतें. हाच क्रम धरून मी लिहितों.

ग्रंथकारांनीं प्रथमतःच आपलें हृद्गत सांगून त्यांस वाटणाऱ्या भावी भयाची सूचक प्रस्तावना लिहिली आहे. मुख्य विषयाचा ' श्रीगणेशा ' पृ. १२ मध्यें केला आहे. ' हिंदू नामर्द आहे ' हें वचन सिद्धवत् करून वा कल्पून तो नामर्द कसा व कां या प्रश्नांची मिमांसा पृ. १४ ते ७४ पर्यंत केली आहे. पुढें पृ. ८४ ते पृ ८८ पर्यंत मनाचें व त्याच्या जोपासनेचें महत्त्व उपपादून सद्यः-प्रसंगीं गृहशिक्षण, त्याची अवश्यकता, उद्देश प्रभृतींसह शिक्षणाची रूपरेखा सांगून समारोपपूर्वक प्रेमळ वाचकांचा निरोप घेतला आहे.

भारतवर्षांतील आर्यांनीं ऋग्वेदकालीन संस्कृतीची धडाडी सोडली, उपनिषत्कालीन उच्च विचारांची ताटातूट करून घेतली तेव्हां हे 'आर्य' हिंदु झाले असा माझा समज आहे. अर्थात ते व्यक्तिशःच नसले तरी संघशः कांहींसे नामर्द झाले हें ग्रंथकारांप्रमाणेंच मलाही कबूल आहे. शरीरानें आम्ही हिंदु कमकुवत नसलों तरी मनानें कमकुवत झालों आहों. आमची आत्मश्रद्धा प्रायः नष्ट झाली आहे. ऋग्वेदकालीन सिंहांचे आम्ही बच्चे, तथापि आमच्या हलगर्जीपणानें, आमच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या, धर्मस्वातंत्र्याच्या, अर्थस्वातंत्र्याच्या अभिमानातिरेकानें संघशः विस्कळीत झाल्यामुळें आज आम्ही हिंदू 'अजापुत्र' झालों आहोंत. याचा परिणाम आर्यसंस्कृतीचा क्षय व शेवटीं नाश असाच होईल. परंतु हें पर्यवसान होणें माझ्या मानवी विचारांच्या दृष्टीनें अशक्य आहे. एकच कारण हें कीं, आर्यसंस्कृतीला जें जगदुद्धाराचें कार्य घडवून आणण्याचें आहे, तें पौरस्त्य आर्य म्हणजे आम्ही भारतवासी जिवंत व कार्यक्षम असले-शिवाय होणेंच नाहीं

आतां हिंदु(आर्य)स्वभावतःच नादान आहे असें म्हणणें म्हणजे येथील पंजाबी, शीख, गुरखे, रजपूत, जाट, मराठे, कानडी, तेलंगी कोकणी वगैरेंस नादान अथवा नामर्द म्हणणें होय. परंतु ह्या उल्लेखिलेल्या जातींना स्वभावतः नामर्द म्हणणारांचें काळीज उलटेंच असलें पाहिजे. क्लाइव्हनें खोटी सही केली यावरून सर्व इंग्रज खोटे कागद करणारे हें विधान जितकें अचरट, तितपतच वरील विधान होय. आजचा हिंदू, ऋग्वेदी आर्यांचा वंशज आहे हें विसरणारे, सत्य-हत्येचें पातक करतात.

कांहीं आगंतुक कारणांनीं मात्र आजला आपण संघशः नामर्द झालों आहों. मळीण सुवर्णाला अग्निप्रायश्चित्त दिलें कीं मळीणत्व जातें, तसेंच आत्मश्रद्धाजन्य प्रायश्चित्त घेतलें कीं, आमचा आगंतुक नामर्दपणा नाहींसा होईल. ग्रंथकारांनीं कालगति, जातिभेद,पंथभिन्नता प्रभृति अनेक कारणें निर्देशून त्यांचा कमी अधिक विस्तारानें विचार केला आहे. 'कालस्य कारणं राजा ( अथवा लोक,)' हा वाक्यखंड लक्षांत घेतल्यास कालचक्राची भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

या ग्रंथकाराप्रमाणें माझ्या समजुतीनें हिंदुराष्ट्राचा आभिमान उपनिषत्काला-नंतर म्हणजे आर्य लोक हिंदु झाल्यानंतर हिंदु लोकांतून नाहींसा झाला हें आमच्या नामुष्कीचें मुख्य कारण आहे. आर्यांनीं कुटुंबसंस्था स्थापिली आणि समाज संरक्षणासाठीं चातुर्वर्ण्य निर्माण केलें. पण पुढें हिंदु झालेल्या आमच्या पूर्वजांनीं आर्यांची समत्वाची भावना टाकून दिली तेव्हां चातुर्वर्ण्याचें रहस्य लुप्तप्रायच झालें. जो सत्वगुणी तोच ब्राह्मण आणि त्यानें पूर्वागत ज्ञानविज्ञान धारण करून त्याचा आपल्या तपानें विस्तार करावा. व इतरांस शिक्षण देऊन प्रसार करावा. रजोगुणावच्छिन्न सत्वगुणाचे पोषण करणारे ते क्षत्रिय. यांनीं स्वपरराष्ट्रांतील शत्रूंचे निर्दाळण करून संपत्ति व चैन या द्वयीला न शिवतां राष्ट्राचें परिपालन करावें. हा चातुर्वर्ण्याचा दंडकच होता. सत्वतमोवच्छिन्न रजोगुणी पुरुष ते वैश्य, यांनीं सर्वप्रकारचे संपत्युत्पादक धंदे करावे. ब्राह्मण क्षात्रियांचा योगक्षेम चालवावा व क्षत्रिय छत्राखालीं सुखकर वर्तन ठेवावें. वांच्छा सात्विक असून राजसी बुद्धीच ज्यांना नाहीं ते शूद्र. यांनी ब्राह्मणादि वर्णांनीं सांगितलेलीं कामें करावीं. या व्यवस्थेंत मजा ही आहे कीं, कोणत्याहि वर्णां-तील कार्यक्षम पुरुषाला इजा झाली कीं सर्व चातुर्वर्ण्याला कमी अधिक मानानें धक्का बसे. सर्व वर्णांतील सर्व लोकांस परस्परांविषयीं अगत्यच असे. अर्थात चातुर्वर्ण्यांत अशी कोठें कमताई पडली कीं बाकीचे वर्ण ती उणीव भरून काढून आघाताचें निवारण करीत. याप्रमाणें उपनिषत्कालापर्यंत चातुर्वर्ण्याचें सुंदर स्वरूप जिवंत होतें. वर्णांत प्रवेश होई, तो, गुण व तज्जन्य कर्म यावरून होई. जाबालाच्या गुणावरून तो ब्राह्मणवर्णांत गेला, आणि विश्वामित्राचे पितृद्रोही पुत्र अतिशूद्रांत गेले. तसेंच वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषी होणें, वेश्या पुत्र असतांहि वासिष्ट ब्रह्मर्षी होणें. कुंभाचा म्हणजे कुंभाराचा पुत्र अगस्ति ऋषी होणे, ब्राह्मणांस नरमांस खाऊ घालणारा क्षत्रिय राक्षस होणें ह्या गोष्टी गुण-कर्मांनीं वर्ण ठरत हेंच सांगतात नव्हे? पुढें ब्राह्मणमातापितरांच्या पोटीं

सामान्यतः ब्राह्मणगुणकर्मांच पुत्र येतो असा अनुभव येऊं लागला तेव्हां जन्मावरून वर्ण ठरविणें सुलभ वाटू लागून मूळची वर्णव्यवस्था मोडूं लागली व जातिसंस्था गर्भांतून बाहेर पडली. असा हा जातींचा, जातिभेदांचा व उच्चनीचतेचा उगम आहे.

शालीवाहन शकपूर्व आठव्या शतकापर्यंत या अमंगल जातिभेदानें आपलें डोकें फारसें वर काढलें नव्हतें. पण याच शतकांत पुढें अनेक कारणांनीं गुण-कर्मांनीं वर्ण न ठरतां जन्मावरच जाती ठरूं लागल्या. या राक्षसी नियमाला आळा घालावा म्हणून जिनानें, बुद्धानें, योगानें, सांख्यानें फार काय सांगावे नास्तिकांनींही भगीरथ प्रयत्न केले. परंतु या पैगंबरांस व दर्शनकारांस यश आलें नाहीं. दुर्भाग्य आमचें ! जाती व जातिभेद अनावर झाले. सुलभताग्राही शास्त्र-कारांनीं तर कलियुगांत ब्राह्मण व शूद्र हेच दोन वर्ण असतात असा निर्बंध घातला. हे वर्ण कसले ? या राक्षसांनीं आमच्या आर्यदेशांत अठराशे जाती व उपजाती अशी अहीमही रावणी संतति उत्पन्न केली. उच्चनीच भावाची उष्णता १०० अंशावर गेली. जातिभेद सळसळूं लागला, मत्सर वाढला, प्रेमलुप्त झालें, ओळख बुजली, हूण, शक, बर्बर, इस्लामी स्वाऱ्या करूं लागले ! !

याच वेळीं धूर्तांनीं अशी सवलत काढली कीं जाती कोणतीही असो मुक्ति मिळविण्याची वैयक्तिक स्वतंत्रता प्रत्येकाला आहे. बस्स ! उपास्यें वाढलीं व उपासना अनंत झाल्या. रामाला गोविंदाच्या मदतीची अपेक्षा राहिली नाहीं. मुक्तिदृष्टीनें व्यक्तिशाही मातली. व्यवहारांतही बापाची मत्ता प्रत्येक मुलाला तंतोतंत सारखी मिळाली पाहिजे असें व्यक्तिशाहींच्या व्यक्ति स्वातंत्र्यलोलुप शास्त्रकारांनीं ठरविलें. याप्रमाणें व्यवहारांत व धर्मांत ज्याचा तो मुखत्यार ! आईबाप जन्म देणार, कर्म ज्याचें त्याला. या तत्वाची तत्व कसलें म्हणा अशुभ ठलुकाची स्थापना झाली !

आधींच देश अफाट त्यांत अनंत जाती. त्या अनंत जातींत अनंत उपास्यें, कोणाची ओळख कोणाला नाहीं असा अनिष्ट प्रकार, मग येथें राष्ट्राभिमानाचा गंध असावा तरी कसा ? त्यांतच अनेक चक्रवर्ती राजे व त्यांच्या लढाया. साऱ्या जातींस ब्राह्मणांस सुद्धां पैशाची, सत्तेची, वैभवाची हाव ! संघटन फार तर कुटुंबांत किंवा ग्रामांत. रावसाहेब अत्र्यांच्या गांवगाड्यापुढें-ग्रामसंस्थेपुढें-हिंदूंची संघटना गेलीच नाहीं. मग राष्ट्राभिमान जन्मणार तरी कसा ? गुप्तांनीं संघटनाचे प्रयत्न केले, मुसलमानांशीं पांचसहाशें वर्षें रजपूत भांडले व्यर्थ, मरा-

त्यांनीं शे दोनशें वर्षे राष्ट्रसंघटित करण्याचा भगीरथ प्रयत्न केला पण त्याला रजपुतांनीं, कानड्यांनीं, बंगाल्यांनींच विरोध केला असें नाहीं तर आमच्याच जातभाई मराठ्यांनीं विरोध केला. प्रयत्न फसला.

पण देवाचें करणें अठराव्या शतकाच्या अखेर इंग्रजांची मगरमिठी बसली. १८५८ मध्यें एकछत्री राज्य झालें. त्याच्या आधींच सात्विक स्वातंत्र्याचे गोडवे गाणाऱ्या, ज्ञान वाढविणाऱ्या पाश्चात्य विद्येचें ठाणें आमच्या हिंदुस्थानांत कायमचे बसलें. पाश्चात्य विद्या शिकविणारे पौरस्त्य विद्वान्, कुंभकर्णी झोप घेणाऱ्या राष्ट्रबंधूस जागे करूं लागले. एकाच जातीचे कायदे, एकच भाषा, दळणवळणाच्या सोयी इत्यादि गोष्टींनीं बंगाल, मद्रास, पंजाब, गुजरात,माळवा, महाराष्ट्र, म्हैसूर, तेलंगण वगैरे प्रांतांतील लोक एकाच राष्ट्राची लेकरें आहेत असा शुभ ध्वनी हल्लीं ऐकूं येऊं लागला आहे. बोलण्यांत व कांहींसा कृतींत हाच राष्ट्राभिमान गुंजप्रमाणानें का होईना दिसूं लागला आहे. मरण्यासाठीं हिंदु-जात जन्मास आली नाहीं हें आम्हांस पटूं लागलें आहे. राष्ट्राभिमानाला विषय हवा म्हणून हिंदुसंघटनाचे प्रयत्न सुरू झाले आहेत. ग्रंथकार म्हणतात त्याप्रमाणें उच्चनीच भावांच्या दोऱ्या अगदीं सैल सोडाव्या, रोटीबेटीव्यवहार जोरानें अमलांत आणावा, नुसत्या जोर जोडी कुस्तीवरच न थांबतां सांघिक खेळ अधिक प्रमाणांत आणावे, अरे म्हणेल त्यालाच कारे असा जवाब देण्याची शरीराची मनाची व आत्मश्रद्धेची तयारी असावी, मानसिक व शारीरिक नाश करणाऱ्या ज्या कांहीं घातुक संवयी तरुणांस नवीन फॅशन म्हणून लागत आहेत त्यांचा मोड व्हावा, परमेश्वर सत्कार्य करणारांला साह्य देतो, यावर श्रद्धा ठेवावी, उपास्य उपासनेंत भेद नाहीं, तर तम भाव नाहीं. वगैरे वगैरे प्रस्तुत पुस्तकांत नमूद केलेलीं तत्त्वें मलाही मान्य आहेत.

तात्पर्य फारसा राष्ट्राभिमान नव्हता म्हणून सांघिकताहि नव्हती. ' कलौ संघे शक्तिः ' हें तत्त्व आपण विसरून गेलों होतों. राष्ट्रीयतत्वाच्या आड येणाऱ्या धर्मस्वातंत्र्यातिरेकाला, अर्थिक स्वातंत्र्यातिरेकाला उराशीं बाळगून मीच मोठा, या अभिमानाला डोक्यावर बसविले होतें. असल्या अचरट व आगलाव्या स्वातंत्र्यातिरेकाचा परिणाम राजकीय परवशता हा झाला. असो ' झालें तें साल गुदस्त वाहिली ती गंगा ' आतां आपण महाराष्ट्रांतील मराठे, रानड्यांच्या, नवरोजींच्या,मंडलिकांच्या तेलंगांच्या, मेथांच्या, टिळक, आगरकरांच्या, गोखल्यांच्या चिपळुणकरशास्त्र्यांच्या, परांजप्यांच्या, हाकांनीं जागे झालों आहोंत.

आतां तरी आपण भारतवासी We are first Indians आम्हीं प्रथम हिंदी असा निदिध्यास करूं या.

जगदुपकारक होणारी आर्यसंस्कृति जिवंत ठेवून तिचा प्रसार करण्यासाठीं हिंदु जगले आहेत आणि जगणार आहेत हें हिंद्वेतरांस समजेल पटेल हाडी-मासीं खिळेल अशा पद्धतीनें दाखवूं व शिकवूं या. सहनशीलता चांगली. पण कोणाला ? संसार सोडून विरक्त झाला त्याला. आपणांस मुक्त व्हावयाचें आहे. परंतु मुमुक्षुपण येण्याला शरीर धट्टेकट्टे, मन धडाडीचें, आत्मश्रद्धा दांडगी, आततायांस शिक्षा करून शिकविण्याचें सामर्थ्य, ह्या गोष्टी हव्याच असतात. या दृष्टीनें श्री. धामणकर यांचा लेख हृदयस्पर्शी व उद्बोधकच आहे.

मनाचें व त्याच्या जोपासनेचें महत्व हाही पाक चांगला खुसखुशीत झाला आहे. हा भाग अवश्य वाचा इतकेंच सांगतों ' मनः एव मनुष्याणां कारणं बंध-मोक्षयोः ' या एका वाक्यांत सर्व कांहीं येतें. ' चित्त करा खंबीर हिंदुहो चित्त करा खंबीर ' हा उपदेश करण्याचा संप्रदाय पुराणिकांनीं कथेकऱ्यांनीं घात-लाच पाहिजे.

गृहशिक्षण, त्याची अवश्यकता, इत्यादि हा भाग सर्व वर्तमान व भावी माता-पितरांनीं अवश्य अभ्यासावा. शाळेंत मिळत नाहीं, मिळणें शक्य नाहीं, तें शिक्षण देण्याची जबाबदारी आईबापांवर व विशेषतः मातांवर आहे ' राष्ट्राची जी भवितव्यता तिची अधिष्ठात्री माता ' असें जगज्जेता नेपोलियन म्हणे. सर्वथा खरें.

तात्विक पाया या शिरोलेखाखालीं २४ सूत्रें दिलीं आहेत. बहुतेक सर्व सूत्रें उपयोगी आहेत. मात्र नंबर १३, १४ व १५ हीं सूत्रें मला मानवत नाहींत. ठोशास ठोसा द्या परंतु ' लबाडाशीं लबाडी करा ' हें तत्व मला पटत नाहीं. लबाडाची लबाडी ओळखण्या पुरती लबाडीची माहिती असावी पण ' लबाडी करा ' असा साक्षात् उपदेश कोणत्याही सर्वदर्शी गुरूनें केला नाहीं. इष्टसिद्धीचें कोणतेंही अनिष्ट साधन इष्टच हेय ' Ends Justify the means ' असें जेसुइट लोक शिकवोत, चाणक्याचें अर्थशास्त्र शिकवील कदाचित् परंतु आर्यत्वाचा अभिमान बाळगणारे जे आपण त्यांनीं असल्या गोष्टींस थारा देऊंच नये.

श्री० धामणकरांचा उपसंहार म्हणजे समारोपही योग्यच आहे. असो येथ-पर्यंत मला वाटलें तें मी मोकळ्या मनानें म्हटलें आहे. श्री० धामणकर

यांचा व माझा मतभेद फार तर एकदोन ठिकाणीं झाला आहे. श्री० धामणकर बहुश्रुत आहेत. खासगी व्यवहार संभाळून ते आपला बराच वेळ वाचनांत घालवितात, वाचल्या गोष्टींचें मनन जिव्हाळ्यानें करतात हें त्यांस भूषण होय. यांच्या विचारशक्तीला उद्दीपक भावनाशक्तीचें उपकारक साह्य आहे. हिंदूंनीं जगावें. जगत्कल्याणासाठीं निदान आर्यसंस्कृतीसाठीं जगावें ही श्री० सदाशिवरावांची कळकळीची इच्छा प्रत्येक वाक्यांत दृग्गोचर होत आहे. आरंभींचें **हृद्गत आणि भावी भयसूचक प्रस्तावना ' हे परिच्छेद तर अंतःकरण हालवून सोडतात.** आतां परवशतेचें जख्खड जूं मानेवर असल्यामुळें स्वातंत्र्य भोगणाऱ्यांविषयीं केव्हां केव्हां अनुदार उद्गार निघणें व त्यांच्या मनोगतांविषयीं अप्रतिष्ठापित कल्पना होणें यद्यपि अपरिहार्य आहे तथापि हा मोह, लोकशिक्षकानें आवरलाच पाहिजे. हंसाप्रमाणें पाणी टाकून दूधच घ्यावें असें मला वाटतें. रा० धामणकर यांची भाषा सतेज, पुष्कळप्रसंगीं उचित आणि बहुधा शिष्टमान्य आहे. पृ० ८६ मध्यें एकच काय तो ग्रामकंटक मला भेटला. यांच्या भावनामय विचारांनीं वाक्यें मात्र पल्लेदार म्हणून अवघड होतात. पण **एकंदरीनें हें जिव्हाळ्यानें लिहिलेलें पुस्तक करुणायुक्त रमणीयतेनें भरलेलें व भारलेलें आहे.** उमेद आहे कीं धामणकरांनीं फुंकलेलें शिंग हिंदूंस हिंमतबहाद्दर होण्याचें स्फुरण देऊन जनताजनार्दनाची वाङ्मय सेवा करण्याची ही अशीच स्फूर्ति श्री० धामणकरांसही देईल. शुभं भवतु.

# नमनपूर्वक प्रास्ताविक निवेदन.

माझे बालमित्र श्री. बापुसो चापेकर ( प्रो० डे० कॉलेज ) यांच्या प्रेमळ आग्रहावरून १८९६ सालीं मी एकदोनवेळां वर्तमानपत्रांत गद्यपद्यमय चार वेडीं वांकडीं अक्षरें लिहून–अलीकडे ज्याप्रमाणें कांहीं लोक नुसते नांवाचे हिंदु होऊन राहतात, त्याप्रमाणें–लेखनव्यवसायाची आपली शास्त्रार्थाला एकदां त्या सालच्या संक्रांतीच्या योगावर दीक्षा घेऊन ठेविली होती. त्यावर आज इतक्या वर्षांनीं, पवित्र वाङ्मयक्षेत्रांत माझें पाऊल पुन्हां पडून कशीवशी पण पुस्तकरूपानें म्हणून किंचित् अधिक टिकाऊ आणि सशास्त्र अशी उपासना घडून येण्यास, पुन्हां त्याच श्री० चापेकरांचें प्रोत्साहन प्रथम विशेष कारण होण्याचा योग आणि तोही संक्रांतीच्याच सुमारास आल्यानें, एकदम तीस वर्षांपूर्वींच्या पुण्यांतील अनेक उलाढालींचा सुंदर चित्रपट नजरेसमोर येतो व पक्षाभिमानातीत शुद्ध तिऱ्हाइत दृष्टीनें तर तो आतां जास्तच मनोरम वाटतो. ‘ माझें रामायण ’ कर्त्यांनीं प्रकाशकिरण सोडलेल्या त्यावेळच्या गतेतिहासास पूरक, अशा अवांतर हकीकतींचें येथें कांहींच प्रयोजन नाहीं. पण परमपूज्य लोकमान्यांचें पवित्र दर्शन व त्यांचें मनमोकळें विनयपूर्ण ओजस्वी संभाषण, यांचा लाभ ज्यांच्याकडे असतांना मधून मधून होई, त्या ऋषितुल्य गंभीर वृत्तीच्या ति॥ रा० रा० का० ब०उर्फ बाबासाहेब पेंडसे म०अ० कमिशनर, यांच्या वात्सल्यपूर्ण भीतियुक्त आदराच्या सान्निध्यांत अल्पकाल मजेनें चाललेल्या आमच्या आनंदमंडळांतील Merry making club. विविध मनोवृत्तींच्या सर्व हसतमुख सन्मित्रांचे, त्यांच्या यौवनसहज खेळकर आणि विनोदी गोड स्वभावांचे, तसेंच आपसांतील तात्कालिक महत्त्वाच्या तशाच कितीतरी रम्य प्रसंगांचे अजूनहि हर्षपुलकित करणारें मधुर स्मरण, माझ्यापुरतें तरी कारणविशेषानें मला आज यथाकाल" असें प्रासंगिकच वाटतें. अधिक सुखावह म्हणून, मागील असें कांहींच कधीं आठविण्याचें कारणही न पडतां, उगवला दिवस नित्य नव्या आनंदांत नवीन साधनांनीं सहज घालवितां येण्यासारखी ज्यांची परिस्थिति व मनस्थिति असते व प्रतिपाद्य विषय सोडून मुद्याबाहेर–ओघप्राप्त तरी निष्कारण असें–थोडें देखील कांहीं लिहिलेलें ज्यांस न्यायालयांतील कडक शिस्तीनें खपत नाहीं, अशांच्या दृष्टीनें तें येथेंहि खरोखर अप्रस्तुतच होईल हें खरें. पण प्रवाहपतित व्यक्तिगत प्रपंचाच्या अनि-

वार्य चिंतेंत आणखी राष्ट्रीय संसारांतील रिकाम्या (!) उठाठेवींच्याही अकारण विवंचनांची भर करण्याकडे, दैवबलानें वा योगायोगानें कल होऊन परिणामीं उदास चित्त झाल्यामुळें, पूर्वी आनंदांत घालविलेल्या दिवसांचे प्रसंगोपात्त भावनोद्दीपित उल्लेख शोकाकुल अवस्थेंत एकीकडे अनिश्चितपणें अर्धवट नको नको म्हणतांनाही तेच थोडथोडे पुन्हां राहून राहून ऐकावेसेच वाटणाऱ्यांच्या नेत्रांतून, त्यामुळें स्मृतिसाम्यानें कदाचित् गहिंवरून आनंदाश्रूही घळघळ गळतील. काळजीकथा नसलेल्या पूर्ववयांतील अशा गोडगोड आठवणी, म्हणजे सुखदु:ख–मय आयुष्यपथ पुढें ओढ लागल्याप्रमाणें जलद् पण अनैच्छिकपणें आक्रमितांना, हातांतून मागच्यामागें भुरकन निसटून परत वळूनही न पाहतां वेगानें दूर दूर पळत जाणाऱ्या गोजिरवाण्या सुंदर पांखरांप्रमाणेंच असतात. पाठीमागच्या क्षितिजाकडील वाढत्या अंधुकतेंत उत्तरोत्तर दूरावत, अस्पष्ट, अदृश्य होत जाणाऱ्या त्या हृदयंगम स्मरणशकुंतांचे, कधींकाळीं किलकिल्या डोळ्यांनीं असें चुकून होणारें ओझरतें दर्शनही, शांतवन करणाऱ्या सुखसंवेदनाच उत्पन्न करतें. म्हणून आतां चिरअस्तंगत, तथापि पुढील अडचणी पाहणाऱ्या दूरदृष्टीचीं भिंगें नसलेल्या अजाण पूर्वदृष्टीनें, नवलकथाच घडलेल्या त्या स्फूर्तिप्रद अशा लहानशा कालविभागासही, आपणासर्वांबरोबरच अगोदर एकवार नम्र प्रणाम करतों.

मोपल्यांनीं मलबारकडे हिंदुजनतेंत उडवून दिलेला हाहा:कार कमी होत आहे, तर त्याच अग्नीच्या ज्वाला, ज्वालाग्राही दिसेल त्या त्या भागांत भडकत थेट अफगाणिस्थानच्या सरहद्दीला जाऊन भिडत आहेत अशा सुमारास म्हणजे तीन वर्षांपूर्वीच मी हा निबंध लिहून तो माझे सन्मान्य लेखनमित्र श्री० चांफेकर यांजकडे त्या सालच्या संक्रांतीच्याच निमित्तानें अवलोकनार्थ पाठविला व शिष्टसंमत होण्यासारखा असल्यास प्रसिद्ध करण्याचा मनोदयही त्यांस कळविला. त्यांनीं आपलें कार्यबाहुल्य संभाळून सवडीनुसार व स्वत:च्या विचारधारणाप्रमाणेंच पण रसिक दृष्टीनें आणि अगत्यपूर्वक, त्यांत कांहीं संक्षेपविस्तार व फिरवाफिरव सुचवून आणि मार्मिक सूचना करून उत्तेजनही दिलें. परंतु नूतन लेखकांस परिचित आणि तर्कगम्य अशा अनेक कारणांनीं कोणत्याही प्रकारें प्रसिद्धीचा योगच जमून येईना. शिवाय अनेकप्रकारच्या लहानमोठ्या मालाकादंबऱ्यादिनाट्यकृतींच्या घों घों निनाद करणाऱ्या मिश्ररस प्रवाहांनीं बहुतेक तुडुंब भरून वाहूं लागलेल्या वाङ्मयजलौघांत, संध्येच्या पळीभर आणि तेंही उगांच कसलें तरी अधिक पाणी टाकण्यांत विशेष वैशिष्ट्य किंवा स्वारस्य

तें काय ? कारण स्वतःच्या अल्प समजुतीप्रमाणें संतांचेच पवित्र उच्छिष्ट असें वाटणारें शब्दजल वास्तविक तसें नसून, तें तसें आहे या प्रामाणिक बुद्धीनेंच पण भ्रमानें आपण पुढें करतांच, प्रसादाच्या अगत्याऐवजीं उष्ट्या खरकट्याच्या साहजिक उपहासानें जर लोकांकडून तें धिःकारपूर्वक मानलें गेलें तर दोष कोणाचा ? ही अंतस्थ भीतीही नेहमीं वेळीं अवेळीं मला कार्यविन्मुख करण्यास कमी करीत नसें. अनिश्चित वृत्तीच्या अशा या दीर्घ कालावधींत देशांत भडकलेली आग शमली तर नव्हतीच पण डोंगराळ कोकणच्या दरीखोऱ्यांतील दिवसानुदिवस निर्जन होत जाणाऱ्या आमच्याकडील कांहीं ओसाड खेड्यांतूनही ' बातम्यांच्या वावटळी बरोबर आपल्याकडे नाहींना हें दंग्याच्या आगीचे किटाळ येणार ? ' अशी मधून मधून ती साधार धास्तीही उत्पन्न करी. मनाची कालवाकालव करणाऱ्या अशा चमत्कारिक परिस्थितींत एका तीव्र अस्वस्थेतच्या क्षणीं, भावी उपहासजन्य उदासीनता आणि धाकधुक, यांची जागा कर्तव्य आणि भावनाप्रधान धिटाई यांनीं बळकावली व लेखणीच्या तोंडाशी अर्थिक अडचणीच्या रूपानें दबून बसलेल्या शुक्राचार्यांस आयत्या हाताखालीं असलेल्या जवळच्या शेळ्या, मेंढ्या, विकून वेळीं शांत दिसणाऱ्या पण वाऱ्याकडे पाहून वागणाऱ्या वस्तुतः चंचल समुद्रावर, उतावळेपणानें दुरून धोक्याचा व्यापार हौसेनें करण्यास धजावणाऱ्या धनगरी निश्चयानें, जिथच्या तिथें दाबून धरलें. तेव्हां शंकांच्या अधिक खोल पाण्यांत न शिरतां, घरच्या मित्रप्रशंसेशिवाय बाहेरच्या चार विद्वान् तिऱ्हाइत शिष्टांनींही मान्यता दिली, तर मग मात्र त्रिविधजन कोणी कांहींही म्हणो व कांहींही होवो, निबंध पुस्तकरूपानेंच प्रसिद्ध करण्याचें ठरवून त्याचें पुनर्लेखन केलें. धर्मवीर डॉ. मुंजे यांस निबंध पसंत पडल्यास त्यांच्याच हातची प्रस्तावना मिळविण्याचा संकल्प करून ठाणे–बदलापूरचे सुप्रसिद्ध विद्वान पेन्शनर सबजज श्री. नानासो॥ चाफेकर, पुणें हिंदु सभेचे अध्यक्ष विद्यानिधि श्री. चित्रावशास्त्री, ज्ञानवृद्ध गुरुवर्य प्रोफेसर श्री. चिं. गं. भानू, यांस निबंध दाखविला. या सर्व सद्गृहस्थांनीं सवडीप्रमाणें वाचनाची तसदी घेऊन व समक्ष बहुमोल सूचना करून उत्तेजनपर अभिप्राय दिले. गु. प्रो. भानूंनीं तर माझ्या विनंतीप्रमाणें मुद्दाम परीक्षण वजा प्रस्तावने सारखा तपशीलवार, विस्तृत अभिप्राय लिहिण्याची तसदी घेऊन व एक दोन बाबतींत स्पष्ट पण गोड शब्दांत हळुवारपणें आपलें भिन्न मत दर्शवून गुरुप्रेमानें मला उपकृत केलें. मूळ योजनेनुसार प्रस्तावनेबद्दल पत्र-

द्वारें खटपट चालूच होती. पण डॉ सो दौऱ्यावर असल्यामुळें वेळेवर कांहीं जमण्याचा रंग दिसेना. आणि माझे ग्रामस्थ श्री. बाबुराव ललित यांच्या माहितीनें चित्रशाळेचे गोड सुस्वभावी आणि मला संभाळून घेणारे व्यवस्थापक, श्री. शंकरराव जोशी, यांजकडे छपाईचें वगैरे सर्व काम सोपविलेलेंच होतें. याप्रमाणें प्रस्तावनेशिवाय बाकी सर्व क्रमशः पुरे होऊन स्वस्थ बसण्याची वेळ आली तेव्हां दुसऱ्या तजविजीला लागलों.

मनांत म्हटलें माझें पुस्तक ते काय एक शंभर पानांचें चोपडें. मनांतच आणील तो दोन दिवसांत पुस्तक वाचून प्रस्तावना माझ्या आंगावर फेकून देऊन मला मोकळा करील. पण त्या उद्योगालाच लागलों तेव्हां अनुभव निराळाच आला. कारण याच वेळीं मेयोनिषेध, स्टाट्यूटरी कमिशन, तत्संबंधीं बहिष्कार स्वीकारांच्या प्रकारानुरूप बनणारे नूतन पक्षोपपक्ष, एकमेकांवर डाव करण्याकरितां चाललेलीं हिंदुमुसलमानी धोरणासंबंधीं खलबतें, जातिहितविषयक धार्मिक सभा, संस्थानी परिषदा, तळेगांवासारखी दुसरींहि कित्येक चालू प्रकरणें, एक का दोन म्हणून सांगू! संन्याशाच्या पूर्वसंचित कर्माप्रमाणें जशी कांहीं ही भुतावळच माझ्या मार्गांत एक महिना दोन महिने मला भेवडावीत व अडथळा करीत होती. त्यामुळें जेथें जेथें तूर्त सवड नाहींची पाटी वाचून मधुकऱ्याप्रमाणें मला पुढें चाल धरावी लागे. नाहीं कोणीही म्हणत नसे, जो तो फक्त सवडीचीच सबब पुढें करी. परंतु हें त्यांचे करणें केवळ शिष्टाचाराकरतां नव्हतें, तर वस्तुस्थितीची तशी होती. अडचणींतल्या आतुर मनुष्याला आपलेंच काम दिसतें, दुसऱ्याची नड सहसा दिसत नाहीं. पण वर्णिलेला चालू इतिहास तर माझ्या समक्षच घडत होता. त्यामुळें कोणाचीहि सबब मला वृथा वाटण्याचें कारणच नव्हतें. दिल्ली, लाहोरपासून तो मुंबई पुणें घेऊन मद्रासपर्यंत काम निघेल तेथें जरूर दिसतांच जरूरीपुरतें आयत्या वेळीं आपल्या अधिकारांत चढ्या घोड्यानिशीं उपस्थित होतां यावें म्हणून या अवधींत, डॉक्टर साहेबांनीं तर शिलेदार घोडेस्वाराप्रमाणें जणुं रिकिबींत पायच घालून ठेवला होता; त्यामुळें त्यांच्या हातच्या प्रस्तावनेची आशा बहुतेक राहिली नव्हतीच. पण माझी खालावलेली प्रकृतीही याच वेळीं अधिक बिघडूं लागल्यामुळें, उभ्या जन्मांत कधींच्याकाळीं आणि नव्या नवसानें एकदां हातीं घेतलेलें काम, परंतु तें सुद्धां कसेबसें तरी पण एकदांचे हातावेगळें करण्यासाठीं मी अगदीं अधीर होऊन गेलों होतों. कारण एकदां यायला लागलीं म्हणजे डुकरामेंढरांप्रमाणें एकामागून एक येऊं लागणारीं हीं वेडसर आणि आड-

मुठीं विघ्नें, आपल्याला आतां आटपणारच नाहींत असें मला साहजिक वाटूं लागलें. 'ओबि दिन जायगा' असें कारुण्यमुद्रेनें धीरवचन देणारा कोणी कोमल अंतःकरणाचा मनुष्य मला यावेळीं भेटायला पाहिजे होता. तो अखेरीस पुन्हां मित्रवर्य श्री. चापेकर यांच्याच द्वारें श्री. दा. वि. उर्फ बाबुराव गोखले (संपादक मराठा) यांच्या ठिकाणीं दिसला. आणि सांगण्यास अत्यानंद वाटतो कीं उतावळे-पणानें न वागतां शेवटीं त्यांच्याच हितमधुबोधवचना प्रमाणें वागल्यानें, बसल्या जागींच श्री. मुंजेसाहेबांचा मला दर्शनलाभ घडला. माझ्या पूर्वसंकल्पाप्रमाणें त्या धीरोदात्त महाभागाच्या हातचीं स्फूर्तिप्रसव सुंदर प्रस्तावना, मला माझ्या प्रिय-वाचकांस जी आतां सादर करतां येत आहे, त्याचें सर्वच्या सर्व श्रेय वरील श्री. बाबुराव गोखले यांच्याच उदार योजना चातुर्यास आणि सार्वजनिक कार्य-निष्ठेस आहे, हें कृतज्ञपणें उघड सांगितल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. आपलेंच घोडें पुढें दामटित, मी–मी अगोदर म्हणत आणखीच पुढें पुढें येणारीं एकापेक्षां एक महत्त्वाचीं किचकट कामें,ज्यांची निव्वळ हौशी खिलाडूंस व एकमार्गी विशिष्ट कलाभक्तांस आणि प्रपंचरतांस,–कल्पानाही नसल्यामुळें केवळ लष्करच्या भाकऱ्यांवजा वाटणारी अशीं-वरीलसारख्या विश्रांतिहीन प्रवासांत उभ्या उभ्या उरकतांना, त्यांतूनच एक एक क्षण वाचवून अशी संजिवनी प्रस्तावना लिहिण्याचें कष्टप्रद लेखन व तेंहि आवडता विषय म्हणून जवळ जवळ स्वेच्छेनें पतकरून व पुन्हां तें व्यवस्थितरीतीनें वेळेवर पुरें करून देण्याचे काम, आर्यसंस्कृतीच्या रक्ष-णार्थ वित्ताची किंवा जिवाचीहि तमा न बाळगणाऱ्या लोकमान्यशिष्य श्री.डॉक्टर मुंजे यांच्यासारख्या कार्यनिष्ठ धर्मवीरासच करवतें. याच सुमारास माझे प्रिय भागिनेय चि०श्री.तात्यासाहेब पेठे यांनीं सदर पुस्तकासंबंधी होणाऱ्या खर्चांत वाटे-करी होण्याची आपलीं सदिच्छा कळविली, ती तर सहज प्रसादचिन्हाप्रमाणें मला शुभशकुनच वाटली. आतां यावेळीं कार्यविघातक भुतावळ उत्पन्न करणारीं पूर्विल्री कर्मगतीच बहुतेक बदलली, हणूनें. काकतालीय न्यायानें अगर प्रयत्नचातु-र्यानें माझ्या हातून योग्य तेंच घडत आलें म्हणून अशा रीतीनें आतां सत्र सोईचे होऊं लागले. हें ठरविणें मी दैवयत्नवाद्यांवरच सोंपवितो, असो.

आतांपर्यंत उल्लेखिलेल्या व चुकून उल्लेख करणें राहिलेल्या अशा विद्वान सज्जनांनीं व सुहृदांनीं मला हातीं धरून सरस्वतिमंदिराकडे माझ्या चालीनें चालून जें दोन पावलें चालविलें, त्याबद्दल माझ्या मनांत मला काय वाटत आहे हें मी कसें सांगू ? आणि सांगण्यास शब्द तरी कोणते योजूं ? कारण

मला वाटत असलेली कृतज्ञता ज्याच्या त्याच्या मानानें यथोचित शब्दांत समर्पकपणें व्यक्त करण्यास माझी साधीभोळी अल्लड खेडवळ लेखणी अति उत्सुक पण अगदींच अनभिज्ञ व अकुशल असल्यामुळें, जागच्याजागीं जणुं स्तंभित झाली आहे. तथापि हा उणेपणा सुविद्य आणि रसिक सहृदयांना, हृदयाची ओळख साधेपणांतही सहज पटते; यांत भरून निघणारा असल्यामुळें तितकेसें अवघड वाटत नाहीं. पान ११ वर तथापि या शब्दांपासून पुढें सूचित केलेलें प्रकरण पुस्तकांत दिलें नाहीं. थोडेसें शुद्धिपत्र मात्र जोडलें आहे. जनताजनार्दनाची पूजा करावयाचीच असें जेव्हां माझ्या मनानें घेतलें तेव्हां अनेक रंगारूपांची व कांहीं कमी अधिक वासांची अशींहि, पण जीं वेळीं बरीं वाटलीं व हातीं आलीं तीं विचारकुसुमें, भिल्लिणीच्या शुद्ध प्रेमळभावानें आराध्यदेवतेपुढें केलीं आहेत. तीं सर्वच्या सर्व आणि पुढें केलेल्या स्थितींतच स्वीकारलीं जावीं असा मुळांतच दुराग्रह किंवा आग्रहही नाहीं. तर ' यत् रोचते तत् ग्राह्यं ' अशीच नम्र विनंती आहे.

आतां अधिक निवेदन करीत राहिल्यास कोणाच्या मस्तकांत वेदनाही कदाचित् उत्पन्न होतील. कारण पहिल्याच नम्र परिचयाचें असें दाट घरोब्याच्या सलगींत अधिक रूपांतर होऊं देणे, सर्वच वाचकांस पसंत होणारें नसतें. तेव्हां समतोल विचारसरणीचे प्रौढ विद्यार्थी आणि शांतवृत्तीचे सुशिक्षित सद्‌गृहस्थ, अंतःकरणपूर्वक पुढें केलेल्या या अल्प कृतीची शाब्दिक तिळगुळाची,मनमोकळेपणानें कशी काय संभावना करतात हें नीटपणें समजण्यासाठीं जरा दृष्टिआड होतों.

२४–१२–२७ — स. वा. धामणकर

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| हेतु ... ... | १–४ |
| भावी भयसूचक प्रस्तावना. ... ... ... | ५–८ |
| विषयोपक्रम व प्राथमिक सूचना. ... ... ... | ९–११ |
| हिंदु कसा नामर्द आहे हें खरें कशावरून ? ... ... | १२–१४ |
| हिंदु नामर्द आहे ? ... ... ... | १४–१५ |
| कारणांची खात्री देववेल का ? ... ... ... | १६–१९ |
| बेगुमान कालगति. ... ... ... | १९–२२ |
| प्रचलित जातिसंस्था व चाली समजुती. ... ... | २३–६६ |
| पंथभेद. ... ... ... ... | ६६–७२ |
| कारणसमुच्चय. ... ... ... ... | ७२–७४ |
| मनाचें व त्याच्या जोपासनेचें महत्त्व.... ... ... | ७४–८७ |
| गृह शिक्षण. ... ... ... ... | ८७–९८ |
| समारोप व निरोप . ... ... ... ... | ९७–९८ |

३२००

# खरा वीर पुरुष

अथवा

# नामर्दाचा मर्द हिंदु कसा होईल?

## हद्गत.

बा सुहृदा, सहृदय वाचका, असें एकेरी संबोधनानें हटकलें म्हणून रागावूं नकोस. तें प्रेमळ सलगीचें लक्षण मान. तुझा श्रेष्ठपणा मला सम्मत आहे. व तूं कार्यव्याप्त आहेस हेंही मी जाणतों. पण वेळांत वेळ काढ, आणि मुद्दाम सवड करून पुढील चार ओळी वाच, व त्यावर मनन कर. मी काय या अफाट हिंदुस्थान देशाच्या कोनाकोपऱ्यांतील एक अगदीं यःकश्चित् मनुष्य असून, मंद-बुद्धि, वयातीत, व्याधिग्रस्त व कर्तृत्वहीन आणि म्हणून हताश असाच खरा. पण माझी खात्री आहे कीं–होतकरू तरुणा–तुझ्याहातून कांहीं उदात्त सत्कृति घडेलच घडेल. आसन्नमरण भारताच्या मृत्युशय्येवरील प्रस्तुतचा भेसुर देखावा, व नशीबच फुटलें असल्यास समूळ हिंदुत्वनाशाचें या पुढील काळेंकुट्ट भवितव्य, मी कितीसें चित्रित करणार? तें घडवून आणीत असलेला आपला–विशेषतः अलीकडे जगजाहीर झालेला–नसता मुर्दाड नामर्दपणा, तूंच अधिक जाणती असशील. तेव्हां एखादी कोठली तरी रम्य युद्धकथा, लडिवाळ प्रेमाचें विनोदी प्रहसन किंवा उपमा अलंकारांनीं नटलेलें कसलें तरी चटकदार रसभरित वर्णन वाटण्याजोग्या जरी ह्या ओळी लिहिलेल्या नसल्या, तरी उगाच एखादें दुःखदायक पाल्हाळी रडगाणें गाऊन तुझ्या सुखांत माती कालवावी व तुझें आनंदी मन कारण नसतां उगाच उदास करून सोडावें, असाही त्या लिहिण्यांत दुष्ट हेतु नाहीं, हें मीं सांगायला पाहिजे असें नाहीं. पारतंत्र्यबद्ध हिंदवासियांपैकीं मी एक आहे, तेव्हां माझें रडगाणें भाडोत्री किंवा निष्कारण

नसून तें कलेच्या दृष्टीनें व्यवस्थित नसलें तरी अंतःकरणाच्या सहज खऱ्या उमाळ्याचें कां असणार, याची जाणीव तुला आहेच. आणि खरें सांग, अलीकडे तुझ्याही मनाला निरंतर चिंतेचा तोच विषय झाला असण्याचा फार फार संभव आहे. खरेंना ? उघडच आहे. कारण मलबार, मुलतान, कोहाट, गुलबर्गा, दिल्ली, पानिपत, लाहोर–किती नांवें घेऊं ? अशा अनेक ठिकाणीं मुसलमानांकडून, व असेंब्ली पार्लमेंटांत उद्दाम धूर्त नोकरशाहीकडून अंतःकरण पिचून टाकणाऱ्या तापदायक थपडावर थपडा मिळत असतां, कोणता खरा सुशिक्षित हिंदपुत्र, स्वस्थचित्त व आनंदमग्न असूं शकेल ?

शुद्धिसंघटनांत जोराची नवी उचल व खळबळीच्या राजकारणांतील धोरणांत, वरचेवर होणारा फेरबदल, यावरून तेंच नाहींका अनुमान निघत ? परंतु अपमानाचे एकावर एक तडाखे बसून मनोवृत्तींचा असा चेंदामेंदा होत आहे व द्रव्यरूपानें शरीरांतील रक्तशोषही सारखा चालू आहे, तरी हिंदीराष्ट्रपुरुष अजून तसाच निश्चेष्ट पडून आहे. अवसान धरून ताडकन उठत नाहीं, किंवा कोठें स्पष्ट जागृतीचें कांहीं चिन्हही दाखवीत नाहीं. इतका स्तिमित, इतका नामर्द, इतका षंढ, तो कसारे झाला ? कांहीं उपाय आहे का ? बोल बोल. मी म्हणतों तें बरोबर आहेना ? मला तर असें वाटतें कीं, जसा कांहीं आजच हिंदूंवर शेवटच्या घटकेचा चिंतनीय प्रसंग येऊन ठेपला आहे, व त्यामुळेंच या हृदयांत अशी एकसारखी कालवाकालव होत आहे.

तूं बहुश्रुत आहेस. वर्तमानपत्रांचे व मासिकांचे विविध चित्रपट तुझ्या नजरेसमोरून नवनव्या माहितीच्या दृश्यांत एकसारखे परिवर्तत आहेत. तेव्हां आर्यभूमींत, या अभागी देशांत, हल्लीं काय चाललें आहे, पुढें काय अरिष्ट येऊं पहात आहे, या गोष्टीकडे तुझें लक्ष नसेल, असें मी कसें म्हणूं ? पण कांहीं तशाच कारणप्रसंगानें, राजकारणांत तटस्थ राहण्याकडे मनाचा एकदां कल झाल्यास, उदासीनतेची सहजच झापड येते. तशी न जाणो आली असल्यास, भावी प्रसंग–सूचनारूपी हलक्या हातानें हळूच जागें करून ती झापड घालवावी, व पुढील राष्ट्रीय आपत्तीकडे, तुझ्यासारख्या कर्तबगाराचें लक्ष खेचतां आल्यास, देशांत दुसरे कर्तबगार निर्माण करण्याचें तुझ्यांत असलेलें सामर्थ्य हिंदबांधवांस लाभेल, या आशेनें–या भरंवशानें–त्या बाबतींत तुझें आर्जव करण्याकरितां, तुझ्याशीं हितगुज करून समदुःखाचा निदान विभाग करण्याकरितां, तुझें श्रेष्ठत्व

लक्षांत घेऊन, अद्वीच्याच पावलांनीं व अनुकूल दृष्टिक्षेपांची संधी साधून मी तुझ्याकडे येत आहे.

सचिंत भारताच्या भावी आशेच्या उत्साही आणि होतकरू तरुण मित्रा! विचार प्रदर्शित करण्याचे भरांत मजकडून कळकळीच्या उत्कटतेनें कांहीं ठिकाणीं विषयांतर, पुनरुक्ति, औचित्यभंग, आणि अप्रस्तुतपणा, तसेंच पाल्हाळ, क्लिष्टपणा व अननुभवी आणि अदूरदर्शी विसंगत विचारसरणी, असे अनेक प्रकारचे कितीतरी दोष होण्याचा खरोखरच फार संभव आहे, हें मी जाणतोंच. तथापि असें असूनही केवळ मनोरंजक लेखनकलेच्या सशास्त्र पाहणीची दृष्टि थोडी कमी करून, जरा अधिक सहृदयतेनें विषयाशीं तादात्म्य पावून वाचनाची तसदी घेच, अशी तुला आग्रहपूर्वक नम्र विनंती करण्याचें कारण इतकेंच कीं, तसें केल्यानें, इच्छा असूनही हातून, या हतभागी प्रिय मायदेशाची सेवा न घडतां आयुष्य फुकट गेल्याचें दिसून आलें, म्हणजे मागाहून मग अनुताप कसा तापदायक होतो, या अनुभवाची जाणीव व्हावी व इच्छिलेलें किंवा योजिलेलें कर्तव्य तरी वेळेवर करण्यास उद्युक्त होण्यास कोणाकडून हयगय न व्हावी. अर्थात अशा शुद्धबुद्धिपूर्वक तथापि हीन भाषासरणीच्या सदोष विवेचनामुळें जरा डिवचल्यासारखें होऊनच का होईना, पण जर तुझ्यासारख्या कार्यकुशल विचक्षण पंडिताकडून ह्यच हेतु जास्त उत्तेजक भाषेंत आणि अधिक समर्पक रीतीनें प्रतिपादला गेला, व त्यामुळें लोकजागृतीला हिंदूंचें लोकहितविषयक औदासिन्य आणि व्यवहारांतील भ्याडपण घालविण्याची चांगलीच मदत झाली, तर दुःखद गुलामगिरीचें दुस्तर आणि विस्तीर्ण वाळवंट कर्तव्य म्हणून शक्त्यनुसार थोडेंसेंच उल्लंघन करण्याचा कसा तरी प्रयत्न करीत असतांना, त्याच इच्छेनें मागून येणाऱ्या लोकहितवादी यात्रेकरूंस ओळखतां येण्यासारखी खुणेची पावलट दिसावी, म्हणून स्वतःचाही योगक्षेम ज्यावर अवलंबून असतो, त्या राष्ट्ररथाच्याही प्रगतिपर सुखसंचाराच्या दृष्टीनें सिंधूंतबिंदु याप्रमाणें, एकतरी पाऊल उमटविण्याकरितां पाय उचलण्याचा यथाशक्ति निदान शाब्दिक तरी प्रयत्न केल्याचें जन्मकर्तव्य यथामति बजावण्यांत अखेरची वेळ तरी अंशतः सार्थकीं लागली, एवढीच मनाला समाधान मानण्यास जागा होईल. बालपण केवळ आनंदांत, तारुण्य विविध आणि विफल योजनांत व वार्धक्य तर आधिव्याधींच्या नुसत्या शुष्क चिंतनांत, मिळून देहयात्रा संपवितांना ' अंतेमतिः सा गतिः ' या अंतिम आशेसंबंधीं विश्वासवचनावर विसंबून शेवटची घडी जरी कशीबशी पण जनताजनार्दनाचे भक्तियुक्त

मननांत श्रद्धापूर्वक घालवितां आली, तर—वाइटांत चांगलें—असें सानुताप दुसरें काय कोण अधिक साधूं शकेल? मायभूमीसंबंधीं ऋण फेडण्याचें अल्पही कर्तव्य उभ्या जन्मांत कांहींच न होतां राहून गेलेलें आहे, या सबबीवर मृत्यूकडून कधीं कुणाला मुदत मिळाल्याचा किंवा मिळण्याचा संभव असल्याबद्दलचा यत्किंचित्तरी भरंवसा असता, तर गोष्ट निराळी होती.

---

# भावी भयसूचक प्रस्तावना.

फार पुरातन कालीं, सर्व जगताला बहुतेक सर्व बाबतींत गुरुस्थानीं असलेल्या सुवर्णभूमि हिंदुस्थानास--आर्वाचीन कालीं मुख्यतः आधिभौतिक संहार-शास्त्रांच्या व सुधारलेल्या कुटिल व्यापारी व राजनीतीच्या विशेष प्रगतीनें ऐहिक उन्नति झपाट्यानें करून घेत असलेल्या जीवनकलहवीराग्रणी पाश्चात्यांचे पांढरे पाय लागल्यापासून–पोटाच्या विवंचनेनें सदैव विव्हळत व पारतंत्र्यांतील पदोपदींच्या अपमानानें आंतल्याआंत सतत जळफळत असलेल्या हिंदूंच्या डोळ्यांपुढें–या परदास्याच्या चकडबंद कोंडमाऱ्यांतून एकदां सुटका कशी होईल,–ही एकच काळजी रात्रंदिवस वाढत्या भयंकर निराशेचें कृष्णवस्त्र लपेटून विकट हास्य करीत सारखी उभी आहे. काय करतील बिचारे ? व्यूहांतून बाहेर पडण्यास स्वतःला वाट दिसत नाहीं, दुसरा कोणी दाखवीत नाहीं, दाखविलेली पटत नाहीं व पटत असलेली बिकट अतएव अव्यवहार्य म्हणून चालवत नाहीं. अशी त्यांची मोठी केविलवाणी व चमत्कारिक स्थिति झाली आहे. परवशतेंत बहुधा हटकून होणाऱ्या दिशाभूलीनें अनेक मार्गांनीं अंगांत भिनत जाणारा निराशाजनक व व्यामोह उत्पन्न करणारा नामर्दपणा, हें एक याचें प्रमुख कारण असेल.

कडेकोट बंदोबस्ताच्या कैचींत एकदा कसाबसा पण पुरता सांपडलेला महान् बलाढ्य प्राणी, असहाय किंकाळ्या फोडीत ज्याप्रमाणें निरुपाय होऊन व विषण्ण चित्तानें तात्पुरतें आंग चुकवून निमुटपणें प्रहार सोशीत कसाबसा पडून राहतो, त्याप्रमाणें हिंदुमनुष्य, आजकाल आपल्या अनिश्चित व कदाचित् भयावह भवितव्यांकडे शून्यदृष्टि लावून सचिंतपणें नाइलाज होत्साता, परदास्यजन्य सर्वप्रकारच्या दुःखसंतापांचे आघात, शरपंजरीं पडल्यापडल्या केवळ आंग मारून सहन करीत आयुष्याचे दिवस कसे लोटीत आहे, हें जाणते सहृदयच जाणत असतील.

मनांत गुलामगिरीच्या बंदिवासांतून बाहेर पडून ताडकन एकदम मोकळें होण्याची–पण नाइलाजामुळें उसन्या हास्यांत दाबून टाकावी लागणारी–अनिवार वाढती इच्छा, घरांत नरडीचा घोट घेणारी लाजिरवाणी भाऊबंदकी,

आणि बाहेर आधुनिक लष्करी शिस्तीचा करडा बंदोबस्त. अरेरे ! उपाय करतांनाच अपाय घडायचा ! शिव शिव ! कोण ही गुदमरून टाकणारी केविलवाणी स्थिति ! अशा वेळीं, असल्या या परवशतेच्या अनिवार्य आणि असह्य यमयातनांत झुरून झुरून सावकास का होईना, पण हातून प्रयत्न न घडल्यामुळें अखेर रांडमरणानेंच मरण्यापेक्षां, भयंकर भूकंपांत एकदम गडप होऊन गेल्यास काय वाईट ? पतंगाप्रमाणें दिव्यावर झडप घालून एकदांच जळून जाण्यांत काय नुकसान ? असें वाटणें, केवळ साहजिक आहे. असले आत्मघाताचे विचार मनांत येण्याचे ऐनभरांत–थांबा हा पहा तुमचा पाठिराखा व मार्गदर्शक जवळच उभा आहे, असें घाबरूं नका व घाईनें आत्मनाशास प्रवृत्त होऊं नका. उठा, अवसान धरा आणि चिकाटीनें या मार्गानें चला—असा दिव्य विद्युत् संदेश दशदिशा. दणाणून सोडणाऱ्या धीरोदात्त गंभीर मेघगर्जनेनें, सह्यगिरीच्या उत्तुंग शिखरावरून अखिल हिंदुस्थानास ऐकविणारा उत्साहमूर्ति शिवसिंह, रामदासांसह अवतरेल का ? व्हिक्टर, कव्हूर ग्यारीबाल्डीला घेऊन म्याझिनी धावून येईल का ? असे प्रत्येक जाणत्या हिंदु अंतःकरणास वाटल्याशिवाय खचित रहात नसेल.

पण वाटून उपयोग काय ? दृष्टीला तर्काची दुर्बीण लावली, तरी निराशेच्या धूसरपणांत आशेचा किरण कसा कां आणि कोठेंच चमकतांना दिसत: नाहीं ? संकटाच्या कडेलोट प्रसंगीं भगवत्‌दर्शन असें दुर्लभ कां व्हावें ? प्रयत्नाअंतीं परमेश्वर म्हणतातना, मग प्रयत्न तर चोहींबाजूंनीं सारखे चालू आहेत. तेव्हां सुधारक, सनातनी, मवाळ, जहाल, स्वामिभक्त, अत्याचारी वगैरे सर्वांचेच प्रयत्न होत आहेत, पण ते भक्तिपूर्वक नसून सर्वच कोठेंतरी चुकत आहेत, असें म्हणायचें कीं काय ? असें सगळ्यांचें चुकतें तरी कोठें ?। कदाचित् प्रत्येकाकडून मूळ सुरवातीसच कोठेंतरी चूक होत असली पाहिजे; एरव्हीं बहुविध चळवळींची एवढी इमारत, ढासळून फुकट जायची भीति कां वरं वसावी ? पायाशुद्धीच बरोबर होत नसली पाहिजे. कृतीचा उगम विचारांत म्हणतात; व असे प्रयत्न करायचे, तसे उपाय योजायचे, वगैरे विचार सुरू होतात, ते ज्याअर्थी मनाचे ठिकाणीं सुरू होतात, त्या अर्थी इच्छा विचार वगैरे करणाऱ्या **इच्छा धर्मी चंचल मनाचेच** तर पहिल्यानें नीट संशोधन व संगोपन व्हायला पाहिजे असेल व तें तसें होत नसल्यामुळेंच मर्दपणाची व पर्यायानें मुक्ततेची ही सारी खटपट व्यर्थ जात नसेल कशावरून ?

शिवाय, जगभर जिकडे तिकडे, आर्थिक, सामाजिक, राजकीय, अशा निरनिराळ्या स्वरूपांत नित्यशः चालू असलेल्या अनेक उलाढाली, व प्रवास सौकर्यानें होणारें जगाचें वाढतें दळणवळण, यामुळें वरचेवर उत्पन्न होणारी चंचल परिस्थिति, केव्हांही अनुकूल करून घेतां येईल, अशी सवड आपल्या आचार-विचारांत वेळींच ठेविली न गेल्यामुळें, व संवयीनें आंगवळणीं पडणाऱ्या पारतंत्र्याच्या दूषित वातावरणांत दीर्घकाल काढावा लागल्यामुळें, एखाद्या जुनाट मुरलेल्या दुखण्याप्रमाणें जो मुर्दाड रंडका नामर्दपणा आपल्या अंगीं भिनून गेला आहे, तो एखाद्या आकस्मिक असहकारितेच्या, वाक्पटु कौन्सिलांच्या, किंवा उतावळ्या सशस्त्र बंडखोरीच्या अल्पकाळ उसळीनें जरी किंचित् दबला, तरी कायमचा कसा जाईल ? बाणेदार मर्दपणानें हिंदु मनुष्य जगांत वावरायला हवा असेल, तर प्रथमतः त्याच्या देहांत, मेंचट, निरुत्साही व आलस्यजन्य घाण रक्तप्रवाहाऐवजीं, नित्य ताज्या दमानें कुशलकर्तव्याच्या उसळ्या मारणारें, शुद्ध रुधिराभिसरण सुरू झालें पाहिजे व तें व्हावयाला **त्याच्याही अगोदर** त्याच्या मनांत स्वार्थी, अदूरदर्शी, कुजट, जनानी, बेंगरूळ विचारांऐवजीं मर्दानी जोमदार तडफेचे श्रेष्ठशुद्ध असे व्यापक राष्ट्रीय विचारप्रवाह खळखळून वाहूं लागले पाहिजेत, असेंच खरें असेल.

कोणी म्हणेल पण वाहतील का ? मी म्हणतों नक्की वाहतील. ही गोष्ट प्रथमतः वाटते तितकी कठीण नाहीं व वाटते तितकी सोपीही नाहीं हें खरें; पण—बघतां काय उठा, नाहींतर कायमचे पडा—असेंच जणूं म्हणत आलेल्या आणीबाणीच्या वेळेचें गांभीर्य या विवेचनानें लक्षांत घेऊन, सशास्त्र, निदान चिकित्सापूर्वक परिस्थित्यनुरूप सुलभ उपाययोजना ठरवून, ती त्वरित अमलांत आणण्याकडे तुझेकडून जनमनाचा कल होण्याविषयीं कळकळीनें प्रयत्न झाल्यास, राष्ट्रीय धन्वंतऱ्यांस यश ठेवलेलेंच आहे.

नित्यशः चालू असणाऱ्या आपसांतील खासगी यादवीच्या भीषण रणधुमाळींत, स्वार्थासाठीं हरतऱ्हेनें एकमेकांस चकवून आपसांत लढतां लढतांच, अत्यंत व्यापकपणानें व कौशल्यानें सर्व जगभर चालू असलेल्या सार्वजानिक जीवनकलहांतही निःशस्त्रपणें व आपल्याच अकलेनें आपण हिंदी संस्कृतीचें रक्षण करून हिंदी जनतेचा अभ्युदय करूं—अशा भ्रामक समजुतीनें मोठे वस्ताद समजलेले हिंदी पुढारी वागत आहेत. परंतु त्यांना तसेंच भ्रमांत ठेऊन, व त्यांस आणि त्यांच्या प्रयत्नांस न जुमानतां, पश्चिमेकडील कैक चोरवाड्यांतील

सशास्त्र व सुधारलेल्या अकलेचे अट्टल सोदेही, आपली सर्वसंग्राहक पाश्चात्य संस्कृति बगलेंत मारून त्यांतच गर्दी करून घुसले आहेत. आणि आपल्याला पूज्य व प्रिय अशा आपल्या हिंदी संस्कृतीचा व उर्वरित पूर्ववैभवाचा गाडा तर, विधि-नियोजित इष्ट भवितव्याच्या रोखानें न्यावयाचा आहे. तेव्हां जपा, सावध रहा, इतकीच विनयपूर्वक धोक्याची सूचना देत आहे.

सर्व पुरुषार्थांच्या साधनांचें साधन, अशा तरुणांच्या शुद्ध कोमल मनाच्या जोपासनेच्या, सशास्त्र उपायाच्या, पद्धतशीर भक्कम धार्मिक आणि व्यापक पायावर बंधुभावनेनें सुसंघटित होऊन, प्रगमनशील वृत्तीनें कुशल प्रयत्नमंदीर उभारा, म्हणजे अन्याय व जुलूम, यांस आपल्या मर्दुमकीनें चळचळा कापायला लावणारी व सज्जनांस तोषविणारी,–मर्दांना प्रिय अशी–मुक्ति स्वातंत्र्य देवता, तेथें खचित वास्तव्य करील, अशी विनम्रपणें खात्री देऊन, ही भावी भयसूचनात्मक प्रस्तावना पुरी करतों.

# विषयोपक्रम व प्राथमिक सूचना

नामर्दाचा मर्द हिंदु कसा होईल ? या उत्तरगर्भ प्रश्नवाक्यांत, हिंदु तूर्त नामर्दच आहे, तथापि, कसातरी पण तो पुन्हां मर्द होईलच होईल, हें त्याचें उत्तेजनपर उत्तरही हळूंच सुचविल्यासारखेंच आहे. परंतु हिंदु, नामर्दाचा मर्द होत असला, तरी तो होतो कसा ? हें अशा संदिग्ध सूचनेवरून समजण्यासारखें नाहीं. शिवाय, यांत तो नामर्द आहे, हें सिद्ध न करितांच गृहित धरल्यासारखें होतें. म्हणून सर्व गोष्टींची समजूत पडावी व विषयविवेचन सुलभ व सोईस्कर व्हावें, यासाठीं, उपक्रमोपसंहार पद्धतीचें मीं पुढीलप्रमाणें अवलंबन केलें आहे. हिंदु नामर्द आहे, हेंच मुळीं अगोदर खरें कशावरून ? तो नामर्द असला, तरी कसा नामर्द आहे ? म्हणजे कायमचा जातनामर्द आहे कां कांहीं कारणांनीं तूर्त तसा-म्हणजे-उपरा प्रयत्नानें बदलण्यासारखा-असा नामर्द झाला आहे ? अशा तऱ्हेचा नामर्द व्हायला नेमकीं अमुकच कारणें घडलीं असें खात्रीनें सांगतां येईलका ? जीं कांहीं कारणें असतील त्यांत-कालगति-हें, सर्वांत महत्त्वाचें पण अनिवार्य कारण आहे असें म्हणतां येईल किंवा नाहीं ? सहज कलहसंभव, अशा जन्मजात श्रेष्ठ कनिष्ठ भावनेवर अनेक भोळसर चाली समजुतींसह-अस्तित्वांत असलेली विशिष्ट जातिसंस्था, धार्मिक पंथोपपंथ, व आचारविचारांच्या दुसऱ्या सर्वसाधारण आढळणाऱ्या गोष्टी, यांना, त्यांच्या कमी अधिक महत्त्वाप्रमाणें, नामर्दपणाची संभवनीय कारणें ठरवितां येईल किंवा कसें ? आल्यास तीं नाहींशी करण्यास शरीर तर आहेच, पण तें असलें, तरी शरीरापेक्षां मन, हेंच खरें व महत्त्वाचें साधन आहे, असें मानतां येईल किंवा नाहीं ? येत असल्यास सध्यां शाळांतून व घरींदारीं आणि समाजांत मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां, घरीं पालकांचे नजरेसमोर द्यावयाचें विशेष मानसोपचारी सार्वजनिक गृहशिक्षण, हेंच, तें साधन, म्हणजे मन× उपयोगांत आणण्याचा आजच्या स्थितींत योग्य उपाय ठरेल का ? आणि ठरत असल्यास कोणत्या पद्धतीनें तो उपाय अमलांत आणावा ? व तसा आणल्यानें काय परिणाम होईल ? याप्रमाणें विवेचनाचा प्रकरणवार क्रम स्वीकारून विषय संपविला आहे.

या लेखांत नामर्द अथवा भीरु, किंवा मर्द अथवा वीर, हे कांहींसें समानार्थक शब्द, केवळ मारामारींत भित्रा अथवा धीट एवढ्याच संकुचित अर्थानें वापरले नसून—अनिष्ट व प्रतिकूल परिस्थितींतून अभ्युदयार्थ, सात्विक कुशल प्रयत्नपूर्वक धिटाईनें वर डोकें काढून, मानव या श्रेष्ठ पदवीस स्वतःस पात्र करून न घेणारा किंवा घेणारा या व्यापक अर्थानेंच वास्तविक योजिले असून, हिंदु मुसलमानी संबंधांतील वगैरे मुसलमानांच्या दुष्ट चढेलपणाची व हिंदूंच्या मूर्ख भित्रेपणाची अलीकडील नित्याच्या माहितींतील कांहीं उदाहरणें द्वेषबुद्धीनें दिलीं नसून हिंदूंची सांप्रतची भीरुता, केवळ चटकन लक्षांत भरण्यासाठींच दिलीं आहेत, हें सर्व लेख वाचल्यावर अखेरीस वाचकांचे ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. कारण मुसलमानाला किंवा कोणाही अन्यधर्मी मनुष्याला उगाच त्रास देण्यासारखी मजबूत शरीराची व दुष्ट मनाची सदैव तयारी असणें, हा ग्राम्य हेतु मला मुळींच मान्य नसून, अन्याय व जुलुम यांचा प्रतिकार करतांना, स्वतःच्या, स्वदेशाच्या, व अखिल मानवजातीच्याहि कल्याणासाठीं, धीरोदात्त हौसेनें खर्ची पडण्यासारखी सुदृढ शरीराची व थोर मनाची—स्वधर्मी व परधर्मी अशा सर्व मनुष्यमात्रांचीच—नित्य तयारी असणें, हाच श्रेष्ठ उद्देश मला अभिप्रेत आहे. तसेंच भेकडपणा अथवा नामर्दपणा उत्पन्न करणारीं सर्वच कारणें माझ्यामतें एकोत्तरी अनेक प्रश्नांप्रमाणें असून तीं एकाच—मूले कुठारः—उपायानें नाहींशी होणारीं आहेत. तेव्हां उगाच प्रकरणें वाढूं नयेत व रोगनिदान, त्याचीं कारणें, त्यावरील उपाय, तो करण्याची रीत व पुढील फलनिष्पत्ति, हीं सर्व त्रोटकपणें का होईना पण विषयाचे महत्त्वापुरती तरी कोणालाही एकत्र वाचण्यास मिळावीं असें योजून—कालगति—या अनिवार्य कारणाशिवाय दोनः खेरीज करून, भीरुपणा उत्पन्न करणाऱ्या बाकी बहुतेक सर्व कारणांचा 'कारणसमुच्चय' या एकाच प्रकरणांत मीं नुसता नामनिर्देश फक्त केला आहे.

कारण, नामर्दपणा उत्पन्न करणाऱ्या प्रत्येक कारणाचा अगोदर तपशीलवार वाढता शाखाविस्तार देऊन मग त्याचीं लक्षावधी अग्रें, नंतर लहान लहान डहाळ्या, मग मोठमोठाल्या खांद्या, त्यामागून मग खोड व शेवटीं मुळासकट बुंध, अशा पद्धतशीर क्रमानें पण हळु हळु एक एक विशाल कारणवृक्ष नाहींसा करण्याचें अत्यंत त्रासदायक व कंटाळवाणें काम कितीतरी वेळ एकसारखें करीत बसण्यापेक्षां व दमांत उखडून टाकण्यासारखें तें आपल्या शक्ति बाहेरचेंही आहे अशी खात्री वाटून, त्या वृक्षास दुष्ट व घातुक विचारसरणी-

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

रूप जीवनरस, मनाच्या [illegible] पुरविणाऱ्या, सुरवातीच्या ज्या [illegible] संस्कारनलिका— मनावरील प्राथमिक दुष्ट संस्कार—त्यांवरच जर एकदम तात्त्विक कुऱ्हाड चालविली—मनावर तसे संस्कारच न होऊं दिले—तर आनिवार्य अशा कालगतिशिवाय भीरुतेचीं अनिष्ट फलें प्रसवणारे इतर कारणवृक्ष, हां हां म्हणतां उन्मळून पडतील असें वाटल्यावरून, निरनिराळ्या शेकडो हजारों जातींच्या द्वेषमूलक व चमत्कारिक भाकड उत्पत्तिकथाहि देत न बसतां, कलहसंभव जातिसंस्था व धार्मिक पंथोपपंथ, हीं दोनच मुख्य कारणें, त्यांच्या विशेष वैशिष्ट्यामुळें जरूरीच्या अनुषंगिक गोष्टींसह रूढ चाली समजुती वगैरे विचारांत घेऊन, ओघानें होणाऱ्या किंचित इतर विषयांतरासह, जरा विस्तारानें वर्णिलीं आहेत. पुढें एकंदर कारणनिरसनाचें मुख्य साधन व तें उपयोगांत आणण्याची पद्धति, यांना दोन प्रकरणें देऊन अगदीं मोजक्या शब्दांत या विषयापुरता समारोप केला आहे. तथापि, वाचकांशीं हितगुज करण्याची हौस पुरी न झाल्यामुळें कष्टानें त्यांच्या नजरेआड होतां होतां, जगदीश, जग व त्यांतील व्यवस्था, यांविषयीं कांहींतरी भरमसाट कल्पना करणारे,—दैववादी, फलज्योतिष किंवा नवस शकून व पूर्वपुनर्जन्म वगैरेंवर फाजिल भरंवसा ठेऊन आपल्या कर्तव्याची हयगय करणारे,—आळशी किंवा कसातरी थोडासा प्रयत्न करून लगेच यत्नानें कांहीं होणार नाहीं असें म्हणून स्वस्थ बसणारे,—निव्वळ विलासी किंवा स्वतःच्या खासगी संसारापलीकडे सार्वजनिक कर्तव्य म्हणून कांहीं आहे, याची ओळखच नसणारे, पण मनांतून—किंवा वरवर बोलण्यांत तरी निदान—देशबांधवांच्या स्वातंत्र्याची कधीं काळीं सदिच्छा दर्शविणारे असे जे कोणी माझे मित्र कोठें असतील, त्यांच्या सर्वसाधारण तार्किक करमणुकीसाठीं, सिद्धांत म्हणून नव्हे, तर तर्क करण्याची दिशा व क्षेत्र यांत बदल होण्यासाठीं, बरी वाईट पण स्नेहपूर्वक अल्प मदत म्हणून 'कुंडली न मांडतां भारताचें भविष्य अथवा राष्ट्रोद्धाराचें गुपित' या स्वतंत्र प्रकरणांत तुटक स्फुटांप्रमाणें दोन विनयाचे शब्द लिहुन वाचकांस वाचनांतून मनन करण्यास मोकळे केलें आहे. आशा आहे कीं, हे शेवटले विनयपूर्ण शब्दहि, 'खरा वीर पुरुष अथवा नामर्दाचा मर्द हिंदु कसा होईल' या आपल्या मुख्य विषयासही पोषकच होणारे असल्यामुळें, वाचक त्यांचाही योग्य तोच परामर्श घेण्यास मुळींच अनमान करणार नाहींत.

[ १२ ]

# हिंदु नामर्द आहे हें खरें कशावरून ?

हिंदु खराच नामर्द झाला आहे, झुंजारपणा कसा तो त्याच्यांत मुळींच राहिला नाहीं, असें जग म्हणतें, आणि आपलें मनहि सांगते. ज्याच्या त्याच्या मनाची साक्ष कांहीं कमी महत्त्वाची नसते. आपण होऊन उगाच दुसऱ्याची कुरापत काढून त्याच्याशीं झुंज घेण्याचा रगेलपणा–एक फाजील मर्दपणाचें लक्षण–तर त्याच्यांत दिसत नाहींच—न दिसो, पण उलट दुसऱ्यानें बळेंच तसें केल्यास, न्यायाचें व संख्याधिक्याचें भरपूर पाठबळ असतां, हिमतीनें त्यास नुसतें स्वसंरक्षणहि नीटपणें करवत नाहीं, असें उघड झालें आहे आतां नामर्दपणा असा उघड कबूल करण्यांत कोणालाहि मोठी नामुष्की वाटावी, हें मनुष्यस्वभावानुरूप साहजिकच आहे; परंतु आज कैक वर्षें ठिकठिकाणीं व विशेषतः खिलापतकालांत, हिंदूंनीं मुसलमानांच्या गळ्यांत गळा घालून झाल्यावर, आणि मुसलमानांची दिखाऊ मोहक मिठी, म्हणजे खरें स्नेहालिंगन नसून ती प्राणघातक मगरमिठी आहे, असा अलीकडे एकसारखा सर्वत्र कटु अनुभव आल्यावर, तें सत्य आतां लपवून ठेवण्याच्या स्थितींतहि राहिलें नाहीं, असें मोठ्या कष्टानें पण उघड म्हणणें भाग पडत आहे.

हिंदु लोक आज कैक दिवसांपासून, आपल्या आचार विचारांनींच वास्तविक नामर्द बनत आले आहेत. आणि आतां त्या नामर्दपणात, सरकारी पक्षपाती धोरणामुळें अधिक भर मात्र पडत आहे इतकेंच. पण सरकारचें असें पक्षपाती धोरण व्हायला कारण देखील, हिंदूंचा अगोदरपासून बनलेला भीरु स्वभाव व विस्कळितपणाच पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेला आहे, हें विसरून चालायचें नाहीं. हिंदूंच्या वाढत्या नामर्दपणाला मुसलमानांनीं चव्हाट्यावर आणलें, म्हणून **एका अर्थीं बरें झालें**; नाहींतर तो नामर्दपणा किती अंशापर्यंत चढत गेला असता कांहीं सांगवत नाहीं. असो. जितलोकांमधील बेकी कायम ठेवण्यासाठीं कांहींतरी करून, जेत्यांना, जितलोकांमध्यें दुहीचें पातें सारखें फिरतें ठेवावेंच लागतें. तेव्हां धार्मिक बाबतींत नेहमीं आपसांत भांडत असणाऱ्या प्रजाजनांपैकीं अल्पसंख्य, पण आगे लाथ पीच्छे बात वृत्तीचे संघटित व स्वधर्मापेक्षां स्वराज्याची किंमत कमी समजणारे मुसलमान सोडून देऊन, बहुसंख्य पण सौम्यवृत्तीचे, स्वराज्याकांक्षी पण विस्कळित आणि बुद्धिमान पण भाबडे, असे

हिंदूच जे सरकारनें आपल्या पक्षपाती धोरणाला सुलभ भक्ष्य म्हणून निवडले, तें उगाच नव्हे.

असो. काळजी घेतली नाहीं तर देणें व दुखणें दुणावतें; सबब हें नामर्दाईचें दुखणें वेशीवर टांगलें जायला पाहिजेच होतें. आणि तें तसें टांगलें जावें म्हणून तर देशभक्त लालालजपतराय, यांनीं रावीपासून ब्रह्मपुत्रापर्यंत शेंकडो कोस जमीन पायाखालीं घालून, आपल्या अधिकारयुक्त लेखणीनें तमाम हिंदु लोकांस जागे करून जाहिर केलें कीं, हिंदु इतर गुणांत कोणाला हार न जाणारे असे आहेत. पण ते विस्कळित असून नेभळे झाले आहेत. हिंदु या सदराखालीं एक होऊन त्यांस निर्दयपणाची क्रूर मारामारी तर मुळींच करतां येत नसल्यामुळें, शत्रूवर त्यांचा वचक राहीनासा झाला आहे.

मला वाटतें देशभक्त लालालजपतराय यांनीं जशी देशांत आडवी सफर मारली, तशी विश्वेश्वरापासून रामेश्वरापर्यंत कोणी दुसरी उभी सफर मारली तरी त्याला निराळें दृश्य दिसणार नाहीं, हेंही त्यांत सूचित आहे; आणि परवां हिंदु महासभेचे उत्साही अध्यक्ष देशभक्त डॉक्टर मुंजे, यांनी हिंदुस्थानच्या अंतर्भागांत एक चक्कर मारली, तेव्हां त्यांसही त्याप्रमाणें तेथेंही प्रत्यय आलाच. अशा-रीतीनें जबाबदार लोक बायकोकडून हिंदूचें हें जबर दुखणें राष्ट्राच्या वेशीवर तर लटकावलें गेलेंच आहे. उपाय चिंतन आणि अनुरूप आचरण हल्लींपेक्षांही केव्हां जोरांत सुरू होईल तो सुदिन. पण नागपुरासारखीं एक दोन ठिकाणें खेरीज करून अनेक ठिकाणीं हिंदूनीं राजरोसपणें विस्कळितपणाची व भेकड-पणाची मोठमोठीं कैक प्रशंसापत्रें मिळवून संग्रहीं जपून ठेवलीं असल्यामुळें व कदाचित् हरवल्यास वरचेवर अधिक मिळविण्याचा क्रमही सावधगिरीनें चालू ठेवला असल्यामुळें, ‘ हिंदु नामर्द आहे का ? निदान झाला आहे का ? ’ तर– ‘आहे’ हें सिद्धच होऊन बसलें आहे व आहे कशावरून हें विचारण्याची तर सोयच राहिली नाहीं कारण नित्याप्रमाणें हिंदुमुसलमानांची मारामारी झाली. इतकें कानांनीं ऐकलें पुरें, किंवा डोळ्यांनीं तो मथळा वाचला पुरे, कीं पुढें काय झालें हें विचारावें किंवा वाचावें लागतच नाहीं. कारण, हिंदुमुसलमानांची मारामारी, हा आपला सुरवातीला, समान विजयार्थ शब्द–समुच्चय उच्चारा-यचा इतकेंच. बाकी मारामारींत मार कोणाला मिळायचा, अपमान कोणाचा व्हायचा, लुटालूट कोणाची व्हायची, मुलें कोणाचीं पळविलीं जायचीं, देवळें

कोणाचीं भ्रष्ट व्हायचीं व बायकांवर जुलुम कोणाच्या व्हायचा हें जसें कांहीं ठरलेलेंच असतें. तपशिलांची फारतर चौकशी करावी व निरनिराळ्या मारामारींतील संपादकीय फरक काढीत बसावें. आणि तसे फरक निघून ताज्या वर्तमानपत्रांतून जाहिर झाल्यानंतर पहावें, तों जो तो सचिंतपणें—कोंबडीं, मासे, मेंढरें हीं जशीं खायला, त्याप्रमाणें हिंदु मनुष्यें दुसऱ्यांच्या जुलुमजबरदस्तीला बळी पडण्याकरतांच उत्पन्न झालीं आहेत कीं काय ? असा नुसता सुन्नपणें विचार करीत, तत्संबंधीं उलट सुलट काल्पनिक सिद्धांत बसवीत व कलींतील भविष्योत्तर पुराणाची प्रचीती देणारीं पानें चाळीत, आपल्या खोलींत निमुटपणें बसला आहे असें दिसतें. अर्थात एवढें एकच कारण, हिंदु आजमितीला तरी नामर्द, दुबळा, झाला आहे हें खरें कशावरून ? तें ठरविण्यास पुरेसें आहे. त्याकरितां—आमचा मोहरमचा सण आहे, तेव्हां तो संपेपर्यंत माशिदी पुढेंच काय पण गांवांतील दूरदूरच्या तुमच्या देवळांत व घरांतही कोणत्याच कारणाकरितां वाद्यनाद होतां कामा नये, असा हुकुम मुसलमान करतात व हिंदु निमुटपणें तो पाळतात—असलें आश्चर्यकारक उदाहरण सांगण्याची अवश्यकता नाहीं.

## हिंदु कसा नामर्द आहे ?

वास्तविक या मुद्याची चर्चा नकोच होती. परंतु मुसलमानांबरोबर वरचेवर होणाऱ्या कटकटींत बहुधा हिंदूच हटकून पराभूत होऊं लागल्यामुळें, कांहीं वेळ्यांना हिंदूंच्या दुर्बलतेच्या अनुवंशिकपणा संबंधाची भूल पडून शंका येऊं लागली आहे, म्हणून मुद्दामच याविषयीं दोन शब्द लिहिले आहेत.

मागील विवेचनावरून, हिंदु केवळ प्रत्यक्ष मारामारींत दाखवाव्या लागणाऱ्या हिंमतीच्या बाबतींत आजकाल नामर्द दिसत असला—आणि खरोखर तेवढ्याच बाबतींत आणि क्वचित् इतर बाबतींत पण त्याचमुळें तो तसा दिसतो—तरी तेवढ्यावरून तो कसा नामर्द आहे ? म्हणजे कायमचा जातनामर्द आहे, का कांहीं जबरदस्त आगांतुक कारणांचा त्याच्यावर दीर्घकालीन परिणाम होऊन तो तसा तात्पुरता म्हणजे नामर्दपणांत बदल होण्यासारखा असा नामर्द झाला आहे, याचा निश्चय होत नाहीं. तेव्हां त्याचा विचार करूं.

सृष्टिनियमानुसार प्राप्त झालेले आपआपले विशिष्ट उपजत गुणधर्म सजीव निर्जीव पदार्थ जर तीव्र संस्कार करून घेऊनही सहसा पूर्णपणे सोडीत नाहींत, तर हिंदुमात्राची गर्भस्थितींतील घडण किंवा उपजच नैसर्गिक नामर्दपणाची

घडत असल्यास, म्हणजे तो स्वयंभुपणेंच नामर्द असा जन्मत असल्यास तो मर्द होण्याची आशा करणें, म्हणजे गरीब निरुपद्रवी कबुतरें,–साहसी गरुड, किंवा भित्रे लाजाळू ससे,–धाडशी लांडगे बनविण्याचीच हाव धरण्यासारखें मूर्खपणाचें होईल. कारण निसर्गयोजना कशी बदलणार ? काल्पनिक गोष्टींतील एका बादशहाची एकदां तशी लहर लागली होती, तेव्हां त्याच्या चतुर बिरबलानें, गाढवाचा घोडा बनविण्याचें लटकें नाटक स्वतः बळेच त्याला दाखवून निसर्गयोजना मानवी प्रयत्नानीं बदलली जाणार नाहीं, असें बादशाही हुकुमानें त्याच्याच तोंडून कायमचें ठरवून घेतलें. तेव्हां हिंदू जन्मानेंच नामर्द, असाच जर निर्णय असेल, तर तो फिरवून घेण्याचा व्यर्थ खटाटोप करायचा तरी कशाला ? प्रयोगाच्या निर्जीव वस्तूंप्रमाणें जिवंत हालचाल केल्याशिवाय स्वस्थ बसावें झालें. पण तसें नसून हिंदू मनुष्य पृथ्वीवरील इतर कोणत्याही मनुष्यप्राण्याप्रमाणें केवळ सर्वसाधारण अशा मानवगुणांनीं युक्त असून, तो पूर्वी तर मर्द होताच, पण अजूनही कोठें कोठें वेळीं अवेळीं तो मर्दुमकी गाजवितो व म्हणून पुढेंही निःसंशय तसाच प्रत्यय येईल, असें जर निष्पन्न होईल तर, त्याला मर्द बनविण्याचे कोणतेही प्रयत्न करण्याचे शिल्लक ठेवितां कामा नयेंत, असें ठरतें.

हिंदूंच्या मर्दपणाच्या पुराव्यासाठीं अगदीं प्राचीनकालचा उज्वल इतिहास जरी सोडून दिला, तरी श्रीछत्रपती शिवाजी महाराज, संताजी धनाजींची जोडी, थोरले बाजिराव पेशवे, किंवा महादजी शिंदे, यांच्या हाताखालचे मराठे, मोंगलांस कसे कर्दनकाळ वाटत ? आजही इंग्रज सेनानी हिंदूंच्या मर्दुमकीवर तुर्कस्थानांत किंवा फ्रान्सच्या रणभूमीवर कसे जय मिळवितात व **एकेकाळीं बाटून मुसलमान झालेले हिंदूच, केवळ धर्म बदलल्यानें आज बाटल्याशिवाय राहिलेल्या आपल्या पहिल्या धर्मबंधु हिंदूंस नामर्द बनविण्या इतके कसे शूर वा क्रूर होऊं शकतात,** हें पाहिलें म्हणजे, उपजत प्रकृति गुणधर्मानें नव्हे, तर नामर्दपणा उत्पन्न करणाऱ्या कांहीं तशाच जबर अगांतुक कारणांचा तात्कालिक जोरदार पण युक्तियुक्तीनें बदलतां येण्याजोगा असा परिणाम होऊन, हिंदू, त्या कारणांनीं तात्पुरता नामर्द झाला आहे, असें सरळ अनुमान निघतें. तेंव्हां नामर्द बनविणारीं हीं आगंतुक कारणें कोणतीं हें हुडकून काढणें अवश्य व क्रमप्राप्तच आहे.

# कारणांची खात्री देववेल का ?

क्रांति सारख्या उलथापालथ करणाऱ्या मोठमोठ्या गोष्टी घडून आल्यावर. संशोधकांस त्यांच्या लांबचलांब व गुंतागुंतीच्या कारणपरंपरेचा पूर्ण सुगावा, सहसा लागत नाहीं; व जो लागतो तोही पुष्कळ वेळां भ्रममूलक असतो. तथापि हें समजत असूनही, आपलें निदान बरोबर जमून यावें व उलट फेर क्रांतीची उपाययोजना अचुक फलदायी व्हावी, या इच्छेनें पहिल्या क्रांतिकारक कार्याचें कारण शोधून काढण्याकडे मनुष्याचा स्वाभाविकच कल असतो. पण जलयंत्र घटांच्या अविरतपणें चालणाऱ्या रिक्तभरित क्रमाप्रमाणें, सृष्टीच्या कार्यकारण-चक्राचे दुर्वेतर असंख्य व गुप्त निसर्गनियमानुसार कसेतरी जे अगोदरच फिरून गेलेले असतात, त्यांची आपल्याला माहितीही नसते. तेव्हां अशा स्थितींत,प्रयत्न फलाची शाश्वति न पटून नक्की अमुकच कारणांनीं अमूक घडलें, असें छातीवर हात ठेवून सांगण्यास कोणाचेंही मन कचरावें यांत काय नवल ?

ठराविक विधि अथवा दैवयोजनेप्रमाणें म्हणा अगर प्रयत्नाचें-कृत-कर्माचेंच फल म्हणून म्हणा, सहज घुणाक्षरन्यायानें वा पूर्वसंचितानुसार अथवा विशिष्ट कारणरहित असा अनपेक्षित आकस्मिक केवळ सहज योगायोग म्हणून पाहिजेतर म्हणा किंवा दुसरें जें वेळेवर सुचेल तें कारण म्हणून म्हणा- अशा मोठ्या गोष्टींत कारणांचा निश्चय, हा नेहमींच न तुटणारा असा वाद आहे, पण कारण समजलें नाहीं तरी, जगतांत कार्य हें मात्र एकसारखें घडून येतच असतें, व उपलब्ध पुराव्याप्रमाणें त्याला कोणतेंतरी कारणही जोडलें जातच असतें.

आतां असें हें संशोधित कारण तरी का घडून आलें, म्हणून त्या कारणाचें कारण व मग पुन्हां आणखी त्या कारणाचें कारण अशा कधींही न संपणाऱ्या क्रमानें शोध करीत करीत अनंताचा पल्ला गाठणें, मानवी बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें काम म्हणून नाइलाजानें सोडून दिलें जात.

कार्यकारणवैचित्र्याची सतत अधिकाधिक वाढ होत जाणारी परंपरा न थांबतां, विरुद्ध प्रयत्नांना बगल देऊन अखंडपणें कशीतरी व कोणत्यातरी रूपानें कुठेंतरी प्रकट होत असणे, हा सृष्टि धर्मच आहे. तराजूच्या सरळ ताठ दांडीचें एक शेवट, ज्या वेळीं ज्याप्रमाणांत खालीं दबलें जात असतें, त्याच वेळीं त्याच प्रमाणांत तिचें दुसरें शेवट आपोआप वर उचललें जात असतें; त्याच

प्रमाणें कोणत्याही एखाद्या पुढील प्रतिक्रियेचें बीजारोपण तिच्या अगोदरच्या क्रियेंत होऊन गेलेलेंच असल्यामुळें, कार्यवैचित्र्याच्या संततीचें हें अमर रहाट-गाडगें, कायम गति दिलेल्या सुंदर पण बिकट यंत्राप्रमाणें सदैव चालू असतें. मुक्काम असा त्याला माहीतच नाहीं. आतां या गोष्टीची सत्यता पटवून घेतांना हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, माहित झालेली एका कालचीं व एका ठिकाणचीं कारणें दुसऱ्या वेळीं व दुसऱ्या ठिकाणीं तसलेंच कार्य घडवून आणण्यास समर्थ होतीलच असें नाहीं. कारण एकंदर सर्वप्रकारच्या परिस्थितींत जरा कोठें थोडा-बहुत महत्त्वाचा फरक झाला कीं, त्या नवीन रसायनाला अनुरूप असें भलतेंच एखादें अनपेक्षित कार्यफल निदर्शनास येतें; व मिळालेल्या पुराव्यावरून तींच; तेवढींच, तशींच, कारणें असतां असें विपरीत कार्य कां व्हावें, असें म्हणत आपली पंगु परीक्षक बुद्धि बुचकळ्यांत पडते. पण वास्तविक जें झालेलें असतें तें नियमबद्ध सृष्टिशास्त्राप्रमाणें यथान्यायच झालेलें असतें. नियमाविरहित व विनाकारण असें अपवादादाखल थोड्या आकस्मिक योगायोगांखेरीज कधींच कांहीं घडत नसतें. बाकी योगायोगांचे हे अपवाद देखील म्हणजे सर्वस्वीं नियम-विरहित असे नसून ते फक्त गर्दींत दोन अगर अधिक माणसांची अवचित सहज टक्कर होऊन त्यामुळें जसें भलतेंच कांहीं घडतें, त्याप्रमाणें असतात इतकेंच. ते परिणामकारक मोठ्या स्वरूपाचे असले म्हणजे लोक त्यांचे उत्पादकत्व दैव, दैवतें किंवा भूतपिशाच्चें यांजकडे लावितात, व क्षुल्लक असले, म्हणजे त्यांजकडे दुर्लक्ष करितात.

असो. एकीकडे प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न करणारीं कारणें नाहींशी करून अनुकूल परिस्थिति उत्पन्न करण्याचे प्रयत्न, मानव, यथामति, यथाशक्ति करीतच असतो व दुसरीकडे, मानवी प्रयत्न व इच्छा लक्षांत न घेतां, अनेक गुंतागुंतीचे व सतत चालू राहणारे बहुविध सृष्टिव्यापार परस्पर संलग्न होऊन, त्या नूतनघटित मिश्रणाला लागू असलेल्या निसर्गनियमाप्रमाणें कल्पनातीत नवीन कार्य उत्पन्न करण्यांत गुंतलेलेच असतात; आणि त्याच वेळीं पुन्हां हें नवीन जन्मास येणारें कार्य, त्याच्याही पुढील कार्याचें कारणबीज होत असतें. अशा रीतीनें ही कारण-कार्य–कार्यकारण दिव्य खरी शृंखला, जगाच्या अंतापर्यंत न तुटतां लांबत जायची असते.

जगाच्या आरंभापासून आजपावेतों निरनिराळ्या राज्यांचे उदयास्त बहु-तेक आळीपाळीनेंच निरनिराळ्या किंवा त्याच त्याच कारणांनीं, समजुतीप्रमाणें

भरपूर प्रतिबंधक उपाय केले जात आहेत, तरी सारखे चालू आहेत. त्याचप्रमाणें कांहीं दुर्धर रोगांचीं नेमकीं कारणें सापडलींशी वाटून व त्यांवर रामबाण औषधें निघून शिवाय प्रतिबंधक उपायही प्रसिद्ध होत आहेत, इतक्यांत त्या नवीन औषधउपायांनींच जसे कांही तिसरे नवे रोग डोकें वर काढू पहात आहेत. समाजांतील अव्यवस्था व अराजकता नाहींशी होऊन समाज सुखी व्हावा म्हणूनच मूळ निघालेल्या व एके काळीं प्रशंसनीय वाटणाऱ्या वर्णाश्रम व राजधर्म या संस्थांचीं तत्त्वें कालपरिस्थिति बदलतांच चुकीचीं वाटूं लागत आहेत तर, आज बरी वाटणारीं सबगोलंकारी व समतेचीं तत्त्वें, पुढेंमागें चुकीचीं ठरतील म्हणून आरंभालाच सकारण संशय येऊं लागत आहे, तसेंच मोठ्या कल्पकतेनें व उमेदीनें शत्रुसंहारार्थ उत्पन्न केलेलीं शस्त्रास्त्रें व योजिलेल्या युक्त्या जरा कांहीं चूकभूल होतांच भस्मासुराप्रमाणें योजकाच्याच नाशाला कारणीभूत होतांना नेहमीं दिसत आहेत. असा चमत्कृतिजनक देखावा नेहमीं दृष्टीस पडतो. कारण निसर्गाचा जगड्व्याळ व्याप सुसूत्र खरा, तथापि फारच मोठा व कल्पनातीत गुंतागुंतीचा असून, सवड सांपडतांच नियमानुसारच पण वरचेवर त्वरित बदलणारा असतो. त्यामुळें मानवाला या सगळ्या गोष्टींचें आकलन न होऊन, त्यानें आपल्या बुद्धिप्रमाणें योजिलेले उपाय, पुष्कळ वेळां सहजच अपुरे पडतात. त्याबरोबर सृष्टिकार्य लगेच सांपडेल त्या मार्गानें व मिळेल त्या गतीनें पुढें चाल धरितें, आणि मनुष्य, दैव दैव म्हणत कपाळाला हात लावून स्वस्थ बसतो. काय करील बिचारा ! बुद्धीच पंगु. एवंच या नाहीं त्या निसर्गनियमित कारणानें, कसेंतरी कोणतेंतरी कार्य घडतच असतें, व परिणामानंतर, त्याला सुचेल तें कारणही मनुष्याकडून जोडलें जातच असतें. पण उपयोग काय ? मरून नाहींसे न होतां एकपेशी अमीबाप्राण्याप्रमाणें फक्त दुसऱ्या कुडींत, किंवा अहिमहिरावणाप्रमाणें वाढत्या क्रमानें फार तर गति मिळेल त्याप्रमाणें निराळ्या दृश्यांत अवतीर्ण होणें, असे हे चिरंजीव सृष्टिव्यापार असल्यामुळें, कार्य झाल्यावर कारणांचा काथ्याकूट, म्हणजे हंसाकडून माला पळविली गेल्यानंतरचाच तो कलकलाट दुसरें काय ?

असो. अशा स्थितींत अगदीं पहिल्यानें नामर्दपणा उत्पन्न करणारीं कारणें प्रथमतः मुळांत कोणत्या दुसऱ्या कारणांनीं कसकशीं जुळून आलीं, तें पाहण्याच्या भरीस मुळीं न पडलें—आणि न पडावें हेंच उत्तम. कारण मूळ सांपडणारच नाहीं—व आजच्या परिस्थितींत फक्त वरवर पाहिलें असतां, असा नामर्द-

पणा उत्पन्न करणारीं कोणतीं कारणें असावींत असें प्रस्तुत कालीं वाटतें, तेवढेंच पहावें असें म्हटलें, तरी तेंही प्रतिज्ञापूर्वक निश्चितपणें सांगण्यास वर दर्शविलेल्या कारणांनीं खात्री न वाटून मन कचरावें व–कारणांची खात्री देतां येत नाहीं–असेंच अखेर म्हणण्याची पाळी यावी, यांत काय नवल?

---

# बेगुमान कालगति.

कोण काय म्हणेल किंवा कोणाला काय वाटेल याची फिकिर न करितां, स्वतःच्या ठराविक नियमानुसार विशिष्ट गतीनें सृष्टिचक्र किंवा कालगति सतत चालू असल्यामुळें, कार्यांचीं कारणें, नेहमींच बिनचूकपणें कां सांगतां येत नाहींत, हें मागील प्रकरणीं आपण पाहिलें. तथापि कर्ममार्गाला अनुसरून स्वस्थ न बसतां, संकटनिवारणार्थ, कुशल उपाययोजना करीत राहणें, हेंही आपलें कर्तव्यच असल्यामुळें, सुरवातीला आपल्या तर्कशक्तीप्रमाणें कारणांचा शक्य तितका तलास लावणें, ओघानेंच प्राप्त आहे. त्याप्रमाणें पाहतां, कालगति, हें कारण प्रथमच नजरेंत भरतें. व तें कांहींसें अनिवार्य वाटत असलें तरी, तें कारण आहे, व निरुपाय झाल्यावर समाधान मानण्याची सुरक्षित जागा आहे. तेव्हां या त्याच्या महत्त्वामुळें, एके काळीं मर्द असलेल्या हिंदूंना आतां असे नामर्द बनविणारीं कारणें सांगतांना, कालगति, या कारणाला पहिला मोठा मान देणें भागच आहे.

कालगति अनुकूल असली, म्हणजे क्रूर व कपटपटु अशा बलवान शत्रूचे मुद्दाम जाणूनबुजून जरी मोठे अपराध केले, तरी तेही तिच्या चतुर योजनेनें त्याच्या बुद्धीस भ्रंश होऊन किंवा कसेतरी जिरून जातात; व तीच उलट प्रतिकूल झाली, म्हणजे विनोदानें किंवा केवळ उपकारबुद्धीनें केलेल्या गोष्टींतही, स्वप्नांत सुद्धां मनांत न आणलेल्या दुष्ट हेतूंचें हुबेहुब प्रतिबिंब, प्रत्यक्ष प्रेमळ मित्राच्या जागृत विचारी दृष्टीलाही स्पष्टपणें दिसतें. असा तिचा मोठा विलक्षण प्रभाव आहे. सारांश, अशा या निरंकुश, चंचल आणि चवचाल कालगतीचे, तिच्या विचित्र विलासांतील चमत्कारिक मुद्राप्रकार आणि चपल

अंगविक्षेप, कालरूप चलच्चित्रपट्टावर मोठ्या चतुराईनें चितारले जात असतांना ते दुरून तटस्थ वृत्तीनें पाहणें, सदोदित रमणीय नसलें, तरी चिंतनीय असतें, एवढें मात्र खरें.

विक्रमाला म्हणतात साडेसाती आली तेव्हां त्याच्या डोळ्यांदेखत समोरील खुंटीवरचा सुंदर हार भिंतीवरच्या चित्रमयूरानें हां हां म्हणता खाल्ला. आणि हार चोरीस गेल्याबद्दलचा खरपूस मार मात्र राजा असलेल्या बिचाऱ्या विक्रमाच्या वांटयास आला. त्याचप्रमाणें, धर्म, भीम, अर्जुनादि पांडव हे स्वतःच अगोदर मोठे ज्ञानसंपन्न, व अतुल पराक्रमी वीर, घरांत द्रौपदीसारखी ज्ञानी व सुशील साध्वी आणि बाहेर प्रत्यक्ष भगवान कृष्ण परमात्म्यासारखा जिवलगसखा, अशी पांडवांची मोठी स्पृहणीय स्थिति होती तरी, कालगतीनें आलेल्या विपत्कालीं, यांपैकीं कोणाचेंही कांहीं चाललें नाहीं. पण याहूनही कदाचित् अधिक गम्मत व महत् सखेदाश्चर्य चालू काळांत आपल्या नजरेसमोर आजमितीलाही घडत आहे. शेकडों नव्हे हजारों वर्षें तिरस्काराच्या व अपमानाच्या टाचेखालीं सतत तुडविले जात असतांही, जे अस्पृश्य अद्यापही हिंदुत्वाच्या अभिमानानें हिंदुधर्माकडे दीन केविलवाण्या मुद्रेनें पहात, न्यायाची नव्हेच, तर नुसत्या दयेची तरी भिक्षा मिळावी म्हणून पदर पसरून उभे आहेत, त्यांची अजून आम्ही नुसती सांवलीदेखील घेण्यास तयार नसतो, व जे आमच्या छाताडावर बसून आमच्या डोळ्यांदेखत पवित्र गोमातेच्या मानेवर सुरा ठेवण्यास व आमच्या आईबहिणींच्या आंगावरील पदर ओढण्यास तयार, त्यांना, किंवा नाइलाजानें बाटून पवित्र!!! खानसाहेब झालेल्या पहिल्या **अस्पृश्यांना** मात्र, भाईसाहेब म्हणून अदबीनें शेजारीं उच्चासन देण्यास डोळ्यांत झणझणीत अंजन पडत आहे तरी—तयार होतों, हें केवढें आश्चर्य ? खरोखर, आपलें हें निर्लज्ज नवलाईचें वर्तन पाहून, आपले शत्रूही एकीकडे पोट धरधरून मोठ्या मिस्किलपणानें खाचित हांसत असतील. सर्व जगाचे अगोदर न्यायी, दयालु व चिकित्सक झालेल्या आपणास, ही विस्मयकारक चूक अजूनही समजून येऊं नये, हें केवढें नवल ? असो.

ही शेवटली परिस्थिति, सांप्रत सर्वांचेच नजरेसमोर चलच्चित्राप्रमाणें सारखी धरलेली असल्यामुळें, तिच्याबद्दल अधिक लिहिणें नको. पण वरील विक्रम—पांडवांच्या पौराणिक गोष्टींत कल्पनातिशय असलें तरी, त्यांत अनुस्यूत असलेल्या तत्वाचा नजरबंदीचा खेळ, आजपर्यंत जगाला धमकावणाऱ्या जर्मन केसरप्रमाणें मी मी म्हणणाऱ्या कितीजणांच्या किती वेळां अनुभवास

ग्रं. क्र. ३२९०



आला असेल किंवा यत असेल, याची साक्ष समक्ष घडत असलेला सांप्रतचा इतिहासच देईल.

कोणाच्यामतें असलाच कांहींतरी चमत्कार फारा दिवसांपासून मोठ्या विस्तृत प्रमाणावर हिंदूंच्याही बाबतींत होत असावा; व तसा जबर संशयही येतो खरा. कवींची काल्पनिक दृष्टीही पोंचत नाहीं, इतक्या मागच्या अशा वेदप्राचीनकालीं रचल्या गेलेल्या किंवा निश्वसित केलेल्या सुंदर उपमा अलंकारयुक्त पवित्र वाङ्मयसरोवरांत, खरें म्हटलें म्हणजे, कोणाचेही कृतज्ञतापूर्वक व कुतूहलबुद्धीनें आनंदांत विचारविहार चालावे. पण नशीबीं पाहिजेना ! हिंदूंपैकींच कांहीं जणांना त्या सुंदर उपमा, म्हणजे त्या सरोवरांत आपल्याला खायला टपून बसलेले मत्सरमगरच वाटून, त्यांना पाहतांच ते क्रोधाविष्ट होतात, व द्वेष संतापाच्या आविर्भावांत त्या शुद्ध वाङ्मयजलांत त्यांचीच पडलेलीं रागीट पडछायारूप विकृत मतें, त्यांच्या अंध अनुयायांना भुतांप्रमाणें भेवडावतात.

आतां असा हा विक्षिप्तपणा तरी कशाचा द्योतक समजावा ? फार कशाला एकच लहानसें उदाहरण घेऊं. ‘ ब्राह्मणोस्य मुखमासीत् बाहूराजन्यः कृतः उरू तदस्य यद्वैश्यःपद्भ्यां शूद्रो अजायत । ’ या ठिकाणीं हिंदभूमींतलि सर्व व्यक्ति मिळून समष्टिरूपानें विराट देहधारी असा एक राष्ट्रपुरुष कल्पिलेला आहे. आणि मुख, बाहु, वक्षस्थल व पाद हे जसे देहाचे महत्त्वाचीं कामें करणारे पण स्वतंत्र निरनिराळे मुख्य अवयव, त्याप्रमाणें विद्या, पराक्रम, पैसा व सर्वांस पोसणाऱ्या भूमातेची सेवा हीं चार विशिष्ट कामें, गुणकर्मांच्या हक्कानें करणारे जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण, हेही त्या विराटदेहधारी श्रेष्ठ जनताजनार्दनाचे कार्यवैशिष्ट्याप्रमाणें सारख्याच योग्यतेचे मुख्य मुख्य अवयव आहेत; एकोप्यानें चालल्यास ठीक नाहींपेक्षां सर्वांचेंच मरण, हेंच उत्तम तत्व त्यांत सांठविलेलें आहे.

आतां पहा येथें किती गोड सुसंघटनादर्शक असा बहारीचा दृष्टांत साधला आहे ? अशा प्रशांत काव्यजलांत, निर्विकार मनानें व सुखानें निमज्जन क्रीडा करायची का द्वेषमत्सरादि सर्व दुष्ट हेतूंतलें हालाहल विष त्यांत बळेंच ओतून तो मृतसमुद्र आहे, असें म्हणत तेथून तिरस्कारानें एखाद्या माथेफिरू पिसाट कांचनभटाप्रमाणें दगड मारीत पळत सुटायचें ? कांहीं कशाची जरूर तरी ? पण ते तरी करणार काय ? कालगतीनें झपाटले गेल्यामुळें, समते-

ऐवजीं जन्मजात श्रेष्ठहीनतेचें विषमबीजच तेथें मुद्दाम पेरलें असल्याची समजूत होऊन, तत्कालीन केवळ वस्तुस्थितिवर्णनाच्या रूपकांत, त्यांना अक्राळविक्राळ जबडा पसरलेले नक्र दिसतात; म्हणून गैरसमजानें मत्सरवश होऊन, ते तसे करतात दुसरे काय ? पण अशारीतीनें आपल्या पवित्र धर्मग्रंथांबद्दल असा द्वेषमूलक समज होऊन, त्यामुळें चुकीच्या धोरणानें अर्थ लावण्याचा व पूर्वज धर्मबांधवांच्या सद्धेतूविषयीं साशंक राहण्याचा परिणाम काय होतो तर, हिंदूंच्या एकजुटीच्या गोटांत फूट वाढत जाऊन, त्यांचे संख्याबल आटत जातें, आणि त्यांचें एकजुटींतील प्रतिकारसामर्थ्य, त्या मानानें लुलें पडतें, व या कमी झालेल्या प्रतिकारसामर्थ्याची, म्हणजे असून नाहींशा झालेल्या पाठबळाची, म्हणजेच सत्यसमाजिस्ट किंवा ब्राह्मणेतर यांच्याप्रमाणें जवळ जवळ शत्रुत्वांत रूपांतर झालेल्या कांहीं संख्येची जाणीव होतांच, हिंद्वेतर बलाढ्य शत्रूशीं झगडतांना, हिंदु, कालगतीच्या निष्ठुर लीलेला बळी पडून नामर्द होत जातो.

पण याला इलाज काय ? विश्वचक्राला विश्रांति माहीत नसते आणि कालगति प्रमाणें कांहींतरी तर पुढें व्हायचेंच असतें. भविष्याच्या पोटांतील पुढील गोष्ट अनेक-नियमबद्ध कारणांनीं नेहमीं अनिश्चित असल्यामुळें, नेमकी कोण सांगणार ? गोड वाटणाऱ्या चातुर्वर्ण्याच्या पोटीं, पुढें उपजत श्रेष्ठ कनिष्ठ भावना असह्य होऊन सत्यसमाजिष्टासारखीं कडु कंवडळें जशीं निपजलीं, तशीं, कांहींजणांस पिढ्यान पिढ्या निर्धनतेंत घाणेरडेपणानें राहण्यास जवळ जवळ भाग पाडून पुन्हां स्वच्छतेकरितां अस्पृश्यता उत्पन्न करण्याच्या पोटीं-हिंदूंचेंच निसंतान करणारें, मुसलमानांचें संख्याबल वाढविणारें-कुसंतान जन्मास येणार, हें जर मागील आचारधर्मप्रवर्तकांस अगोदर कळतें, तर कदाचित् आज शुद्धि चळवळीची जरूरही पडली नसती. असो.

हिंदूंना नामर्द करणारें, कोणत्यातरी योग्य कारणानें कोणत्यातरी रूपांत, गैरसमजानें किंवा योगायोगानें नित्य प्रकट होणारें म्हणून—कांहींसे अनिवार्य, असें—कालगति—हें पहिलें महत्त्वाचें कारण आहे. अगोदर कोणी योजना न करतांही, व्यवहारांचे गर्दींत अनपेक्षितपणें, सहज घडून येणाऱ्या कांहीं आकस्मिक योगायोगांप्रमाणें, तें बरेंचसे परस्वाधीन असल्यामुळें, त्याचें विवेचन एवढेंच पुरे. आतां सहजनिवार्य व कष्टनिवार्य अशी संभवनीय कारणें कोणतीं, तें पुढें पाहूं.

———

# प्रचलित जातिसंस्था व रूढ चालीसमजुती.

सृष्टीची योजनाच अशी आहे कीं, कोणतीही सामाजिक व्यवस्था, सदोदित एकाच स्वरूपांत हितकर, अशी मानवांस वाटूं नये व वस्तुतः असूंही नये. सर्व वस्तुमात्रांप्रमाणें परिस्थितींच्या टिकाऊपणासही कांहीं कालमर्यादा-आयुष्य-आहे असें दिसतें. आयुष्याची ती कालमर्यादा कांहीं विशिष्ट अवस्थेंत त्या परिस्थितीनें गाठली कीं, तिच्याच अतिरेकानें वगैरे ती नकोशी वाटण्यासारखी योग्य कारणें आपोआप उत्पन्न होऊन, तींत फेरबदल करण्याकडे मनुष्यांची सहज प्रवृत्ति होते. मग चालत आलेल्या व्यवस्थेंत बदल करावा किंवा न करावा अथवा कसा करावा याबद्दल समाजांत भांडणें सुरू होतात. पुढें कांहीं कालानें उभयपक्षांचे त्वयार्ध मयार्ध असें कांहीं होऊन थोडा बदल होतो; नंतर, किंचित् शांतता झाल्यासारखी वाटते; पण सृष्टीच्या योजनेनुरूप पुन्हां पूर्व स्थितीवर गाडें येऊन कार्यकारणचक्र चालू होतें. पृथ्वीवर मानवांची उत्पत्ति झाल्या-पासून याचप्रमाणें क्रम सुरू असून त्याचाच अनुभव प्रस्तुत आपल्याला येत आहे. जन्मायत्त श्रेष्ठ कनिष्ठ भावनेवरील चालू पृथक् जातिसंस्था, अशीच वैमनस्याचा वगैरे अतिरेक झाल्यामुळें नकोशी वाटूं लागली आहे. कारण प्रगतिपर आणि सुसंघटित लोकसंग्रह होणें हा जो 'धारणात धर्मः' या व्याख्येप्रमाणें धर्मसंस्थेचा मुख्य उद्देश, तो न साधतां उलट समाजांत विस्क-ळितपणा आणि भेकडपणा मात्र वाढत आहे. कारण लोक एकमेकांचा हेवा करूं लागल्यामुळें त्यांचे एकमेकांस पाठबळ मिळेनासें झालें आहे. याला दुसरींही पुष्कळ कारणें आहेत. पण जन्मावर जातीचा आणि मनुष्याचा श्रेष्ठकनिष्ठपणा मानणें, ही समजूतच त्याचें मुख्य कारण आहे, म्हणून ही समजूतच प्रथम नष्ट होणें हा त्यावर बिनतोड उपाय आहे, असें कित्येकजण मानतात. जातींतून जाती जशा वाढत गेल्या त्याचप्रमाणें उलट जातींत जाती सामील होत होत शेवटीं सर्व जातींचें एकीकरण झाल्यानें ही आपत्ति टळेल अशी त्यांची कल्पना आहे. हिंदूंच्या सनातन संस्कृतीचे पूर्ण अभिमानी व हिंदुसमाजाविषयीं अगदीं आपलेपणाची भावना असणारे आणि हिंदुसमाजांत राहूनच त्यांची प्रगति करूं पाहणारे असेही ते आहेत. हिंदूंचा केवळ तिरस्कार करून हिंदुधर्माचा उच्छेद करूं पाहणारे असेच सर्व नाहींत. कोणी सांगावें त्यांची कल्पना कदा-

चित् चुकीचीही असेल. पण विद्वान् स्वकीय सद्गृहस्थांकडून निस्वार्थ बुद्धीनें व खऱ्या कळकळीनें ती पुढें येत असल्यामुळें, त्यांच्याच विचारसरणीनें प्रचलित जातिसंस्था व रूढ चाली समजुती, प्रस्तुत अवनतीस कशा कारण आहेत व ती आपत्ति नाहींशी करण्यास जातींचें एकीकरण कसें उपयोगी पडेल आणि तें कसें साधेल याचा विचार करूं; व कोणीकडून तरी हा विस्कळितपणा आणि भीरु स्वभाव वगैरे कमी होण्यासारखें त्यांत कांहीं असल्यास पाहूं. म्हणजे तूर्त पोटजातींच्या एकीकरणास तरी त्याचा कांहीं उपयोग झाल्यास होईल.

सुखाभिवृध्यर्थ व्यक्तिपरत्वें झटत असतांना, मनुष्यमात्रांच्या खासगी जीवनव्यवहारांतही एकप्रकारचें स्वास्थ्य नांदावें व त्यांचा सार्वजनिक जीवनक्रमही एकमेकांचा एकमेकांस संघटित विरोध न होतां, तो सामुदायिक सुखाचा व सोयीचा व्हावा, म्हणून अति पुरातन कालीं, आपल्या पूर्वाचार्यांनीं बरीच पुष्कळ दूरवर नजर पोंचवून, सद्धेतूनें व मोठ्या धोरणानें, एकंदर हिंदुसमाजाचे गुणकर्माप्रमाणें चार विभाग पाडण्याची व व्यवहारसौकर्यार्थ त्यांच्यांत कांहीं विशिष्ट हक्कांची पृथक् वांटणी करून, शिवाय **अनुलोमप्रतिलोम पद्धतीनें पुन्हां त्यांना एकप्रकारच्या सांखळीनें कांहींसे एकत्र ठेवण्याची जी सुंदर क्लृप्ति काढली,** ती जितक्या दक्षतेनें संभाळून व बदलत्या कालमानाप्रमाणें सुधारून चालू ठेवायला पाहिजे होती, तितकी पुढें आपल्या कमनशिबानें पुढच्या तत्कालीन समाजनेत्यांकडून—कदाचित् परकी लोकांच्या आगमनामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीपुढें नाइलाज झाल्यामुळें—ठेविली न गेल्यानें, गुणकर्माप्रमाणें पाडलेल्या त्या विभागांतील मनुष्यें, आपआपलीं नियोजित कामें, कांहीं काल करितां, करितां, व त्यांच्या मुलानातवांनींही वडिलांचेच धंदे चालवितां चालवितां, कालांतरानें त्यांचे ते विभाग गुणकर्माऐवजीं, जन्मावर ओळखले जाऊं लागले; आणि येथेंच पहिला अपशकून घडला. ज्या विभागांत जे जन्मतील, त्यांनींच—आपली लायकी किंवा आवड लक्षांत न घेतां,—त्या विभागाचे ठरलेले धंदेच वाडवडिलांप्रमाणें पुढें चालवायचे, असें कायमचें घातुक वळण समाजघटकांना लागत चाललें.

अशा रीतीनें एकदां आपल्या गुणकर्माच्या उच्च स्थानापासून सुटल्यावर खालीं येतांना, पाण्याचा ओघ ज्याप्रमाणें मिळेल त्या निरनिराळ्या मार्गांनीं विभागून अधिकाधिक उथळ, कमजोर व लहान होत होत विस्कळितपणानें खालीं येतो, त्याप्रमाणें मनुष्यसमूहाचे विभाग पूर्वीप्रमाणें त्याच्या उघडाउघड, सहज, वरवर दिसणाऱ्या गुणकर्माकडे पाहून न करितां,

अज्ञान अंधकारदरींत गुप्तपणें असलेल्या त्याच्या जन्मपरंपरेकडे अधोवदनानें डोकावून पाहून करण्याची अधोगति, समाजधुरीणांच्या दृष्टीस, कारणाकारणांनीं मिळतांच, मग काय विचारतां? बुडत्याचा पाय जास्त खोलांत म्हणतात त्याप्रमाणें, हिमागिरीच्या उत्तुंग कैलास शिखरावरील स्थानभ्रष्ट गंगेच्या वाढत्या उतरत्या वेगानें, अगदीं खालीं खालीं येत येत ती दृष्टि, अखेर, सर्व समाजाच्या मर्त्यस्थितीच्या भयाण खोल खड्ड्याशीं येऊन थडकली. कालपरिस्थित्यनुरूप जरा कोणी आपल्या खाण्यापिण्यांत, वागणुकींत, बोलाचालींत, किंवा उपजीविकेचा धंदा करण्याच्या पद्धतींत फरक केला, कीं झाला त्याचा विभाग निराळा; मग त्याच्या मुलांनींही त्या निराळ्या विभागांत तसेंच वागायचें, पण जर कां पुन्हां त्या मुलांपैकीं एखाद्यानें पुढें कारणपरत्वें आणखी कशांत कांहीं फरक केला, कीं त्याचाही आपल्या भाऊबंदांपासून तेवढ्यावरून आणखी निराळा विभाग व्हायचा. अशा रीतीनें **फक्त व्यापक गुणकर्मावरून ओळखले जाणारे मोठमोठे विभाग संकुचित गुणकर्मावरून व तेही जन्मपरंपरेच्या जातीवर ओळखले जाऊं लागून,** त्या मोठ्या विभागांचे अशाच वाढत्या क्रमानें शतशः तुकडे तुकडे होऊं लागले. **हे तुकडे म्हणजेच जाति.** पण, अधःपतन पुरें होण्याकरितांच कीं काय, गुणकर्मावरून जन्मावर उतरतांना, जन्माचा न टिकणारा **कृत्रिम उच्चनीचपणाही** आणखी मानला जाऊन, समाजधारणा सुटत चालली. अन्नोदक, स्पर्श व छाया यांचे बाट विटाळ सुरू झाले; द्वेषानें मानलेल्या **काल्पनिक भिन्न रक्ताची भेसळ** न व्हावी म्हणून, विवाहबंधनें निरनिराळ्या जातींचीं पृथक्‌पणें होऊं लागलीं, आणि मोठेपणाच्या वगैरे मानाकरितां चोहोंकडे अंतःकलह, तीव्रपणें बोकाळले. अखेर या भ्रष्ट विचारसरणीचें पर्यवसान कायमच्या व दिवसान्‌दिवस वृद्धिंगत होत जाणाऱ्या भयंकर जातिवैमनस्यांत होऊन, आतां ते जातिवैमनस्यरूपी पिशाच्च नाना प्रकारचीं रूपें धारण करून, हिंदूंच्या सामाजिक, राजकीय, वगैरे हरएक सुधारणेच्या मार्गांत पदोपदीं भेसूरपणानें भेवडावीत आहे.

एकमेकांकडे प्रेमानें जाण्यायेण्याचें मुळींच दळणवळण नसलें म्हणजे शेजारधर्म कशाला म्हणतात याची देखील जशी ओळख न राहून काणा कोणाची चाड बाळगीत नाहीं, त्याप्रमाणें रोटीबेटीव्यवहार कडकडीतपणें बंद झाल्यामुळें ' दोघे भाऊ शेजारीं पण भेट नाहीं संसारीं, या डोळ्यांना उद्देशून असलेल्या उखाण्याप्रमाणें, धर्मबंधूचें शाब्दिक नातें जोडण्यापुरता,

सांगायला मांत्र सगळ्यांचा हिंदूधर्म राहिला, पण संकटकालीं मदतीला धाऊन येण्याचा बंधुधर्म मात्र त्यामुळें नेमका विसरला गेला. नुसते हिंदू म्हणवून घेतलें, तरी परस्परांत सर्वसाधारणपणें प्रेमळ सहभोजनें व लग्नविधि होत न राहिल्यानें, वाढत जाणाऱ्या भिन्न भिन्न जातींतील प्रेमाच्या व जिव्हाळ्याच्या शेजारधर्माला व नातवोईक आप्तपणाला, वैवाहिक संबंधाचे अभावीं, जी मत्सरकीड लागली, तिची वीण होऊन एकंदर हिंदुसमाजाला अनेक जाती, पोटजातींच्या शेंकडो प्रकारच्या द्वेषछिद्रांचे जातिवैमनस्यरूपी मोठें किवण पडलें

निरनिराळ्या पोटजातींनीं, संकटकालीं एकमेकांच्या सहाय्यार्थ धावून जाण्यास सर्वसाधारण हिंदुधर्माचें आकर्षण, पोकळ सहानुभूतीच्या बोलासारखें अगदीं अपुरें पडूं लागलें. कारण देहजन्माबरोबर पिढीजात उच्चनीचपणाचें लग्न लागतांच, भिन्न विभागांतलि माणसांचीं लग्नें बंद पडलीं, व देहोत्पत्ति आणि उच्चनीचपणा, या विचित्र जोडप्यापासून पुढें जातिवैमनस्यरूपी जें कुसंतान जन्मास आलें, त्यानें हिंदूंच्या राष्ट्रकुटुंबांतच आपसांत पुरी भाऊबंदकी माजविली. इतकीं कीं, खानेसुमारीच्या कागदोपत्रीं जरी पंचविस कोटी हिंदूंची खोगीरभरती होई, तरी, हिंदुसमाजावरील शत्रूच्या सार्वत्रिक हल्ल्याचा प्रतिकार करायला पुरे पंचवीसही एकमतानें पुढें येईनातसे झाले.

मराठी साम्राज्याचे शिंदे होळकरादि निरनिराळे आधारस्तंभ, इंग्रजसरकारकडून ज्याप्रमाणें पृथकपणें फोडले व झोडले जात असत, त्याप्रमाणें प्रचंड हिंदुसमाजाचे फुटकळ जातिविभाग, शत्रूच्या चौफेर सार्वत्रिक हल्ल्यांना एकएकटे बळी पडत, व बाकीचे उदासीन रहात. अशा वेळीं खरें म्हटलें म्हणजे, खिश्चन लोकांप्रमाणें हिंदूकडून क्रूसेडसारखें धमयुद्ध चालवायला पाहिजे होतें. पण तें त्यांस कसें चालविता येणार ? कारण गुणकर्माऐवजीं जन्माच्या उपजत उच्चनीच कसोटीवर त्यांच्यांत कायमचे विभाग पडले गेल्यानें, **गुणकर्माच्या जोरावर या विभागांतून त्या विभागांत कोणाला जातां येत नसे** व शिवाय सर्व जाति पोटजातींच्या एकंदर हिंदुसमाजांत, एकच रक्त अंगांत खेळत असणारीं आपलीच जिवलग नात्यागोत्याचीं माणसें आहेत, **ही ओळख-ही भावनाच**-त्यांच्यात राहिलेली नव्हती. **रोटी-बेटी व्यवहाराच्या प्रत्यक्ष जोरदार बंधुत्वाच्या नात्यापेक्षां नुसत्या एक समान हिंदुधर्माचें पोकळ, शाब्दिक नातें**, त्यांचा एकजुटीनें सार्वत्रिक टिकाऊ उठाव करण्यास अगदींच असमर्थ ठरे. व हीं स्थिति अद्यापही कायमच आहे.

ख्रिश्चनमुसलमानादि अन्य धर्मियांत, आपल्यांतल्या प्रमाणें लहानमोठे-पणाची समजूत किंवा खाजगी सामाजिक भांडणें, विविधजाति व तीव्र पक्षकलह नाहींत असें नाहीं. ते सगळीकडे नेहमीं असायचेच व त्यांच्यांत तर अतिशय आहेत असेंही म्हणा. पण ते तसे असले तरी, सर्वसाधारण संकटकाळीं व एरवींही शांततेच्या वेळीं, धर्माच्या नांवावर त्यांच्यांतलि भिन्न भिन्न पक्ष-समूहांना व सर्व व्यक्तींना–सर्वांचा एकमेकांशीं नात्याचा आप्तपणा असल्यामुळें मेणाच्या गोळ्याप्रमाणें एकरक्तसबंधाच्या आधारानें सहज एकजीव होतां येते. तशी सवडच आहे. व वाळूचे कण एकत्र केले, तरी स्वयमेव चिकटा-ईच्या अभावीं त्यांच्यांत जशा फटी राहतात, त्याप्रमाणे हिंदूंचे विभाग व त्यांतील माणसें जरी कारणपरत्वें एक होऊं लागलीं तरी, त्यांच्यांत जन्मा-नेंच उच्चनीच जातिभिन्नत्वाच्या कलहसंभव मत्सरफटी–बेटी व्यवहार नस-ल्यानें–कायमच्याच रहात असल्यामुळें, सर्व समाज एकरक्तसंबंधाच्या अभावीं समरस होऊं शकत नाहीं; कारण तशी सवडच नाहीं. **सोयरिकीची** अडचण नसती, तर शुद्धि चळवळीला कधींच पुरतें यश मिळून हिंदुस्तान एव्हाना किंवा यापूर्वींच बहुतेक हिंदुमय झाला असता, किंवा त्या चळवळीची आवश्यकताच उत्पन्न झाली नसती.

एके काळीं सकारण गोड वाटणाऱ्या वर्णाश्रम धर्माच्या पाळणुकीबरोबर गुणकर्माऐवजी जन्मादारभ्य श्रेष्ठ हीनत्वाच्या कलहबीजाचीच सहजगत्या चांगली पाळणूक व जोपासना होत राहिल्यामुळें, एकीच्या मुख्य पीकापेक्षां बेकीचें रानगवतच अधिक जोमानें भरारलें; व त्यामुळें हंगामांत जरूरीचे वेळीं, आश्रमधर्मांतील एकीचें फल प्रत्यक्षपणें हातीं न लागतां क्षेत्रांतच पडून राहूं लागलें आणि बेकीच्या रानगवताचें बीज मात्र हमखास पदरांत पडत गेलें. या कलहबीजवृद्धीचा परिणाम, म्हणजे हिंदूंच्या दिखाऊ प्रचंड संख्येचें खरें पाठ-बळ त्यांना बौद्धिक वादांत किंवा प्रत्यक्ष मारामारींत न मिळतां, त्या संख्येच्या प्रचंडपणाप्रमाणें ती नुसती प्रचंड नसून संघटित प्रचंड संख्या आहे असें सम-जून, शत्रू मात्र पहिल्यानेंच अधिक सावधगिरी ठेवूं लागले व अशा तयारीच्या शत्रूबरोबर झुंज घेतांना, मूळांतच विस्कळित असलेले हिंदु, साहजिकच पहिल्या झपाट्यास कमकुवत ठरूं लागले; आणि पुढील प्रसंगांतून दोघांच्या परस्पर विरुद्ध अनुभवानें तर अधिकाधिक भेकड बनूं लागले. कारण, एकंदर हिंदुसंख्येच्या मोठ्या प्रमाणानें, खास स्वजातियांशिवाय दुसऱ्या हिंदुजातींचें, शाब्दिक सहा-

नुभूतीपलीकडे खरें भरीव पाठबळ त्यांना मिळतच नसे; व अजूनही तसाच अनुभव सर्वत्र येत आहे.

आज हिंदुस्थानांत हिंदूंकडून जो कांहीं थोडासा सार्वत्रिक एकीचा उठाव होत असल्याचें दिसत आहे, तो संकटाचा सार्वत्रिकपणा व त्याचें नाविन्य संपतांच, कदाचित् ओसरूनही जाईल, अशी इंग्रजांबरोबरच्या राजकारणांतील अनुभवामुळें सकारण भीति वाटते. Divide and rule फोडा आणि सत्तेनें झोडा, या तत्त्वाचें–उद्यां इंग्रजांच्या किंवा आणखी कोणाच्या शिकवणीनें–मुसलमानांनीं युक्तिपूर्वक अवलंबन करून, व वरिष्ठ हिंदूंशीं राजकारणांत जरा मिळतें घेऊन, किंवा वेळीं कोल्ह्याच्या दांभिकपणानें त्यांच्या सात्विकवृत्तीबद्दल त्यांची खुशामतवजा प्रशंसा करून, आणि इतर कनिष्ठ हिंदूंपैकीं अल्प, तिरस्कृत व त्रस्त अशा जातींना ममत्व दाखवून व गोंजारलेंसें करून, त्यांच्यांतील फक्त एकएका मऊ जातीच्याच पाठीशीं तेवढें लाचलुचपतीच्या व त्रासदायक युक्तिप्रयुक्तींनीं प्रथम लागण्याचें त्यांनीं ठरविल्यावर, तशा हलक्या अशिक्षित व असहाय जातींतील पुष्कळ लोक हिंदूंतून नुसते नाहींसे न होतां, हिंदूंचे कट्टे दुस्मन होण्याचाही फार संभव आहे. शिवाय, पुढें अशीही गंमत होईल कीं, हिंदवी स्वराज्य दुरावेल व राजकारण बिघडेल म्हणून वरिष्ठ हिंदु, तिकडे दुर्लक्ष करतील व मुसलमान आपले दोस्त, त्यांचा रोख आपल्यावर नाहीं असें म्हणून गोंजारलेले इतर कनिष्ठ हिंदूही तिकडे कानाडोळा करतील. याप्रमाणें मुसलमानांनीं प्रत्यक्ष भक्ष्य ठरविलेल्या व हिंदूंनीं सिंधप्रांताप्रमाणें नकळत जणुं बळी देण्यास काढलेल्या एकाकी अशा एखाद्या दुर्दैवी जातीशिवाय, इतर सर्व हिंदुजातींचा उठाव व हुरूप संपुष्टांत येऊन, क्रमानें एक एक जात विरोध व गाजावाजाही न होतां, त्यांच्या पचनीं पडूं लागेल. सर्वसाधारण अशा प्रासंगिक महत्संकटसर्पापेक्षां, हें जळूचें सतत हळुवार विषारी सूच्याग्रप्रवेशनच अधिक घातक होत असतें, ते असें.

बोली–भाषा, पोषाख, सामाजिक वागणुक व धार्मिक समजूत, या सर्वसाधारण बाह्य चिन्हांवरून कोणाही परक्याला त्याचा सहज चंचुप्रवेश व्हायला हिंदूंतील निरनिराळ्या जातींच मुळीं, त्यास एकाएकीं ओळखतां येतां कामा नयेत. देशस्थ, कऱ्हाडे व कोंकणस्थ वगैरे ब्राह्मणांतील बेटीव्यवहाराची ही नड निघाली, म्हणजे कोण परका त्यांस सहजासहजीं निराळे लेखील? आपसांत तंटे उत्पन्न होण्याच्या बाबींपैकीं, जेवढ्यांत सामान्य हितसंबंध घडून आला असेल, तेव-

ह्यासंबंधानें तो परका, त्यांच्यांत, मग तंटे कसे लावून देईल ? व ते स्वतः तरी आपसांत त्यासंबंधानें सतत कसे भांडूं शकतील ? परक्यांना आंतील सूक्ष्म भेद सहज न ओळखतां येण्यासारखी व आपले सामाजिक, धार्मिक हितसंबंध एकच आहेत असें वाटण्यासारखी स्वतः सर्वच हिंदूंची स्थिति झाली, म्हणजे त्यांच्यांतील कोणत्याही एका समूहावर जरी कारणपरत्वें एखादें संकट आलें, तरी तें धार्मिक दृष्टीनें आपणा सर्वांवर आहे, असें हिंदुसमाज मानूं लागेल व त्याचें खरें पाठबळ मग, आत्मीय भावनेनें त्या संकटग्रस्तांस मिळूं लागेल. परंतु, हल्लीं त्याप्रमाणें कोठें मिळत नाहीं आणि कसें मिळावें ? नेहमींचें अगदीं साधें उदाहरण घेऊं. रोटीबेटीव्यवहाराची मोठी कठीण व वादग्रस्त गोष्ट लांब राहिली; पण देवाला स्पर्श करण्यास, देवळांत प्रवेश करण्यास किंवा देवाचें दुरून दर्शन घेण्यास देखील अहंपणानें ज्यांना बंदी करायची, व सोवळे बाटेल, विटाळ कालवेल, भ्रष्टाकार होईल म्हणून तिरस्कारानें ज्यांना दूर लोटायचे, त्यांच्याचकडून, मुसलमानांच्या जबरदस्तीच्या वेळीं मात्र भिक्षेकऱ्याच्या हक्कानें मदतीची अपेक्षा करायची. त्यांना हिंमतच नसेल, तर गोष्ट वेगळी; पण असली तरी, आपलें करणें, सहज स्वभावाच्या विरुद्धच असल्यामुळें, खऱ्या उत्साही आप्तपणाच्या किंवा स्वहितसंबंधाच्या भावनेनें, त्यांच्याकडून पुढील दिवसांत ती मदत कशी बरें व्हावी ?

शिक्षण, एकत्र प्रवास, राज्यकर्त्यांचें धोरण व अनेक प्रकारच्या विविधतेनें भरलेल्या एकंदर जगाशीं वाढतें दळणवळण, यांमुळें सर्वच लोकांत जागृति होत आहे व आपल्या पूर्वजांनीं इतक्या पूर्वकाळीं इतकी दूर दृष्टि पोंचवून समाज-स्वास्थ्यासाठीं इतपत तरी सामाजिक सुव्यवस्था कशी लावून दिली, याबद्दलचें कृतज्ञतापूर्वक कर्तव्य विसरून, उलट कृतघ्नाप्रमाणें कमीअधिक सूडाच्या भावनेनेंच जो तो आपआपले खरेखोटे हक्क तपासूं लागला आहे. अशा स्थितींत, आम्ही तुम्हांस तिरस्कारानें झिटकारलें, तरी तें मनांत न वागवितां, तुम्ही मात्र आम्हांस पूज्य व श्रेष्ठ मानून, आपल्या उभयतांच्या कल्याणासाठीं, आम्ही सांगूं त्या स्थितींतच, संतोषानें राहिलें पाहिजे, असें–विनायोग्यमूल्यवर्तन–नुसत्या ब्राह्मणांनींच नव्हे, तर कोणत्याही वरिष्ठ जातीनें आपल्यापेक्षां कोणत्याही कनिष्ठ जातीला करण्यास सांगितलें तर कसें चालेल ? चाललें असतें, पण केव्हां, तर आपल्याशिवाय त्यांना दुसरा तरणोपाय नाहीं, परधर्माचा व परकी राज्ययंत्राचाही त्यांस आधार नाहीं आणि स्वहिताची धूर्तदृष्टीही त्यांस अजून

प्राप्त झाली नाहीं, अशी स्थिति असती तर चाललें असतें. पण वस्तुस्थिति तर अगदीं उलट अशी चमत्कारिक उद्भवली आहे कीं, वरिष्ठांच्या तुसडेपणामुळें वैतागून, कनिष्ठ जर शत्रूंच्या चिथावणीस बळी पडले, तर तेही फसतील व हे श्रेष्ठही मागाहून पस्तावतील आणि अशा रीतीनें सर्वच हिंदूंचा ऱ्हास होईल. म्हणून सामाजिक, धार्मिक बाबतींत समता पाळलीच पाहिजे. मुसलमानांसारख्या कडव्या शत्रूशीं गाठ पडली म्हणजे वरिष्ठांना कनिष्ठांची आठवण होते व तुम्ही आम्ही शेंडीवाले एक, आपला धर्म एक, गाय आपली आई, असें म्हणून ते त्यांची मदत मिळवितात; व प्रसंग निघून गेला कीं आम्ही ते आम्ही आणि तुम्ही ते तुम्ही असें त्यांस सांगतात. पण हें किती दिवस चालणार ? अपमानाची जाणीव होऊन, अपमान नाहीं सहन केला तरी चालेल, असें कनिष्ठांच्या मनांत पुरतेंपणीं बिंबेपर्यंत. पण तें अधिकाधिक बिंबण्यासारखी परिस्थिति प्रत्यहीं वाढत आहे. कौरवांबरोबर भांडतांना कौरव शंभर आणि आपण पांच, पण गंधर्वा-सारख्या परक्यांबरोबर भांडतांना आपण दोघे मिळून एकशेपांच हें वाक्य, वनांत बंधूंसह विपत्तींत असतांना व कौरवांकडून सारखा छळला जात असतां-नाही, कौरवांनाच संकटमुक्त करण्याकरितां, धर्म, भीमार्जुनांना उद्देशून बोलला, म्हणून त्यास जसें शोभलें, तसें, तसलेंच वाक्य, प्रसंगांतून पार पडण्यापुरतें मतलबानें जर सदोदित सुस्थितींतील दुष्ट दुर्योधन गंधर्वांकडून पकडला जातांना पांडवांना उद्देशून बोलला असता, तर त्यास खाचित शोभलें नसतें. ही गोष्ट हल्लींच्या हिंदुमुसलमानी संबंधांत उभयतांच्या कल्याणासाठीं म्हणून कनिष्ठांना विभक्तांतून अविभक्तपणा काढून दाखविणारें **धर्माचें** वाक्य सांग-तांना, वरिष्ठांनीं जरूर ध्यानांत घ्यावी. कारण, वरिष्ठ आज कैक दिवसांपासून कौरवांच्या ठिकाणीं आहेत. असो.

लग्नसंबंधाची गोष्ट लांब राहिली; पण त्याशिवाय इतर सामाजिक, धार्मिक स्वराज्यांत तरी कनिष्ठांना सहभागिदारी देण्यास मनमोकळेपणानें सुरवात करा. म्हणजे तेवढ्यानेंच पहा काय गम्मत होते ती ! कार्य आपलें समजून संकट-समयीं ते होऊन धावून येऊं लागतील. इंग्रज, फ्रेंच, जर्मन वगैरेंत रोटीबेटी–व्यवहार सर्रास होत असूनही, त्यांच्यांतील भांडणें अजून संपलीं नाहींत, एव-ढ्यावरून हें उदाहरण, रोटीबेटीव्यवहार हा एकी होण्यास अगदीं निरुपयोगी होय, असें ठरविण्यास कसें उपयोगी पडेल ? कारण त्यांचीं भांडणें धर्मवेडे-पणाचीं किंवा उपजत श्रेष्ठहीनतेचीं खरीं नसून, तशा अर्थाच्या शिव्या ते लोक

रागाच्या भरांत एकमेकांस शिव्यांकरितां कधीं कधीं भांडणांच्या वेळांतच फक्त देत असतात. मनांत ते पुरे समजून असतात कीं, आपलीं भांडणें, जन्माच्या श्रेष्ठकनिष्ठपणाबद्दलची वास्तविक नाहींत. तीं आर्थिक हितसंबंधाचीं किंवा आम्ही इंग्रज, आम्ही फ्रेंच, आम्ही जर्मन अशा फक्त नावांच्या दुराभिमानाचा, एखाद्या सत्कारणाच्या पांघरुणाखालीं स्वार्थाकरितां चालविलेलीं, अशीं तात्पुरतीं आहेत. म्हणूनच चालू वादाचा प्रश्न निकालांत निघाला कीं, लगेच त्यांची पुन्हां घरोब्याची खेळीमेळी अगदीं पूर्ववत् सुरु होते. इतकी कीं, जसे कांहीं ते त्या गांवचेच नाहींत. असले वरकर्मी कृत्रिम, व अल्पजीवि तंटे नाहींसे होण्याकरितां रोटीबेटीव्यवहार हा एक मोठा अमोघ व कायमचा रामबाण उपाय आहे, असें मुळीं कोणी म्हणतच नाहीं. **उपजत श्रेष्ठकनिष्ठ भावनेच्या रोगावर मात्र तो** तसा आहे. पोटापाण्याची, नफातोट्याची व इतर क्षुल्लक मानापमानाची, पोरखेळांतल्याप्रमाणें हरघडीं उपस्थित होऊन पुन्हां अल्पकालांतच बहुधा विलय पावणारी हीं तात्कालिक भांडणें, कृतयुगांत देखलि आपलें अस्तित्व दाखविण्यास कमी करणार नाहींत. फुकटचा वायु भक्षण करून केवळ ईशचिंतनाचा व्यवसाय जरी माणसांनीं कधीं काळीं सुरू केला, तरी देखलि असलीं भांडणें संपणार ताहींत. परंतु तीं पुरतीं न संपलीं तरी असलीं हीं भांडणें-कमी करण्याचा रोटीबेटीव्यवहार हा एक उपायच नाहीं, असेंही म्हणतां येणार नाहीं. सहभोजनाचा वगैरे एकत्र व्यवहार करूनही भांडणाऱ्यांचें उदाहरण दाखविण्यास इंग्रज फ्रेंच कशाला पाहिजेत ? एकाच आईच्या उदरांतून निघालेले कांहीं सख्खेभाऊ व प्रत्यक्ष बापलेक नाहींका क्वचित् भांडत् ? म्हणून सर्वच भाऊबंदांनीं व बापलेकांनीं एकत्र रोटीव्यवहार व भेटी व्यवहार देखील कायमचा सोडून देऊन प्रत्येक बाबतींत सवता सुभा पहावा, कारण स्नेहसंवर्धनास सहभोजनाची भेटीची व संभाषणाचीही अवश्यकता नाहीं असें म्हटलें तर शोभेल का ? सयुक्तिक दिसेल का ? सुख परिणामी होईल का ? हे पाहिलें पाहिजे. तेव्हां हे जसे कौटुंबिक, तसे तें सामाजिक एवढाच फरक, पण तत्त्व एक असेंच जानलें पाहिजे.

आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचा पूर्वापार चालत आलेला श्रेष्ठपणा, रोटीबेटी–व्यवहारानें नाहींसा होईल व तो तर राहिला पाहिजे, तेव्हां तो राखून–अभ्युदयार्थ–जसें एकीकरण होईल तसें साधावें, कनिष्ठांनीं या आपल्या वृत्तीस मान्यता द्यावी, अशी वरिष्ठांच्या पोटांतील खरी खुरी इच्छा असते व ती तशी असणें

मानवी सहज स्वभावास धरूनच आहे. त्यांत वावगें कांहीं नाहीं, कारण कनिष्ठांच्या संसर्गानें विघडणारी व्यवस्था कोणाला हवीशी वाटणार ? पण उलट आपल्या स्वतंत्र आस्तित्वाचा कायमचा कनिष्ठपणा, रोटीबेटीव्यवहाराशिवाय जाणार नाहीं व तो तर गेला पाहिजे. तेव्हां तो घालवून जातींचे ऐक्य साधावें व या आपल्या म्हणण्यास परिष्टांनी अनुकूल व्हावें, असा कनिष्टांचा हेतु असतो, व तोही मानवी सहज स्वभावास म्हणजे सोडून आहे असें नाहीं. कारण श्रेष्टांच्या सहवासानें सुधारणारी स्थिति कोणाला नकोशी वाटणार ? जातींचे ऐक्य दोघांनाही पाहिजे पण या परस्पर विरुद्ध भावना एकमेकांचा तिरस्कार करणाऱ्या भाषेंत व कृतींत व्यक्त होत असल्यामुळें, बाहेरील हल्यापेक्षां हा आंतीले माराच एकंदर हिंदुसमाजास जास्त जाचक होत आहे. आपणच आपले वैरी आहोंत असें म्हणतात तें खोटें नाहीं. द्वेष बुद्धीनेंच दुसऱ्याकडे कोणी पाहूं लागला, तर दुसऱ्याचा हेतु स्पष्ट न झालेल्या सत्कृत्यांतही पाहणाऱ्यास त्याच्या स्वतः-च्या द्वेषबुद्धीच्या पडच्छाये शिवाय दुसरें काय दिसणार ? आपण एखाद दुसरें लहानसें उदाहरण घेऊं. रामायणाच्या शेवटीं तपश्चर्ये सारखी चांगली गोष्ट करणारा शूद्र शंबूक, शूद्र असूनही तपश्चर्या करतो, म्हणूनच केवळ श्रीरामचंद्राकडून मारला गेल्याचें दाखविलें आहे. बुद्धांच्या शिकवणीप्रमाणें ब्राह्मण-शूद्रादि सर्वच लोकांनीं आपआपलीं नियोजित संसारकर्में सोडून तपाचरण करूं नये, केल्यास उपयुक्त अनेक उद्योग व शेती यांकडे दुर्लक्ष होऊन दुष्काळ पडेल व एकंदरींत सर्व प्रकारें अनवस्था प्राप्त होईल; हा त्यांतील सूचित हेतु, नुसते रामायणावाचून सहजासहजीं कळण्यासारखा नाहीं व आजवर कोणी तो फारसा स्पष्ट केलेला नाहीं. तपश्चर्येचा अधिकार शूद्रांना नाहींच आणि म्हणूनच, त्याच्या अधर्माचरणाबद्दल त्यास देहांत प्रायाश्चित्त मिळालें, असेंच मोघमपणें पुराणिक बोवा सांगतात, व त्यामुळें किती तरी चुकीच्या कल्पना होऊन बसतात. त्या म्हणजे दृष्टिकोनच ज्यांचा ब्रह्मद्वेषानें दूषित झाला आहे अशांच्याच होतात असें नाहीं तर सर्व साधारण ब्राह्मणांच्याही होतात. भारत, भागवत, रामायण, यांचे काल कोणते, त्यांत लिहिलेल्या अनेक काल्पित गोष्टी काय हेतूनें लिहिलेल्या आहेत वगैरेबद्दल आजवर कथापुराणांतून जिथच्या तिथे योग्य स्पष्टीकरण होत आलें असतें म्हणजे सुधारकांनीं ब्राह्मणेतरांनीं किंवा पाद्रीभटांनीं, ब्राह्मणांच्या शुद्धहेतूंबद्दल हल्लीं सारखा संशय घेतला नसता व त्यांस घेताही आला नसता. फार कशाला पण मौंजीबंधनापूर्वीचे अल्लड बालपणच फक्त श्रीकृष्णानें गोपींच्या सहवासांत घाल-

विलेले असतां शिमग्याला लाजवितील अशा बीभत्सकथा अजूनही त्याच्यासंब-धानें ब्राह्मण हरिदास कीर्तनांत घोळवून घोळवून सांगत आहेत आणि ब्राह्मण श्रोते, शृंगारिक भक्तीनें निमुटपणें ऐकत आहेत. ब्राह्मणांवर बोलून चालून दुष्टपणाचे आरोप करण्यास सज्ज झालेले ब्राह्मणेतर, पुराव्यादाखल याचा उपयोग करून, कोणी निव्वळ द्वेषानें तर कोणी अज्ञानानें, ब्राह्मणांसच याबद्दल जबाबदार धर–तात; कारण आजपर्यंत लिहिणारे बोलणारे बहुतेक सर्व ब्राह्मणच होऊन गेले. तेव्हां यांत अस्वाभाविक तें काय ? प्रक्षिप्त गोष्टींचें पूर्वीचें स्पष्टीकरण झालेलें नसल्यामुळें त्यांचे दिसतात तसेच हेत्वर्थ मानण्याची चूक, मनांत दुष्ट बुद्धि नसतां, स्वाभाविकपणें कोणाच्याही हातून होण्यासारखी आहे. पण हें लक्षांत न घेतां, कोण्या आधुनिक विद्वान संशोधकाला त्या प्रक्षिप्त गोष्टींचें खरें कारण व हेतु समजले, म्हणजे त्यानें ते त्याच्याप्रमाणें न समजणाऱ्यांस एखाद्या सत्त्वस्थ गुरूजींच्या सौम्य भाषेंत न सांगतां आपल्या विद्वत्तेच्या थोड्या अंतस्थ घमेंडींत, ब्राह्मण अब्राह्मणांत द्वेष वाढेल अशा कुत्सित शब्दांत समजावून देऊन हिंदु–समाजांत दुही वाढविणाऱ्यांच्या कृत्यासच एकप्रकारें थोडाफार हातभार लावावा, असें होतें. याप्रमाणें कोणी कमी कोणी जास्ती पण दोघेही, म्हणजे हिंदूच हिंदूंचे खरे शत्रु आहेत असें दिसतें. जातींचें म्हणा, पोटजातींचें म्हणा पण समाजांत एकीकरण होऊन समाज समर्थ व्हावा असें वाटत असेल, तर **युक्तीनें प्रत्येक गोष्टींत एकमेकांशीं मिळतें घेण्यास शिकलें पाहिजे.** कोणाच्या हेतूचा विपर्यास करूं नये. सहभोजनाचे विरुद्ध लिहितांबोलतांना कित्येक वेळीं असाच विपर्यास केला जातो. जिभेचे कोड पुरविण्याकरतां का कोणी सहभोजनें करावीं, असें म्हणतात ? पण कित्येकांकडून मुद्दामच तसें भासविलें जातें. वाईट गोष्टीचा संभवच नाहीं अशी बहुधा कोणतीही चांगली गोष्ट नाहीं; मग या नियमाला, सहभोजनच कसें अपवाद असूं शकेल ? संभाषणानें व स्पृश्य व्यवहारानें जर स्नेह वाढेल तर तो सहभोजनानें अधिकच वाढेल; व **बेटी–व्यवहारानें त्याहूनही ज्यास्त वाढेल, हें काय सिद्ध करायला पाहिजे ?**

आतां आपलें जातीय अस्तित्व स्वतंत्र ठेऊन निर्मांस भोजन करणाऱ्यांच्या दृष्टीनें विचार केल्यास, शाकाहारी व मांसाहारी यांचें एकत्र भोजन सुरू झालें म्हणजे शाकाहाऱ्यांत हळुहळु मांसाहार सुरू होईल व पुढें त्यांच्यांत बेटीव्यव-हार होण्याचीही आपत्ति ओढवेल, असा आक्षेप पुढें येतो तो खरा आहे. पण जातींचें पूर्ण ऐक्य **मनापासून इच्छिणाऱ्यांचें**, ही भावी भीति बाळगून चाला-

वयाचें नाहीं. कारण, इतर कोणत्याही मार्गांनीं होणाऱ्या एकीकरणांत जातिभेद थोडा तरी डोकावणारच; पण बेटीव्यवहारांनीं होणाऱ्या मीलनांत जातींचें पृथक् अस्तित्व मरूनच जातें. दुसरें असें कीं, बेटीव्यवहार होणें, ही आपत्ति मानली, तर त्या आपत्तीला मूळ सुरवात सहभोजना अगोदरच्या संभाषणापासून व त्याहून अगोदरच्या, परस्परांत होणाऱ्या सहानुभूतिपूर्वक व्यवहारापासूनच होतें, हेंही विसरून चालणार नाहीं. एकींतून पुढें दुसरी अशा क्रमानें उद्भवणाऱ्या परिस्थितीचा अखेर परिणाम जो ऐक्यानें एक होणें, तो हितकर किंवा अहितकर कसाही असला, तरी तो टाळण्याकरितां इतरांशीं संभाषण व कसलाही व्यवहार न करितां समाजांत सुखानें राहणें किंवा समाजालाच सोडून दूर गिरिगव्हरांत दडून बसणें यांपैकीं कोणतें शक्य आहे ? मांसाहारी लोकांत मिसळूनही शाकाहार सांभाळतां येतो. विलायतचा प्रवास करून येणाऱ्यांत कितीतरी असे लोक आढळतात. इतकेंच काय, पण मांसाहारी कुटुंबांतही निवृत्तमांसवृत्तीनें राहणारे कांहीं सद्गृहस्थ आहेत. जेवणाकरतां तयार केलेल्या पदार्थांपैकीं मुळींच न आवडणारे पदार्थही खाल्लेच पाहिजेत, असें फसविण्याचा किंवा सक्ती करण्याचा उद्देश असल्याशिवाय कोण म्हणेल ? छद्मी भाषण जसें प्रेमळ संभाषण नाहीं, तसें दगलबाजीचें जेवण स्नेहभोजनच नाहीं. तथापि अशा सर्रास भोजनांनीं मांसाहार थोडथोडा अधिक रूढ होत जाईल, हें म्हणणें मात्र खोटें नाहीं. पण जाणून बुजून तें करणाऱ्यांस तसें करूं नका म्हणणें म्हणजे झोपेचें सोंग घेणाऱ्यांस जागें करूं पाहणें आहे. अर्थात् द्वेषबुद्धि वाढेल अशा रीतीनें तर तें करूंच नये. तेव्हां ज्याला ती गोष्ट त्याज्य वाटेल, त्यानें **स्वतःपुरतें शक्य तितकें जपावें व सौम्य शब्दांनींच इतरांस त्यापासून परावृत्त करावें**; पण सहभोजनांनीं सामुदायिक स्नेहसंवर्धन होणेंच शक्य नाहीं व तो त्याला उपायच नाहीं, असें भलतेंच बोलूं नये. कारण आहारांत फरक नसून परस्परांत उगाच दुजा भाव बाळगणाऱ्या इतर जातींत तर सहभोजन खात्रीनें अधिक ऐक्यवर्धक होईल.

आतां ताकद व तापटपणा वाढवून खर्चांत थोडी जास्त बचत करणारा, असें जरी मांसाहारासंबंधानें साधार म्हणतां येत असलें व 'जीवो जीवस्य भक्षणम्' जीव हेंच जीवांचें भक्ष्य आहे, निवृत्तमांस लोकही सजीव अन्नावरच जगतात, कारण जीवमयच सृष्टि आहे व वनस्पतींनाही सुखदुःख विवेक आहे, गाळलेल्या पाण्यांतून व तोंडाला फडके लावलें तरी श्वासोच्छ्वासाबरोबर असंख्य जीवजंतु पोटांत जातात व अगणित अदृश्य जीव तर शरीरांत सर्व ठिकाणीं व खुद्द तोंडां-

तच नेहमीं जन्मत व मरत असतात. या सर्व गोष्टी जरी प्राचीन अनुमानाप्रमाणें व अर्वाचीन शोधाप्रमाणें अगदीं खऱ्या असल्या तरी मरतांना, विव्हळतांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या दृश्य प्राण्यांचा क्षुधाशमनार्थ व जिव्हालौल्याकरितां वध करून उघड मांसाहारास प्रवृत्त होणें, हें जास्त निर्दयपणाचें व अधिक किळसवाणें नाहीं, असें कसें म्हणतां येईल? वनस्पत्याहार म्हणजे एकप्रकारें नकळत होणारा प्राणिसंहार असें जरी म्हणतां आलें, तरी तो कांहींही केलें तरी न टळणारा व मनुष्याच्या दृष्टीनें घाण न वाटणारा असा खचित आहे. तेव्हां तो मनापासून नको असणाऱ्यांवर, हवा असलेल्यांनीं जबरदस्तीनें अथवा कपटानें लादूंही नये, हेंच उत्तम. तत्राप इतक्या सर्व गोष्टी कळत असूनही कांहीं शाकाहारी, मांसाहारापासून होणाऱ्या इतर फायद्यामुळें व समाजहिताच्या दृष्टीनें तिकडेच झुकत असल्यास खरोखरच केवळ संवयीनें प्रिय किंवा अप्रिय होणारी ही गोष्ट,कालमहिमा म्हणून परिस्थितीवर सोंपवावी व आपला अधिकार जाणून स्वतःपुरतें जपावें; पण व्यापक हिंदुत्वाच्या रक्षणास उपयुक्त अशा एकीकरणास एकमेकांनीं एकमेकांवर आपलें म्हणणें तंटे वाढतील अशा रीतीनें लादून अडथळा करूं नये. **कारण कितीही मोल पडलें, तरी जातींचें ऐक्य मिळविलेंच पाहिजे इतक्या जरूरीचें तें आहे.** कितीही संपत्ति असली,तरी संरक्षणाची योग्य तजवीज असल्याशिवाय जशी तिची शाश्वती नाहीं, त्याप्रमाणें आपली संस्कृति कितीही श्रेष्ठ असली, तरी बहुजनसमाजाच्या सुसंघटित शक्तीशिवाय ती टिकणार कशी? पण अशी सुसंघटना जातींचें ऐक्य झाल्याशिवाय होणार नाहीं; आणि जातींचें खरें ऐक्य, परस्परांमध्यें विवाहविधि सुरू झाल्याशिवाय टिकाऊ स्वरूपांत व्हायचेंच नाहीं. जन्माचा उच्चनीचपणा नाहींसा करून त्यांत समता मानली गेली पाहिजे.

कांहीं सुरवंटादि उद्भिज प्राणी उत्पन्न होण्याचा एक एक हंगाम असतो. मुदतीच्या तापाच्या व सांथीच्या जंतूंचेंही कांहीं अंशीं तसेंच आहे. विचारांच्या विरलतर वातावरणांत विशिष्ट तत्त्वांचे सूक्ष्मतमजंतु, आपआपल्या अनुकूल कालापुरते प्रभावीच व्हायचे असें नसतें, तर युगायुगांचे ठायीं निरनिराळ्या कालखंडांत त्याच त्याच मतांचा पुन्हा पुन्हा लोप व विकास दाखविणारें सतत परिवर्तन झाल्याचा इतिहास वाचायला किंवा ऐकायला सांपडला नसता. जातींच्या एकीकरणाचा म्हणजेच समतेचा उदयकाल आपल्या भरतभूमींत जवळ जवळ येत असल्यास, सहानुभूति, संभाषण, सहभोजन, पोटजातींचें एकीकरण,

हीं त्या पवित्र समतादेवतेच्या उर्ध्वगमन मार्गांतील सोपानपरंपरा ठरेल व तिचें आरोहण पुरें होईपर्यंत तरी निदान, प्रतिकूल तत्त्वांचा कंठशोष म्हणजे अरण्यरोदनच होईल. अर्थात विचारा आहारप्रकार तर मग लक्षांतच न घेण्याची एक क्षुल्लक ऐच्छिक बाब होऊन बसेल. पण नियमाप्रमाणें या समतेचाही पुढें केव्हां अतिरेक होऊन त्यास पशुतुल्य अवस्था प्राप्त झाली, म्हणजे पुन्हा उलट शुद्ध शाकाहाराचा, वर्णव्यवस्थेचा व जन्मायत्त जातिसंस्थेचा काल कधीं येणारच नाहीं असें भारीच आहे ! सृष्टीचा तो चंचल स्वभावच असून भावी पिढ्यांस त्याचा निःसंशय अनुभव येईल.

सर्वांना सामान्य हितसंबंधाकरितां परशत्रूशीं भांडण्याची वेळ आल्यास, आपसांतील नेहमींच्या आर्थिक हितसंबंधाच्या वगैरे कैक भानगडी निकालांत निघाल्या नसतांही जन्मायत्त श्रेष्ठकनिष्ठपणा न मानतां, रोटीबेटीव्यवहाराच्या समतेनें व सलोख्यानें लोक जर एकमेकाशीं वागत असले, तर आपलेपणा नित्य जागता राहिल्यानें, सार्वत्रिक संकटप्रसंगीं त्यांना सहज एक होता येऊन समान शत्रूबरोबर जुटीनें भांडतां येतें. कारण अशा एकत्र व्यवहारांनीं प्रेमळपणा थोड-थोडा वाढता राहून व उपयुक्त विचारविनिमय होत राहून, वेळीं लवकर एकी व्हायला तितकीच अधिक मदत होत असते.

आमचा सर्वसाधारण जनतेचा सामान्य स्वधर्माभिमान आतां पूर्वीइतपत असा सोज्वळ राहिला नाहीं किंवा पाश्चात्यांचा तेजस्वी राष्ट्राभिमानही अजून आमच्या आंगीं त्यांच्याइतका तसा बाणला नाहीं, कीं ज्याच्याकरितां जर्मनी बरोबरच्या महायुद्धांत सर्व इंग्रज स्त्रीपुरुष आपआपले सर्व तीव्र पक्षोपपक्षभेद विसरून व अंकित काळ्या माणसांकडून, पूर्वीं कधीं न मारविलेलीं गोऱ्या कात-डीचीं माणसें मारण्यासही खुशाल तयार होऊन केवळ इंग्रजपणाच्या रक्षणा-करितां, युनियनजॉकच्या झेंड्याखालीं जसें झटकन एकजीव झाले, तसे एखाद्या सार्वत्रिक संकटकालीं आम्हीही आपला जात्यभिमान व कुलाभिमान तेव्हांच झुगारून देऊन केवळ व्यापक हिंदुत्वाच्या रक्षणाकरितां भगव्या निशाणाजवळ हां हां म्हणतां सर्वजण तसें गोळा होऊं. तो काळ आतां गेला व नवा यावयाचा तो अद्याप आला नाहीं. तेव्हां आतां तसे एक होतां येण्यास, मधल्या या कला-हीन कालाला अनुसरून व्यापक हिंदुत्व, सामान्य हितसंबंध, देशभक्ति वगैरे जीं जीं साधनें असतील, त्यांत व त्यांना पोषक असेंही, वरचेवर एकत्र प्रेमळ व्यवहार होणें, हेंही एक साधन आहे; व रोटीबेटीव्यवहार, हें एकत्र प्रेमळ व्यवहाराचें

प्रमुख अंग असल्यामुळें, तें शक्य तेवढें निर्दोष व सुलभ करून प्रथम पोटजातींच्या एकीकरणापुरतें तरी अवश्य स्वीकारलेंच पाहिजे.

तुम्ही म्हणाल मग मराठी राजसत्तेच्या वेळीं अशीच जातिसंस्था असून सर्व पृथक् जाति, खांद्याला खांदा लावून समान शत्रूबरोबर अगदीं त्वेषानें एकत्र कशाहो लढल्या ? मी म्हणतो कां नाहीं लढणार ? आणि काय करत्या न लढून ? लढल्या याचें एक प्रमुख कारण—त्यांनीं नाहीं म्हटलें असतें तर त्यांचे पाठीवर चाबकाचे फटके लगावून त्यांस लढायला लावणारी—प्रबल मराठी राजसत्ता त्यावेळीं अस्तित्वांत होती हेंच आहे. त्यांत आश्चर्य कसलें ? हल्लीं नाहीं का आपण हिंदुमुसलमान एरव्हीं घरींदारीं हवेतसें वर्दळीवर येऊन भांडत असतां, इंग्रजांच्या दराऱ्यानें त्यांच्या शत्रूबरोबर अगदीं खांद्याला खांदा लावून एकत्र लढत ? असा नाहीं विचार करीत कीं, हे समोरचे लोक इंग्रजांचे शत्रु असले तरी आमचे भाऊबंद व मित्र आहेत, किंवा आम्ही हिंदुमुसलमान तर परस्परांचे कट्टे हाडवैरी असतां, इंग्रजांचा शत्रु मारण्यापुरतें तरी आम्ही एकत्र का आणि कसें व्हावें ? हा विचार कोणीच कसा करीत नाहींत ? न करण्याचें कारण त्यांना पुरें माहित असतें कीं चवदाव्या रत्नापुढें आपल्याला काय वाटतें हें अगदीं विसरावेंच लागतें. दुसरे असें कीं, त्यावेळीं जाति असून जातिमत्सर म्हणजे मुळींच नव्हता असेंही नसून तो सत्तेच्या दराऱ्याखालीं दबला जात असल्यामुळें, परक्यांच्या चिथावणीनें हल्लींसारखा व्यक्तिस्वातंत्र्याच्या, अल्पसंख्यत्वाच्या किंवा मागसलेपणाच्या नांवाखालीं बेफामपणानें बोकळत नसे. मुळींच तक्रार करित नसे असें नाहीं. शिवाय इंग्रजी भाषावाघिणीचें उद्दाम व चिकित्सक दूध, त्यावेळीं आतांच्याप्रमाणें कोणाला मुबलकपणें प्यावयास मिळत नसल्यामुळें, एकराष्ट्रीयत्वाची बुद्धि जागृत झाली नव्हती, तरी त्यांच्या ठिकाणीं, आंधळी म्हणा, डोळस म्हणा, पण धर्मश्रद्धा अधिक होती. त्यामुळें त्या जांदूचे फुंकर घालूनही पूर्वी संकटकालीं लोकांना चेतवून एक करतां येत असत व ते त्याप्रमाणें स्वयंप्रेरणेनेंही होत असत. आहेत या जाती मोडा किंवा यांना आणखी जास्त जोडा पण यावरून अशीच जातिसंस्था असतां, पूर्वींचे निरनिराळ्या जातींचे लोक शत्रुबरोबर खांद्याला खांदा लावून लढले असल्यामुळें, आतां जाती मोडण्याचें कारण नाहीं व रोटीबेटीनें ऐक्य साधणार नाहीं, हें म्हणणें काहींतरीच दिसतें; असो. पण पूर्वींप्रमाणें लोकांचा एकत्र उठाव करण्याचें काम आतांच्या चिकित्सक पण उच्छृंखल व अभिमानशून्य शिक्ष-

णाच्या व लावालावीच्या दिवसांत तसें सुलभतेनें साधणार नाहीं एवढें खरें. आतां धर्माभिमानाच्या जोडीला देशाभिमानाचें एंजिन जोडावें लागेल व हें जोड एंजिन समतेच्या व समान हितसंबंधाच्या वाफेवरच मुख्यतः उघडपणें चालवावें लागेल; कसलेही लपंडाव चालणार नाहींत. जाणूनबुजून टाळाटाळ व कालहरण केल्यानें पुढीलपिढीच्या ते आंगलट मात्र अधिक येतील हें खूप समजून ठेवावें.

कालाच्या कलानेंच सर्व गोष्टी घेतल्या पाहिजेत. चांगल्या गोष्टी स्वीकारणें व वाईट गोष्टी टाकणें या क्रिया, त्यांबद्दल आपल्यावर दुसऱ्याची सक्ति होण्याचे अगोदर जर आपण केल्या, तरच आपली शोभा. तसें करण्यास दुसऱ्यानें आपल्याला भाग पाडलें, तर त्यांत आपलें औदार्य व मोठेंपण तें काय ? रशियानें नाहीं का परवांच्या महायुद्धांत पोलंडांतून पळतां पळतां त्याला स्वातंत्र्य बहाल केलें ? कोण त्याबद्दल त्याचे गोडवे गाणार ? म्हणून जी गोष्ट तत्त्वतः गैर नसून करणेंही भाग होणार आहे, ती युक्त व व्यवहार्यच समजून आपणच योग्यवेळीं करण्याचें ठरविल्यास, भाग पडल्यावर करूं त्यापेक्षां थोडीतरी अधिक सोईस्कर, अशी खात्रीनें करतां येईल. पण तीच सक्ति होईपर्यंत हट्टानें न केल्यास कदाचित् अतिशय त्रासदायक होईल. अशा रीतीनेंही करावी लागेल. जन्मायत्त श्रेष्ठहीनतेच्या गोष्टी हळुहळु विसरल्याच पाहिजेत. दुसऱ्यांना हलके हीन समजून पिढिजात श्रेष्ठपणाच्या गोष्टी सांगणाऱ्या एखाद्या सोवळ्या माणसाच्या आश्रयाला देवघरांत जरी कोणी गेले, तरी ते मानवी योग्यतेची जाणीव झालेले मानीव हलके लोक 'जन्मायत्तं कुले जन्म मदायत्तंच पौरुषम्' असें कर्णाप्रमाणें म्हणत त्या नामधारी श्रेष्ठांना जीवनसंग्रामांत बळेंच खेचून आणतील आणि मग फ्रान्सांतल्याप्रमाणें कदाचित् भलत्याच भयंकर क्रांतीची वेळ येईल. कोणी नाहीं म्हणावें ? ब्राह्मणेतर व सत्यसमाजिष्टांचे चाळे व कोल्हापुरांतील प्रकार लक्षांत आल्यास बरें होईल. म्हणून वाढत्या संकटकालाची प्रचंड लाट आंगावर येणारच असेल तर ती अशा खुबीनें आंगावर घेतली पाहिजे कीं, **किंचित् नव्या वेषांत पण हिंदु, हिंदु म्हणूनच फिनिक्स पक्ष्याप्रमाणें पुन्हां जगासमोर नव्या जोमांत छातिठोकपणानें पूर्ववत उभा आहे, असेंच जगाला दिसेल.**

जिवंत माणसांतील भांडणें अगदीं पूर्णपणें अशीं कधींच संपायचीं नाहींत. या नाहीं त्या रूपानें आपलें अस्तित्व कमीअधिक प्रमाणांत तीं नित्य प्रकट

करणारच; पण ऐक्याचा राजमार्ग–रोटीबेटीव्यवहार–कायमचा बंद न करतां मोकळा ठेवलेला असेल तर नित्याच्या भांडणांत एकमेकांशीं संपर्क न ठेवणाऱ्यांनाही, उभयतांवरील संकटकालीं उभयतांच्या कल्याणासाठीं, त्याच मार्गाचा चांगला उपयोग करून घेण्यास सांपडतो. एके कालीं रोमन क्याथोलिक व प्रॉटेस्टंट, एकमेकांना पाण्यांत पहात असत–नव्हे उभे जाळीत असत. पण स्पानिश आर्मेडाच्या सर्वसाधारण महत्संकटप्रसंगीं आपआपले विशिष्ट पंथभेद व सांप्रदायिक धर्माभिमान पार गुंडाळून ठेऊन सर्वच इंग्रज, केवळ इंग्रजपणाच्या एकजात अभिमानानें प्रेरित होऊन सहज एकजीव झाले. व संकट टळल्यावर जसें कांहीं मधेंच उद्भवलेलें जरूरीचें काम उरकून पुन्हा पहिला किंवा नवा डाव आरंभावा, त्याप्रमाणें भांडणांचे अनेक खेळ पहिल्याप्रमाणें चुरशीनें खेळूं लागले. त्यांचा देशाभिमान, परवशतेची चीड व व्यवहारनैपुण्य हीं सर्व अनुपम तर खरींच, पण आयत्यावेळीं आपसांतील लाथाळी मिटवून एकी करते वेळीं, कलहसमयीं मुद्दाम अधिक मानावयाचे बाटविटाळ व अनेक गैरसमज, यांची त्यांना मुळींच कशीतरी अडचण भासली नाहीं. कारण सर्वसामान्य संकटाची भीषणता पटतांच, देशाभिमानाचा जसा उपयोग झाला त्याचप्रमाणें, उपयुक्त विचारविनिमयास, त्यांच्यांत सररास चालू असलेल्या रोटीबेटीव्यवहाराचाही निःसंशय त्यांस फायदा झाला, संकटाची चर्चा करण्याचे व त्यावरील उपाययोजनेचे प्रसंग त्यामुळेंच चटकन साधले गेले. हिंदूंचा सार्वत्रिक उठाव करतांना, त्यांच्या एकीकरणास आपल्यालाही, मानल्यास–अशा क्षुल्लक किंवा मोठ्या अडचणींची नड होऊं नये, म्हणून जातिनिर्बंधामुळें अस्तित्वांत असलेले द्वेषमत्सर, ज्या ज्या उपायांनीं कमी करतां येण्यासारखे आहेत, त्या त्या उपायांचें अवलंबन केलें पाहिजे. हिंदुत्वाच्या अभिमानानें हिंदु म्हणवून घेऊनच हिंदुनीं जगांत जगावें असें वाटत असेल तर हिंदूंच्या पोटापाण्याचा प्रश्न नजरेसमोर सारखा ठेऊन, धर्माच्या, देशाच्या, संस्कृतीच्या किंवा ज्यावेळीं जें योग्य दिसेल त्याच्या व्यापक अभिमानाचें अधण नेहमीं यांनाही त्या योग्य जळवणानें हिंदु मनाच्या चुलीवर समतेच्या भांड्यांत उकळत ठेवून त्यांचें ऐक्य व वीरवृत्ति राखणें न्यायानें प्राप्त आहे. अभ्युदयाच्या नुसत्या गोष्टी बोलण्यांत काय अर्थ आहे ? बिकट परिस्थितीशीं झगडून उद्दिष्ट साधण्यास स्वतःचें सामर्थ्य वाढण्यासारखी कृति केली पाहिजे. वृथाभिमान व लाडके गैरसमज, सोडले पाहिजेत आणि लोकापवाद व त्रास सहन केला पाहिजे. मात्र स्वतःच्या पवित्र

जन्मपरंपरेच्या व आपल्या जातीच्या श्रेष्ठपणाच्या संकुचित अभिमानापुढें, एकंदर हिंदूंच्या हिंदुत्वाच्या व्यापक अभिमानाची किंमत नसल्यास मनाला, व शरीराला असा त्रास घेण्याचें खरोखरीच प्रयोजन नाहीं. सुखेनैव कालक्रमण-करीत असावें. कारण मग अशा हट्टाचे व अज्ञानाचे कपाळीं एकतर हळुहळु झुरून नामशेष होणें किंवा सक्ती होऊन, अन्य जातींत किंवा परधर्मांत अनायासें ओढले जाणें हें ठरलेलेंच असतें. त्याकरतां मुळींच तसदी घ्यायला नको. असल्या बाबतींत तसदी शत्रूला, त्याच्या स्वाधीन होणाऱ्याला नसते. पण जर व्यक्तीपेक्षां जातीचें व जातीपेक्षां हिंदुत्वाचें प्रेम व महत्त्व अधिक वाटत असेल, तर परकी राज्यकर्त्यांना राजकीय प्रकरणीं प्रजेशीं जसें न्यायाचें, निःपक्षपाती, समतेचें व दयाळु वर्तन करण्यास आपण मोठ्या संभावितपणानें सांगतों; तसेंच चोख वर्तन, धार्मिक, सामाजिक स्वराज्यांत आपल्या बरोबरीच्या किंवा कनिष्ट अशा अज्ञान गरीब देशबांधवांशीं आपल्याला–कितीही–कठीण वाटत असलें, कितीही जड जात असलें, तरी–नको का अगोदर सुरू करायला? सूक्ष्म व समतोल विचाराअंतीं दिसून येईल कीं ही हितपरिणामी कडु गोळी आज नाहीं उद्यां गिळलीच पाहिजे व गिळावीही लागणार. मग ती दूरदृष्टि चालवून युक्तियुक्तीनें चविष्ट व गोड अनुपानाबरोबर खुषीखुषीनें गिळली जावो किंवा एखाद्या अवचट प्रसंगांत आडमुठ्या वैद्यांकडून घशांत कधींकाळीं कोंबली जावो; तो कालाचा प्रश्न आहे. पण हें सत्य पटत असेल, तर भ्रमानें असें उगाच घोटाळतां कां आणि मधून मधून इकडे एकीकरणाच्या तीराकडे संमत्तीचे असे नुसते दृष्टिक्षेप फेंकीत, पण तिकडे सद्यःफलदायी रूढींच्या विलोभनीय वीचिसमूहास विलोभून अधिकाधिक खोल पाण्यांत तसे घसरत जाता कां? पूर्ण निश्चयदृष्टीच इकडे वळवा आणि मग सावकास का होईना, पण तीरच गाठण्याचें उद्दिष्ट ठरवून मार्ग सुधारीत चला म्हणजे झालें. यथाकालीं उद्दिष्ट साधेलच साधेल.

हिंदु भीरु व्हायला, प्रचलित जातिसंस्थेची व्यवस्था आपल्या जन्मतः कायम श्रेष्ठहीनत्वाच्या मत्सरबीजदोषामुळें, खरें पाठबळ मिळण्याचे अभावीं, थोडीतरी कारणीभूत झाली असेल, असें तुम्हांस या विवेचनावरून थोडें तरी वाटतें का? विचार करून पहा. उदार चौकस बुद्धीचे व बहुश्रुत असे आश्रम-धर्माभिमानी सुद्धां, बिकट प्रसंगाची चुणुक दिसतांच अलीकडे, पोटजाती एक झाल्या पाहिजेत, असें उघड प्रतिपादन करण्याइतपत धीट झाले आहेत. या त्यांच्या कदाचित परापदेशे पांडित्यांत जणुं काय–मांजराच्या गळ्यांत घाट

बांधायला आज आम्हाला धीर होत नाहीं, तरी इतर पोटजाती परभारें एक झाल्यावर मागाहून सावकाशपणें आम्ही आपला मुख्य जातींबद्दलचाही विचार आम्ही पाहणार आहोंत-अशी गर्भित सूचना आहेसें दिसतें. कसेंही असो. पण हें त्यांचें बोलणेंच-ते कबूल करोत वा न करोत पण,-तुच्छतादर्शक वर्णसंकर किंवा सबगोलंकार असे शब्द न उच्चारतां, पोटजातींचें एकीकरण किंवा संमिश्रण असें सहानुभूतिपूर्वक म्हणत म्हणत-मानव धर्मांतील समतेच्या तत्वाला-तें पटून, हळूच कळत नकळत-अनुमति देण्यासारखेंच आहे. यावरून इतकेंच निष्पन्न होतें कीं, समाजाच्या व त्यांच्या मनावरील परंपरागत रूढिबंधनांचा दाब, आजमितीस त्यांस तसें करण्यास धजावूं देत नाहीं. अनुकूल कालाची ते फक्त वाट पहात आहेत. कालालाच अनुकूल करून घेण्याची त्यांस ताकद मात्र नाहीं. अनुयायी सैनिकांत एकदम गोंधळ उडूं नये म्हणून निराळा क्रम स्वीकारण्यापूर्वी समरांगणावर धूर्तपणानें घेतलेली ही एकप्रकारची थोडी व्यवस्थित माघारच नाहीं का ? असो ताकदच नाहीं, तेव्हां ते दोषार्हही नाहींत. कारण दुष्ट व अनवश्यक तथापि अप्रतिबंधपणें व दिसण्यांत बऱ्याच हौसेनें चालू असलेली जुनाट रूढिबंधनें तोडून, आपल्या व समाजाच्या मनावरील त्यांचें दडपण उडवून, आपल्यामागून समाजाला सत्प्रगतीकडे मंत्रमुग्धपणें आणणें, हें सामान्य लोकाग्रणींचें कामच नाहीं. आणि सामाजिक चालीरूढीही वरिष्ठ जातींना अधिक सोईस्कर व सद्यःफलदायी अशा अगोदरपासूनच पडलेल्या असल्यामुळें, कबजांत असलेल्या वस्तूंप्रमाणें त्यांचा कोणालाच लोभ सुटत नाहीं. जीवनकलहाच्या समरांगणावर इतके दिवस यशस्वीपणानें चालत आलीशी वाटणारी, आचारविचारांची जुनी युद्धपद्धति, प्रस्तुतकालीं परिस्थितिमहात्म्यानें चालेनाशी झाली, तरीही ममत्वामुळें ती टाकायला जीवावर येणें, सामान्य मनुष्यस्वभावाप्रमाणें साहजिकच आहे. त्यांत म्हणजे कोणाचा फारसा दोष आहे असें नाहीं. आईबापांना तरी आपले पुत्र, ते कुपुत्र असले तरी एकाएकीं कुठें टाकवतात ? कारण ते कुपुत्र असले तरी स्वपुत्र असतात व शिवाय जनाची व मनाची आडकाठी होत असल्यामुळें, त्यांचा सहसा त्याग करवत नाहीं. तशा कुपुत्रांप्रमाणेंच, समाजांत कांहीं रूढ दुष्ट चाली असतात. त्या अन्यायमूलक व अहितकारक असल्यामुळें मनापासून तर पाळवत नाहींत आणि समाजाच्या लोभानें व भीतीनें अजीबात तर सोडवत नाहींत, अशी कोंडमाऱ्याची स्थिति होते. तरीही अशा अवस्थेंत जुना आपलेपणा राखून जीवनकलहांत जय मिळत असेल, तर

त्यास आग्रहानें कोण नको म्हणणार ? व केवळ मनाच्या समाधानासाठीं, समाजाला कृतीनें कोण दुखविणार ? मधूनमधून एखादाच. परंतु अप्रिय आचार-विचारांनीं होणारा मनाचा कोंडमारा सहन करूनही, तें साध्य म्हणजे जीवन-कलहांत यश, ही मुख्य गोष्टच जर साधत नसेल, तर मुद्यावर लक्ष देऊन व आपद्धर्म म्हणूनही, साध्याकरतां साधनांत फेरबदल नको का करायला ? तो करण्यांत कमीपणा वाटतां कामा नये. इतकेंच काय, पण फेरबदल फलदायी होण्यास, तो वेळेवरही केला गेला पाहिजे. निकडीचें काम दिरंगाईवर टाकण्यांत तात्पुरती सोय वाटत असली, तरी ' नहि प्रतीक्ष्यते मृत्युः कृतमस्य नवाकृतम् ' यांत सुचविल्याप्रमाणें, भावी धोका टाळण्याचें तर त्या दिरंगाईत सामर्थ्य नसतेंच, पण परिस्थिति उलट अधिकाधिक विकोपाला जायची मात्र जास्त भीति असते.

हिंदूंच्या भीरुपणाचा वरचेवर जिकडून तिकडून ऐकूं येणारा डंका, लज्जेनें मन उद्विग्न करून कपालशूल उठवितो, म्हणून त्यावर तोडगा करण्याकरतां, हिंदुधर्माचें नांव राखण्याकरतां, व भावी लोकशाहींतील मताधिकाराकरतांही, हिंदु म्हणविणाऱ्यांची संख्या, शक्ति, व जूट वाढविण्यासाठीं,–हें प्रेमळ व्यवहाराचें मुख्य साधन वगळून–जर नुसती शुद्धिसंघटनाची चळवळ आपण कितीही उत्साहानें चालविली–बाकी नुसती हिंदु म्हणविणारी नांवाची संख्या देखील वाढविण्याकरितां चालविलीच पाहिजे: कारण, आम्ही हिंदु–असें म्हणणारीं माणसेंच संपलीं, म्हणजे सर्वच ग्रंथ आटोपला–तरी, जातिसंस्थेंतील रोटीबेटी-व्यवहाराच्या अभावानें अस्तित्वांत राहिलेल्या **उपजत श्रेष्ठहीनत्वाच्या व भिन्न रक्तसंबंधाच्या सुप्रसिद्ध कालगतीच्या-आर्थिक मानापमानाच्या दृष्टीनें महत्वाच्या ठिकाणीं** ती येतांच, त्या चळवळींचे घोडें, हल्लींच्या राजकारणाच्या चळवळीच्या घोड्याप्रमाणें आडलें जाऊन तें तेथेंही पेंड खाणार, असें तुम्हांस सत्यसमाजाच्या व ब्राह्मणेतर वगैरे संस्थांच्या वागणुकीवरून वाटत नाहीं का ? विचार केलात तर नक्की वाटेल. पण वाटलें तरी चळवळ सोडा, असा याचा अर्थ नाहीं. तींत योग्य ती अधिक सुधारणा करा इतकाच आहे.

निरानिराळे समाज व त्यांच्या निरनिराळ्या चळवळी उत्पन्न होण्यासारखी परिस्थितीच–सामाजिक किंवा राजकीय व्यवस्थेंत सहज झालेली किंवा जाणून बुजून केलेली असली, म्हणजे तसे समाज व त्यांच्या चळवळी या सुरू व्हायच्याच. **जन्मायत्त श्रेष्ठ कनिष्ठ भावनेनेंच जातिवैमनस्याला जन्म दिला आहे.**

फार कशाला, राज्यव्यवस्थेंतील हल्लींच्याच मतदानपद्धतींचा वगैरे जरा जारीनें व पक्षपाती धोरणानें अंमल चालूं होऊंदे, कीं उद्यां याच धर्तीवर एकंदर हिंदु समाजांतच काय, पण सत्यसमाजाच्या व ब्राह्मणेतरांच्या पोटांतही आणखी लहान लहान पक्ष निपजतील व एकीकडे इतर जातींशीं कांहींतरी कुरापती काढून भांडतां भांडतां आपल्या **अल्प व स्वतंत्र अस्तित्वाच्या** सबबीवर सरकारच्या दाराशीं तेही राखीव जागांकरितां अप्पलपोटेपणानें धरणें धरून बसतील. अर्थात आपसांत भांडत राहून असे लहान लहान समूह होतांना त्यांचा सर्वांचा म्हणजे एकंदर हिंदूंचाच नामर्दपणा मात्र वाढत जाईल. कारण भांडणानें विभक्त होतील त्या मानानें त्यांचे पाठबळ कमी पडेल व **पाठबळाच्या भरंवशानें** वाटणारा हुरूप व धीर यांस तरी ते मुकतील. नोकरशाही काय प्रजाजनांत पडेल तितकी फूट पाडण्यासाठीं भांडखोर कोंबड्यांपुढें टाकण्यास हातांत जातवारीच्या किंवा दुसऱ्या कसल्या तरी कलहकारक हक्कांच्या कण्या घेऊन टपून बसलेलीच आहे. पण आपण असा विचार केला पाहिजे कीं, हक्काच्या कण्या आमच्यापुढें अगोदर अधिक टाका; कारण हिंदूंत आमचें जातीय अस्तित्व स्वतंत्र आहे, असें नोकरशाहीजवळ म्हणण्यास या भांडखोर कोंबड्यांना मुख्यतः सापडतें कसें ? तर हिंदुसमाजांत **खालपासून वरपर्यंत शरीरसंबंध घडत नाहींत म्हणून ना ?** हिंदूंत पृथक् जातींचें अस्तित्वच नसतें, तर अशीं जातींच्या निराळेपणाचीं भांडणें तरी कोणाला लावतां आलीं असतीं. ? बाकी तशी स्थिति असती, तरी तेवढ्यावरून कोणी लावालावीचा उद्योगच सोडून दिला असता, असें म्हणणें नाहीं. पण मग फार तर हे बंगाली, हे मद्रासी, ते पंजाबी, किंवा महाराष्ट्रीय अशी प्रादेशिक किंवा आणखी कसली सुचतील त्या तऱ्हेचीं भांडणें त्यांनीं लावून पाहिलीं असतीं. परंतु त्यांत कोणाला हल्लींप्रमाणें यश आलें नसतें. कारण शरीरसंबंधांनीं सर्वजण एकमेकांचे आप्त होऊन जात असल्यामुळें, नुसत्या एकराष्ट्रीयत्वाच्या व एकधर्माच्या जोरावर तीं जेव्हांच्या तेव्हांच शमवितां आलीं असतीं. समदुःखी लोक नद्या डोंगरांनीं विभागले गेले असले तरी समाइक दुःखाच्या प्रतिकारार्थ शक्य तितके एक होण्याचा प्रयत्न ते सहजस्वभावानेंच करीत असतात. त्यांतच त्यांचे शरीरसंबंध घडत असले म्हणजे तुम्ही जातधर्मानें एक नाहीं, असें म्हणण्यास परक्यांना जागाच रहात नाहीं.

नेपाळी लोक आपल्या स्वतंत्र राज्यामध्यें हिमालयांतील दऱ्याखोऱ्यांतून शतकानुशतकें दडलेले असले तरी आपली व त्यांची धर्मपरंपरा व वंशो-

त्पत्ति एकच आहे. तथापि इकडील लोकांशीं फारा दिवसांपूर्वी पासून त्यांचे बेटीव्यवहार होण्याचें बंद पडल्यामुळें, तेवढचि फट पाहून, नेपाळी लोकांना, तुम्ही हिंदु नाहीं सबब हिंदूंचा कैवार घेण्याचें तुम्हाला कारण नाहीं, असा मायावी उपदेश करण्याचा प्रयत्न कांहीं गोरे लोक मधून मधून करीत असतात. हेतु काय तर प्रसंगीं त्यांचीं मदत न झाल्यास हिंदूंना आपले म्हणणे ऐकायला लावायला तितकेंच सोपें जाईल. पण इकडील हिंदूशी त्यांचे शरीरसंबंध घडत असते तर नेपाळी लोकांना तुम्ही हिंदू नाहीं, हें गोऱ्या लोकांस कोणच्या तोंडानें म्हणतां आले असतें ? परकी हल्ल्यां पासून आज परयंत हिंदु धर्म जो कसा बसा टिकून राहिला तो या अशा आमच्या जातिसंस्थेमुळेंच राहिला असेंही एक मत आहे व तें मागील काळा पुरतें एका दृष्टीनें कांहींसे खरेंही आहे. पण हल्लींच्या चोरट्या व गनिमीं काव्याच्या अनेकांगी व्यापक हल्ल्यां पासून जातिसंस्थेच्या जुन्याच व्यवस्थेनें पूर्वीं इतपत तरी हिंदुधर्माचें संरक्षण होईल असें वाटत नाहीं. पूर्वीं जातिवैमनस्य कमी असून धर्मश्रद्धा अधिक होती. आम्हाला स्पृश्यकरा नाहीं तर आम्ही मुसलमान होऊं अशा खऱ्या खोट्या धमकावण्याही कोणी देत नव्हते व लोक सशक्त, लढाऊ आणि सशस्त्र असून स्वराज्यसत्ताही जिकडे तिकडे विखुरलेली होती. तरीही अशा अनुकूल स्थितींत ज्या जातिसंस्थेनें आपल्यांतून पांचसहाकोट लोक जाऊं दिले, तीच जातिसंस्था आतांच्या सर्व प्रकारच्या अगदीं उलट परिस्थितींत कसें काय धर्माचें संरक्षण करून लोकांत ऐक्य व उमेद वाढवील तें न सांगताही समजण्या सारखें आहे. आतां तोडीस तोड म्हणजे त्यांतल्या त्यांत, **सुसंघटित एकत्र उठाव** हाच एक उपाय आहे. पण तो शिक्षणानें **समतेच्या तत्वावर** एकमेकांची एकमेकांविषयीं मनें शुद्ध होऊन **जातींचे एकीकरण** झाल्या शिवाय मात्र खरा साधणारच नाहीं हें निश्चित.

मित्रहो, असा विचार करा कीं ही उपजत श्रेष्ठहीनत्वाची समजूत व भिन्न रक्ताचा संबंध मानण्याचा प्रघात ज्या कालापासून सुरू झाला, त्या कालाच्या अगोदरच्या कालांत, काय स्थिति होती ? कोणती असणें संभवनीय आहे ? अनेक जातींच्या अगोदर जसे तीन किंवा चार वर्ण, तसे तीन किंवा चार वर्णांच्या अगोदर किती ? दोन किंवा एक असेंच ना ? बरं त्याच्याही अगोदर किती ? एक व त्याच्याही अगोदर शून्य असाच क्रम येतो नाहीं का ? मग आतां येथेंच थांबलेलें बरें, नाहीं तर—माणसा अगोदर माकड—असें कोणी सुच-

वलि. अशा दृष्टीनें विचार केल्यास सर्व हिंदूंच्या रक्तवाहिन्यांत एका आर्य वंशाचेंच, नव्हे एका आर्य जातीचेंच रक्त वहात असलें पाहिजे असें उघड होत; कारण भूतलावरील पहिले जे मानव तेच आर्य व तेच आपले पूर्वज, अशीच वास्तवीक स्थिति असल्यामुळें, हिंदूंतलि सर्व जातींच्या एकीकरणास देखील जेथें नड नसावी, तेथें पोटजातींच्या एकीकरणास सुद्धां ती असावी—अगदीं मुख्य हिंदुत्वच धोक्यांत येत असलें तरीही असावी असें म्हणणारे आमच्यांतलेच आग्रही भेटले, म्हणजे ऐकणाऱ्यांच्या तोंडांतून--विनाश काले विपरीत बुद्धिः—या पेक्षां सखेदाश्चर्यानें दुसरे कोणतें **दुःखोद्गार** निघणार ?

या ठिकाणीं असा एक नाजुक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं, पृथ्वीवर पहिले मानव, तेच आर्य व तेच आमचे पूर्वज, म्हणजे सर्वच आम्ही, असें जर आहे, तर एखादी हिंदु कुमारिका, एखाद्या मुसलमानाशीं निका लावण्यास तयार झाली, तर मनुष्य तिथून एक असें म्हणून सर्व हिंदुजातींस एकीकरण करण्याचा उपदेश करणाऱ्या हिंदूंना तरी, त्या मुलीसंबंधानें एवढा गहजब करण्यास कसा अधिकार पोचतो ? तर त्याचें उत्तर तो मुसलमान आमच्याप्रमाणें मनुष्यच नाहीं किंवा आर्यकुलोत्पन्नहि नाहीं, म्हणून गहजब करतां येतो असें नाहींच. तर आमच्या वारसहक्काच्या फारच फार पवित्र अभिमानाची मोठी मौल्यवान ठेव अशी आमची वैदिक आर्य संस्कृति जशी अति पुरातन, तशीच ती अत्यंत व्यापक, सर्वसंग्राहक, परमउदात्त व मानव या श्रेष्ठ पदवीची यथायोग्य जाणिव करून देऊन भेदाभेद न मानतां कोणाही मानवास त्याचा अभ्युदय करीत परमेश्वराकडे नेऊन त्यास तद्रूप करणारी, इतकी उच्च प्रतीची असल्यामुळें, तिचा आपलेपणा, अभिलाष व पूर्ण सदभिमान तर आमच्या रोमरोमांत भरलेला आहेच. तथापि अशी ती अनुपम विलोभनीय आहे, तरीही किंवा म्हणूनच तिचा, त्या पुण्यठेव्याचा लाभ आमच्या शत्रुस्थानीं असलेल्या स्वकीय किंवा परकीय लोकांसही—सर्वजणानाच—व्हावा, अशीहि आमची प्रामाणिक उदार सदिच्छा आहे. अर्थात तिचा शत्रूंनींही अंतःकरणपूर्वक स्वीकार केल्यास—मग ते एखाद्या **आर्येतर मानववंशाचे** का असेनात—ते **सर्वस्वी आमचेच आहेत.** हिंदुसंस्कृतीचा **जगभर प्रसार** आणि **विजय** होवो, असेंच आम्ही मनापासून इच्छितों. परंतु अशा सर्व श्रेष्ठ संस्कृतींत अनायासें जन्म लाभलेली एक मुलगी, भिन्नसंस्कृति अंगिकारलेल्या—नव्हे जन्मदात्या आईसमान असलेल्या आपल्या मूळ संस्कृतीस द्वेषानें ठार मारण्याकरितां नंगी तर-

वार घेऊन तयार झालेल्या–दुष्ट व मूर्ख पुरुषास–मी तुझी बायको, चरणाची दासी–असे स्वधर्म द्रोही, फितुरीचे निर्लज्ज शब्द उच्चारून स्वैर स्वातंत्र्याच्या उल्लू विचारांनीं व तारुण्यांतील अंधप्रेमानें तसलेच मातृवध करणारे अनेक **कुलांगार प्रसविण्यास** युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत प्रत्यक्ष समरांगणावरच–पति म्हणून वरण्यास सिद्ध व्हावी, याहून दुर्दैवानें कदाचित मृत्यूच्याही ठरणाऱ्या मृत्युशय्येवरील हिंदुत्वाच्या अभिमानी हिंदूंना, गहजब करण्यास दिसण्यांत क्षुल्लक पण परिणामानें भयंकर, असें दुसरें कोणतें अधिक बलवत्तर कारण असेल ? यांतच वरील प्रश्नाचें समर्पक उत्तर आहे. व तें भयानक ज्वालांनीं भडकलेल्या भीषण चितेंत हौसेनें आणि अहमहमिकेनें धडाधड उडया घेऊन जोहार करणाऱ्या शूर रजपूत स्त्रियांनीं, आणि शत्रूंच्या, किंवा तें नच साधल्यास, स्वतःच्या छातींत सपासप खंजिरावर खंजीर खुपसून घेऊन मराठी वीरांगनांनीं,–असे प्रामाणिकपणानें, मूर्खपणानें किंवा कावेबाजपणानें प्रश्न करणाऱ्यांस–अधिक समर्पकपणानें मागेंच आपल्या उज्वल कृतींनीं देऊन ठेवलेलें आहे. शत्रुविनाशार्थच अल्पकाल रिपुरमणी होण्याचा म्हणून क्षम्य व मान्य असाही अति धाडसाचा व कुशल गनिमी काव्याचा एक गौण मार्ग आहे. नाहीं असें नाहीं. परंतु तो आमच्या भोळ्या भाबड्या तरुण बालिकांस मुळींच झेपण्यासारखा नसल्यानें नको–त्याची गोष्टच बोलायला नको. त्या मार्गाचें अनुकरण रूसोजपानी युद्धांत कांहीं जपानी स्त्रियांनीं व नुकत्याच होऊन गेलेल्या जर्मन युद्धांत कांहीं जर्मन स्त्रियांनीं हेतुपूर्वक शत्रूंच्या गळीं पडून केलें होतें असें म्हणतात. असेल, कदाचित् खरेंहि असेल. त्या कुशल युवतींस त्यांचा तो मार्ग खुशाल लखलाभ होवो, आपल्याला त्याची चर्चा नको. पण वरील विवेचनावरून हिंदुलोकांचा नामर्दपणा वाढविण्यास व जगाचा उद्धार करणाऱ्या संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुधर्माचा नाश करण्यास कारण होणाऱ्या विधर्मी विवाहांवर, पुराणमतवादी सनातनी लोकांप्रमाणें आग पाखडण्यास, जातपात न मानणारे, परन्तु उदात्त आणि व्यापक हिंदुत्वाचे अभिमानी सुधारक व आर्य समाजिस्ट तयार कां होतात, हें जसें दिसून येतें, त्या प्रमाणें जे कोणी थोडे सुधारक, सत्यसमाजिस्ट, किंवा ब्राह्मणेतर, हिंदुत्वाचे असे **काळविवाह** पाहून त्यांत कांहीं विशेष नाहीं असें मानतात, किंवा उलट–प्रामाणिकपणानें किंवा खिजविण्याकरितां बरें झालें असें म्हणून–विवाहांचें अभिनंदन करतात, त्यांना स्वतःच्या विशिष्ट समूहाशिवाय इतर हिंदू लोकांविषयीं–जगांतील कोणीतरी लोक, या पलीकडे कांहीं अधिक आपलेपणा

मानण्याचें कारण नाहीं असें वाटतें का अशा रीतीनें हिंदुधर्मावरील ते आपली एकप्रकारची विरोधभक्तीच दाखवितात का आपलेपणा वाटत असूनही, हिंदुजनतेला त्यांच्या समजुतीप्रमाणें सुधारून मर्द करण्याचा, मुसलमानी पाठबळ मिळवून देण्याचा, हिंदुधर्माचें व हिंदु संस्कृतीचें यश अधिक उज्वल करण्याचा, त्यांचा हा एक चुकीचा किंवा बरोबर–पण सहज लक्षांत न येण्याजोगा असा चमत्कारिक प्रयोग आहे, याचा मात्र अद्याप उलगडा झाला नाहीं असें वाटतें. त्यांच्या वक्रोक्ति व कृति पाहून ते व इतर, परस्परांविषयीं साशंक आहेत असेंच तिऱ्हाइताला दिसतें.

कोणीही कोणास उगाच हासूं नये हा न्याय सर्वांना माहित असतो पण कोणीही कोणास खुशाल हासावें असाच जगांत व्यवहार दिसतो. वास्तविक स्वतःला आलेल्या अनुभवाप्रमाणें व प्राप्त झालेल्या ज्ञानाप्रमाणेंच जो तो बोलत व वागत असतो. पण जग वैचित्र्यानें भरलेलें आहे, या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊन प्रत्येकाला वाटतें कीं मी करतो तें आचरण व मानतो तेवढें सुधारकपण योग्य आहे. याहून कमी तें गांवढळ व जास्ती तें फाजील. उत्तरेकडील गोषांतील स्त्रिया, बुरखा न घेतां बाहेर हिंडणाऱ्या दक्षिणी स्त्रियांस नांवें ठेवितात तर उलट सुधारलेल्या बायका त्या दोघींची–अद्याप बिचाऱ्या मागसलेल्या आहेत–म्हणून कींव करतात किंवा बेंगरुळांत गणना करतात. याचप्रमाणें मोठमोठ्या नैतिक वादविषयक गोष्टींचेही आहे. हिंदूंच्या धार्मिक;सामाजिक व्यवहारांत कोणी शास्ता नाहीं आणि श्रेष्ठपणाची समजूत तर जन्मावर करून घेतलेली, यामुळें त्यांच्यांत रूढ झालेल्या अनेक चालीरीतींच्या व बाटाविटाळांच्या समजुतींत, ब्राह्मणांपासून महारापर्यंत सर्वांची वृत्ति सारखीच आहे. रूढिविनाशनास समाज अज्ञानामुळें विरोध करतो व अधिकारी वर्ग जरूर नसल्यामुळें तटस्थ राहतो. तरीही विशेष वाईट अशा–सतीची चाल, असंमत वयोमर्यादा, माणसांस बळी देण्याचें वेड किंवा अज्ञान, मुलींचा जाहीर विक्रय वगैरे–कांहीं गोष्टी सरकारनेंच मनावर घेतल्यामुळें गुन्हा समजून सरकारी कायद्यानेंच बंद झाल्या. आणि कायद्यानेंच बंद झाल्यामुळें हळु हळू समजूत पटून,–झालें तें बरें झालें–असेंच आतां त्यांच्या संबंधानें लोकांस वाटत आहे. त्याचप्रमाणें आगगाडी–आगबोटींतील व कचेरी-बाजारांतील शिवाशिवीचा विटाळ न मानण्याची प्रवृत्ति, कायदा करावा न लागतां परिस्थितीनेंच आंगवळणीं पाडून कायम केली व यवनांनीं आपला स्पर्श तर मनगटाच्या जोरावर कधींच मान्य करून घेतला. आणि असेंच सर्व–अगो

दर मान्य नसलेलें मानाहून केवळ संवयीनें पावन होणारें असतें. परंतु हें लक्षांत न घेतां रूढ चालविल्यानें . .समाजांत तंटे उद्‌भवून द्वेष वाढतो व लोक विस्कळित होऊन, परशत्रूंबरोबर भांडतेवेळीं त्यांचें एकमेकांस पाठबळ न मिळाल्यानें भेकड ठरूं लागतात व होतातही. परंतु घरांतल्या घरांत सोवळ्याओवळ्याची व बाटविटाळाची कल्पना अजून पुष्कळ जीव धरून असल्यामुळें, घरगुती व्यवहारांत ब्राह्मणांस कोणाचीच शिवाशिव मानवत नाहीं. इतर पांढरपेशा उच्च जातीस मराठ्यांची शिवाशिव चालत नाहीं, मराठ्यांस त्यांच्याहून इतर हलक्यांची व महारांची पसंत होत नाहीं. व सर्व वरिष्ठांस दोष देणाऱ्या महारांना त्यांच्याही घरगुती व्यवहारांत घेडमांगांचा शिरकाव सहन होत नाहीं. यांत हांसायचें कोणी कोणाला आणि या उडदाच्या राशींतून काळ्यागोऱ्यांची निवड तरी कोणी कशी करायची ? घेडमांगांकडे कदाचित् कोणाची नजर जाइल, पण त्यांच्याहूनही एखादी हलकी जात असल्यास, तिच्याशीं या घेडमांगांचें वर्तन कांहीं निराळें होत असेल, ही शंकासुद्धां नको. हिंदुसमाजांत अनेक लहानमोठ्या निरनिराळ्या कारणांनीं विस्कळितपणा वाढत जाऊन व परस्परांचें परस्परांना मिळणारें जिव्हाळ्याचें पाठबळ कमी झाल्यानें समाज कसा थोडथोडा अधिक भेकड बनत आला आहे, याबद्दलचें हिंदु–मनोवृत्तीचें असें हें पुसट पुसट काढलें जाणारें लहानसें अपुरें छायाचित्र सुधारून खिशांत ठेवूनच हिंदुसंघटनेच्छु आपलें प्रचारकी कार्य सर्वत्र चालवीत असतील, असा विश्वास आहे. चालू रूढींतील अन्याय व अप्रयोजकपणा दुसऱ्याला उपदेश करण्यापुरता मनाला पटत असला, तरी त्या रूढि, भल्याबुऱ्या समजुतीप्रमाणें तूर्त फायदेशीर वाटत असल्या किंवा सोडल्या नाहींत तरी चालेल असें वाटत असलें, म्हणजे त्यांच्यासंबंधानें त्या सोडण्यासारखी सक्ति झाल्याशिवाय किंवा परिस्थितीनें त्या रूढींविरुद्ध वागणें जरूर व आंगवळणीं पडल्याशिवाय, तसल्या रूढी, आपण होऊन सोडण्यास महार, मराठे, ब्राह्मण कोणीही सहसा तयार नसतात. बोलण्यापेक्षां करणें केव्हांही श्रेष्ठच, पण आधीं विचार मग उच्चार आणि नंतरच आचार, हा क्रमही विसरून चालायचें नाहीं. आपण कांहींही प्रगतीपर न करितां किंवा उलट परागतीनेंच मागें मागें सरकतांना—नुसते बोल घेवडे म्हणून—दुसऱ्यास हिणविण्यापूर्वीं, वरील क्रम जर आठवला, तर–ते कृतिच करीत नाहींत, पण आपणतर प्रगतिपर नुसतें बोलतही नाहीं, हें पटून प्रामाणिक सद्‌गृहस्थ मनांत खचित खजील होतील व निरनिराळ्या जातींचें परस्परांशीं चालू असलेलें वर्तन सर्वांनींच ध्यानांत घेतल्यास निम्मे

जातिवैमनस्यही कमी पडेल, पण त्यांत काय, एकंदर सर्वसाधारण मनुष्य-स्वभाव असाच सहज स्वार्थाकडे झुकलेला असतो. त्यामुळें सर्व जातींतील मनुष्यें त्याचप्रमाणें वर्तन करतात. ब्राह्मण सर्व वर्णांवर व जातींना सारखेच गुरुस्थानीं असल्यामुळें, त्यांस पूजेचें सामान्य अधिष्ठान समजून, त्यांच्यावर उग्रगंधवाक्-सुमनांचा अधिकाधिक वर्षाव करण्याचे बाबतींत सर्व जातींमध्यें जणुं स्पर्धा चालू झाली आहे. मागील व अलीकडील सर्वप्रकारची वस्तुस्थिति, मानवी सहज-स्वभाव व आपण करतों काय, याचा दूरवर विचार या गोष्टींत जे जितके कमी, तितके ते स्पर्धेत अधिक पुढें, असा या चढाओढींत उलटा नियम आहे. पाहूं या सर्वजण मागें पडून नवीन तडफेनें व जोमानें पुढें झालेले सत्यसमाजिष्ट व ब्राह्मणेतर यामध्येंच बहुधा अखेर खरी चुरस होऊन त्यांचेपैकींच कोणीतरी विजयाचिन्ह पटकावतील, असा आजच्या चालू घटकेला तरी लोकांचा कयास आहे. असो.

गरीब, मागसलेल्या व सत्ताहीन हिंदुजनतेंत उत्पन्न झाल्याबद्दल वाईट न वाटतां, उलट, उपकारक कृत्य करण्यास विस्तीर्ण क्षेत्र मिळालें म्हणून आनंदून, जगामध्यें हिंदूंचें नांव गाजविण्याची ज्या हिंदूंची–मग ते कोणीही असोत–खरी इच्छा असते, ते 'Always to be ahead of times' नेहमीं चालू कालमानाच्या दोन पावलें तरी पुढें राहण्याचें धोरण ठेवतात व जन्मस्वभाव व मनाची समजूत यांच्या प्रमाणांतच पुढेंमागें राहून लोक आपली निंदा किंवा स्तुति करणार, हें ओळखून व आचांडाल सर्व हिंदूंना सारखे मानून, निंदेचें स्तुतींत रूपांतर आपण आपल्या कृतीनें करूं अशीच त्यांची ईर्षा व उमेद असते. निरनिराळ्या जातींच्या उत्पत्तिविषयीं प्रथम थट्टेनें एकमेकांना हिणवितां हिणवितां मागाहून वदेळीवर येऊन पुढें कायमचे वैरी होतांनाही कांहीं लोक दृष्टीस पडतात. अशा वितंडवादांचे,-समाजावर होणारे दुहीचे व पाठबळ कमी करणारे दुष्परिणाम त्यांस कळत नसल्यामुळें, वारंवार ही चूक त्यांचे हातून घडते. निर्विकार मनानें केवळ शास्त्रीयदृष्टी ठेवून संवादात्मक निरुप-द्रवी करमणुकीचा एक प्रकार म्हणून त्यांस ही गोष्ट करतां आली असती, तर हरकत नव्हती. पण मनाची ठेवण निराळी असल्यामुळें तसें घडत नाहीं. आणि वाद तर सुरू होतो. दंतकथा, पुराणांतील प्रक्षिप्त भाग व आक्षेपार्ह विधानें आणि ऐकलीं वाचलेलीं संस्कृत वचनें, हेंच उभयपक्षांचें भांडवल. तें संपुष्टांत आलें किंवा ज्याचें त्यावर उलटण्याचा रंग दिसूं लागला, म्हणजे

'शेषं कोपेन पूरयेत्' याचा साहाजिकच उभयतांकडून भरपूर आश्रय केला जातो. कारण योग्य अधिकारी विद्वानांजवळ बसून किंवा स्वतःशीही शांतमनानें वादविषयक प्रश्नाचा असा कोणीच कधीं विचार केला नसतो कीं शुद्धबीज शुद्धबीज म्हणून जें आपण जोरजोरानें म्हणत आहों. त्याचें स्वरूप तरी काय? हा जातिभेद खरोखरीच पहिल्यापासून मुळांतच भिन्नरक्तसंबंधामुळें अस्तित्वांत आला आहे, का व्यवहारांत कांहीं कारणाकारणांनीं घडत आलेल्या व कांहीं काल्पनिक व निव्वळ द्वेषपूर्ण अशा दोषारोपांनीं उत्पन्न झाला आहे? यांतील खरी गोष्ट कोणती? तें कोणालाच समजलेलें नसतें. कारण पिढीजात अभिमानाचा वाद चालू ठेवण्यास, साधारणपणें मुद्देसूद व सयुक्तिकपणाच्या माहितीपेक्षां वाडवडिलांच्या वागणुकींतील नुसती परंपराच अधिक उपयोगी पडते, व ती तर मुळांतच सकारण सुरू झालेली नसते. तथापि आग्रहानें व हट्टानें भांडायचेंच असलें, तरी वादविषयांतील जयापजय अवलंबून असणारी खरी गोम माहीत असली म्हणजे बाजू आंगावर उलटलीच, तर तें वादप्रकरण थट्टेवारी व हंसत हंसत वृथा विकोपाऐवजीं वास्तविक विनोदावर तरी न्यायला सांपडतें. म्हणून तिऱ्हाइताच्या निःपक्षपात दृष्टीनें थोडा आपल्याशींच त्यांनीं विचार करून पहावा.

जगांतील ख्रिस्ती, इस्लामी वगैरे सर्व धर्म,—बुद्ध, शीख व जैन धर्मसांप्रदायां प्रमाणें—आमच्याच व्यापक व सनातन धर्मापासून पुढें सुरू झाले व आम्हा सनातनीयांच्या अगोदर अन्य धर्मांच्या व अन्य वंशांच्या लोकांची भूतलावर मनुष्यवस्ती; सुद्धा नव्हती, असें आपण वैदिक धर्मानुयायी सनातनी, मोठ्या योग्य अभिमानानें म्हणत असतो व म्हणतांना आपल्या या सहजसिद्ध श्रेष्ठपणाबद्दल साहजिक आनंदही मानीत असतो. वेदांचा आपल्याजवळ पुरावाच असल्यामुळें आपल्याला तर आपली अभिमानोक्ति खरी वाटतेच, पण जगाचाही तसाच समज असल्याचें पाहून, एकप्रकारचें विशेष समाधानही होतें. हें सर्व ठीक आहे. पण या अभिमानोक्तींत निष्पन्न काय होतें, तें पाहिलें आहे का कुणी? **सर्व देशांतील, सर्व धर्मांतील सर्व माणसें, म्हणजे सनातनीयांचेंच विभागून विभागून विस्तारलेलें विश्वकुटुंब, हेंच नाहीं का ठरत?** आतां अशीच जातिसंस्था व असाच रोटीबेटीबंद व्यवहार चालू राहिला पाहिजे, मग याच्यापायीं मिळणारें स्वराज्य, होणारें एकीकरण व वाढणारा हिंदुधर्म, बुडाला तरी हरकत नाहीं, असें आग्रहाआग्रहानें म्हणणाऱ्यांच्या छातींत एकदम विजेचा धक्का बसण्यासारखेंच वरील अभिमानोक्तींत दिसून येणारें सत्य आहे, ही गोष्ट खरी; परंतु कोणाला घाबर-

ण्याचें कारण नाहीं. तसें जरी सिद्ध होत असलें, तरी तें मनांतल्या अगदीं खोल खोल आंतल्या आंगच्या कप्प्यांत लपवून ठेवावें. आणि विकारवशतेनें व पिढी-जात अभिमानपरंपरेनें भांडायचीच हौस असलेल्यांनीं, वेड पांघरुन अन्यजातीय मनुष्यालाच काय, पण प्रत्यक्ष पाठच्या भावाला देखील वाटल्यास त्याच्या शुद्ध बीजाविषयीं टोमणा मारून किंवा दुसरें कांहीं कुभांड रचून समाजाकडून त्यास एकदां प्रथम नुसता वाळींत टाकवावा; व मग तो तसाच वाळींत टाकलेला राहील, असा व्यूह रचावा म्हणजे कालांतरानें त्याच्या पुत्रपौत्रांची, गोवर्धन-पळशे, अशी एखादी निराळीच जात बनून चांगला सूडही उगविल्यासारखा होईल व हिंदुलोकांत जातींतून जाती कशा निर्माण झाल्या किंवा होतात, एकमेकांचा आधार तुटून त्या विस्कळित कशा होतात, व त्यामुळें संख्येनें हिंदु पुष्कळ असले, तरी निरानिराळ्या जातींचें एकमेकांस पाठबळ कसें मिळत नाहीं, व मग त्यामुळें भांडणांत हिंदुलोक अधिकाधिक नामर्द कसे होत जातात, याचा, जातींच्या अभ्यासकांस एक नमुना करून दाखविल्याचेंही—देखत किंवा पश्चात्—पण केव्हां तरी श्रेय मिळेल. तेव्हां स्वर्गांतील देवांनाही हेवा वाटेल!!! अशा या दुहेरी यशाचा नीट विचार करावा, आणि ठरवावें कीं, अज्ञानजन्य व निष्कारण कां असेना, पण अभिमानपरंपरा चालवून बंधुवर्गासह कालाच्या लाटेबरोबर गटं-गळ्या खात खात वाहवत जाणें होईल तिकडे नामशेष होण्यास आपण वाहवत जायचें कां मनःसंयम करून मर्दाप्रमाणें कुशल प्रतिक्रियेनें त्या काळलाटे-वर थोडातरी यथाशक्ति विजय मिळविण्याचा प्रयत्न करून **मनुष्यत्वाचा** पुरावा दाखल करायचा ? परंतु यांत तिऱ्हाईत कोण काय सांगणार ? हा ज्याचा त्याचा स्वतःच्या आवडीचा, निश्चयाचा आणि भावनेचा प्रश्न आहे, एवढें लक्षांत ठेवावें.

मित्रहो, तुम्हांला धर्माभिमान व समाजाभिमान तर आहेच आहे; त्यांत संश-यच नाहीं. परंतु तो व्यापक हिंदुत्वाचा व एकंदर हिंदुसमाजाचा जितका व जसा असावा तसा नाहीं. त्यांतील पोटभागांचा मात्र तसा आहे. या व्यापक व पृथकांबद्दलच्या अभिमानांत व प्रेमांत योग्य फिरवाफिरव अवश्य झाली पाहिजे. तुम्ही या पिढींतील लोक अजून कांहींसे सुखवस्तु आहां; आणि त्यामुळें ही रूढपरंपरा, अभिमान न सोडतां तुम्हांस तुमच्या अखेरीपर्यंत कशीबशी चालवायला सांपडेल हें खरें. पण तुमच्या पौत्रप्रपौत्रांची वाट काय ? त्यांच्या सुखाची नकोका कांहीं काळजी ? त्यांचेंही तुमच्याप्रमाणें अभिमानांत सुखानें व

स्वस्थतेनें आयुष्य जाईल, या भ्रमांत राहूं नका. जीवनकलहास विलक्षण तीव्र स्वरूप येत चाललें आहे. प्रत्येक उजाडणारा दिवस प्रत्येक बाबतींत मावळलेल्या दिवसास शांतिसुखाच्या दृष्टीनें बरा म्हणवीत आहे. अहंपणाचे व दुरभिमानाचे दिवस गेले. जुनेभोळे जग का आतां राहिलें आहे ? माझें ऐका, माझ्या पाया पडा, माझ्यावर प्रेम करा, असें आपली चालू योग्यता न दाखवितां मागील नुसता दाखला दाखवून म्हटलें, तर कोणी आतां ऐकेल का ? निरंकुशराजसत्ताच जवळ असती, तर न्यायानें नव्हेच, पण-आपण इंग्लिशांचे ऐकतों त्याप्रमाणें-भीतीनें तरी कोणी कांहीं काल ऐकलें असतें. पण तसें कांहींच नाहीं. सर्वजण एका माळेचेच मणी झालों आहों. अशा स्थितींत उपजत श्रेष्ठहीनत्वाच्या गृहकलहानें व भिन्नरक्ताच्या बागुलबोवानें सर्व हिंदुत्वाच्याच नाशास जर विशेष मदत होत असेल व हिंदुत्व तर जगाच्या पाठीवर टिकून राहिलेंच पाहिजे, अशीही जर खरोखर तीव्र स्वाभिमानी सदिच्छा असेल, तर प्रसंगाकडे पाहून व किंचित् पड खाऊन—' सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ' यांत दर्शित केल्याप्रमाणें, मूळचें वेदप्रणीत सनातनी हिंदुत्व तेवढें कायम ठेवून, बाकी वांडगुळाप्रमाणें अवास्तव वाढत गेलेल्या निरुपयोगी चालीरीतींच्या हिंदुत्वास फांटा द्यावा कीं काय ? द्यावा लागेल कीं काय ? देणें भाग पडेल कीं काय ? याचा विचार नको का व्हायला ? विचार तर झालाच पाहिजे; कारण आज परिस्थिति अशी आहे कीं, आर्थिक वगैरे इतर सर्व अडचणींची, अन्य धर्मियांप्रमाणे आपसांत नीटरीतीनें देवाण घेवाण करून तरतूद करतां येईल, पण गुणकर्मांऐवजीं जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरविणाऱ्या जातिसंस्थेंतील जातिद्वेषाचें बीज कायम ठेवणारा रोटी, **विशेषतः बेटीव्यवहाराचा अभाव** हा सांप्रतकाळीं कोणत्याही **महत्त्वाच्या प्रगतीच्या मार्गांतील दुर्लंघ्य हिमालय** होऊन बसला आहे, असेंच सर्वत्र आढळून येतें.

कोणी म्हणतात, मानव इथून तिथून एकच आहे. स्थल, काल व हवापाणी, यामुळेंच केवळ अवयवरचनेंत व रंगरूपांत फरक झाल्यानें-आर्यन केल्टिक असे-त्याचे निराळे वंश भासतात. तेव्हां जातींच्या निराळेपणाची तर गोष्टच बोलायला नको. कोणी म्हणतात, तशी कल्पना केली तरी दुसऱ्यांनीं आपल्या स्वतंत्र जन्मपरंपरेचा दुरभिमान सोडल्याशिवाय आम्ही तरी तसें कां करावें ? इतकें पुढें न जातां कोणी म्हणतात, सर्व जाति, निदान पोटजाती तरी बेटीव्यवहारानें मोडून आपल्याला अधिक सुसंघटित झालें पाहिजे. एरव्हीं या वाढत्या जीवनकलहांत

असें विस्कळित राहून यापुढें आपला हिंदु म्हणून निभाव लागेल, असें दिसत नाहीं, हें सत्य आहे. पण कांहीं केलें तरी हिंदूंत बेटीव्यवहार तर सुरू व्हायचा नाहीं आणि त्याशिवाय खरें सामाजिक ऐक्य तर साधायचें नाहीं, हेंही खरें आहे, अशी स्थिति आहे. कोणी म्हणतात, पूर्ण स्त्रीस्वातंत्र्य व एकच जात, अशी जेथें स्थिति आहे, तेथील लोकही गुलामगिरींतच नामर्दपणानें खितपत पडून आहेत. मग भलत्याच आशेनें आम्ही आपली स्वतंत्र जात तरी कां मोडावी ? कोणी म्हणतात, सर्वांचें उदार शिक्षण झाल्यावर, स्वराज्य हें सर्वांचेंच समान ध्येय होईल, आणि तसें झालें म्हणजे मग हल्लींचीच जातिसंस्था कायम राहिली तरी तिचें महत्त्व आपोआप कमी होऊन सामाजिक, राजकीय ऐक्य साधेल.

कोणी म्हणतात, श्रेष्ठपदप्राप्तीबद्दलची मनुष्याची स्वाभाविक लोभ वृत्ति लक्षांत घेतली, तर बेटीव्यवहाराशिवाय नुसत्या वरच्या शिक्षणानें सामाजिक व राजकीय ऐक्य साधेल, हें म्हणणें फोल आहे,असेंच दिसून येईल. कोणी म्हणतात, तें म्हणणें फोल ठरून आम्ही नामर्दच काय,पण नामशेष झालों तरी हरकत नाहीं, पण आम्ही आमच्यांतल्या पोटजातींशीं देखील कोणत्याही कारणांनीं एकदां सुटलेला रोटीबेटीव्यवहार कसल्याही आमिषाकरितां पुन्हां सुरू करण्यास मुळींच तयार होणार नाहीं.याच्या अगदीं उलट,दुसऱ्या टोंकाला जाऊन व जगांतलि वाटेल त्या धर्माच्या व जातीच्या पुरुषाशीं बिनदिक्कत लग्नें करणाऱ्या ब्रह्मी स्त्रिया, आपला ब्रह्मीसमाज अद्याप गुलामस्थितींतच पहात आहेत, हें माहीत असतां, हिंदुत्वाच्या अस्तित्वावरच तिलांजली घेऊन उठलेल्या अवैध व इतर अहिंदुसमाजाशींही हिंदूंनीं स्वाभिमान सोडून खुशाल विवाहविधींनीं एकजीव व्हावें व मुळीं विश्वधर्म पत्करावा, म्हणजे जगाशीं त्यांचा तंटाच संपून त्यांच्या हिताचा मार्ग त्यांस मोकळा होईल, असेंही कांहींचें म्हणणें आहे. तर पुन्हा दुसरे असें म्हणतात कीं, क्षुल्लक जातिनिष्टस्वाभिमानातिशय व व्यापक विशिष्ट मानववंशाभिमान-शून्यत्व, हीं दोन्हींहीं अंतिम टोकें, ज्याच्याकरितां तूर्त जिवाचें रान करून हाडांचीं काडें झालीं तरी झटायचें, त्या मुख्य हिंदुत्वाच्याच नाशास सारखीच कारण होणारीं असल्यामुळें, अजीबात सोडून सर्वश्रेष्ठ वैदिक संस्कृतीच्या रक्षणासाठीं समतातत्वावर जातींच्या एकीकरणाचा मार्ग धरावा. तो साधण्याकरितां प्रथम पोटजातींच्या एकीकरणापासून सुरवात करावी. व तेंही साध्य होण्यास अगोदर सहानुभूतींचीं संभाषणें व स्नेहसंवर्धक सहभोजनें आरंभावीं, म्हणजे ऐक्य-

वृद्धि होत राहून इष्ट हेतु साधेल. याप्रमाणें एक ना दोन ज्याला जें सुचेल तें तो बोलत आहे. तेव्हां प्रसंग जाणून मतामतांच्या या गलबल्यांत सर्वांचे म्हणण्याचा, व्यापक हिंदुत्वाची काळजी वाहणाऱ्या कार्यकर्त्या सुजाण जनतेनेंच अखेर एकमतानें युक्तिपूर्वक विचार केला पाहिजे, एरव्हीं गत्यंतर नाहीं. वैदिक संस्कृतीचा किंवा व्यापक हिंदुत्वाचा अभिमान कां धरायचा, आत्मौपम्य दृष्टीनें त्यांत जगांतील सर्वच मनुष्यांचें कल्याण कसें साधण्यासारखें आहे, **जातींच्या एकीकरणानें सुसंघटित न झाल्यास** अशा उच्च संस्कृतीचा व तिचा पुरस्कार करणाऱ्या सनातन हिंदुधर्माचा व हिंदूंचा नाश होण्याचा कसा संभव आहे, याची कल्पनाच नसल्यामुळें, एकमेकांना नानातऱ्हेचे दोष लावून परस्परांना धमकावीत ते विभक्तपणाच वाढवीत आहेत. वरिष्ठ कनिष्ठांच्या असंख्य जातींत हे भांडणाचे कैक प्रकार चालू आहेतच. शिवाय सर्वच वरिष्ठांना आणि विशेषतः ब्राह्मणांना, स्पृश्य होण्याविषयीं आतुर झालेल्या अस्पृश्यांचें असें म्हणणें आहे कीं, आजपर्यंत सत्तेच्या जोरावर तुम्ही आम्हांस पुष्कळ छळलेत; आतां आम्हांस एकदम स्पृश्य करा, नाहींतर आम्ही सत्याग्रहाची दंडेली करूं किंवा धर्मांतर करूं. वरिष्ठ म्हणतात, तुम्ही घाई न करितां व सामोपचारानें आणि आमच्या कलाकलानें न घ्याल, तर प्रकरण उलट जास्त चिडीस जाऊन तुम्ही अस्पृश्यतेंत असेच पडून रहाल, याद राखा. जणुं कांहीं ऐक्याची जरूर स्वतः कोणालाच नसून ते दोघेही फक्त दुसऱ्यांवर उपकार करण्याकरतां एकीच्या गोष्टी बोलत असतात. पण परिस्थिति अशी आहे कीं, बरोबर वाटत असलेलें आपलें म्हणणें बोलून दाखविणारांपैकीं ते समाजाकडून अमलांत आणण्याची कोणाचीच एकट्याची शक्ति नाहीं, व विचारस्वातंत्र्याचा फायदा घेऊन आपलेंच निरनिराळें म्हणणें दुरभिमानानें सर्वस्वीं खरें धरून स्वतंत्रपणें वाद माजवीत राहणाऱ्या हट्टी प्रजेचा तात्पुरता रोष सहन करूनही, शेवटीं कल्याणप्रद होणाऱ्या परिणामाकडे लक्ष देऊन अनेक कारणांनीं अस्तित्वांत असलेला जातिद्वेष व त्यामुळें दिसून येणारा नामर्दपणा, युक्तीनें व खुषीच्या सक्तीनें नाहींसा करून **सर्व हिंदूंत धार्मिक विधिनिषेधाचे बाबतींत एकच कडक शिस्त** उत्पन्न करणारा एखादा हिंदु जातीचा धीरोदात्त मिक्याडो अथवा केमलपाशा, हिंदुस्थानचें राज्ययंत्र चालवीत नाहीं. तेव्हां विद्वान्, समंजस व कळकळीच्या लोकनेत्यांनीं मनावर घेतल्याशिवाय प्रचलित जातिसंस्थेंतील–समाजांत नामर्दपणा उत्पन्न करणारीं–असलीं

कारणें नाहींशीं व्हावींत कशीं ? व हिंदुसमाज मनानें राहो, पण बहुसंख्य पाठ-बळाच्या भरंवशानें तरी आपल्या प्रचंड संख्येनुरूप समर्थ व्हावा कसा ?

सामान्य लोकोत्तर पुढारी, लोकसंग्रहास्तव लोकांत मिसळून, दृढमूल झालेल्या जुनाट दुष्ट रूढिबंधनांचे वगैरे बाबतींत, लोकांच्यापुढें फारतर एकदोन पावलेंच जाऊं शकतात. त्यांनीं सांगितलेलीं पथ्यकर कटु तत्वें, तोंडानें—बरोबर कबूल म्हणून—बोलून दाखविण्याइतपत लोकांना मान्य झालीं, तरी त्या तत्वांनुसार, लोकांचा दैनिक आचार करून सोडण्या इतपत त्या पुढाऱ्यांचा लोकोत्तरपणा मोठा नसतो; हें दुसऱ्या कैक पुढाऱ्यांचे मदतीनें श्रेष्ठ गांधिजींनीं चालविलेला सर्वमान्य असा यःकश्चित् अस्पृश्यता निवारणाचा अट्टाहास, व त्यांत त्यांना स्वतःला लाभलेलें यश, यावरून सहज दिसून येईल; तेव्हां उघड बोलून दाखविण्यास देखील ज्याची चोरी किंवा भीति वाटते, असा बेटीव्यवहाराचा हिमालय उल्लंघन होऊन खऱ्या समतेचें तत्व या विस्तीर्ण देशांत, आपसांत जन्माच्या श्रेष्ठहीनतेवर सतत भांडत राहणाऱ्या अनेक सांप्रदायी पंचवीस कोट सामान्य हिंदुजनतेच्या रोजच्या आचरणांत उतरण्याइतपत आंगवळणीं पडण्यास, एकतर अष्टपैलू बुद्धीचे पूज्य लोकमान्य किंवा विरक्त महात्मा गांधिजी यांच्यापेक्षांही लोकोत्तर व आकर्षक असून अनुयायांस अचुक मार्ग अनुसरण्यास सांगणारे कैक राष्ट्रपुरुष एकाच काळीं व एकामागून एक असे निर्माण व्हायला पाहिजेत. अथवा पुढील पिढ्यांतील सर्वसाधारण जनताच खरी उदार सुशिक्षित, शीलवान व उद्योन्मुख अशी झाली पाहिजे. किंवा जिव्हाळ्याच्या व फार प्रबल व कुशल अशा तडफदार राजसत्तेनें तरी तसें करण्याचें मनांत आणलें पाहिजे तरच तें होईल, हें उघड आहे. पण असें कांहीं किंवा एकसमयावच्छेदें हें सर्वही होईल त्याच वेळीं हिंदूंच्या प्रचंड संख्येचा—जमावानें उत्पन्न होणाऱ्या पाठबळाचा—फायदा तरी त्यांच्यांतील झुंजार लोकांना मिळू लागून त्या झुंजणाऱ्यांच्या यशामुळें मग सर्व हिंदु तेवढ्यापुरतें मर्द ठरूं लागतील.

सुखस्वातंत्र्याचें मंदीर गांठण्याकरतां कोणती खटपट आधीं केली पाहिजे, तें ठरविण्याकरितां केलेला—आधीं राजकीय का आधीं सामाजिक—हा शाब्दिक वाद, वादेवादे निघणारा तत्वबोध जनतेला समजल्यानें हल्लीं मागें पडला आहे. आधीं राजकीय म्हणणारा पक्ष विजयानें जोरांत कांहींसा प्रथम पुढें सरकला खरा, पण त्याहून आणखी पुढें प्रगति करतांना, कल्पनातीत अनेक अडचणींचे डोंगर दिसूं लागतांच, त्याला असें स्पष्ट कळून चुकलें, कीं सामाजिकालाधिकारून व

असें मागें टाकून आपल्याला आतां एक पाऊलही नीटपणें पुढें टाकतां येणार नाहीं. सामाजिकालाही स्वानुभवानें पुरें समजलें कीं, राजकीयाची पर्वा न बाळगतां निराळ्या दिशेनें स्वतंत्रपणें एकाकी पुढें जायचें ठरविल्यास, आपल्याला कोणीच जुमानणार नाहीं. दूर परदेशीं गेलेल्या स्थानिक प्रतिस्पर्ध्यां-प्रमाणें त्यांची परिस्थितीच्या प्रभावानें अशी परभारें समजूत घातल्यावर, आतां—अजून मर्यादित अंतर राखूनच—किंचित् आगेमागें एकमेकांच्या सहानुभूतीची अपेक्षा करित तें पुढें सरकण्याचा विचार चालवीत आहेत. पूर्णपणें दिलजमाईनें अद्याप त्यांनीं एकमेकांच्या हातांत हात घातला नाहीं. परंतु इतपत तरी जवळ जवळ चालण्याची सुबुद्धि त्यांना बाहेरच्या दाबानेंच झाली. त्यांना होऊन आपोआप सुचली नाहीं. दुसऱ्यानें नाक दाबल्याशिवाय आपण होऊन तोंड उघडायचें नाहीं या वृत्तीमुळें धर्मानें एक असले, तरी रोटीबेटीव्यवहाराच्या बाजूनें हल्ला चढविण्यास हिंदु अजून विस्कळित व असुरक्षित आहेत, असें पाहून, शक्य तितकें अधिक दिवस अधिक राज्यसूत्रें हातीं ठेऊं इच्छिणारे कावेबाज, कंजुष व अंशतः न्यायीसरकार म्हणूं लागले कीं, तुम्हांस—तुम्ही पात्रता प्रकट करित जाल, त्या मानानें—स्वराज्याचे हक्क द्यावयाचे आहेत खरे. पण प्रजाजन या दृष्टीनें आम्हांला सर्व सारखेंच, हें तत्व विसरून ते देत गेल्यास, तुमच्यांतील सुशिक्षित असलेल्या पुढारलेल्यांच्याच पदरांत ते जास्त पडतील व अगोदरच मागसलेले कायमचेच अधिक मागें राहतील, सबब, आम्हांला त्यांची काळजी घेतलीच पाहिजे. रोग्याकडून काढतां येईल तेवढा पैसा अनेकरूपानें पुष्कळ दिवस काढून घेण्यास सांपडावा, म्हणून एखादा वैद्य ज्याप्रमाणें औषधपाणी देण्याची खुबीदार योजना करतो, त्याप्रमाणें नोकरशाहीनें, हक्कदानाचे बाबतींत अशी कुशल कारवाई चालू केली कीं, दाता-उदक सोडल्याप्रमाणें दान करण्यास तयार आहे. याचकच आपसांत भांडत राहून कोणालाच एकमतानें हात पुढें करूं देत नाहींत. तेव्हां प्रजाजनांतील कलहबुद्धि संपेपर्यंत सरकारला स्वतः राज्ययंत्र चालवीत राहणें, भागच आहे, असेंच कोणीही म्हणावें. दातृत्वाची अशी योजना ठरवून, ती अमलांत आणतांच नोकरशाहीच्या अदमासाप्रमाणें, हिंदुलोकांत ब्राह्मणेतरवादानें जातिवैमनस्य अधिकच चेकाळलें. व हक्कदानाच्या याच कारवाईनें धर्मवेडचा मुसलमानांस आपलें संख्याबल त्वरित वाढविण्याची अनिवार इच्छा होऊन विस्कळित, हिंदु-समाजावर त्यांचें भयंकर आक्रमण सुरू झालें. अशा रीतीनें कात्रींत सांपडून

भराभर कातरले जाऊं लागले, त्यावेळीं कोठें हिंदूंना अधिक ऐक्याची जाणीव भासूं लागली, आणि हिंदुत्व टिकून राहण्याचीही शंका येऊं लागली. तेव्हां पुढे साहजिकच सर्व हिंदूंची एकी कशी होईल, हिंदुत्व कसें राहील, हिंदुसंख्या कशी वाढेल, व अधिक हक्क लवकर कसे पदरांत पडतील, याविषयीं त्यांच्यांत खल सुरू झाले. वादविवादाअंतीं या सर्व गोष्टी साधण्यास शुद्धि-संघटनाचा उपाय, एकमतानें नाहींच पण बऱ्याचशा बहुमतानें सर्वमान्य होऊं लागला. पैकीं शुद्धि हा उपाय हिंदूंची आहे. ही संख्या टिकवून ती थोडी-बहुत वाढविण्यासही बराच उपयोगी पडेल, असा अनुभव येत आहे. परंतु चालू संघटनानें मात्र अपेक्षेप्रमाणें सार्वजनिक ऐक्य पूर्णपणें घडून येईल, असा रंग दिसत नाहीं. जात्यावर बसलें म्हणजे ओंई सुचते, पण दळणारा नवशिका असल्यास म्हणायची कशी, याची त्याला पंचाईतच पडते. त्याप्रमाणें अडचणी उपस्थित होऊन काम करूं लागल्याबरोबर लोकांना शुद्धिसंघटनाचा उत्तम उपाय सुचला खरा, पण त्यापासून अपेक्षित फलप्राप्ति कशी आणि कोणत्यामार्गानें पदरांत पाडून घ्यावी, याची मात्र त्यांना आतां काळजीच पडली आहे. कारण काळजी वाटण्यासारख्या अडचणींचा तसाच मोठा हिमालय पुढें आपला दत्त म्हणून उभा राहिलेला दिसत असल्यामुळें, प्रगति व्हावी तशी होत नाहीं. त्या चळवळींतील जाणत्या कार्यकर्त्यांच्या आतां पुरतें लक्षांत आलें आहे कीं, आपण कितीही जरी समतेचे बोल बोललों व वरवर कितीही समतेनें वागलों, तरी **जन्मानेंच मी श्रेष्ठ व जन्मानेंच तूं कनिष्ठ हें मुख्य शल्य** परस्परांशीं वागतांना सर्व हिंदूंच्या डोक्यांतून केव्हांतरी **साफ गेल्याशिवाय** व जाऊन निःशंकपणें आचरणांत उतरल्याशिवाय, जन्मायत्त समतेचें खरें ऐक्य संभवणारच नाहीं. मनांतून हें **जन्मासंबंधीं किल्मिष** नाहींसें होणें म्हणजेच जातींचें खरें एकीकरण अथवा संघटन होणें. कृति करण्यास तयार न होतां, व्यापक हिंदुधर्माच्या समतेचे नुसते गोडवे गाणाऱ्यांची **डोकीं** गोऱ्या कुंभाराच्या तडाक्यांत सापडल्यास तो थापटून **कच्ची मडकींच** ठरवील. खरें एकीकरण व संघटन झालें म्हणजे जुने लोक वाटविटाळ कशाला म्हणत असत, तें नवीन लोकांना समजावून सांगितलें तरी समजेल किंवा नाहीं, कोण जाणे ! खाण्यापिण्यानें होणाऱ्या भ्रष्टीकरणाची अंधुक कल्पना त्यांस पुस्तकें वाचून काय होईल तेवढीच; आणि जातवारीनें मिळणाऱ्या हक्कांच्या कण्या टिपायला जाणाऱ्या लोकांविषयीं ते त्या वेळेपर्यंत पूर्ण मनुष्यत्व पावले नसावेत, अशीच त्यांस

शंका येईल. जन्मायत्त श्रेष्ठहीनतेचें कल्पित काव्य विसरलें गेलें म्हणजे, असें सर्व होईल, हें ते कार्यकर्ते जाणून आहेत; पण करतात काय? अज्ञजन, तेंच कवन गुणगुणत असतांना व कांहीं जाणते दुरभिमानी आणि शत्रु, त्यांना गुणगुणा-यला लावीत असतांना, तें विसरलें जातें कसें? व हा जातिसंस्थेचा दुर्लंघ्य हिमालय उल्लंघन होतो कसा? याला मार्ग तरी कोणता? कार्यकर्त्यांना दृर्त मोठा पेंच पडलाय तो हाच. मार्ग अतिशय बिकट तर खराच; पण मार्गच नाहीं असें मात्र नाहीं. आक्रमितां येण्यासारखी ज्याची परिस्थिति असेल, त्याची **मार्ग** आहे, अशाबद्दल खात्री तरी पटावितां येईल; मग कोणी त्या मार्गाचें आक्रमण करो वा न करो. तेव्हां ज्या कोणाला अशा या मनःशुद्धीच्या एका पण खात्रीच्या घाटानें त्या दुर्गम पर्वतावर आरोहण करतां येण्यासारखें असेल, त्यानें शांत. शुद्ध व प्रसन्न मन असेल तेव्हां त्यालाच पुढील प्रश्न नम्रपणानें विचारावे. हे ज्ञानी आणि समर्थ मना, जिज्ञासेनें आग्रह केल्यास तुला पुष्कळ ठिकाणचा आणि पुष्कळ मागील काळचा इतिहास माहीत करून घेतां येतो, तेव्हां सांग वरें? हिंदुलोकांनीं आपली प्रचलित जातिसंस्था मोडली राखली, किंवा आणखी वाढविली, तरी त्याचे काय बरे वाईट परिणाम होणार असतील ते होवोत. कालाच्या उदरांतील त्या गुप्त भविष्याची परिस्फुटता पूर्ण दिवस भरण्याच्या अगोदर आजच करण्यास मी तुला भीड घालीत नाहीं पण जातींचें एकीकरण करावें कीं न करावें, करणें युक्त किंवा अयुक्त, व एकीकरण म्हणजे पूर्वी एकदां एकच असलेल्या मानवजातींचें केवळ पुनर्मीलन का प्रथमपासूनच निरानिराळ्या बीज कोशांतून पृथक्पणें निर्माण झालेल्या **विजातीय** प्राण्यांचें मूर्खपणानें होणारें पहिलेंच **अनैसर्गिक** संयोगीभवन यासंबंधानें जो वाद चालू आहे, त्यांतील साररहस्य काय? वेदकालीन ब्राह्मण निवृत्तमांसच होते का? असले किंवा नसले तरी कालेंकरून स्वतःच्या शुद्ध आचरणानें पवित्र व जैनांच्या सदय सहवासानें, दृश्य प्राणिमात्रांविषयीं विशेष दयाशील बनलेल्या आजकालच्या ब्राह्मणांनीं पुन्हां निर्दय व किळसवाण्या मांसाशनास कशाही कारितां जाणून बुजून प्रवृत्त व्हावें काय? क्रूर लोकांशीं प्रसंग असल्यामुळें त्यांचें आक्रमण थांबविण्यास क्रूरच का बनलें पाहिजे? क्रौर्याशिवाय अन्य गुणांनीं नाहींका क्रौर्याचा प्रतिकार होणार? मांसाशनाशिवाय क्रौर्य संभवतें किंवा नाहीं? शरीराला ताकद आणि मनाला हिम्मत यांची प्राप्ति झाल्यास क्रौर्याचा प्रतिकार होईल किंवा नाहीं? का वनस्पत्याहारी हत्ती जरी देहानें कितीही मोठा व बळकट

झाला, तरीं मांसाहारी लहानशा क्रूर सिंहाशीं गांठ पडतांचें उन्मत्त स्थितींतही मलूलच पडायचा, त्याप्रमाणें शाकाहारी मनुष्य शरीरानें व मनानें आपल्याप्रमाणेंच परी कसाही तयार झाला, तरी क्रूर मांसभक्षक मनुष्यांशीं चिडीची मारामारी करतांना तो निष्ठुरपणांत तरी कमी पडल्यानें अखेर नामोहरमच व्हायचा ? तसें असेल तर ही आपत्ति टळावी तरी कशी ? हिंदूंत शेकडा नव्याण्णवहून अधिक लोक मांसाहारी आहेत; ते नाहीं का त्यांच्यांतल्या थोड्याशा शाकाहारी लोकांस संभाळून घेणार ? का सत्यसमाजिष्ट व ब्राह्मणेतर यांचें प्रस्तुतचें वर्तन, हेंच त्याचें उत्तर ? तर मग या अपायाला उपाय तरी कोणता ? वितुष्ट वाढविणारी व्यर्थ बाचाबाच न करितां या बाबतींत होणार तें होऊं द्यावें काय ? आर्यांत आर्येतर माणसेंही विवाहांनीं मागेंच मिसळून गेलीं असून अनुलोम प्रतिलोम विवाहाचीही चाल पूर्वीं होती, हें जर खरें असेल, तर जातींचें निर्भेळ निराळें रक्त संभवतें तरी कसें ? प्राचीन हिंदुसंस्कृतीनें स्वतःस हिंदु म्हणवून घेणारे लोक या हिंदुस्थानांत रहायला हवे असल्यामुळें जातींच्या एकीकरणाची जर विशेष अवश्यकताच आहे, तर हिंदूंतल्या हिंदूंत हिमतीनें स्वतःच्या जबाबदारीवर मिश्रविवाह करणाऱ्यांस--तुम्ही एक नवीनच जात काढतां--म्हणून दोष देणें वाजवी होईल, का याच एका जातींत पुढें सर्व जाती मिळतील--असें म्हणून त्यांना उत्तेजन देणें रास्त होईल ? सांप्रत हिंदूंमध्यें ज्या एवढ्या अठरा नव्हे अठराशें पगड जाती झाल्या आहेत व ज्या उत्तरोत्तर एकमेकांशी अधिक भांडूं लागल्या आहेत, **त्या प्रत्येक जातीचीं कांहीं जोडपीं, सृष्ट्युत्पत्तीच्या वेळींच आकाशांतून पृथक्पणें खालीं पडलीं किंवा जमीनींतून भूलिंगांप्रमाणें वर येऊन स्वतंत्रपणें वाढीस लागलीं** असें समजायचें काय ? या प्रश्नांचीं उत्तरें--उत्तरेंच फक्त--आणि तीही सवडीनें पूर्वग्रहदूषित नसलेल्या हे निष्कलंक, निर्विकार व शांत आणि ज्ञानी मना, तुझ्याशिवाय कोण देण्यास समर्थ आहे ?

वाचकहो रागाऊं नका. कोणताही भला मनुष्य कधींही कोणास भलतेंसलतें करण्यास सांगत नाही आणि गैरसमजानें त्यानें सांगितलेंच तर त्याचें कोणी ऐकतही नाहीं. ही प्रश्नावली म्हणजे पोटजातींच्या एकीकरणाच्या कोल्ह्याच्या शिकारीस कोणीही निर्भयपणानें तयार व्हावें म्हणून प्रसंग पडल्यास सर्व जातींच्या एकीकरणाच्या वाघाच्या शिकारीचीही तयारी सज्ज आहे, याची त्यास खात्री पटविण्याकरतां आहे. **हिंदूंची संघटना झाल्याशिवाय** राजकारणांत प्रगति व्हायची नाहीं, **जातींचें एकीकरण झाल्याशिवाय** खरें संघटन होणार नाहीं व मनांतील

**अग्नीपत्त श्रेष्ठकनिष्ठपणाचा किंतु नाहींसा होऊन**, बंधुप्रेमानें समतेच्या तत्त्वांवर धार्मिक, सामाजीक बाबतींत **ते वागूं लागल्याशिवाय** जातींचें किंवा पोटजातींचेंही एकीकरण होणें नाहीं, ही विचारसरणी पटत असूनही 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं ' असें आचरण घडत नसलें तरी **ध्येयदृष्टि तरी शुद्ध असावी हें खरें ना?** मग सत्यनिष्कर्षाकरितां, वरील प्रश्नांना मिळणाऱ्या उलटसुलट उत्तरांचा समतोल चिकित्सक दृष्टीनें आपल्या मनाशीं मेळ तरी नको का घालायला? का तूर्त आहे या फायदेशीर स्थितींत पालट करणारें सत्य उघडकीस येऊन त्याचा समाजाकडून स्वीकार झाल्यास विजय होईल व आजच हातचे गमावून बसावें लागेल म्हणूनच मुद्दाम डोळ्यांवर कातडें ओढून जें होईल तें होऊं द्यायचें, किंवा उलट त्या सत्यनिष्कर्षास चकवून शक्य तो प्रतिकार करायचा असें मनांत आहे? मला नाहीं वाटत कोणी सुशिक्षित कोंडलें न जाणाऱ्या सर्वगामी सत्यालाच असें कोंडून ठेवण्यास तयार होतीलसे?

पुष्कळशा लोकांना या विस्तीर्ण जगाच्या विविधतेची यथार्थ कल्पनाच नसल्यामुळें वस्तुस्थितींत फेरबदल करणारे असले प्रश्नच मुळीं आचरटपणाचे वाटत असल्यानें विचारांतच घ्यावेसे वाटत नाहींत. कांहींना त्यांचीं बरोबर उत्तरेंही सुचतात, पण बोलवत नाहींत, कांहींना बोलवतात, पण सामाजिक बहिष्काराच्या भीतीनें आचरणांत आणवत नाहींत आणि कित्येकांना तर सर्व गोष्टींची अनुकूलता असतांनाही शिंगें मोडून वासरांत शिरल्याशिवाय राहवत नाहीं. बरें, हिंदु मधील जातिवैमनस्य संपून ते आपल्याला प्रबल प्रतिस्पर्धी व्हावेत, असें शत्रूंना कधीं वाटतच नाहीं. उद्यां तुम्ही आपण होऊन जाती मोडून खरोखरीच एक व्हायला लागलेत तर तें न पाहवून तुमचीं-आपसांत एकमेकांना भेदनीतीनें चिथवून ते हरतऱ्हेनें भांडणें लावून देण्याचा प्रयत्न करतील व आपण पुन्हां बकमुनीप्रमाणें उलट तटस्थ राहण्याचाही देखावा दाखवितील अथवा नक्राश्रु ढाळीत भांडणें सोडवायला येण्याचेंही सोंग आणतील किंवा कोणाचा कैवार घेऊन लांडग्याप्रमाणें त्याच्या मदतीलाही धांवतील. पण हें सर्व सहज लीलेनें वरवर करतांना भांडणाऱ्यांची एकी न होतां त्यांच्यांत दुहीचें बीज कसें जीव धरील, एवढ्याच गोष्टीला खरोखर मनापासून जपतील. तेव्हां अशा कैक विरोधी गोष्टी असतांना हातून यशस्वी प्रयत्न न झाल्यामुळें-हिंदु एक झाले पाहिजेत-असें आपण तोंडानेंच नुसतें बोलत रहावें, हेंच स्वाभाविक. या दृष्टीनें विचार केल्यास, योगायोगानें उगाच रूढ होऊन विलक्षण वाढीस लागलेलें रोटीबेटीव्यवहाराच्या

अभावाचें हें कारण, हिंदूंना त्यांच्या विस्कळित धर्मबंधूंकडून योग्य पाठबळ न मिळूं देणारें असल्यानें त्यांस नामर्द बनविण्यांत बरेंच महत्त्वाचें असावें, असा नुसता अजून संशय सुद्धां नाहीं का येत?

चुटकीसरसें तें कारण नाहींसें होईल किंवा होण्यासारखें आहे, असें कोणाचेंच म्हणणें नाहीं. समाजांत राहूनच सर्व लोकांची हळुहळु समजूत घालून सामुदायिक प्रगति करणें, लोकांशीं फटकून राहून सडेतोड भाषणानें व कृतीनें समाजाचे दोष दाखविणें, नाटक कादंबऱ्यांच्या रूपानें निरनिराळीं सामाजिक दृश्यें दाखवून लोकांची सुप्त नवविचारशक्ति जागृत करणें, विनोदी व विक्षिप्त वर्तनानें व लेखनानें त्यांना हांसवीत खेळवीत त्यांच्या मनांत निरनिराळे कल्पनातरंग उठाविणें किंवा सरकारी कायद्याच्या आधारानें त्यांना रूढ चाली समजुती सोडायला लावणें, असे लोकमतांत बदल करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांपैकीं ज्याला जो झेपण्यासारखा असेल, तोच त्यानें करावा. विद्वत्ता, अधिकार, संपत्ति, चातुर्य व मनुष्यबळ यांपैकीं कांहींच जवळ नसून नुसती थोडीशी इच्छा असलेल्यांनीं मात्र आपली कुवत ओळखून या भरीस पडूं नये, हेंच चांगलें. कारण आवांक्याबाहेरील काम आंगावर घेणाऱ्याचें हंसूं तर होतेंच, पण कार्यहानीहि होते. हिंदुसंस्कृतीचे पूर्ण अभिमानी आणि मराठी भाषेचे केवळ शिवाजी अशा कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या तीक्ष्ण लेखणीनें विलायती चोंचल्यांनीं चवचाल व स्वाभिमानशून्य बनत जाणाऱ्यांचे आणि देवभोळ्या मूर्ख समजुतींनीं भ्रमिष्ठ व दुरभिमानी होत जाणाऱ्यांचे बरोबरच कान टोंचून लोकमत समतोल राखण्याचा प्रयत्न अगदीं योग्यवेळीं केला. व तो त्यांस साधला. त्यांची योग्यताच तशी होती. त्याचप्रमाणें मागसलेल्या आणि पुढारलेल्या अशा दोनही प्रकारच्या लोकांना आपल्या प्रेमळ व खुबीदार वागणुकीनें मी सर्वस्वीं तुमचा आणि तुमच्यांतलाच आहे, असें एकीकडे भासवीत असतांनाच सरकारी रोषास व वरचेवर झालेल्या कारागारांतील हालअपेष्टांस न जुमानतां, नित्य नव्या जोमानें आपल्या असाधारण राजकारणकुशलतेनें, सत्वसंरक्षक बाब म्हणून प्रथम राजकीय बाबतींत व वात्सल्यप्रेमानें लिहिलेल्या अगाध विद्वत्तादर्शक व्यापक विचारांच्या संशोधक ग्रंथलेखनानें मग सामाजिक बाबतींत त्यांचेकडून सावकाश पण एक एक सामुदायिक निश्चयाचें विराट पाऊल अंधश्रद्धेवर टाकविणारे श्रेष्ठ लोकमान्य काय, किंवा जननिंदेची व स्वतःच्या स्वास्थ्याची यत्किंचितही पर्वा न करितां अगदीं अंतःकरणपूर्वक कळक-

ळींच्या ममत्वबुद्धीनेंच पण तितक्याच कठोरपणानें, दादाबाबा करून न उठ-विता डोळ्यांत झणझणीत अंजन घातल्याप्रमाणें हाय हाय करीत खडबडून जागे करणाऱ्या स्पष्ट शब्दांनीं कोणाची भीडमुर्वत न धरितां लोकांच्या तोंडावर त्यांचे दोष बोलून दाखवून व स्वतःच्या वर्तनानें रूढींच्या कुजत्या कोंडीला प्रथम झटक्यासरसें तोंड पाडून प्रतिस्पर्ध्यांसही खुशाल वाट मोकळी करून देणारे वंदनीय वीर आगरकर काय, अशीं क्वचित् उत्पन्न होणारीं माणसें म्हणजे खरोखर 'साधवो नहि सर्वत्र' अशा कोटीपैकींच खरी. सर्वांनाच त्यांच्यासारखें कसें साधेल ? गोष्ट खरी आहे. न साधो. आपल्या वाट चुकलेल्या पण आवडत्या समाजांत राहणें भाग आहे म्हणून सामान्यांनीं पुढारीपणानें अशीं कृत्यें करण्यापासून फार तर स्वतः अलिप्त असावें परंतु हिंदुत्व न सोडतां रूढींच्या कक्षेबाहेर हिंमतीनें पडणाऱ्यांचा **मुद्दाम जातीनिशीं छल करण्यास तरी** अज्ञजनांत—त्यांच्यांकडून शाबासकी मिळविण्यासाठीं-सामील होऊन गुन्ह्याला मदत करूं नये. एवढेंच करण्यास तर हरकत नाहींना ? नाहींतर एकीकडे जातींच्या एकीकरणाच्या गोष्टी पण बोलायच्या आणि कोणी भिन्न जातीच्या कुमारि-केशीं विवाह केल्याचें दिसून आलें कीं, इष्टापत्ति समजून स्वस्थ न बसतां समा-जाला आजच एवढी उडी झेंपायची नाहीं, गोंधळ उडेल, म्हणून आपणच समा-जाला चेष्टावून द्यायचा व पुढारीपणांत पुन्हां धर्ममार्तंडही बनूं पाहायचें. यांत एकीकरणाची खरी इच्छा व्यक्त होत नसून मूर्ख दांभिकागिरीच उघड होते असें त्या नूतन विवाहित जोडप्याला वाटल्यास नवल काय ? हिंदूंचीच काय, पण अखिल मानवजातीचीच उत्पत्ति मुळांत कशी झाली, कोठें झाली, कधीं कोणापासून कसकशी झाली, या मानवी जन्मपरंपरेविषयीं निश्चयात्मक असें अद्याप कांहींच कोणाला सांगतां येत नाहीं, आणि असें असून त्यांचे निरनिराळे वंश, जाति, पोटजाति, मात्र एकमेकांस उच्चहीन ठरवून आपआपलें कल्पित निराळें रक्तबीज शुद्ध ठेवण्यासाठीं अगदीं हमरीतुमरीवर येऊन आपआपल्या-परी विचारे मोठ्या अभिमानानें परस्परांशीं प्राणपणानें झगडत आहेत. कोण हें अज्ञान ? हीनसंस्कृतीच्या शत्रूबरोबर प्राणपणानें झगडण्यासारखें त्यांना कांहीं दिसतच नाहीं. तेव्हां करमणूक म्हणून ते याच क्षुल्लक कारणावरून आपसांत भांडत असतात झालें. जरा तटस्थवृत्तीनें पाहिलें तर ही एक गम्मतच दिसते. मागील काळांत वेळीं अवेळीं त्यांच्या समजुतीप्रमाणें असलेल्या भिन्न भिन्न वंशांची व जातींची त्यांच्यांत निःसंशय मिसळ झालेली आहे, अशी इतिहासानें

सप्रमाण साक्ष दिलीच, तर ती नाइलाजानें कबूल करूनही-तें कांहींही असो, दृष्टिआड सृष्टि-असें म्हणत, आज आहे तें खरें व तेंच बरें, असें वर्तन ठेवण्याकडे त्यांचा सर्वांचाच स्वाभाविकपणें सर्वसाधारण असा ठराविक कल असतो. पण सदासर्वदा सर्व बाबतींत अगदीं सहजासहजीं चटकन हटकून बदलणारा, किंवा कधींही कांहीं केलें तरी मुळींच न बदलणारा, असा कोणताच ठामठाकरी हेका किंवा कल असणें, नेहमींच उपकारक ठरत नाहीं व आज बिकट परिस्थिति ओढवल्यानें संख्या वाढवून, शिवाय जिव्हाळ्याचें पाठबळही वाढविण्याची तीव्र अवश्यकता फारच भासत असल्यामुळें, या जन्मायत्त श्रेष्ठकनिष्ठपणाच्या कलहकारक जातिबंधनांचे बाबतींत तर ' किं कर्म किमकर्मेति ' अशी आपल्या समाजाची अवस्था झाली असून तो दिङ्मूढ झाला आहे. तेव्हां सावकास का होईना, पण या कलालाच हळुहळु पथ्यकर अशी कलाटणी देण्याची कांहीं युक्ति आपल्याला सुचली तर पाहूं. म्हणजे कदाचित् त्यायोगानें, हिंदूंतील मांसाहारी व निरपवाद शाकाहारी, यांच्यांत विनाकारण झालेल्या अनेक पोटजातींचे तरी एकीकरण होऊन, **मांसाहारी व शाकाहारी असे दोनच मोठे समूह** तूर्त हिंदु या समान भूमिकेवर शिल्लक राहतील. **आहाराशिवाय इतर गोष्टींत त्यायोगानें त्यांच्यांत ऐक्य व समता उत्पन्न होईल, अशीच धार्मिक व सामाजिक वागणूक ठेवतां आल्यास,** जन्मायत्त उच्चनीचपणा मानण्याची समजूत व वृत्ति पुष्कळ लोप पावून त्यांच्यांत अधिक खरें जिव्हाळ्याचें व आप्तपणाचें नातें उत्पन्न होईल. व अशारीतीनें मत्सरगर्भ जातिसंस्थेची धार बोथटून या वाढलेल्या पाठबळाची जाणीव होऊन, हिंदु तितकाच अधिक वीरपणानें आपल्या व्यवहारांत वागूं लागेल, नाहीं का ?

अलीकडे कांहींशा उत्साहानें सुरू झालेल्या शुद्धि चळवळीचा तरी, हिंदूंची घटत चाललेली संख्या थांबवून ती उलट जास्त वाढविणें, व भावी बहुमतानुसारी लोकसत्तेंत समाज बहुसंख्य व जोरकस करणें आणि हिंदुत्व राखणें, हाच मुख्य कार्योद्देश आहेना ? ठीक आहे. पण तो उद्देश, शुद्धिसंस्कार होईल त्या ठिकाणीं, लगेच अन्नोदक व्यवहारांनीं, व पुढें जरूर पडेल तेव्हां मिश्रविवाहांनीं, तीं शुद्धिकृत माणसें आत्मसात् करून घेण्यास नेहमीं तयार असलेलीं कांहीं माणसें उघडरीतीनें पुढें येऊं लागल्याशिवाय, किंवा हिंदूंतील एक स्वतंत्र जात म्हणून तरी तीं तशी खुषीनें राहूं लागल्याशिवाय; चांगला साधणार नाहीं व तिच्याच बरोबरची संघटनेची चळवळही त्याच कारणास्तव चांगला जोर धर-

णार नाहीं. तसेंच शुद्धीनें वाढविलेल्या या नवीन हिंदुसंख्येच्या पाठबळाचा फायदाही एरव्हीं झुंझार हिंदूंना चांगलासा मिळणार नाहीं, किंवा त्या शुद्धिकृतांनाही त्रिशंकुप्रमाणें अशा निराधार लोंबकळत स्थितींत फार दिवस सुखानें सुरक्षित स्थितींत राहतां येणार नाहीं. पाहुण्याला सोबत म्हणून अगत्यानें आपल्या घरीं बोलवायचा, व तो आल्यावर त्यास घराबाहेर वेस्कटीच्या आसपास कोठें तरी वळचणीला अडीअडचणींत उभे राहावला सांगायचें, अशापैकींच त्यांचा पाहुणचार होणार, नाहीं का ?

अस्पृश्यांची नित्याची केविलवाणी स्थिति डोळ्यांसमोर असतांना,—हौसेनें शुद्धिकृत होऊन हिंदुधर्मांत परत येण्यास मनांत असलें तरी—कोणते धूर्त लोक अहमहमिकेनें अशा स्थितींत धजावणार ? मुसलमानांतही अस्सल मूळजात आणि मायदेश यांबद्दलच्या फाजिल अस्सलपणाच्या अहंकारानें, कांहीं वरकर्मी जाती झाल्या असल्या, तरी एकंदरींत, त्यांच्या जन्मसंबंधीं व धर्मविषयक लवचिक भावनेमुळें, हिंदूंना बाटविल्यावर तीं बाटलेलीं माणसें लग्नविधीनें मुसलमान समाजांत समाविष्ट करून घेण्याचें त्यांच्या मनांत आलें, म्हणजे तसें करण्यास त्यांना त्यांच्या धर्मशास्त्राची, चालीरीतींची वा समाजाची आडकांठी न झाल्यानें मुळींच पंचाईत पडत नाहीं. आणि आपल्यांत केवळ जन्मानेंच निरनिराळी उच्चनीच जात ठरत असल्यामुळें, बाटून एकप्रकारें मृत झालेल्यास त्यानें पुनर्जन्मानें गर्भांतून आल्याशिवाय, कसा कोणत्या जातींत घ्यायचा ? तसेंच मूळची हिंदुजात विसरलेल्यास व जन्मतः विधर्मी असलेल्या शुद्धिकृतास कोणत्या जातींत घ्यायचा, याचा मोठा विचार पडतो. अर्थात् यामुळें शुद्धिचळवळीची झपाट्यानें प्रगति होत नाहीं. आपलीं सनातन धर्मतत्त्वें एरव्हीं अतिशय व्यापक व कोणालाही जुलमलालुच या साधनांशिवाय पटावीं अशीं आहेत. पण **सहज कलहसंभव अशी ही जन्मायत्त श्रेष्ठकनिष्ठपणाबद्दलची प्रचलित चुकीची समजूतच** आजमितीस आपल्या जातिसंस्थेचे **मुख्य वैशिष्ट्य होऊन बसली** आहे; व तेंच वैशिष्ट्य जातींतील संख्या कमी करतें, पण वाढवीत नाहीं. आणि विस्कळितपणा व वैमनस्य वाढवितें, पण पाठबळ मात्र कमी करतें. म्हणून पूर्वी जरी या वैशिष्ट्यानेंच हिंदुधर्म जिवंत ठेवला, असें वाटत असलें, तरी अनेकांगी कावेबाज आक्रमणांनीं पूर्णपणें बदललेल्या परिस्थितींत **तेंच चालू काळीं हिंदुत्वाचें संरक्षण करणाऱ्या सुसंघटनेस खरें नडत आहे.** जातींच्या उत्पत्तीचें

**यथार्थ ज्ञान झाल्यानें** व आहारप्रकाराची ज्याच्या त्याच्या **वैयक्तिक आवडीनिवडीवर सामोपचारानें व्यवस्था लावून,** धार्मिक, सामाजिक बाबतींत **समता** पाळल्यानें ही नड पुष्कळ कमी होईल.

सर्वच शाकाहारी बनतील, किंवा एकमेकांचा हेवादावा न करितां समत्व-बुद्धीनें व अनुलोम प्रतिलोम विवाहाची सवड असलेलें चातुर्वर्ण्य पुन्हां सुरू होईल, तर किती उत्तम होईल? पण हें मनोराज्य आतां शक्य नाहीं. आपण सर्व स्पृश्य-अस्पृश्य, एकाच राष्ट्रपुरुषाचे पृथक् अधिकारान्वयें सारख्याच योग्यतेचे व परस्पर सहाय्यावांचून एकमेकांचे न चालणारे असे उपयुक्त अवयव आहोंत, अशा ऐक्य भावनेनें चाललेल्या सुवर्णकालांतील चातुर्वर्ण्याच्या घरांत, चार वर्णांच्याच चार हजार जातींनीं, यादवांप्रमाणें एकप्रकारच्या मत्सरमदिरापानानें चालविलेला स्वतःचाच संहार पाहून, दाराशीं जमलेल्या बुभुक्षित व धूर्त शृगाल शत्रूंचा कोलाहल कानीं आला, म्हणजे ‘ हेरंबद्वारे शिव शिव शिवानां कलकलः ’ या हृदयभेदी मार्मिक कव्युक्तीची आठवण होऊन मन उदास होतें. असो. प्रत्यक्ष नाहीं तरी पर्यायानें, एकंदर हिंदुसंख्येच्या दिखाऊ मोठ्या प्रमाणानें हिंदूंस पाठबळ मात्र तितक्याच व्यस्तप्रमाणांत अगदींच कमी देणारी आपली ही मत्सरगर्भ विशिष्ट जातिसंस्था, हिंदूंत बराच नामर्दपणा उत्पन्न होण्याचें प्रमुख कारण आहे, असें नाहीं का ठरत ? नसल्यास गोष्ट निराळी; मग आमचें कांहींच म्हणणें नाहीं. पण जर ठरत असेल, तर–खाईन तर तुपाशीं नाहींतर उपाशी–असें म्हणून हिंदुधर्म–समूळंच विनश्यति–अजीबात नष्ट होऊं देण्यापेक्षां राखतां येईल तेवढा तरी सनातन हिंदुपणा, त्याच्या श्रेष्ठ संस्कृतिकरतां राखतां यावा, म्हणून एकीकरणास नडणाऱ्या व जन्मानें जात व श्रेष्ठकनिष्ठपणा ठरविणाऱ्या जातिसंस्थेंतील बाटविटाळासारख्या कांहीं अनवश्यक चालीरीतींस व समजुतींस तरी व्यावहारिक समंजसपणानें निदान पोटजातींच्या एकीकरणासाठीं योग्य तेवढा तरी फांटा देण्यास तत्परतेनें नको का तयार व्हायला ? पहा बोवा विचार करा; वेळ कशी आणीबाणीची आली आहे, हें सूज्ञांस सुचवायला नकोच.

याप्रमाणें आपल्या **प्रचलित** पुराणमतांशीं विरुद्ध पण ममत्वबुद्धीनें व **व्यापक** सनातन हिंदुत्वाच्या अभिमानानें केलेली अशी ही एक आप्तविचारसरणी आहे. म्हणून तिचा सहानुभूतिपूर्वक विचार होणें अगत्याचें आहे. कारण, विरुद्ध म्हणून नुसतें संतापून नव्हे, तर योग्य व निरुत्तर अशा सयुक्तिक कोटिक्रमानें वेळचेवेळीं

खोडींत न गेल्यास व त्यांतील ग्राह्यांशाबद्दलही अनादर दाखविल्यास, ती तरुणांचे मनांत मूळ धरून भलत्याच वाढीस लागण्याचाहि फार संभव आहे. तेव्हां असें होणें अनिष्ट किंवा इष्ट असेल त्याप्रमाणें त्या विचारसरणीचा विचारपूर्वक त्याग अगर स्वीकार व्हावा.

---

# पंथभेद.

एकाच धर्माचे छत्राखालीं असूनही, हिंदुलोकांत एकमेकांस परशत्रूप्रमाणें लेखणाऱ्या पंथोपपंथांचा व नाना सांप्रदायांचा कैक वर्षे जो सुळसुळाट होत राहिला तो मनाचे ठिकाणीं तशा प्रकारची म्हणजे एकमेकांस शत्रूप्रमाणें मानण्याची प्रेरणा उत्पन्न होण्यासारखी स्थिति उद्भवून वर्षानुवर्षे ती टिकून राहिली. म्हणून राहिला. उलट दुसऱ्या एखाद्या उपयुक्त दिशेनें जर त्यांच्या इच्छाधर्मी मनाला यशस्वी होण्यासारखी गति दिली गेली असती, तर वाट मोकळी करून द्यावी तिकडे जसें पाणी जातें, त्याप्रमाणें हिंदूंच्या तीव्र बुद्धीचा ओघही त्या इष्ट दिशेकडे वळून, आजचे दिवस कांहीं निराळ्याच सुस्थितींत काढायला सांपडले असते. पण योगायोग तशा तऱ्हेनें जुळून न आल्यामुळें, धार्मिक उपासनाउपास्यांत **आचरणाचे बाबतींत** फाजिल व्यक्तिस्वातंत्र्य मिळालें, **ऐहिक** गोष्टींत लक्ष घालणें अगदीं मूर्खपणाचें ठरलें, व पारलौकिक संशोधन मात्र जिकडे तिकडे निरनिराळ्या सूक्ष्म विवेचक पद्धतींनीं फैलावून पंथभेद फार उत्पन्न झाले. व या किरकोळ धार्मिक पंथभेदांच्या अभिमानांत **ऐहिक उत्कर्षास कारणीभूत होणारा राष्ट्राभिमान मात्र पार नष्ट झाला;** व त्याचाच अंशतः परिणाम म्हणून राजकारण चालविण्यांत चुका होऊन मध्यवर्ती मराठी राजसत्ता, फुटून बाहेर पडलेल्या शाखाविस्तारासह, सुसंघटित परसत्तेपुढें टिकाव न निघून जशी वेळीं अवेळीं क्षीणबल होऊं लागली. त्याप्रमाणें धर्मकारणांतही चुका होऊन आर्यांची मूळची सुसंघटित वैदिक समाजसंस्थाही आपल्या परिवारासह प्रबल परधर्मसंस्थेपुढें दिवसानुदिवस निस्तेज होऊं लागली. परस्परांशीं भांडणाऱ्या शेंकडों पंथोपपंथांत ती विभागली गेल्यामुळें, जुटीच्या परधर्मीयांचे हल्ले ज्यांच्या ज्यांच्यावर पडत, ते ते पंथविभाग पाठबळाचे अभावीं

भांडणांत नामर्द ठरूं लागले. हा तोटा होण्यास जन्मायत्त श्रेष्ठहीनपणाच्या समजुतीप्रमाणें, धार्मिक बाबतींत **व्यक्तीला** मिळालेलें-भलतेंच निराळा पंथ स्थापून राहण्याचें—आचारस्वातंत्र्यही कारण घडलें असावें असें म्हणतां येईल. स्वातंत्र्य चांगलें खरें,पण तें अवेळीं व अनाठायीं चांगलें नसतें. व तशाच तऱ्हेनें मिळाल्यामुळें हिंदूंस तें पचलें नाहीं. घरबसल्या खासगी रीतीनें **मताभिन्नता** असली,तरी सार्वजनिक व्यवहाराला हिंदुधर्म जसा सर्वांचा एक त्याप्रमाणें प्रमाण-भूत असें धर्मपुस्तकही सर्वांचें एक १ उपास्यदैवत व उपासनेचा प्रकार एक, त्या-प्रमाणें इतरही सर्व धार्मिक विधिनिषेध एक १ अशी जर स्थिति असती तर हा अनिष्ट प्रकार कदाचित् घडताना; **विरुद्ध मत असतांनाही सरकारी नोकर जसे शिस्तीनें हुकमाप्रमाणेंच वागतात, तसेंच कांहीं पाहिजे होतें.** धार्मिक व राजकीय बाबतींतलि व्यक्तिस्वातंत्र्य पाश्चात्यांनीं तर रक्त सांडून मिळविलें, पण त्यांचा बुद्धि प्रवाह केवळ धार्मिक व पारलौकिक विचारांच्या जाळ्यांतच अडकून न राहतां, तो ऐहिक श्रेष्ठते करितां आध्यात्मिकपेक्षां आधि-भौतिक दिशेनेंच जास्त वाहूं लागला. व पंथाभिमान किंवा पक्षाभिमान यापेक्षां, **मुख्य अस्तित्वाला व जीवनालाच अवश्य असा राष्ट्राभिमान** त्यांच्या हाडीमासीं कसा नेहमींच अधिक खिळलेला असतो,तो तर एखाद्या चित्रपटासा-रखा आज सतत दोनशेंहून अधिक वर्षें इंग्लिशांनीं हिंदुधर्मवाल्यांच्या पुढें स्पष्टपणें धरलेला आहे. पण सहज किंवा करमणुकी शिवाय अन्य दृष्टीनें व हेतूनें तिकडे बघतो कोण ?

परमेश्वराचें वास्तविक स्वरूप,पूर्वपुनर्जन्म, जन्ममृत्यूचें कोडें, पिशाच्चयोनि, फलज्योतिष किंवा सामुद्रिक वगैरे असल्या नेहमीं हरतऱ्हेनें नुसता विचारच फक्त करीत बसावयाच्या निष्फल गोष्टींचा विचार करण्याचें पाश्चात्यांनींही म्हणजे अजीबात सोडून दिलें आहे,अशांतला भाग मुळींच नाहीं.त्यांना सर्व नाद आहेत व त्यांची बुद्धि सर्वगामी आहे. परंतु लोकतंत्री राज्यकारभार व मुख्यतः आधिभौतिक शोध यांच्या सहाय्यानें प्रथम **इहलोकीं वर्चस्य**—आणि मग दुसरें कांहींही—अशा कायम धोरणाचें त्यांच्या बुद्धीला सुमारें दीड हजार वर्षांपूर्वींच जें एकदां वळण लागलें तें अद्याप चालू असून त्याच्या आधारानें ते आज ज्ञात जगावर प्रभुत्व गाजवीत आहेत; व विशेषतः अध्यात्म विद्येंत, तेवढें श्रेष्ठत्व संपादन करून वा भक्तींची अचल नजर परमेश्वर-चरण-कमलावर खिळवून सात्विक आचाराच्या गोष्टी बोलत ऐहिक वर्चस्व सुखाकडे लक्ष न देतां,मोक्ष

किंवा स्वर्गलोकांत मरणोत्तर सद्गति प्राप्त व्हावी म्हणून, इहलोकीं मरणापूर्वी भोगाव्या लागणाऱ्या **परवशतेच्या अधोगतीची** तितकीशी पर्वा न बाळग-ण्याचें धोरण गिरविण्याचें आमच्या बुद्धीला जें एकदां मागें पुरातनकालीं वळण लागलें त्याची पकड, सर्व समाजाचा प्रत्यक्ष मरणकाल जवळ आला, तरी अद्याप सुटावी तशी सुटत नसल्यामुळें आम्ही दास्यांत कुजून मरत आहोंत.

वास्तविक पाहूं गेले असतां या भूतलावर उत्पन्न झालेल्या कोणत्याही इतर मानवजातीपेक्षां आर्यलोकांचा बुद्धिविकास फार अगोदर झाला. पशुपक्ष्यांच्या कळपाप्रमाणें लहान लहान टोळ्यांनिशीं रानावनांतून पशुवृत्तीनेंच केवळ पोट भरण्यासाठीं ज्यावेळीं इतर लोक हिंडत असत, त्यावेळीं आर्य लोक आश्रमधर्म पाळून सृष्टीचें गूढ उकलण्यासाठीं बुद्धिसर्वस्व खर्च करण्यांत गढून गेलेले असत. अध्यात्मभागाचें अतिसूक्ष्म विचारपूर्वक संशोधन करून, व वेद उपनिषदां-सारिखे कुशाग्र बुद्धिमत्तादर्शक पवित्र ग्रंथ निर्माणकरून, जगदीशाच्या वास्त-विक स्वरूपासंबंधानें–नेति नेति–याच अखेर ठरणाऱ्या या ठाम सिद्धांतापलीकडे मानवीबुद्धि उपलब्ध विद्यमान इंद्रियांच्या जोरावर पुढें जाणें शक्य नाहीं, हें श्रेष्ठ मुनिवर्यांनीं केक हजारों वर्षांपूर्वीं कधींच सिद्ध करून टाकलें होतें. आणि अभिमानाची गोष्टही कीं, दुसऱ्या कोणत्या बाबतींत आर्यपूर्वजांना इतकी अखे-रची सीमा जरी गांठतां आली नाहीं, तरी अध्यात्मशास्त्रांत या बाबतींत मानवीबुद्धीची मजल त्यांच्यापुढें अद्यापपर्यंत तरी यत्किंचितही कोणी नेलेली नाहीं. व पुढें कोणी नेईलसेंही वाटत नाहीं;

आत्महत्या शास्त्रनिषिद्ध म्हणून करायची नाहीं, आणि शरीरधारणा तर सात्विक अल्पाहार किंवा श्वासोच्छ्वास एवढ्या तरी क्रिया केल्याशिवाय होत नाहीं. मग जगांत उदासीनपणें निष्क्रिय राहण्यापेक्षां, सर्वच व्यावहारिक कर्में सुखप्राप्तीकरतां शास्त्राला धरून विवेकपूर्वक किंवा फार झालें तर स्वार्था फला-शा सोडून करतां आल्यास काय वाईट ? हा जसा कर्ममार्ग प्रणेत्यांनीं त्यांतले त्यांत सयुक्तिकपणा स्वीकारला, त्याप्रमाणं सामान्य जनतेनें असा विचार करा-यला पाहिजे होता कीं, जगदीशाचें सत्स्वरूप ओळखणारें सामर्थ्यवान् इंद्रियच जर निदान सर्वसाधारण मनुष्यमात्राजवळ नाहीं व जन्मा अगोदरची व मृत्युनंतरची खरी स्थिति ही जर कोणाला, **दुसऱ्याला पटेल** अशा स्वानु-भवानें सांगतां येत नाहीं, तर त्यांच्याकरितां, सुसंबद्ध तथापि केवळ कल्पना-प्रचुर खोल खोल तर्कविचारांनी पिष्टपेषण करून सर्वांनींच डोकीं पिकवीत

बसा तरी कशाला ? आत्महत्या न करितां आयुष्य संपेपर्यंत इहलोकीं कसेंबसें जिवंत राहणें जर भागच आहे, तर **जास्तींत जास्त सुखानें व श्रेष्ठपणानें पण दुसऱ्यास त्रास न होईल अशा बेतानें**–कसें राहतां येईल, याचाच–शोध कां न करावा ? कृतज्ञपणानें त्या जगन्नियंत्याला नेहमीं सर्वसामान्य, सुलभ, सुकर, सुटसुटीत अशा धार्मिक कार्यक्रमानें शरणागत असलें म्हणजें झालें. थोर आर्यपूर्वजांनीं चित्स्वरूपाविषयीं केलेल्या अनुमानांत आणखी भर घालण्यास फार झालें तर कांहीं थोड्या विचारवंतांना आणखी विचार करीत बसण्याची मोकळीक ठेऊन पुढील वंशजांकडून ऐहिक गोष्टींचा विचार करण्याकडे म्हणजे **इहलोकीं सौख्य व श्रेष्ठत्व मिळविण्याकडे** जर मनाचा मुख्य कल ठेवला गेला असतां, तर शत्रूचा निःपात करणाऱ्या भयंकर पाशवी शस्त्रांच्या साहाय्यानें व कुशल राजकारणानें या जगांत आर्यपुत्रांना आधींच तरतरीत झालेल्या बुद्धीच्या जोरावर कधींच पहिल्या प्रतीचा मान मिळाला असता, यांत संशय नाहीं.

पण पूर्वजांच्या अनुमानांवर व सिद्धान्तांवर समाधान न मानतां, त्यांच्या वंशजांनीं स्वावलंबनपूर्वक त्याच सत्तत्वांचा शोध, विचारांची फक्त दिशा निरनिराळ्या तऱ्हेनें बदलीत राहून सांख्यन्याय वगैरे अनेक केवळ बौद्धिक विलासाचीं शास्त्रें उदयास आणून चालू ठेवला; ब्रह्म म्हणजे काय, त्याची प्राप्ती कशी होईल, वगैरे संबंधानें कैकजण कैक मार्गांनीं ऊहापोह करीत व तत्प्राप्तीसाठीं कैकजण कर्मकाण्डांतर्गत यज्ञायागादि कर्में आचरीत. वेदप्रामाण्य मानायचें, पण आपलें वैशिष्ट्य नजरेंत भरेल, असा तपशिलांत तेवढा फरक करून हरतऱ्हेनें शोधनाचा नाद चालू ठेवायचा, असा क्रम शेकडो वर्षें चालला पण आधिक फलप्राप्तीच्या नांवानें शून्य. बाकी आजही तो नाद म्हणजे सर्वस्वीं सुटला असें नसून जवळजवळ अनुवंशिकासारखाच तो होऊन बसला आहे.

व्यावहारिक कृत्रिम गरजा त्यावेळीं फार कमी, व जीवनसंग्राम बेताचा. तेव्हां नुसत्या कंदमूळांनींसुद्धां पोट भरण्याइतपत साध्या अन्नाची तरतूद लावण्यासारखी असली कीं त्यांचा–अर्थात् त्यांचेपैकीं विचार करणाऱ्या बुद्धिमानांचा–सर्व काल कोणाचा ब्रह्मविचारांत तर कोणाचा मरणोत्तरच्या सद्गतिचिंतनांत कोणाचा पुनर्जन्मविवेचनांत तर कोणाचा विद्यमान सुखदुःखाचा पूर्वसुकृत दुष्कृतांशीं मेळ घालण्यांत, असा बहुधा खर्च होई. जो उठे तो असल्या **दूरच्या**

गोष्टींचा ऊहापोह करण्यांत गढून जाई; पण **जवळच्या** म्हणजे **येथील जीवन** अवलंबून असणाऱ्या इहलोकच्या प्रत्यक्ष व्यवहाराकडे लक्ष देणारा विरळा.

वंशपरंपरेनें विचार करण्याची संवय झाल्यानें, तरतरीत झालेल्या बुद्धींचा सगळा ओघ प्रत्यक्ष व्यवहारापेक्षां ब्रह्म कुटण्याकडे फार वळला. मध्यंतरी ब्रह्म कुटण्याच्या या स्थितीला किंचित् मुरड देऊन त्यांचेपैकीं कांहींजणांची बुद्धि मरणोत्तरच्या स्वर्गसुखलाभाकरितांच विविध फलें देणारीं अनेक प्रकारचीं होमहवनें. विधिव्रतवैकल्यें व भजनपूजनें यांत गुरफटली, ती इतकी कीं, त्यांतही त्यांनीं अगदीं बारिकसारिक निष्कारण सूक्ष्म विचारांची शिकस्त करून सोडली. तेव्हां साहजिकच सर्वांची बुद्धि व वृत्ति सारख्या मापाची नसल्यामुळें व मनुष्यांमधील स्वाभाविक अहंकार अहमहमिकेच्या अस्तित्वामुळें वरील सर्व बावतींत अनेक अध्वर्यूंचे त्यांच्या विचारधोरणामुळें निरनिराळे पक्ष तयार झाले. ओघानेंच त्या पक्षांत कलह सुरू झाले. पुढें ते कलह विकोपाला गेले. व निरनिराळ्या पक्षांत अभिमानानें सामील होण्यासाठीं अनुयायांची एकच धांदल उडाली.

अरण्यांत झाडाझुडपांमधून एऱ्हवीं स्वस्थ बसलेले माशांचे थवेच्याथवे कांहीं कारणानें जसे एखादेवेळीं गोंगावत एकदम उसळतात, त्याप्रमाणें आसेतुहिमाचल जिकडेतिकडे भांडखोरवृत्तीनें एकमेकाशीं—**प्रत्यक्षव्यवहाराशीं संबंध नसलेला पारमार्थिक शुष्क वितंडवाद करणाऱ्या पंथोपपंथांचें** जणुं पेवच फुटत राहिलें. बौद्ध, जैन यांनीं तर वेदालाही झिडकारून जवळजवळ निराळाच धर्म स्थापला व बाकीच्या पंथांनीं वेदप्रामाण्य तेवढें मानून साधन. उपासना, उपास्य वगैरे बावतींत एकमेकांशीं शत्रुत्व आरंभिलें. माझे आचार, विचार, तर्क सर्व कांहीं चांगले, व तुझे सर्व वाईट व वेदबाह्य हें ठरविण्यासाठीं विचारसरणींतील व वागणुकींतील किरकोळ फरकांवर क्लिष्ट कोटिक्रम होऊं लागून, भस्म, आडवें उभें गंध, वस्त्रालंकार, खाद्यपेय सोवळओवळें वगैरे क्षुद्र भेद देखील परमेश्वरप्राप्तीला परस्परविरुद्ध प्रतिपादनानें एकमेकांकडून अनुकूल प्रतिकूल ठरूं लागले.

याप्रमाणें **पारमार्थिक** व **धार्मिक** बावतींत उगाच भलभलतीं तर्कटें रचीत बसण्यांत फाजिल स्वातंत्र्य, ऐक्यपोषक साध्या आहारविहारादि **सामाजिक व्यवहारांत** निष्कारण अवास्तव बंधन व सर्वांना खुबीच्या व खुषीच्या कुशल अधिकारजबरदस्तीनें **ऐहिक उपयुक्त व्यवहाराच्या** सरळ रस्त्यावर खेचून आणून सोडणाऱ्या समर्थ लोकतंत्री वा एकतंत्री राज्यपद्धतीचा अभाव या

**त्रिदोषाच्या बाधेनें** अगोदरच मूळ चार वर्णांत जन्मतः श्रेष्ठहीन ठरणाऱ्या अठरा नव्हे अठराशेंपगड जातींच्या झालेल्या खुळाच्या वाढींत परस्परांस पाण्यांत पाहणाऱ्या पंथोपंथांची पिकलार सुरू होऊन समाजव्यवस्था खिळखिळी झाली. हिंमत व जूट नाहींशी होऊन औदासिन्य वाढलें आणि हिंदूंच्या संख्येचा फक्त दर्शनीं प्रचंडपणा तेवढा शिल्लक राहिला. कागदोपत्रीं लिहिल्या जाणाऱ्या अशा या विस्काळेत प्रचंड म्हणजे पंचवीस कोट हिंदु संख्येचा परिणाम किंवा उपयोग विचाराल, तर हिंदु अधिक नामर्द होण्यांत मात्र झाला. तो कसा, हें थोडें ध्यानांत येण्यासाठीं आपण १८१८ सालच्या खडकीच्या लढाईचें उदाहरण घेऊं.

इंग्लीशांचें सैन्य अवघे जेमतेम ३०००, पण जे होते तें सर्व एका श्रेष्ठ अधिकाऱ्याखालीं एका कवाइती पद्धतीचें, एकजुटीचें, वाटेल तसें न वागतां वरिष्ठाचा हुकुम मानणारें, सुटसुटीत व नियमबद्ध लष्करी शिस्तीचें असून इंग्रजांविषयींच्या अभिमामानें भारलेलें असें होतें. उलट पेशव्यांकडील सैन्य संख्येनें तेवढे तीस हजार, पण जे होतें तें कांहीं स्वतः फितूर असलेलें, कांहीं दुसऱ्याच्या फितुरीमुळें दारुगोळा हल्ल्याची जागा वेळ पद्धत वगैरे बाबतींत दिशाभूल झालेलें, कांहीं लढाईचे दंगलींत केवळ लुटालूट करूं इच्छिणारें, कांहीं आपल्याच हेक्यानें लढाईचें धोरण चालवूं पाहणारें, कांहीं लढाईचा खरा हुरुप नसतां केवळ हुकूम म्हणून उसन्या ऐटीनें समरांगणावर आलेलें, कांहीं युद्धाच्या धुमश्चक्रींत सूडाच्या बुद्धीनें खाजगी वैर साधून आपलें स्तोम वाढवूं पाहणारें,–व कांहीं थोडें शेलकें फक्त मुख्य सेनापती बापू गोखले सांगेल तें निष्ठापूर्वक करणारें–असे पंथभेदांचे असल्यामुळें सहज त्यांचा पोरखेळ होऊन पराभव झाला, पण त्याचा परिणाम एकंदर सर्वसाधारण जनतेवर आम्ही संख्येनें कितीही असलों तरी इंग्रज आम्हांला फारच भारी आहेत–असें, असल्याच गोष्टी वारंवार घडत येऊन मनाला जें वाटत आलें होतें **त्यांत भर घालण्यासच** कारण झाला. असो. अशा दृष्टीनें विचार केल्यास स्वातंत्र्यबंधनांचा आनाठायीं आणि अवेळीं अतिरेक होऊन, विचार करण्याच्या सवयीनें वापरत्या हत्याराप्रमाणें तीक्ष्णतर होत जाणाऱ्या व मिळेल त्या मार्गानें पुढें जाणाऱ्या हिंदूंच्या बुद्धीवर उपास्य उपासना वगैरे धार्मिक बाबतींत एकसूत्री कुशल व व्यावहारिक असें जबरदस्त अधिकारनियंत्रण पुढें पुढें व विशेषतः बुद्धकालापासून न राहिल्यामुळें, विशेष जलद चालणारा पण वाट चुकलेला मनुष्य जसा अधिक लवकर घोर अर-

ण्यांत प्रवेश करून शोधायच्या वस्तूस व आप्तमंडळांस आणि घरादारास मुकतो, त्याप्रमाणें हिंदूंची बुद्धि, आपल्या निरंकुश तरतरितपणामुळें निबिड अंधःकारमय अशा पारमार्थिक विचारविपिनांत अध्यात्मिक संशोधनार्थ स्वैर संचरूं लागली व परब्रह्म हातीं न लागतां ऐहिक उत्कर्ष साधूं देणारे आधिभौतिक शोध व व्यावहारिक कौशल्य यांचे अभावीं **प्रथम समाजाचें संघटण** व परकी लोकांच्या स्वाऱ्या सुरू होतांच **स्वदेशावरील स्वसत्ता मात्र गमावून बसली.** असें दिसतें. त्यांच्यांत भाऊबंदकीच्या भांडखोर वृत्तीचे जे असंख्य पंथभेद उद्भवले, ते नात्याचा एकरक्तसंबंध नाहींसा करीत, जातींतून जाती उत्पन्न करणाऱ्या मत्सरगर्भजातिसंस्थेप्रमाणेंच, **नुसत्या संख्येचे प्रचंडत्व फुकट ठरवून,** उलट हिंदूंना–एकराष्ट्रीय प्रेमळ बंधुभावनेचे आपल्याला खरें पाठबळ नसून आपण आपल्या विशिष्ट जातीपुरतें अथवा पंथापुरते एकाकी आहोत, अर्थात अशा **आपल्या एकट्यांच्या हांतून प्रबळ शत्रूचा पराभव होणें नाहीं,**– या जाणिवेनें प्रत्येक पंथ पृथक्पणें अधिक भीरु बनविण्यास मात्र अंशतः तरी कारण झाले असावेत असें नाहीं का दिसत ? विचार करा.

## कारणसमुच्चय.

हिंदूना प्रत्यक्ष वा पर्यायानें, केव्हां मनावर तर केव्हां शरीरावर परिणाम करून, नामर्द बनविणारी लहान मोठी कारणें पुष्कळच आहेत. त्या सर्वांचें येथें सांगोपांग विवेचन केलें नाहीं म्हणून त्यांचे महत्त्व अगदीं कमी आहे, असांतला भाग मुळींच नाहीं. उदाहरणार्थ खऱ्या पाठबळाच्या अभावाची, सरकारी पक्षपाती धोरणाची आणि एकंदरींत गुलामगिरीच्या ओशाळगतीची मनाला होणारी सतत रुखरुख. शरीराची पूर्ण वाढ व संसारशकट हाकलण्याचें ज्ञान व सामर्थ्य प्राप्त होण्यापूर्वीच अल्पवयांत मातृपितृपदाची प्राप्ति करून देणारे बालविवाह, तसेंच ब्रह्मचर्य, व्यायाम, खुराक वगैरे आरोग्यकारक अवश्य बाबींकडे दुर्लक्ष, संघशक्तीच्या प्रभावाचें व अवश्यकतेचें अज्ञान, भाषाभेद व सामाजिक चालीरीतींतील फरक यांबद्दल एकमेकांस हिणविण्याची प्रवृत्ति, स्वधर्म व स्वदेश व्यापक व विस्तृत असले तरी सर्व हिंदूंस ते सारखेच आधारभूत आहेत–या विषयींचे अभिमानशून्य औदासिन्य, परंपरागत सौम्य चालीरीतींनीं अगोदरच भेकड होणाऱ्या स्वभावाला घरगुती साहिष्णु सांगणुकीची व सोशिक भक्ति-

मागोतील कांहीं अजागळ शिकवणुकीची आणखी भर. सदोष शिक्षणक्रमांतील निष्कारण पाठांतरानें पडणारा मेंदूवरील दाब, व स्वाभिमान व आत्मविश्वास नाहींसा करणाऱ्या इतिहासाचें पाठांतर, गरीबींतील रुक्ष अन्न सेवनकरीन सोसाव्या लागणाऱ्या प्रापंचिक काळजीच्या यातना, मारामारीच्या वेळीं तोंडाच्या वटवटीपलीकडे कांहींही करूं न देणाऱ्या दारु, भांग, गांजा, चहा वगैरे अमली पदार्थांचें वाढतें व्यसन, बायकी थाटाच्या नखरेबाज सुंदरपणाची तरुणांत चलती हौस, राकटपणाऐवजीं प्रत्यक्ष गरीबींतही उसन्या श्रीमंतीचा नाजुकपणा आपल्या शरीरांत व चेहऱ्यावर आणण्याकडे तरुणांचा होत असलेला कल, भिकार उपहारगृहांतील शिळ्यापाक्या व संसर्गदूषित विषारी पदार्थांचें भक्षण, नाटक, सिनेमा, तमाशांतील उत्तान शृंगारचेष्टांचें दृश्य व तसलेंच कामोद्दीपक चावट वाचन, अशी कितीतरी आणखी कारणें दाखवितां येतील; व तीं आपापल्यापरी कमी अधिक महत्त्वाचींही आहेत. परंतु त्यांत हिंदुलोकांपुरतेंच असें वैशिष्ट्य नाहीं. इतर धर्मांतील लोकांतूनही थोड्याबहुत प्रमाणांत तीं सगळीकडे आढळणारीं आहेत. परंतु गुणकर्माऐवजीं **नुसत्या जन्मावरून सामाजिक व धार्मिक बाबतींत एकमेकांना एकमेकांपेक्षां पिढ्यानपिढ्या कायमचे श्रेष्ठहीन** ठरविण्याने आपसांत निरंतर आपोआप चालून राहणारी यांत्रिक कलागत उत्पन्न करून सार्वजनिक विकट प्रसंगीं ऐक्यपोषक **एकरक्तसंबंधाच्या नात्याचा जिव्हाळा नाहींसा करणारी पृथक् जातिसंस्था**, व उपासना, उपास्य, शिवाशिव, बाटविटाळ, वर्ज्यावर्ज्य वगैरे कांहीं अनवश्यक बाबतींमुळें, एकाच मूळ धर्माचे छत्राखालीं **परस्परांस शत्रु समजणारे हिंदूंतील पंथभेद,** या दोन गोष्टींत हिंदुधर्माचा विशेष कांहीं और आहे.

या दोन कारणांनीं हिंदुधर्मांतील मोठमोठाले समुदायचे समुदाय, त्यांतील विशिष्ट सांप्रदायिकपणामुळें, परस्परांचे शत्रुसमूह बनून समष्टिरूपानें सर्वच हिंदूंस, संख्येच्या दिखाऊ प्रचंडत्वाच्या मानानें पाठबळ मात्र तितक्याच व्यस्त प्रमाणांत उलट जास्त कमी, या जाणिवेनें नामर्द केले असल्यामुळें, हिंदुधर्मांतर्गत सर्व समाजांच्या परस्पर समायिक संमत्तीशिवाय फार खोल मूळ धरलेलीं तीं कारणें सहजासहजीं दूर होण्यासारखीं नाहींत. तीं दूर होण्याचा अनुकूल काल अधिकाधिक जवळ येईल अशा तऱ्हेची खटपट मात्र अवश्य केली पाहिजे म्हणून त्या विशिष्ट कारणांचें तेवढें मात्र जरा विस्तारानें वर्णन केलें आहे.

आणि कारणसमुच्चयांतील वर निर्दिष्ट केलेलीं व कोठेंही दृष्टोत्पत्तीस येणारीं कारणें व्यक्तिशः प्रत्येक मनुष्याला परकी अमलाखालींही घरच्याघरीं दिसायला अगदीं साध्या पण अत्यंत परिणामकारक अशा साध्या मानसोपचारी **खासगी** गृहशिक्षणाचा प्रयत्न करून दूर करितां येण्यासारखीं आहेत. म्हणून त्यांच्या दुष्परिणामांचा जास्त विचार न करितां, तीं नाहींशीं करण्याचें साधन व तें उपयोगांत आणावयाचा त्यावरील उपाय मात्र पुढील प्रकरणांतून विस्तारानें सांगूं म्हणजे झालें. त्या उपायांतील तत्त्व मात्र, विस्तारानें सांगितलेल्या पहिल्या दोन्हीं व कारणसमुच्चयांतील कोणत्याही कारण निरसनास सारखेंच उपयोगी पडेल, असें सर्वव्यापक आहे.

---

# मनाचें व त्याच्या जोपासनेचें महत्त्व.

हिंदूंच्या ठिकाणीं नामर्दपणा उत्पन्न करणारीं जीं संभवनीय कारणें मागील प्रकरणांतून सांगितलीं तीं नाहींशीं करण्यास सुदृढ शरीर व चौकस बुद्धि यांहून श्रेष्ठ अशा चंचल मनाची त्यास कुशल व परिणत बुद्धीच्या अधीन करून देण्याची पद्धतशीर जोपासना हाच खरा व पहिल्यानें करावयाचा उपाय आहे. तेव्हां त्याकरितां मन हें त्यांहून श्रेष्ठ आहे व त्याची जोपासनाही तशीच महत्त्वाची आहे असें ठरलें पाहिजे. ठरतें का आपण पाहूं.

कोणी म्हणेल एकदोन इसमांमधील किरकोळ ठोकाठोकींत किंवा मोठमोठ्या समूहांमधील अटीतटीच्या मारामारींत कोणाचा तरी पराभव होतो, नामर्दपणा दिसून येतो, तो शरीरें हटल्यामुळें दिसून येतो. मग शरीराचा हा नामर्दपणा घालवायला जोपासनेचा उपचार मनावर काय म्हणून? शरीराला खुराक चारा, त्याच्याकडून तालीम करवा, त्याला लाठी, दांडपट्टा खेळायला शिकवा व डावपेंचांच्या कुस्तीचे व हुलकावणीच्या कवाइतीचें त्याला शिक्षण द्या म्हणजे झालें. ज्याला नामर्दपणाचा रोग, त्या शरीराला दवा द्या. मनाला कशाला? म्हटलेंच आहे 'शरीरमाद्यं खलु सर्वसाधनम्'. शंका बरोबर आहे व कविवचनही सार्थ आहे. पण केवळ शरीरावरच नुसता उपचार करून शरीर पोसलें तरी देहाकडून सत्पक्षाच्या सदभिमानानें बाणेदार सत्कृति घडणें, हा जो इष्ट हेतु, तो

नुसता देहच तेवढा पुष्ट होऊन साधणार नाहीं, असें विचारांतीं दिसून येईल. कसें तें पहा.

वरील उपायांनीं शरीर पुष्ट होईल खरें, पण नुसतें पुष्ट होऊन इष्ट हेतु जर साधला नाहीं, तर त्याचा काय उपयोग? पुष्ट असून मूर्ख व दुष्ट अशीं थोडी का शरीरें आपण पाहतों ? सदोदित बेजबाबदारपणें वागणाऱ्या गुंडांचे एक वेळ असो; पण कोणत्याही गुलाम देशांतील लष्करी शिस्तींत असलेल्या देशी सैनिकांचीच गोष्ट घ्याना ? त्यांचीं तीं धिप्पाड शरीरें उत्तम कवाइत शिकून बरोबर नेम मारूं लागतात, पण कोणावर ? हुकूम होईल त्यांचेवर. वरिष्ठानें इषारा करतांच, केवळ न्यायाची व दयेची भिक्षा मागायला आलेल्या आपल्याच दीन निःशस्त्र देशबांधवांवरही बंदुकींतील गोळ्या सोडून ते त्यांची पटापट प्रेतें पाडतात. असा विचार मनांत आणीत नाहींत कीं या घोळक्यांत आपल्याच पैकीं कोणाकोणाचे, कदाचित् आपलेही सखे भाऊबंद असतील, त्या जिवाभावाच्या सहोदर पाठिराख्यांचे आपण आपल्याच हातांनीं कसे उगाच जीव घ्यावे ? कसे मुडदे पाडावे ? पण नाहीं. उडाव कीं उडादेवबास. तेव्हां पहा. नुसत्या धष्टपुष्ट शरीरांचा कसा काय होतो हा उपयोग ? तसेंच सशक्त गुप्त पोलीस व त्यांचे अम्मलदार, गुन्हा हुडकून काढण्यांत तरबेज होतात आणि देशाकरितां तळमळणाऱ्या जीवाकडून झालेलें देशभक्तीचें कार्य हाच गुन्हा समजून बढतीच्या आशेनें त्यास न्यायासनापुढें आणतात, आणि मग लठ्ठ पगार खाऊन तसेच नुसते पुष्ट झालेले न्यायाधीश आपल्या बुद्धिमत्तेच्या तीक्ष्ण व सूक्ष्म तारेवर कापसाप्रमाणें तो गुन्हा व त्याचें स्वरूप पिंजून पिंजून त्यांतून **भासमय** राजद्रोहाचा मळ बाहेर काढतात. अर्थात् पुढील परिणाम म्हणजे त्या अभागी देशभक्ताचा–बांधवांच्या दृष्टीनें देशभक्तीचा परिमल व शत्रूच्या न्याय !!! दृष्टीनें राजद्रोहाचा अनिष्ट मळ पसरविणारा–देह, भूमातेची अपुरी सेवा घडल्यानें अंतःकरणांत हळहळत अश्रुपूर्ण नयनांनीं मातेकडे क्षमेच्या याचनेनें सहेतुकपणें शेवटच्या केविलवाण्या मुद्रेनें अखेरचें दृश्य दिसेनासें होईपर्यंत पहात आहे अशा स्थितींत दूर एखाद्या अंदमानकडे काळ्यापाण्यावर बहुधा काळे होण्यास–मरून नाहींसा होण्यास–ओढून नेला जातो. शिवशिव ! आपल्याच गोतास काळ होणारे कुऱ्हाडीचे हे करंटे दांडे नुसते धष्टपुष्ट होण्यांत देशांतील अन्नाचा, द्रव्याचा, वेळेचा व मनुष्यबळाचा व्यर्थ व्ययच नाहीं का हा झाला ? ही झाली हिंदु स्वधर्मी अशा नुसत्या धणधाकटांच्या शरीराची गोष्ट; पण पूर्वी एकवेळ आईबहिणीप्रमाणें मानलेल्या किंवा कदाचित् असलेल्याही हिंदू स्त्रियांवर

**जुलुम** करण्यास देखील प्रवृत्त होणाऱ्या **गलेलठ्ठ बाटग्यांच्या शरीराचा** कसा काय सदुपयोग होत असेल, याची तर कल्पनाच करूं नये हें बरें. असो. याचें कारण कोणतें तर अभ्युदयकारक अनुकूल योग्य शिकवणुकीचा, त्यांच्या शरीरांतील कोमल मनांवर राष्ट्रीय दृष्टीनें योग्य वेळीं उपचार-संस्कार करून तो टिकविला गेला नाहीं हें आहे. म्हणून नुसतें शरीर पुष्ट करून, चांगल्या कामांतील मर्दपणा येणें लांबच राहिलें, पण त्या शरीराचा दुरुपयोग करणारा नुसता दुष्ट नामर्दपणाही त्यांतून जायचा नाहीं. कारण मूर्खपणामुळें, शत्रूला फितूर होऊन किंवा एखाद्या दुष्ट नीच मनोविकाराला सहजासहजीं बळी पडून भस्मासुराप्रमाणें तीं शरीरें आपत्कालीं अन्नपाण्यानें पुष्ट करणाऱ्या बंधुवर्गावर व भूमातेवरच उलटण्याचा फार संभव असतो. याकरितां **मनावरच** मुख्यतः पहिल्यानें उपचार करून त्याचीच नीट जोपासना केली पाहिजे. मनाच्या **योग्य जोपासनेंत** सत्कार्यासाठीं शरीराचें संवर्धन करणारे विचार आपोआप सुचून मग शरीराला इष्ट वळणही तें मन लावतें.

मनाचें महत्त्व ‘ मानसं प्राणिनामेव सर्व कर्मैक कारणं ’ या वचनांत चांगलें दिग्दर्शित केलें आहे, प्राणिमात्रांकडून घडणाऱ्या सर्व गोष्टींना कारण, त्यांचें मन आहे. असा त्याचा अर्थ आहे.तेव्हां अर्थात् शरीराकडून होतातसे वाटणारे बरे वाईट सर्व व्यापार, वस्तुतः शरीराकडून होत नाहींत, असें उघड दिसतें. लांबचलांब आगगाडीच्या चाकांची मालिका फिरूं लागली, म्हणजे गाडी चालू लागते, व त्यामुळें हीं चाकेंच गाडी चालवितात, असें दिसण्यांत दिसतें. पण चाकांनाच उलटसुलट फिरायला लावणारी किंवा जागच्याजागीं थांबवून धरणारी शक्ति, बुरखा घेऊन कुठें एखाद्या कोपऱ्यांत स्थित् झाली असते, तें कोणाच्या लक्षांतही येत नाहीं. त्याप्रमाणें क्रिया होतांना, शरीराचीच बरीवाईट हालचाल दिसते खरी, पण शरीराला अशी चळवळ करायला लावणारी कळ, अदृश्य पण निराळ्याच ठिकाणीं असते. त्या कळीला–शक्तीला–इच्छाधर्मी मन अशी संज्ञा आहे. बुद्धीपेक्षांही त्या मनाच्या ठिकाणीं कांहीं विलक्षण गुणधर्म असल्यामुळें, त्याला श्रेष्ठत्व लाभलें आहे. मन नसेल तर शरीरांत नुसती बुद्धि असून नसून सारखीच. कारण कोणतीही क्रिया, त्या क्रियेसंबंधानें तशी इच्छा झाल्याशिवाय नुसत्या बुद्धीच्या जोरावर शरीराकडून घडत नाहीं. कारण, इच्छा करणें हा पहिला मनाचा धर्म. म्हणून क्रियासिद्धीला मनाचें अस्तित्व व मदत जरूर पाहिजे. पण घडणारें कार्य उत्तम तऱ्हेनें आणि कल्याणप्रद व्हायला हवे

असेल, तर तें इच्छाधर्मी मन, विचारपरिपक्व कुशल बुद्धीच्या अधीन असावें लागतें. कारण, कार्य कुशलतेनें पार पाडणें ही पडली बुद्धीची करामत. तेव्हां, सत्कार्यसिद्धीला अशी दुहेरी खटपट आहे. या खटपटीलाच मनाची जोपासना म्हणतात. ती जोपासना सादिच्छेनुरूप अभ्युदयकारक आचारविचारांनीं करावयाची असते. पण ही गोष्ट अगोदरच भलतेसलते अनिष्ट संस्कार होऊन गेलेल्या प्रौढ मन बुद्धियुक्त शरीराकडून व्हावी तशी टिकाऊ होत नाहीं. म्हणून बालपणीं मन शुद्ध व कोमल आहे तोंच त्या मनाची जोपासना सुरू केली, म्हणजे शरीराकडून चांगलीं कामें होण्याचा फार संभव असतो. यावरून नुसतें माहितगार बुद्धियुक्त शरीर, मग तें कितीही सुदृढ असो, त्याला सदिच्छा करणाऱ्या सन्मनाची जोड असल्याशिवाय तें हिंमतीचीं, व नांवलौकिकाचीं चांगलीं कामें करीलच, असा नेम नाहीं. म्हणूनच शरीर नव्हे तर ' मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ' असें म्हटलें आहे. तें खरें दिसतें. मनुष्याच्या बंधविमोचनाचें कारण मन हें आहे. असा त्याचा सरळ अर्थ आहे, व तो सहज ध्यानांत येण्यासारखा आहे. पण पोपटपंचीप्रमाणें असा नुसता शब्दशः अर्थ कळल्यानें, मनाचें खरें महत्त्व ध्यानांत येत नाहीं, म्हणून मानवी व्यवहारांत मनाचें किती महत्त्व आहे, याचा जास्त विचार केला पाहिजे.

धडधाकट हातपाय, तेजस्वी नेत्र, व सुंदर मुखकमल, असे जे मानवी शरीर बनविणारे अनेक अवयव आहेत, त्यांची किंमत मनाच्या मानानें कांहींच नाहीं, असें त्या वचनांत सुचविलें आहे. अत्यंत उपयुक्त असें एखादें यंत्र असतें, पण त्याचा उपयोग कुशल कारागीर लाभल्याशिवाय कांहीं होत नाहीं; त्याप्रमाणें नुसत्या हस्तपादादि अवयवयुक्त शरीराकडून, कांहींही होत नाहीं. ते जणू काय सजीव असूनही निर्जीव, असें कळा कुसरीचें एक साधन आहे. पण त्यांत मन म्हणून जो एक अगम्य, अदृश्य, असा अद्भूत भाग आहे, तो त्या शरीराचा चालक असून, तोच त्या शरीराकडून सर्व कांहीं करवितो. त्याच्याच हातांत शरीराचा लगाम आहे. लगाम जशी कमी अधिक सैल सुटेल-इकडे तिकडे हलेल—तशी, या शरीररूपी घोड्याची चाल बदलून, तें खड्डयाकडे, उताराकडे, चढावाकडे, किंवा सपाटीकडे, जिकडे ती लगाम, चालक मनाकडून खेचली जाईल, तिकडे तें शरीररूपी घोडें जाऊं लागेल. अनिष्ट स्थलाकडे न जातां, इष्ट स्थलाकडे या शरीररूपी घोड्यानें जावें, किंवा एखादी लाज व अपमान वाटण्यासारखी वाईट क्रिया त्याचेकडून न होतां, अभिमान व आनंद वाटण्यासारखी

सत्कृति त्याचेकडून घडावी, असें आपल्याला वाटलें, तर शरीरांतील मनाची मदत मिळाल्यास तें अशक्य नाहीं. साधण्यासारखें आहे. सहज साध्य नसेल, कष्ट साध्य असेल; पण असाध्य नाहीं साध्य आहे हेंही त्यांत सूचित आहे.

पण हें साधन साधतांना, शरीराची लगाम जशी मनाच्या हातीं असते, तशी मनाची लगाम बुद्धीचे हातांत देण्याचें कारस्थान मात्र साधलें पाहिजे, ही गोम अध्याहृत आहे. शरीरामध्यें मनाचे शेजारीं बुद्धि म्हणूनही एक अद्वितीय चीज असते. ती आपलेकडून मनावर ताबा चालवायला जरी पाहते, तरी मन फार चपल व दोन पावसाळे अधिक खाल्यासारखे वडील असल्यामुळें, साधारणपणें अखेर तेंच बुद्धीवर हुकमत चालवितें. म्हणून असें हें वात्रें लहरी मन, कह्यांत ठेवतां येण्यासारखी दीर्घ काल कठीण निश्चयी तपश्चर्या करितांना, बुद्धि, अगदीं मेटाकुटीस येते. पण हें मन त्या बुद्धीच्या ताब्यांत असण्यांत तर आपला खरा फायदा असतो. म्हणून या शरीररूपी घोड्याची लगाम खेचणाऱ्या त्या मानाजी फाकड्या स्वार मनाला, कसेंही करून, चुचकारून, फुसलावून, खुलवून, जर त्याचीही शेंडी, त्याच्या सन्निध असलेल्या बुद्धिमतीच्या ताब्यांत देण्याचें कुशल कारस्थान आपल्याला साधलें, तर मात्र आपला इष्ट हेतु सिद्धीस जाईल, एऱ्हवीं नाहीं असें आहे.

बुद्धि श्रेष्ठ व मन कनिष्ठ असा येथें देखावा दिसतो खरा. परंतु, नुसती बुद्धि पण कुचकामाचीच आहे. शरीररूपी घोड्याची लगाम नित्य हातांत बाळगणारें मन ज्यावेळीं बुद्धीचा शिरस्तेदार किंवा प्रधान होतें, त्याच वेळीं तैल बुद्धीचें चातुर्य, इच्छाधर्मी प्रबल मनाची योग्य इच्छा, व सुदृढ शरीराची अजब कर्तबगारी, यांचा मेळ बसून खरा उपयोग होतो. म्हणून मन हेंच मनुष्याच्या बंधविमोचनाचें मुख्य कारण समजलें जातें. कोणी म्हणेल, मग मनाकडे एवढा मोठेपणा येत असतां, त्याचा तेजोभंग तरी कां करायचा ? बुद्धि पाहिजेच कशाला ? बुद्धिपेक्षां त्यासच अग्राधिकार दिल्यानें, तें ज्यास्त कार्यक्षम नाहीं, का होणार ? ज्यास्त कार्यक्षम होईल, पण बेटें कोणीकडे कर्तबगारी दाखवील, याचा नेम नाहीं. स्वभावानें उद्यमशील पण अगदीं लहरी, अशी कांहीं माणसें असतातच कीं नाहीं. कांहीं तरी करीत राहून उद्योगी असणें हा त्यांचा स्वभावधर्मच असतो खरा. पण त्यांच्यावर योग्य नियंत्रण असलें, तरच तीं खरीं कार्यक्षम होतात. नाहींतर कोणी विचारता नाहींसा झाल्यास अव्यापारेषु व्यापार करून, रुक्ष कुडाला तुंबड्या लावतील किंवा अनुकूलता असल्यास सैतानाचा नसला

उलाढालींचा मोठा दुष्ट कारखानाही काढतील. तीच स्थिति, या स्वैर चंचल मनाची आहे. म्हणून तें मुख्य असलें तरी, त्याच्यावर नियंत्रण पाहिजे. **खरें उपयुक्त व कार्यक्षम होण्यास, मन बुद्धीच्या आधीनच असावें लागतें.** आतां चंचल वृत्तीच्या मनावर हुकमत चालवूं पाहणारी बुद्धीही तशीच प्रगल्भ झालेली असली पाहिजे, हें उघड आहे. नाहींतर बादशहा महालातच बसून मर्जी-प्रमाणें हुकूम करणार **एक**, आणि बिरबल कारभार चालणाऱ्या दिवाणखान्यांत बसून आपल्या मर्जीप्रमाणें अमलांत आणणार **दुसरा** असेंच व्हायचें.

यावर पुन्हां कोणाला वाटेल कीं असल्या विलक्षण नाचऱ्या मनाला बुद्धीच्या ताब्यांत देण्याचा असा विकट खटाटोप करायचा आणि त्याला ताब्यांत ठेवतां यावें म्हणून बुद्धीचाही तीव्रपणा व व्याप वाढवायचा तेव्हां या दोन गोष्टी करण्यापेक्षां मनाला वश करण्याचा नाद टाकून देऊन नुसती बुद्धिमत्ताच वाढवून घेतली तर काय होईल ? काय होईल हां हां म्हणतां हें पोपटासारखें बेइमानी व देखने में सुंदर मन त्या एकमार्गी बुद्धीवर वजन पाडील, तिला मोहनी घालील, व लबाड चेष्टेखोर माकड, भाजत घातलेल्या शेंगा ज्याप्रमाणें मांजराचा पंजा धरून काढून खातें, त्याप्रमाणें तिच्या **माहितीचा आणि तरतरीतपणाचा** मात्र आपली स्वैर हौस पुरवून घेण्याचे कामीं उपयोग करील. म्हणून शरीराकडून उपयुक्त कार्य करून घेण्यास बुद्धीची नुसती माहिती किंवा तरतरी हीं पुरणार नाहींत; तर मनाला संभाळून घेण्याची व केलेला हुकूम मानायला लावण्याची कुवतही तिच्या ठिकाणीं मुख्यतः असली पाहिजे. अथवा असेंही म्हटलें असतां चालेल कीं, एकवेळ बुद्धीचा नुसता माहितगारपणा कमी पत्करेल पण तिच्या ठिकाणीं मन आवरून धरण्याचें सामर्थ्यच मुख्यतः विशेष पाहिजे. मोहक गोष्टींनीं मोहून जाणाऱ्या मनाला आवरून धरून त्याची शेंडी सदसद्विवेकी बुद्धीच्या हातांत देण्याची करामत साधणें, म्हणजेच मनाची बहुतेक योग्य जोपासना करणें आहे. मनाची अशी जोपासना जेथें झाली नसेल, तेथील विद्वत्ता, मग ती कितीही मोठी असली तरी, कित्येक वेळां अपकारीही होते. विद्वान् असूनही निर्दय व अनीतिमान, आणि अविद्वान असूनही सदय व नीतिमान, असा जो विस्मयकारक चमत्कार आपल्याला पुष्कळ वेळां नीच वाक्पंडित व साधा सच्छील गृहस्थ यांत पहावयास सांपडतो त्याचें कारणच हे. ' विद्वांस-मपि कर्षति ' म्हणूनच माहितगार विद्वत्ता जरी पाहिजे, तरी तिच्या ठिकाणीं मुख्यतः या चंचल वृत्तीच्या इच्छाधर्मी मनाला आवरून इष्ट कार्य

करायला लावण्याचें सामर्थ्य पाहिजे. योग्य जोपासनेनें, तीव्र, विकासी व विवेकी बुद्धीच्या ठिकाणीं हें मनःसंयमसामर्थ्य उत्पन्न करण्याचें कारस्थान साधलें, तर त्या मनाच्या मदतीनें शरीराकडून कालपरिस्थितिनुरूप बहुमोल सत्कृति घडून येते.

निर्मनुष्य गिरिकंदरांत उग्र तपश्चर्या, सर्वसंगपरित्यागपूर्वक संन्यासदीक्षा, देहविस्मृतींत भजनतल्लीनता, फलत्यागपूर्वक विकट कर्तव्याचरण किंवा दधिचीप्रमाणें लोकहितार्थ आत्मसमर्पण वगैरे अध्यात्मिक भागांत बुद्धीच्या आधीन असलेलें मन, शरीराकडून सदिच्छेनें ज्याप्रमाणें साधारण मनुष्यास आश्चर्य वाटण्यासारखी निरनिराळी सत्कृति करून दाखवितें, त्याप्रमाणें आधिभौतिक क्षेत्रांतही तें मन, शरीराकडून कमी नवलाईच्या गोष्टी करवीत नाहीं. उदाहरणार्थ, नयनमनोहर इमारतींनीं व कलाकौशल्याच्या इतर बहुविध देखाव्यांनीं नटविलेलीं सुंदर शहरें, शेंकडों जीवांना पृथ्वीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत अल्पावधींत वाहून नेणारीं विमानादि सुखसंचारीं वाहनें, शीघ्र मनोगतीलाही जणुं वाकुल्या दाखवीत अद्भुततेनें दूरस्थ मनुष्यापाशीं गप्पागोष्टी मारतां येण्यासारखीं चमत्कारिक साधनें, साक्षात प्रलयकालाचें आगमन भासवून क्षणार्धांत साम्राज्यांची उलथापालथ करणारीं भयंकर शस्त्रास्त्रें किंवा तीक्ष्ण दंतनखांनीं युक्त अशा भीतिप्रद व्याघ्रसिंहांना गोजिरवाण्या गोवत्सांशीं लडिवाळपणानें वागडायला लावणारे अद्भुत प्रयोग वगैरे सर्व गोष्टी, दिसण्यांत मानवी शरीरांकडूनच होत आहेत हें खरें, पण कोणत्या शरीरांकडून ? तर **उपयुक्त व चमत्कृतिपूर्ण कृति करण्याची प्रेरणा करणारें, चंचल मन**, ज्या शरीरांत विकासशील, कुशाग्र व **कल्पक बुद्धिमत्तेच्या स्वाधीन** करून देण्याची किमया साधली गेली आहे, त्या शरीरांकडून होत आहेत. **नुसती मानवाकृति** धारण करणाऱ्या गलेलठ्ठ अथवा विलासी ठोंब्यांच्या शरीरांकडून नाहींत.

रिकामें न बसतां सतत कांहींतरी नवें नवें इच्छित असणें, हा मनाचा स्वभावधर्म आहे. भलतेंसलतें न इच्छितां त्या मनाला बुद्धिवादानेंच सद्वस्तूंची इच्छा करायला लावणें, ही त्या मनाची खुशामत अथवा जोपासना आहे व त्यानें तशी इच्छा केल्यावर मग युक्तिप्रयुक्तींनें ती इच्छा सुदृढ शरीराकडून पुरी करण्याचा प्रयत्न करणें ही कुशल बुद्धीची करामत आहे. आपल्या कौशल्यानें माहितीच्या जोरावर मनाची ती सदिच्छा कुशल बुद्धि पुरी करीलही, पण केव्हां, तर अगोदर मन तशी इच्छा करील तेव्हां. कारण इच्छा करणें हा मनाचा धर्म आहे. म्हणूनच नुसत्या सुदृढ शरीरापेक्षां, नुसत्या माहितगार व कुशल विद्वत्तेपेक्षां

किंवा नुसत्या या दोहोंपेक्षां सदिच्छा करणारें सन्मन हेंच श्रेष्ठ ठरतें आणि म्हणूनच त्यास बंधविमोचनाचें मुख्य कारण समजतात. पण मनाला कह्यांत ठेवण्याइतपत बुद्धीची प्रगल्भता व सारासारविवेचक शक्ति वाढली, म्हणजे मग तिला मनापेक्षां कोणी श्रेष्ठ ठरविल्यास त्यास मनाचीही हरकत राहणार नाहीं. असो.

चमत्कार नव्हे का ? सूक्ष्मदर्शक यंत्रानें सुद्धां जें दिसत नाहीं, किंवा सूक्ष्मभास यंत्रानें ज्याचा स्पर्शही कळत नाहीं, अशा केवळ तर्कगम्य अस्तित्वाच्या अत्यंत सूक्ष्म मनाचे स्वाधीन, किंवा त्याचे अनुरोधानें, या अफाट पृथ्वीतलावरील लहान मोठे, बरे वाईट सर्व व्यवहार असावेत, हें केवढें नवल ? पण ते तसे आहेत, हें मात्र अगदीं खरें. विशाल शाखाविस्तार दूरवर पसरून नभोमंडल भेदून जाणारा प्रचंड वृक्षराज, प्रथमतः मोहरी वरीहूनही लहानशा जागेंतच बीजरूपानें समाविष्ट झालेला असतो. हें नेहमींच्या माहितीचें म्हणून जितकें खरें, तितकेंच, या जड सृष्टींत, अनेकविध क्रिया, विविधरूपानें करिताना दिसणारें मानवशरीर, हें नामधारी बादशहाप्रमाणें केवळ निमित्तमात्र पुढें असून, खरी कर्तबगारी, त्या शरीरांत गुप्तपणें वास्तव्य करणाऱ्या सूक्ष्माहून सूक्ष्म अशा बिरबल मनाची आहे, हेंही तितकेंच खरें आहे. तेंव्हा असलें हें मन स्वाधीन असणें, ही किती महत्त्वाची गोष्ट मानली पाहिजे ? परंतु दुर्दैवाची व खेदाची गोष्ट, आपण ती तशी मानीत नाहीं. त्यामुळें देशांतील नुसती माहीतगार बुद्धीमत्ता व पुष्ट शरीरें, यांचा जवळजवळ दुरुपयोग होत राहून, हिंदूंच्या नामर्दपणाची, व पर्यायानें गुलामगिरीची नौबत, जगभर सारखी झडत राहिली आहे. विचार करा, इतके घोटाळ्याचे, गमतीचे, व **मोठमोठे विविध व्याप करण्याचें** सामर्थ्य मनाचे ठिकाणीं असतांना यःकश्चित् **मारामारींतील नुसता नामर्दपणा** घालविण्याचे कार्यही आपल्याला त्याचेकडून शरीरामार्फत करूनघेता येत नाहीं, हा कोणाचा दोष ? त्या शरीराचा नाहीं, किंवा त्या मनाचाही नाहीं, तर त्यांचेकडून कार्य करून घेणाऱ्या बुद्धीचा म्हणजे आपला, असें नाहीं का होत ?

हिंदुमुसलमान संबंधांत लज्जेनें मान खालीं घालायला लावणारा जो आपला नामर्दपणा दिसून येतो, तो मनाचें हें अथांग महत्त्व लक्षांत न घेतल्यामुळें, त्या दिव्य साधनाची जी आपल्याकडून अक्षम्य निष्काळजीची हेळसांड होत आहे, त्याचाच आश्चर्य वाटण्यासारखा परिणाम आहे. आश्चर्याचें कारण

असें, कीं हिंदूंप्रमाणेंच निःशस्त्र व संख्येनें तर फार कमी, अशा मुसलमानांशीं हिंदुंच्या मारामारीचा प्रसंग आला असतांना सरळ हिशेबानें संख्याधिक्य व न्यायाची बाजू हिंदूंकडे असल्यामुळें, त्यांच्या बाजूलाच जय दिसावा, पण तो राहिला बाजूलाच व उभयतांची बरोबरीही न दिसतां, उलट पराजय मात्र हटकून हिंदूंचा दिसतो. तेव्हां आश्चर्य नव्हे ? निःशस्त्रपणावरोबर निःशस्त्रपणा संक्षेपानें गेला, तीच गत बरोबरीच्या शिरगणतीची झाली, न्यायदेवता आंधळी, म्हणून विचारांतच घेतली नाहीं. परंतु बरोबरीहून अधिक असलेली हिंदूंची संख्या कोणीकडे खर्ची घालायची ? उलट पराभवांत ? वाः खासा न्याय ! प्रथम दर्शनीं न उकलणारें असें हें मोठें कठीण कोडें वाटतें खरें, पण तें सोडविण्याची किल्ली ( मानसं प्राणिनामेव सर्व कर्मैक कारणं ) या उक्तींतच ठेऊन दिलेली आहे. शरीराकडून होणाऱ्या सर्व क्रिया, मनाकडून त्यास होणाऱ्या प्रेरणेप्रमाणे होत असतात-सर्व विकारहेतूंचा उगमच मनांत, या त्रिकालाबाधित सत्यांतच ती किल्ली सांपडण्यासारखी आहे. तर मग हीच किल्ली चालवून आपल्याला असेंही समीकरण उजेडांत आणितां येईल कीं, शरीराला **बेहिंमतीपणाची** प्रेरणा करणाऱ्या मनाला, जर **मर्दपणा** दाखविण्याची प्रेरणा करण्यास लावतां आलें, तर तेंच मन त्याच शरीराकडून मर्दपणा तर निःसंशय करून दाखविलच, पण विशेष कुशल बुद्धीचें सहाय्य झाल्यास, याच काय पण केव्हांही कोणत्याही सत्कार्यांत उत्तम रीतीनेंही दाखवील. मनाकडून **स्वाभिमानी सदिच्छा करणाऱ्या प्रेरणा न झाल्यास**, नुसते सुदृढ, विद्वान, शोधक, व कलावान लोक, फसून शत्रूच्याच उपयोगीं पडतील. कुशल बुद्धीकडून, योग्य संस्कारांनीं इच्छा करणारें मन ताब्यांत ठेवून, व त्याला चांगल्या गोष्टींचीच इच्छा करायला लावून, शरीराचा सदुपयोग करणें, ही एक मोठी कष्टसाध्य अशी अजब किमया आहे. ती जर हिंदूंना साधली तर काय गंम्मत उडेल पहा.

मुसलमानांनीं हिंदूंना मारिलें, असेंच नेहमीं ऐकूं येत असल्यामुळें, ते आतां व पुढें केव्हांही मारणारच, हा जो एक कायमचा उगाच भीरु परिणाम, हिंदू मनावर बाणगुळाप्रमाणें बाजूस राहिला आहे, तोच मुळीं विरुद्ध शिकवणीनें, प्रथम छाटून टाकल्यासारखा होईल. स्पष्टीकरणार्थ आपण दुसरे एक दोन दाखले घेऊं. ब्राह्मण कसाही असला, तरी तो वंदनीय व श्रेष्ठ, अशी फार दिवसांपासून जुन्या मताच्या श्रद्धाळु मराठ्यांची वगैरे समजूत होऊन राहि-

त्यामुळें, अशक्त व अपराधी अशाही ब्राह्मणांवर ते सहसा हात टाकीत नाहींत, त्यांच्यानें टाकवतच नाहीं. पण ब्राह्मणांविषयींचा पूज्यभाव आजिबात नाहींसा होऊन उलट ब्रह्मद्वेषानें पछाडिलेले सत्यसमाजिष्ट व ब्राह्मणेतर, ब्राह्मणांचा निष्कारण छळ व अपमान सहजासहजीं करितात. तसेंच परंपरागत अदबीनें भिऊन वागण्याच्या संवयीमुळें अस्पृश्य लोक हिंदूंच्या अपमानकारक वागणुकीकडे, सहज कानाडोळा करितात. पण तेच बाटून मुसलमान झाल्यावर, तसल्याच वागणुकींचा हिंदूंस उलट अहेर करितात. त्याचप्रमाणें मुसलमानांशीं मारामारीचा प्रसंग आला असतांना, हिंदूंचा मारामारींतील हुरूप, मुसलमान आपल्याला मारणारच, या आगाऊ समजानें, मारामारीच्या अगोदरच निम्मे कमी होतो, व बाकीचा, पूर्वी सांगितलेल्या जातिसंस्था, पंथभेद, वगैरे कारणांनीं, प्रसंगीं उपयोगी न पडणाऱ्या पोकळ संख्याधिक्याच्या खात्रीनें नाहींसा होतो, व अखेर प्रत्यक्ष मारामारीचे वेळीं तो हुरुप शुन्यांशावर येऊन हिंदूंस चोप बसतो. मनाची, याच्या अगदीं उलट परिस्थिति मुसलमानांच्या बाजूला असते. हिंदूंशी मारामारींना ? उंः ? मारामार, लुटालूट, जाळपोळ, बाटाबाट, जुलूमजबरी, काय करूं तें होईल. घारीची झडप आली, म्हणजे कोंबडी जशी को—को—को करून खूप नुसता गोंगाट करितात, त्याप्रमाणें हिंदु लोक आरडाओरडीनें नुसता हलकल्होळ करून सोडतील; परंतु जुटीनें व हिमतीनें मारामारीस तोंड देणार नाहींत. कारण तो हलकल्लोळ प्रतिकारार्थ उठावणीचा नसून फक्त शक्य त्या सावधगिरीनें पळपुटेपणा करण्याचा असतो. अशी मुसलमानांच्या मनाची अगोदरच अनुभवानें समजूत होऊन राहिल्यामुळें त्यांस नसते अवसान चढतें. व त्यांत हिंदू म्हणजे काफर, त्यांना मारण्यांत किंवा जबरीनें बाटविण्यांत व त्यांच्या देवादिकांच्या मूर्ति फोडण्यांत पुण्यच आहे, या हलकट धर्मभावनेची भर पडून ते बेहोष होतात. व या धर्मवेडाच्या भरांत बायकाना पळवून त्यांचेवर जुलूम करण्याचा नीचपणाही त्यांच्यांतील कांहीं गुंडांकडून होतो. आणि प्रत्यक्ष लूट मारापेक्षां या शेवटल्या जुलूम जबरी होण्याच्या काळजीनें थरकांप भीत, हिंदू अधिकच गर्भगळीत होतात.

अहिंदूंच्या हातचें किंवा त्यांनीं नुसतें स्पर्शिलेलें कांहीं खाल्यानें मनुष्य अहिंदु होणें, देव मानलेल्या दगडास त्यांनीं स्पर्श केला तर त्यांतील देवत्व नष्ट होणें, बकऱ्यासारख्या वध्यपशूंपेक्षां गाईंत कांहीं विशेष पावित्र्य समजणें वगैरे

मानण्याच्या असल्या कांहीं सवयी जर हिंदु मनाला लागलेल्या नसत्या, तर निर्दयपणा हें एकच हत्यार त्यांना म्हणजे मुसलमानांना जिथें तिथें उपयोगांत आणावें लागतें. पण तशी स्थिति नसल्यामुळें बायकामुलांना पळवून बाटविणें, शिवाशिवीनें अगर अमंगल पदार्थ टाकून जलाशय व देऊळ भ्रष्ट करणें, केवळ हिंदु चिडतात म्हणून मुद्दाम गरीब गायांची हत्या करणें, देवांच्या मूर्ति फोडणें यासंबंधाची धमकी, हें हिंदूंच्या मनावर परिणामकारक रीतीनें केव्हांही नेमकें फेंकतां येण्यासारखें एक अमोघ शस्त्र मुसलमानांच्या हातांत कायमचें आलें आहे. शत्रू ज्यानें चिडेल, जें केल्यानें त्याचे मनाला फार वाईट वाटून तो खट्टू होईल तें करणें, हाही एक युद्धकलेचा गौण प्रकार आहे. म्हणून या शस्त्राकरवीं या नाहीं त्या बाबतींत वरचेवर होणाऱ्या सहज फजितीनें व अपमानानें एकसारखें अधिकाधिक खिन्न व नामर्द होत राहण्यासारखी हिंदु मनाची त्याच्या धर्मांतर्गत रूढ समजुतींनीं थोड्या गौण व्यवस्थेनें मुळांतच शत्रूंच्या हल्ल्याला सदैव उघडी, अशी असुरक्षित स्थिति होऊन बसली आहे. त्यामुळें. चुकून एखाद्या मारामारींत मुसलमान पराभूत झाले, तरी पळतां पळतां किंवा पळाल्यावरही संधि साधून एखाद्या तळ्यांत किंवा देवळात हाडकें वगैरे टाकून, किंवा एखाद्या कोनाकोपऱ्यांतील देव फोडून, किंवा गरीब बिचारी एखादी चुकार गाय कापून, किंवा तें न साधल्यास तिला भोसकून त्यांना आपल्या मनाचें व अनुयायांच्या मनाचें समाधान करून घेतां येतें व गेला बाजार पर्यायानें तरी, हिंदूंना थोडेसें खजिल करून दुखवितां येतें. पण हिंदूंतील गुंडांना देखील असलें कांहीं दुष्कृत्य करवत वा साधत नाहीं. कारण गुंड झाला तरी तो हिंदु गुंड. मनावर प्रेमळ भक्तीचे मवाळ सहिष्णु संस्कार करणाऱ्या आचारविचारांत नित्य वाढल्यामुळें, त्याच्या ठिकाणीं मुसलमानी कडव्या धर्मवेडांतील मूर्ख धाडस व अमानुष क्रौर्य हीं स्वभावतःच कमी असतात—नसतातच. शिवाय बाटगेपणाचा उद्भवच मुळीं हिंदु दृष्टीनें मुसलमानापासून असल्यामुळें हिंदु बाटतो त्या दृष्टीनें मुसलमान, आणि त्यांत हिंदूकडून कधीं बाटलाच जाणें शक्य नाहीं. पिरांची थडगीं सोडलीं, तर त्याचा निराकार देव गल्लोगल्लीच्या कोनाकोपऱ्यांतून उघड्या नागड्या स्थितींत शेंदुर फासून घेऊन, सहजासहजीं फुटून जायला कधीं लोळत पडत नाहीं. व सर्वसाधारण वृत्ति पहावी, तर हिंदुधर्माच्या मनुष्याशींही जो मुसलमान—हिंदु काफर म्हणून—नुसत्या माणुसकीनेंही वागण्यास तयार नसणार, त्याच्याशीं हिंदु मनुष्य, दादाबाबा करून सलगी करूं पाहणार.

मग येऊन जाऊन डुकरासारख्या मुसलमानी दृष्टीनें तर अप्रिय व घाणेरड्या अशा एकाद्या प्राण्याचा एकीकडे कोणी वध केल्यानें, त्याचें कुसुमाहून कोमल हृदय (!) कितीसें हळहळणार ?

अशारीतीनें मुसलमानाचें मन, प्रत्यक्ष लुटालूट, जाळपोळ व मारामार या क्रियांशिवाय बाकी बाबतींत नेहमीं सुरक्षित असल्यामुळें, व जाळपोळ लुटालुटीची गुंडगिरी, हिंदूंकडून सहसा कधीं होत नसल्यामुळें, व बायकापोरी पळवून त्यांच्यांशीं अनैतिक वर्तन करण्याचा विचार त्यांच्या मनाला शिवतही नसल्यामुळें, मुसलमानी मनावर ज्या त्या बाबतींत फजित पावून नामर्दपणाची उगाच पुटावर पुटें चढण्याचीं कारणेंच नाहींशीं झालेलीं असतात. लढाईवर जातांना मुलांमाणसांना बरोबर नेलीं म्हणजे समरांगणावर प्रत्यक्ष शत्रूंशीं दोन हात करतांना अर्धा जीव जसा पिछाडीस असलेल्या छावणींतील कबिल्यांत गुंतून राहतो व मनमोकळेपणानें शत्रूशीं झुंज घेतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच, हिंदूंच्या मनाची अवस्था, **या कायम काळजीच्या लटांबरामुळें**, नेहमींचीच चिंतातुर झाली आहे. असो. हीं जीं हिंदुमुसलमानांचीं शरीरें उलट सुलट क्रिया करतांना दिसतात, त्याचें कारण मुख्यतः त्या शरीरांतील **मनांवर झालेले परस्परविरुद्ध संस्कार** हें आहे.

अटत जाणारी हिंदूंची संख्या वाढविण्याकरितां, व विस्कळून भेकड झालेल्या हिंदूंस संघटित करण्याकरितां, शुद्धिसंघटनाची जी एक उत्तम चळवळ अस्तित्वांत आली आहे, ती—प्रौढमनांपेक्षां बालमनांवर तत्संबंधीं योग्य संस्कार करून मग शरीराकडून वाटेल तें करून घेतां येतें,—हें तत्त्व लक्षांत न घेतां नुसता गाजावाजा करून व केवळ पुष्कळसे पैसे जमवून त्याच जोरावर जर चालविली गेली, तर ती कदापि तितकीशी इष्टफलदायी होणार नाहीं. पुढारी मंडळींत सनातनी, समाजी असे पंथभेदांचे व सांप्रदायिक तऱ्हेचे तंटे बखेडे न होतां जरी बरेच दिवस टिकली, तरी तशा नुसत्या चळवळीनें, फार झालें तर 'संख्या' वाढेल, पण **हिंमत** वाढणार नाहीं. ती वाढायला आणि कमावलेल्या शरीराकडून योग्य कामीं दाखविली जायला **मनच** तयार केलें पाहिजे. **कळपांत चार पांच मेंढरें अधिक वाढलीं म्हणून लांडग्याला त्याची डर काय ?** असो.

परवशता व निःशस्त्रपणा, या बाबतींत साम्य असून, शिवाय सत्याच्या व संख्येच्या आधिक्याची अनुकूलता असूनही, मुसलमानांशीं प्रसंग पडला असतां, हिंदु लोक बहुधा हटकून फजीत कां होतात, तर केवळ मुसलमानी मनांच्या

उलट, हिंदूंच्या मनांवर होत असलेल्या, भ्याड विपरीत संस्कारांमुळें होतात: हें ठळकपणें नजरेंत भरावें, म्हणून, उभयतांच्या मनाची थोडी तुलनात्मक स्थिति सांगून, मनावरील संस्कारांचें महत्त्व, सुलभतेनें पटविण्याकरितां, हिंदुमुसलमानी संबंधाचा, हल्लीं प्रामुख्यानें जनतेपुढें असलेला दाखला घेतला आहे. मुसलमानांशीं वैर वाढविण्याकरितां, किंवा त्यांना त्रास देण्याइतपत हिंदू तयार होण्यांत म्हणजे मोठी इतिकर्तव्यता आहे, असें वाटण्याकरितां नव्हे. कारण यःकश्चित् मुसलमानांवर वर्चस्व मिळविणें, इतकें हलकें आपलें ध्येयच नाहीं. ती एक क्षुल्लक बाब आहे. मनावरील संस्कारांचे विलक्षण परिणाम याच उदाहरणांनीं पटतात असें नाहीं. त्याची प्रचिती, दुसऱ्या चांगल्या उदाहरणांनींही नेहमीं येणारी आहे.

हातांत तिरकमठा घेऊन, निर्दयपणानें केवळ वाटमाऱ्याचा धंदा करणारें वाल्मीकीचें तिरस्कृत शरीर, भक्ष्यप्राण्यांच्या हिंसेपासूनही परावृत्त होऊन, उग्र तपश्चर्या करण्यास प्रवृत्त होऊन जगद्वंद्य कसें झालें? एका हातांत नांगर धरून व दुसऱ्या हातांत आंसूड घेऊन, रानकाठीं शांतपणें शेतीभाती करितांना, तोंडानें इरीरी पोपो म्हणत काल कंठणाऱ्या भावड्या मावळ्यांचीं शरीरें, उत्साहमूर्ति शिवाजी भेटतांच, वीरश्रीनें फुरफुरून हरहर महादेव अशी भीषण गर्जना करीत, देशभर नंग्या तरवारीचा थैमान घालण्यास कशीं प्रवृत्त झालीं? अगोदर ऐषआरामांतच जन्मसाफल्य मानणाऱ्या कैकजणांच्या शरीरांकडून, लोकमान्यांनीं देशसेवेच्या गाड्याला जुंपून घेण्यांत जी अहमहमिका उत्पन्न करविली, ती कोणत्या जादूचा कुठें फुंकर घालून? १९२१ सालीं सर्वच्या सर्व हिंदुस्थान देश गदगदा हालून जाण्याइतपत, असहकारितेच्या मोहिनी मंत्राचा प्रयोग, गांधीजींनीं शरीराच्या कोणत्या भागावर केला? मदोन्मत्त व दुराग्रही अशा कांहीं जहाल सरकारी अधिकाऱ्यांनाही चकीत करून सोडणारा आत्मयज्ञ शिखांनीं चालविला, तो काय त्यांनीं आपल्या नुसत्या धिप्पाड शरीरांच्या, जोरावर? क्रूरकर्मा सडेसोट उंच पठाण, शरीरानें मोठा असला, तरी दिसण्यांतच चेहऱ्यानें भयप्रद कां दिसावा? आणि दादासाहेब वहिनीसाहेब यांचेमध्यें, शेंपटीवांचून कुडुंया कुत्र्याच्या लुब्रेपणानें व्हयत व्हयत करीत घुटमळणारा व उरल्यासुरल्या कोमट चहाच्या घोटानें खूष होणारा कोकणी बाळू शरीरानें लहान असला, तरी पाहतांच बुळा व बेंगरूळ कां दिसावा? त्याच्यापेक्षांही बुटगा अशा जपान्याप्रमाणें आंतल्या गांठीचा कुरेबाज कां दिसूं नये?

अन्नपाणी व हवामान यांमुळें शरीर कमीअधिक पोसलें गेलें तरी, अंतःकरणाचें प्रतिबिंब, तोंडावर एवढ्या फरकानें कां उमटावें? सगळ्याला एकच उत्तर-**मनावरील निरनिराळे संस्कार व संस्कार ग्रहण करणारें मन.** ज्या मनांवर जसे संस्कार घडून येतात, तदनुरूप गुण, तें मन धारण करणारें शरीर, व्यक्त करितें. व त्या संस्कारांनीं अंतःकरणांत व मेंदूंत बनलेल्या विचारांची छटा, चेहऱ्यावर प्रतिबिंबित होते.

अमुक जाती लढवय्या, अमुक जाती भित्र्या, अमुक जाती गुन्हेगार, अमुक भोळ्या व अमुक बुद्धिमान् किंवा बेइमान, असे त्या त्या जातींची प्रस्तुतची सर्वसाधारण वागणूक पाहून म्हणण्यांत येतें. व पिढ्यानपिढ्या लहानपणापासून त्या त्या प्रकारचे त्या लोकांचे मनांवर संस्कार परिणाम होऊन, वर्णनाप्रमाणें त्या जाती पुष्कळ अंशीं तशा असतात, हेंही खरें. पण मनावर व्यवस्थित रीतीनें लहानपणापासून उलट प्रयोग केले असतांही, न बदलतां, यावच्चंद्र दिवाकरौ टिकण्यासारखे त्यांचे ते स्वभाव असतात, अशांतला मुळींच भाग नाहीं. मेकॉले साहेबानें, मागें बंगाली लोकांचे केलेले बायकी वर्णन, व बंगाल फाळणीचे वेळीं, बंगाल्यांनीं देहधनाच्या बेफिकीरींत बाणेदार तडफ दाखविल्यावर, दुसऱ्या साहेबांनीं त्यांचे केलेले भीत्युत्पादक वर्णन, या दोहोंमधील विस्मयकारक फरक, हेंच दाखवितो. कोणी मूलतः कसाही असो; युक्तीनें त्याचे एकदां शरीराकडून इच्छेनुरूप कार्य करणारें **मन वळवा**, म्हणजे तुम्ही धराल त्या ठेक्यावर **अर्थात् अवसानाप्रमाणें**, तो नाचेल.

दया, क्रौर्य, भीरुता, शौर्य, हौस, औदासिन्य वगैरे जीं जीं कार्यें भावी पिढीच्या शरीरांकडून तुम्हांला करून घ्यायचीं असतील, त्या त्या कार्यांना पोषक, अशा आचारविचारांचा, त्यांच्या शरीरांतील कोमल मनांवर, शास्त्रोक्त व पद्धतशीरपणानें मोहक मारा करून, त्यांचीं मनें भारून टाका, म्हणजे त्यांचीं शरीरें, तुमच्या हेतूप्रमाणें वागतील. कारण जगांतील एकंदर व्यवहार सरितेचें उगमस्थान, असें महत्त्वच त्या मनाचें आहे. कार्यप्रवाहांना, उगमापाशींच अनेक मार्गांनीं सौख्यसागराकडे जाण्याचें इष्ट वळण लागावें, म्हणून व्यवहाराचें हें उगमस्थान, अमुक करावें अशी इच्छा करणारें हें प्रेरक मन कोमल आहे, तोंच, आपलेंसें करून घेण्याकरितां त्याचीच मुख्य जोपासना करावी, हें सांगितलें. आतां कां करावी, कोणत्या उपायानें कशी करावी, वगैरे पुढल्या प्रकरणांत सांगूं.

---

# गृहशिक्षण.

## अवश्यकता, उद्देश, तात्त्विक पाया, मार्गाची स्थूलरूपरेखा

### अवश्यकता.

जलाशयांत नांव नुसती तरंगते, वायूची लहर व पाण्याची लाट यांच्या धक्यानें आपोआप डुलत, इतस्ततः फिरकते. पण ऐच्छिक गति, तिच्या स्वतःच्या ठिकाणीं नसते. मात्र तिच्यावर नाखवा बसला म्हणजे वल्हें व सुकाणूं, यांच्या सहाय्यानें तो तिला आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल तिकडे नेण्याचा प्रयत्न करतो. शहाणा असेल तर दगड, धोंडे, झुडपे, भोंवरे चुकवून इष्टस्थलीं सुरक्षितपणें जातो. मूर्ख असेल तर वाटेंत कोठेंतरी संकटांत सांपडतो. होडी हाकारण्याच्या पूर्वीच जर त्याला त्या मार्गांतील वळणांची व धोक्याच्या जागांची माहिती मिळाली असली तर ठीक, नाहींतर मागें फिरकतां येत नाहीं व पुढेंही सरकतां येत नाहीं, अशा अडचणीच्या भलत्याच ठिकाणीं एकदां अडकून बसला म्हणजे मागाहून मग त्याला कोणी त्या बिकट प्रवाहमार्गाची माहिती सांगितली, तरी त्याला तिचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

संसारसरितेवर मानवी देहनौकेची अशीच स्थिति आहे. रुधिराभिसरणा-प्रमाणें देहांत चालणाऱ्या जीवनक्रिया तर मनुष्याचे नकळतच चालत असतात. पण शरीराकडून संसारव्यवहारांत बऱ्या वाईट व लहानमोठ्या ज्या इतर गोष्टी घडतात त्या, त्या देहांत असलेल्या मनबुद्धिरूप नावाड्यांच्या संगनमतानें झालेल्या प्रेरणेनुसार घडत असतात. मन व बुद्धीकडून होणाऱ्या प्रेरणा, मनबुद्धी-वर होणाऱ्या बऱ्यावाईट संस्कारानुरूप होत असतात. असे संस्कार सद्धेतुपूर्वक व सशास्त्र पद्धतीनें केले गेल्यास देहाकडून घडणाऱ्या क्रियाही चांगल्या होतात., व ते वेळेवर अल्पवयांतच सुरू केले गेले असतां जसे परिणामकारक, मार्गदर्शक व दृढमूल होतात, तसे प्रौढपणीं सुरू करून होत नाहींत. शिवाय, स्वकीय पण मूर्ख अशा किंवा वाईट परसत्तेखालीं, तसे संस्कार इच्छेनुरूप व राजरोसपणें करायला उत्तेजनही मिळत नाहीं, उलट आडकाठी होते. व असे संस्कार तर अल्पवयांतच सशास्त्र पद्धतीनें सुरू करून कायमचे चालवावे लागतात तेव्हांच ते सुखदा-यक व सुपरिणामी होतात.

हल्लीं प्रजेच्या अवाढव्य संख्येच्या मानानें नुसत्या साक्षरतेचेंही प्रमाण अजून जरी पुष्कळच कमी आहे तरी, पूर्वीच्या मानानें आतां तें पुष्कळ वाढलें आहे. व यापुढें वाढतेंच राहणार, यांत शंका नाहीं. पण विद्यार्थ्यांना लहानपणापासून सरकारी व निमसरकारी शाळांतून सध्यां जें शिक्षण मिळतें, तें खरें अभ्युदय-कारक शास्त्रनियमानुसार नसून पुष्कळ निरर्थक गोष्टींची खिचडी–वरवर केवळ त्रोटक माहिती करून देणारें–असें मिळतें. व जें मिळतें तेंही मिळविण्यास पैसा वाजवीपेक्षां भारी लागतो, कष्ट निष्कारणपणें अति होतात, व तरुणपणचें उत्साही आयुष्य निष्कृतींत लोप पावतें. अर्थात् पैसा, श्रम व आयुष्य या अमोलिक गोष्टींचा असा अनाठायीं व्यय झाल्यामुळें व्यवहारांत त्या शिक्षणाचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. तथापि हिणकस का होईना, तें शिक्षण सुवर्ण आहे असें म्हणून लोक त्याचा स्वीकार करतात व ' अकरणान् मंदकरणं श्रेयः ' या न्यायानें करावाही लागतो. पण विद्यार्थी स्वावलंबी, स्वतंत्र वृत्तीचे, शील-वान्, पराक्रमी आणि कर्तबगार होऊन, विशेषतः आपला व आपल्या देशाचा उद्धार करण्याची हाव बाळगून त्याप्रमाणें कृति करणारे व्हावेत, हा मुळीं त्यांत हेतूच नसतो. आणि असेल तरी कसा ? परकी राजसत्ता जें शिक्षण देईल, त्यांत आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्याचें धोरण उघड्या डोळ्यांनीं राजरोसपणें ती कसें चालू देईल! म्हणून राजसत्तेला न दुखवितां,शक्य तितकें अधिक कल्या-णप्रद अशा शिक्षणाची उणीव भरून काढण्याकरितां चालू शिक्षणाला **जरूरीची मदत** म्हणून मुख्यतः **खासगी व सार्वजनिक गृहशिक्षणाची** आवश्य-कता आहे. निश्चयानें, युक्तिपूर्वक व धर्मकर्तव्य म्हणून दिल्यास, बहुधा त्याच्या कोणी वाटेसही जाणार नाहीं. परसत्तेनें डोळ्यांत तेल घालून स्वहिताला जपणें, हें जसें स्वाभाविक त्याप्रमाणें आपल्या मुलाबाळांचें कल्याण ज्या गोष्टींत आहे, ती गोष्ट एकदम सरळपणानें करतां न आल्यास विरोधकांची समजूत करून हिक-मतीनेंही तडीस नेणें नैसर्गिक व मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. इतकेंच काय पण तसें करण्यास आपण परमेश्वरी आज्ञेनें बांधलें गेलों आहों. जन्म दिलेल्या मुलाबाळांची नुसत्या पोटापाण्याचीच नव्हे, तर शीलसंवर्धनाचीही काळजी त्यांच्या आईबापांनीं घेतलीच पाहिजे. पारतंत्र्यांत पशूंप्रमाणें खितपत पडून न राहतां, किंकर्तव्यमूढ होऊन, किंवा आहारविहारांतच इतिकर्तव्य न मानतां देणगीदाखल प्राप्त झालेल्या विशिष्ट बुद्धिमत्तेच्या सहाय्यानें, मानवांनी आपला उद्धार करून घेऊन जगाच्याही प्रगतीस मदत करावी, असा ईश्वरी संदेश दिसतो

अर्थात् त्याचा अव्हेर करणें, तो न मानणें, म्हणजे मोठा गुन्हा आहे. त्याचें प्रायश्चित्त, अधोगतीस कायमचें विलगण्यांत व्हायचें, हें ठरलेलेंच आहे.

**यशाची हमी न मागतांही** केवळ सदाशेनें कर्तव्य म्हणून, सतत प्रगमनशील व सुसंघटनात्मक कुशल प्रयत्न करीत राहिलेंच पाहिजे, असाच परमेश्वराचा सृष्ट्युत्पत्तिपासून चालू असलेल्या सृष्टिव्यापारांवरून संकेत दिसतो एवढें मात्र खरें; आतां जगदीशाचा असाच संकेत कां असावा आणि यापेक्षां दुसरा तिसरा कां नसावा, हें आपण पामर कोण विचारणार ? आणि विचारणार तरी कोणत्या साधनानें आणि कसें? धन्याचा धनी कोणी आहे का आणखी? तेव्हां आहे या स्थितींत त्या सर्व श्रेष्ठाचा व सर्वज्ञाचा तो योग्य संकेत ओळखून व मानून त्याप्रमाणें निमुटपणें वागणें म्हणजेच आपलें कर्तव्य करणें होय, म्हणजेच त्या जगदीश्वराची पूजाअर्चा व सेवा करणें होय. जर अधोगति चुकवायची असेल, तर असें कर्तव्य–अशी ईशसेवा करण्याची मनाला इच्छा होणें व ती पुरी करण्यास बुद्धिद्वारें शरीराचे ठिकाणीं पात्रता येणें, या मानसिक व शारीरिक गोष्टी, **गृहशिक्षणाच्या बिनतोड व्यापक साधनानेंच** हल्लींच्या परवशतेच्या दिवसांत साधतां येतील, म्हणून त्याची अवश्यकता आहे. मात्र तें शिक्षण **बालपणींच सशास्त्रपणें सुरू केलें पाहिजे.**

## उद्देश.

भावी पिढी सुशील, सुदृढ, सदाचारी, उद्यमशील, स्वातंत्र्यप्रेमी, अन्याय व जुलूम यांचा तिटकारा करणारी, धैर्यशाली, स्वतःचा संसार नीटनेटका करीत असतांनाच, वेळ आल्यास, लोकहित साधत असेल तर, साधणार असेल त्या मानानें **आत्मसमर्पणापर्यंत स्वार्थत्यागी**, प्रेमळ पण **व्यवहारकुशल** व पुराण मित्येव न साधु सर्व नचापि काव्यं नवमित्य वंद्यं हें वचन दृष्टिसमोर धरून सुसंघटनात्मक प्रगमनशीलतेवर विश्वसणारी व्हावी.

## तात्त्विक पाया.

जरूर वाटल्यास कमी जास्ती किंवा फेरफार करून जीं तत्त्वें गृहशिक्षणानें मनावर बिंबवायचीं तीं.

१ कारणाशिवाय कार्य नाहीं, या साध्या न्यायानेंच आश्चर्य कारक विराट विश्वकर्त्या अशा सर्वाधार परमेश्वराचें अस्तित्व सिद्ध आहे.

२ परमेश्वराची उत्पत्ति व त्याच वास्तविक स्वरूप आणि गुणधर्म, याविषयीं मानवांना विद्यमान इंद्रियांच्या साहाय्यानें—त्यांची अकल्पित वाढ झाल्याशिवाय—-कांहींही तूर्त यथार्थपणें अधिक खरें व पूर्ण असें कळण्यासारखें नाहीं. त्याचप्रमाणें प्राण्यांच्या जन्मापूर्वीची व मृत्युनंतरचीही स्थिति, त्याच कारणानें वास्तविकपणें कोणाला कळण्यासारखी नाहीं. सर्व अनुमानांचा बाजार आहे. मग तो कितीही सयुक्तिक दिसो.

३ याच गोष्टीविषयीं थोर थोर साधुसंत जें सांगत आले आहेत तें वास्तविक नसलें किंवा चिकित्सक युक्तिवादास पटत नसलें, तरी तेवढ्यावरून त्या सज्जनांस खोटें बोलणारे असें मानण्याचे कांहींच कारण नाहीं. कारण ते जरी सर्व तर्क ठरत असले तरी ते उत्कट सुश्रद्धेनें व सद्धेतूनें मानवकल्याणार्थच व खरोखरच त्यांस दृष्टांताप्रमाणें तसे वाटल्यावरून ते त्यांनीं केलेले आहेत. अर्थात् साधुसंत सदा वंदनीयच आहेत.

४ परमेश्वर एक आहे. विश्वांतील सर्व चराचर वस्तूंप्रमाणें मनुष्यांनाही त्यानेंच निर्माण केलें आहे, अर्थात् सर्व त्याचीच संतति आहे. तेव्हां सर्वांनीं एकमेकांशीं सख्या बंधुत्वाच्या किंवा फार झालें तर जिवलग मित्रत्वाच्या प्रेमळ नात्यानें वागून चालणें व परमेश्वरास शरण असणें, हाच त्यांचा समान धर्म आहे.

५ सर्वांना उत्पन्नकर्ता एकच विधाता असल्यामुळें जन्माचा उच्चनीचपणा जो असेल तो सर्वांचा सारखाच आहे.

६ अमुक मानववंशांत, तमुक देशांत, या जातींत, किंवा त्या कुलांत, जन्मास येणें कोणाच्या हातचें नाहीं; व त्यामुळें जन्मसंबंधांत अभिमानाला किंवा खेदाला तसेंच वंदनाला किंवा तिरस्काराला वास्तविक अवसर नाहीं.

७ व्यवहाराच्या सोयीसाठीं गुणकर्माप्रमाणें श्रेष्ठकनिष्ठपणा मानावा लागेल व तसें करणें अवश्यकही आहे. तरीसुद्धां येथें गर्व वाहण्याचें किंवा खजिल होण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण महत्पदप्राप्तीला किंवा थोर हानीला कुशल अकुशल प्रयत्नाप्रमाणें जागतिक विविध व्यवहारांच्या कांहीं आकस्मिकपणें व घुणाक्षरन्यायानें सहज घडून येणाऱ्या साहजिक योगायोगांचीही मदत झालेली आपण पुष्कळवेळां पाहतो. म्हणून खरें म्हटलें म्हणजे मानापमान गुंडाळून ठेवूनच व प्रसंगीं फलप्राप्तिविषयीं अनासक्त राहूनही हौसेनें व हिमतीनें स्वकर्तव्याचरण उत्कटतेनें करीत राहणें, हेंच मानवांचें काम आहे

८ दैव म्हणजे योगायोग Chance मुद्दाम घडवून आणल्याशिवाय घडून येणें. रूढ समजुतीप्रमाणें दैव मानलें तर प्रयत्नाची आवश्यकता नाहींशी होऊन जीवनक्रमांतील स्वारस्य नष्ट होतें. जगतांत किंवा मानवी व्यवहारांत काय काय गोष्टी घडून येणार, हें अगोदर ठरलेलें नसतें. पण ज्या घडतात, त्या कशा म्हणजे कोणत्या नियमांनीं घडतात किंवा घडणार हें मात्र ठरलेलें असतें. पूर्वपुनर्जन्म खरा असो वा नसो पण जन्मानें प्राप्त होणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टींचें बरेंवाईट श्रेय जीवाला देतांच येत नाहीं. कारण **मागील जन्माची आठवण व पुढील जन्माची जाण त्यास नसते**. एकाच परिस्थितींतील मनुष्यांच्या इंद्रियांच्या शक्तींत व्यक्तिपरत्वें फरक दिसून येतो; कारण जन्माबरोबर प्राप्त होणाऱ्या निरनिराळ्या इंद्रियांच्या शक्तींची वाढ, संधि मिळाल्यास परिस्थितिप्रमाणें जास्तींत जास्ती ज्याचीत्याची किती होईल, हें जन्माबरोबरच ठरलेलें असतें. तेव्हां योग्य संधि व अनुकूल परिस्थिति असूनही आपल्या इंद्रियांच्या शक्तींची अंतिम वाढ गांठण्याचा एखाद्यानें यत्न न केल्यामुळें तो मूर्ख व अभागी राहिल्यास तो दोष त्याचा आहे. येथें दैवाचा कांहींएक संबंध नाहीं.

९ एखाद्या बलाढ्य अशा मानवी साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत कांहीं ठराविक बाबतींत विशिष्ट मर्यादेपर्यंत सनदशीरपणानें प्रगति करून घेण्यास अंकित प्रजाजनांना ज्याप्रमाणें पूर्ण मोकळीक असते, त्याप्रमाणें परमेश्वरी साम्राज्यांतही प्रगमनशीलपणानें कुशल यत्नपूर्वक उत्क्रांत होत जाऊन **कांहीं इच्छित बाबतींत मर्यादा गांठण्यास मात्र मानवांना मुभा** ठेवलेली आहे. असें इतर प्राणी वगळून मनुष्यांसच दिलेल्या, **वाढत्या विशिष्ट बुद्धिमत्तेच्या** देणगीनें सुचवून आज्ञापिलें आहे असें वाटतें. तेव्हां अर्थात् दैवाच्या गोष्टी बोलून, आळशी राहून, मोहवश होऊन, हलकट स्वार्थांत गुरफटून, विद्या व विनय सोडून, किंवा नामर्दपणानें **या अंतर्गत स्वराज्यांत करून घेतां येण्यासारखी आहे तेवढीही प्रगति करून घेण्याचें** कुशल कर्तव्य न बजावणें, म्हणजे परमेश्वराचा आज्ञाभंग करून शिवाय वर निर्लज्जपणें शृंगपुच्छहीन असे आम्ही पशु आहों, आम्हांला त्या दर्जानेंच वागीव, अशी कबुली देण्यासारखेंच आहे.

१० इष्टफलप्राप्तीसाठीं, योग्य प्रयत्न न करितां लाचलुचपतीचे नवस करून देवाला भुलवूं पाहणें, रडून कळवळा आणूं पाहणें, अथवा त्रागा करून त्यास भेव-

डावूं पहाणें, म्हणजे परमेश्वर सर्व बाबतींत आपल्यापेक्षां कमी योग्यतेचा आहे असें मानून त्यास फसविण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. शिवाय यायोगानें सृष्टिचक्राच्या गतिनियमांचें आपलें अज्ञानही प्रकट होतें. कारण अंतरिक्षांतील, भूपृष्ठावरील व भूगर्भांतील सर्व घडामोडी निसर्गाच्या ठराविक नियमांनुसार इतक्या कांहीं अचुकपणें होत असतात कीं, ते नियम मोडून आपली लहर म्हणून कांहीं करण्यास स्वतःसाठीं परमेश्वरानें एखादा जादा अधिकार राखून ठेवलेला दिसतच नाहीं.

११ असें आहे तरी संकटकालीं, आनंदाच्या वेळीं व एरव्ही परमेश्वराचा स्तव व गुणानुवाद सज्जनांच्या सांगीप्रमाणें हौसेनें करावा. त्यानें कर्तव्यशील व निगर्वी मनुष्याचें हृदयस्थैर्य सुखानें बाहेर पडून त्यास शांतीचा लाभ घडतो. नास्तिकवादाकडे झुकणाऱ्या मनुष्यानें सुद्धां मानीव परमेश्वराला मोठेपणा देण्याच्या सुरक्षित बाजूनें चुकण्यांत धोका नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

१२ दुष्कृत्यांबद्दल राजदंडाची, समाजाची किंवा मरणोत्तरच्या काल्पनिक शिक्षेची भीति मानावी, परंतु कोणी न मानली तरी स्वतःच्या मनःस्वास्थ्यासाठीं व जनतेच्या व्यवहारक्षमतेसाठीं त्यास सदाचारानें वागणेंच प्राप्त आहे.

१३ वागणुकींत सचोटी औदार्य व परस्परविश्वास अवश्य पाहिजेत. पण त्यांत व्यवहाराची माहिती व कौशल्य यांची भर पाहिजे. कारण लबाडाशी वागतांना सरसकट निष्कपटी सरळपणा, भोबदला व मागणारी पवित्र सद्‌भावना व भुळा प्रामाणिकपणा मुळींच उपयोगी नाहीं. कारस्थानांत उदंड सावधानता असेल, तरच निभाव लागेल. कारण प्राणिमात्र साधारणपणें जात्याच कमी अधिक अकलेप्रमाणें स्वार्थी व लुच्चा आहे.

१४ योग्य कारण नसतांना व वेळ अवेळ न पाहतां, शत्रूचा उगाच कटु शब्दांनीं द्वेष करूं नये किंवा पोरकट कृत्यांनीं त्याचा अपमान करून व त्यास चिडवून अधिक दुष्ट व सावध होण्याची त्यास संधीही देऊं नये. हरतऱ्हेनें त्याला हतबल करण्याचें उद्दिष्ट मात्र सदैव डोळ्यापुढें ठेऊन परिस्थितिप्रमाणें प्रयत्न करीत असावें.

१५ बलाढ्य व नीच शत्रूचा तर पूर्ण विश्वास संपादन करून घेऊन योग्य संधीची खात्री पटतांच आपला कार्यभाग साधावा. कारण बलवान व महादुष्ट आणि अतिलोभी अशा शत्रूंपाशीं धर्मानें व बेगरूळपणानें वागून न्याय मिळण्याची आशा करण्यांत कधींच अर्थ नसतो.

१६ सबसे जीव प्यारा, आत्मानं सततं रक्षेत्, पैसा हा व्यवहाराचा व जीवनाचा मुख्य आधार, या गोष्टी खऱ्या आहेत. तथापि सारासार विचारानें प्रसंग ओळखून व आपल्या जीविताची आणि आपल्या संपत्तीची योग्यता ठरवून सर्वसाधारणपणें व्यक्तीचें हितापेक्षां कुटुंबाचे हित जास्ती, कुटुंबाचे हितापेक्षां आपल्या नेहमींच्या समाजाचे हित जास्ती व अशा समाजाचे हितापेक्षां राष्ट्राचें हित जास्ती, असें मानून प्रसंगाच्या गंभीरपणाच्या मानानें फुकटच्या दोन गोड किंवा कडु शब्दांपासून तो सर्वस्वापर्यंत कमी अधिक त्यागाची तयारी आनंदानें करतां आली पाहिजे.

१७ संकटांतून बाहेर पडायचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून व विरोधी परिस्थितीशीं स्वसामर्थ्याचा मेळ घालून ज्यावेळीं जे उपाय करतां येण्यासारखे असतील, त्यावेळीं तेंच उपाय केले पाहिजेत. आवांक्याबाहेरील कार्यास हात घालणें अव्यवहार्य आहे. त्यामुळें परिस्थितीचा बिकटपणा मात्र वाढतो. पण याचा अर्थ त्यागवृत्ति सोडावी व ध्येयविन्मुख होऊन स्वस्थ बसावें असा मुळींच नाहीं; तर आपली कुवत वाढवीत राहून धिम्मेपणानें व दूरदृष्टीनें प्रतिज्ञापूर्वक एक एक निश्चयाचें पाऊल पुढें टाकीत टाकीत संकटमुक्त होण्याचें धोरण असावें, इतकाच आहे.

१८ भावनावश होऊन विलंब न करितां तडकाफडकींच साधल्या पाहिजेत अशाही कांहीं गोष्टी व वेळा असतात; पण त्या फार थोड्या असतात. साधरणपणें साधकबाधक गोष्टी नीट ध्यानांत आणून, व युक्तिबाजपणानें नीट तयारी करूनच प्रतिक्रियेचें कार्य हातीं घेतलें पाहिजे. यामुळें थोडा जास्त वेळ लागतो; पण यशाचा संभव अधिक वाढतो.

१९ यश पदरांत पडून भोगायला सांपडत असेल, तरच त्यागवृत्ति स्वीकारावी किंवा कार्याला हात घालावा असें नाहीं, तर आपल्या प्रयत्नानें किंवा त्यागानें ध्येय जवळ येत असेल तरीही तसा उद्योग करावा. ध्येयसिद्धि जी मनानें जाणली, ती डोळ्यांनींही पाहिली. प्रत्यक्ष पाह्यची ती आप्तस्वकीयांपैकीं कोणीही पाहो. इतकी निष्ठा व इतकें औदार्य पाहिजे.

२० मागाहून ऐश्वर्य भोगणाऱ्यांपेक्षां खरें श्रेय अगोदरच्या त्यागी व कर्तव्याचरणी लोकांसच आहे.

२१ लोककल्याण चांगलें व पुष्कळ करतां यावें म्हणूनच विद्या संपादन करावी, उद्योग करावा, सुदृढ बनावें व द्रव्यसंचय करावा. आणि अशा रीतीनें

खासगी संसार चालवीत असतांनाच वेळ येईल तसतसें लोकहित साधत असेल, तर तें साधणार असेल त्या मानानें साधण्याकरितांच जरूर असेल त्या गोष्टीवर जरूरीइतकें आनंदानें उदक सोडावें.

२२ सुसंस्कृत मन व सुदृढ शरीर असल्याशिवाय कोणतेंही खासगी अगर सार्वजनिक कार्य नीटपणें होत नाहीं. व अशीं सुसंस्कृत मनें व सुदृढ शरीरें असलेल्या प्रगतिपर सुसंघटित लोकसंग्रहाचें पाठबळ असल्याशिवाय राष्ट्रकार्याचें पाऊलही पुढें पडत नाहीं.

२३ स्वतंत्र असणें हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो प्राप्त करून घेण्याकरितां व प्राप्त झाल्यावर त्याचें रक्षण व्हावें म्हणून मनुष्यांनीं सुसंघटना करून परिस्थितिनुरूप प्रगतिपर कुशल प्रयत्न करीत असणें, हें त्याचें धर्मकर्तव्य आहे.

२४ एवढा अट्टाहास करून युक्तिपूर्वक स्वतंत्र असण्याचें जें धर्मकर्तव्य करायचें, तें दुसऱ्यांस त्रास देऊन आपली चैन चालविण्याकरितां नव्हे, तर तसें करणाऱ्यांस सन्मार्ग दाखवून ताळ्यावर आणण्याकरितां, अन्याय व जुलुम यांपासून स्वतःची व दुसऱ्यांची सुटका करून घेण्याकरितां व अशीं सत्कार्यें करीत राहून त्याच उद्देशानें राष्ट्रसंघ स्थापन झाला असल्यास, त्याच्या कार्याला हातभार लावतां यावा म्हणूनच तें स्वतंत्र असण्याचें प्रगतिपर व व्यापक धर्मकर्तव्य सुसंघटना करून करायचें आहे.

## गृहशिक्षणाच्या पद्धतीची स्थूल रूपरेखा.

गृहशिक्षण देणें तें शास्त्रोक्त नियमांनुसार दिलें पाहिजे. कोणीकडे तरी एकसारखे भरमसाटपणानें नित्य दगड भिरकावीत राहिल्यास, न दमतां नुसत्या दगडफेंकीची फार तर सवय होईल. पण अचुक नेम मारणें साधणार नाहीं. त्याप्रमाणें ज्या गोष्टीसंबंधानें व ज्या हेतूनें शिक्षण देणें असेल, तें त्यासंबंधीं असलेल्या शास्त्रनियमांप्रमाणेंच पद्धतशीरपणानें व हेतुपूर्वक दिलें पाहिजे. कांहीं तरी सतत कार्य करीत राहण्याची हौस असलेल्या इच्छाधर्मी चंचल मनाला सारासार विचार करूं शकणाऱ्या प्रगल्भ व कुशल बुद्धिमत्तेच्या तंत्रानें सत्कार्यच करण्याची इच्छा करायला लावणें व श्रेष्ठ बुद्धीच्या माहितीनें सुदृढ देहाकडून तें सत्कार्य पुरें करण्याचा प्रयत्न करविणें ही गोष्ट, तें ध्येय बाळगून शास्त्रोक्त अशा दीर्घ शिक्षणाभ्यासानेंच साध्य होईल. तसें न केल्यास त्याचें नाटक होईल.–' तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ '–

मनुष्यमात्राचे ठिकाणीं अशा प्रकारानें मन व बुद्धीचें देहाला 'अमुक कर' म्हणून आज्ञा करण्याचे बाबतींत योग्य संगनमत व्हावेंयासाठीं, वाटेल त्या रंगाबरोबर मिळूनमिसळून जाणाऱ्या स्वच्छ पाण्याप्रमाणें ज्यावेळीं मानवी मनाची व बुद्धीची शुद्धावस्था असते, किंवा वाटेल तसें वळविलें जाण्यास नूतन वेलाप्रमाणें कोमल अवस्था असते, अथवा होतील ते संस्कार ग्रहण करण्यास क्षुधिताप्रमाणें आतुर अवस्था असते त्यावेळीं, म्हणजे अनिष्ट विकारांच्या संस्कारांनीं मन व बुद्धि, दूषित, कठोर व लिप्त नसतात अशा, बालपणांतील निर्मल, कोमल वरिक्त अवस्थेपासूनच त्यांच्यांवर इष्ट संस्कारांचे सशास्त्र प्रयोग करण्यास सुरवात केली पाहिजे. शिक्षणाचा हा अगदीं मूळपाया—हें प्राथमिक काम—पुरुषांपेक्षां स्त्रियांकडूनच उत्तम होईल. बाल्यावस्थेंत मातांचाच बालकांशीं अधिक संबंध येत असल्यामुळें, या कामाला त्याच सर्वथैव योग्य आहेत. म्हणून त्यांचे-कडून संसाराच्या इतर गोष्टींबरोबर या दृष्टीनेंही बालसंगोपन होईल, अशा तऱ्हेचेंच म्हणजे विचक्षण सुगृहिणी व वरिांच्या सन्माता करणारेंच त्यांस स्त्री-शिक्षण दिलें पाहिजे, हीं पहिली गोष्ट. कारण असें अल्पवयांतील संस्कार, हट-कून परिणामकारक व दृढमूल होतात. पुढें वयाबरोबर मुलांची ग्राहकशक्ति, रसिकता व कल्पक आणि चिकित्सक बुद्धि जशी वाढेल त्या मानानें, सशास्त्र, उच्चतर पाठ व प्रयोग वाढवीत नेण्याचें काम विशेषतः पुरुषवर्गाचें आहे.

रूढ कर्मठ मार्गाविरहित अशा या पवित्र धर्मकार्याकरितां वाढता द्रव्यनिधि उभारून अधिकार श्रेणीनें स्त्रीपुरुषांचीं निरनिराळीं पण एकाच नियंत्रणाखालीं काम करणारीं मंडलें व महामंडलें स्थापून त्यांचा संबंध सन्मानार्थ मुख्य आचार्यपीठापर्यंत भिडवावा. इतर प्रौढ मंडळींच्या व पालकांच्या मनावर इष्ट तत्त्वांचा वरचेवर परिणाम करण्याकरितां व प्रचारकांचें काम करण्याकरितां द्रव्य खर्चून लायक स्त्रीपुरुष तयार करावेत; व त्यांनीं मुद्दाम तयार केलेलीं व्याख्यानें देऊन, कीर्तनें करून व पुराणें सांगून आणि चलचित्रपट दाखवून प्रौढ मनें तयार करावीं व ठिकठिकाणीं नवीन मंडलें स्थापून त्यांचा संबंध महामंडलांशीं जोडावा; व मंडलांस द्रव्य मिळ-वून द्यावें. मंडलाधिकाऱ्यांनीं आपल्याला अभिप्रेत अशा तत्त्वांचें परिणाम-कारक प्रतिपादन, उत्तेजक व सुगम भाषेंत करणारे सोदाहरण सुंदर पाठ व धडे, क्रमिक पुस्तकांत चढत्या क्रमानें घालून तज्ज्ञांकडून, सचित्र क्रमिक पुस्तकें तयार करवावीं. शाळेंतील नेहमींच्या अभ्यासाला व्यत्यय न येईल, अशाबेतानें या

पुस्तकांवरून रोज थोडथोडें शिक्षण कसें द्यावें हें आईबाप वगैरे पालकांस समजावून सांगावें, व तें काम त्यांनीं अगत्यपूर्वक करावें म्हणून मनावरील संस्कारांची अवश्यकता, आणि त्यांचें महत्त्व व पावित्र्य हेंही त्यांच्या मनावर ठसवावें. दुसरेही शिक्षित शिक्षक (ट्रेन्ड मास्तर) या कामाकरितां पुरेसें वेतन देऊन मुद्दाम तयार करावे. त्यांनीं मधून मधून ठरलेल्या दिवशीं चाळींतील वाडींतील, आळींतील किंवा गावांतील मुलांचे, संख्येच्या मानानें गट करून पालकांसमक्ष थोडथोडा वेळ वर्ग चालवून दाखवावें. सर्वसाधारण ज्ञानवृद्धि करितां व करमणुकीकरितां, मुलांना व मुलींना जरूरीपुरती आरोग्याची, व्यवहाराची, नीतीची व पदार्थविज्ञानशास्त्राची, चमत्कारिक शोधांची व इतर सार्वजनिक व राजकीय माहिती ही वरवर त्रोटक द्यावी. वरिष्ठांनींही ठिकठिकाणीं संचार करावा, मंडलांची व्यवस्था तपासावी, मुलांच्या परीक्षा घ्याव्या व मुलांच्या शरीराचें व मनाचें आरोग्य, अपेक्षेप्रमाणें वाढत आहे किंवा नाहीं, तें पाहून त्याप्रमाणें शिक्षणाच्या दिशेंत व अन्य गोष्टींत मंडलांचे चालकास, शिक्षकांस व पालकांस योग्य सूचना देऊन सर्वांस द्रव्यानें अगर शब्दानें उत्तेजन द्यावें. आणि मंडलांचा व्याप तीं एकमेकांशीं व मुख्य संस्थेशीं सुसूत्र राहतील, अशा शिस्तीनें व नियमबद्धतेनें सर्व देशभर कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें पसरावा.

## त्रोटक समारोप व वाचकांचा प्रेमळ निरोप.

राजकीय, औद्योगिक, सामाजिक वगैरे ज्या अनेक चांगल्या चांगल्या संस्था व चळवळी देशांत चालवायच्या असतील, त्या यशस्वी होण्याला अशा तऱ्हेची गृह-शिक्षणाची चळवळ मुख्य पायादाखल आहे. कारण या चळवळीनें कोणत्याही संस्थांच्या भावी चालकांची व सभासदांची मुख्य मनेंच तयार व्हायचीं आहेत. इतर शिक्षणसंस्थांतून दुसऱ्या पुष्कळ गोष्टी शिकवितात, औद्योगिक व बौद्धिक माहितीही देतात. पण शीलसंवर्धन करणारें व उत्तम नागरीक बनविणारें जें मानसिक शिक्षण, तें आपल्या मुलांस आपल्या संस्कृतिनुरूप तेथें मिळत नाहीं, म्हणून तेथील शिक्षण सदोष असतें, असें आपण सकारण म्हणतों ना? म्हणून तें **अभ्युदयकारक मानसोन्नति करणारें शिक्षणच फक्त मुख्यतः या गृहशिक्षणाचें ध्येय आहे.** आणि मनाच्या बऱ्यावाईट स्थितिवरच तर जगांतील सर्व घडामोडी कशा चाललेल्या आहेत, हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां या गृहशिक्षणाच्या चळवळीनें—ती सद्धेतुपूर्वक, सुनिश्चयानें, सशास्त्र पद्ध-

[१९५]. ३२९०

तीनें, धर्मकर्तव्य म्हणून, धार्मिक पवित्र भावनेनें देशांत व्यापकपणानें चालू केल्यास भावी पिढींतील तरुण, उच्छृंखल, उदासीन, स्वाभिमानशून्य, कलह-प्रिय, स्वार्थपर वगैरे अराष्ट्रीय दुर्गुणांनीं न बिघडतां 'स्वार्थो यस्य परार्थ एवं' या उदात्त भावनेनें व अकुतोभयवृत्तीनें प्रसंगविशेषीं उद्भवलेलीं, वाटतील तीं देशकार्यें यथाशक्ति, यथामति करण्यास सदैव उत्सुक असेच होतील यांत काय संशय? मानसोन्नति झालेल्या शीलवानांच्याच अंगीं असले गुण दिसून येतात. तेव्हां त्याना कोण नामर्द अथवा भीरु म्हणेल? आयतें असलेलें जिव्हाळ्याचें पाठबळ Backforce नाहींसें करून व समाज विस्कळित, नाउमेद व उदासीन करून पोटजातींतील सर्वथैव निर्दोष, अशा मिश्रविवाहांसही बंदी करून जन्मायत्त शुद्धाशुद्धता व श्रेष्ठकनिष्ठपणा मानणारी जातिसंस्था व व्यक्तिविषयक आवडीनिवडी-प्रमाणें उपास्यउपासना ठरविणारे कलहकारक पंथोपपंथ, तसेंच परंपरेनें चालत आलेल्या कांहीं रूढ वेडगळ समजुतींनीं शरीर व मन भेकड आणि पंगू करणारे अनेक खुळचट आचारविचार व परकीयांच्या मोहक व चवचाल संसर्गानें जडलेल्या घातुक संवयी **नामर्दपणा उत्पन्न करणारीं सर्व कारणें**, लहानपणा-पासून गृहशिक्षणांतील विचक्षण, उदात्त व उत्तेजक अशा **मानसिक संस्कारांनीं** लोकहितार्थ तयार झालेल्या उत्साही तरुणांच्या सुविचार प्रभंजनापुढें, वाळलेल्या पाचोळ्याप्रमाणें उडून जातील. सुसंघटित होऊन प्रगमनशीलपणानें वागणाऱ्या असल्या धीरवीर युवकांना यःकश्चित् मुसलमानांवर सरशी म्हणजे हातचा मळ वाटेल. असल्या संकुचित व क्षुद्र कार्यक्षेत्रांतच रमत न बसतां, येथील काम सहज उरकून—म्हणजे त्यांनाही आपल्यासारखें तात्काळ करून—त्यांचीं पावलें प्रथम राष्ट्राच्या व मग पुढें अखिल मानवजातीच्याही हिताचें काम करण्याच्या अधिक विस्तीर्ण आणि अधिक पवित्र अशा क्षेत्राकडे त्यांस नेतील. आणि खरोखर त्यांच्या उत्साहास आणि पराक्रमास तेंच क्षेत्र योग्य ठरेल. व **तेथेंच विजयशाली होणाऱ्यास खरा वीर अथवा मर्द ही पदवी शोभेल.** म्हणून देशोद्धारार्थ चालणाऱ्या अनेक चळवळींत **पायाशुद्धीकरितां** धार्मिक पवित्रतेनें सर्व देशभर व घरोघरीं द्यावयाच्या गृहशिक्षणाच्या या नूतन व्यापक मानसोपचारी चळवळीचा प्रामुख्यानें समावेश करण्याचें व शीलसंवर्धक व मानसोन्नतिकारक देशी विद्यालयें घरोघर निर्माण करण्याचें कर्तृत्ववान् लोकधुरीणांचे व स्वदेशाभिमानी उदार धनिकांच्या मनांत लवकरच येवो, अशी इच्छा करून, जनताजनार्दनाच्या अल्प वाङ्मयसेवेंतून एवढ्यापुरता मोकळा होतों.

REFBK-0003290